# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. २/२००७.** **दिनांक १७.०२.२००७**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी ३.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २००७ रोजी दुपारी २.३० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१८१९-२००७, दिनांक ०२ फेब्रुवारी, २००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा पुढे ढकलण्यात येऊन ती शुक्रवार दिनांक १६.२.२००७ रोजी दुपारी २.३० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२०२८-२००७, दिनांक ०८ फेब्रुवारी, २००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानंतर काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा शुक्रवार दिनांक १६.२.२००७ ऐवजी शनिवार दिनांक १७.२.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२२२४-२००७, दिनांक १० फेब्रुवारी, २००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक १७फेब्रुवारी, २००७ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२. | मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४. | मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०७. | मा.श्रीमती रिम्पल लोहिया | ०८. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९. | मा. श्री.रमाकांत गणेश कर्णिक | १०. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ११. | मा.डॉ.प्यारेलाल तिवारी | १२. | मा.श्रीमती सुमित्रा कैलास कोते |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, यांनी दूरध्वनीद्वारे तसेच मा.श्री समि खतिब,मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.श्री. कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय यांनी पत्राव्दारे कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित रहाणेची अनुमती दिली.

तसेच सुरुवातीस मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांना पुणे विद्यापीठाचा "जीवन साधना गौरव" पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा शाल श्रीफळ व श्रींची मुर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांनी माजी विश्वस्त भिमाशंकर खांबेकर यांचे निधनाबद्दल दु:खवट्याचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

"श्रीसाईबाबांचे निस्सीम भक्त, कॉंग्रेस पक्षाचे पाईक, गेली पाच दशके सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या व्यक्तीमत्वाचा ठसा उमटविणारे, श्रीसाईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त व शिर्डी ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच मा.श्री.भिमाशंकर व्यंकोजी खांबेकर यांचे दिनांक २४.१.२००७ रोजी दु:खद निधन झालेले आहे. श्री.खांबेकर यांचे कुटुंबीयांचे दु:खात सर्व विश्वस्त, संस्थानचे कर्मचारी सहभागी आहोत"

या सभेने कै.खांबेकर यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

यानंतर मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी व्यवस्थापन मंडळाचे सभेच्या तारखांमध्ये होणारे बदल व ऐनवेळेच्या विषयाबाबत एक पत्र मा.अध्यक्ष महोदय यांना दिले, त्याची नोंद घेण्यात आली.

यानंतर मा.विश्वस्त डॉ. गोंदकर यांनी तब्येत बरी नसल्याचे सांगून ते सभागृहातून बाहेर गेले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दि.०६.०१.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निणर्य क्र.११३** दि.२५.११.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**०१) निर्णय क्र.१५ मधील शेवटचा परिच्छेद-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन नविन प्रसादालयाचे गॅस प्लँट उभारणीकरीता तज्ञ सल्लागार म्हणून मे.सफेस क्वालिटी मॅनेजमेंट प्रा.लि.मुंबई यांचे दर स्वीकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले."

**याऐवजी**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन प्रसादालयाचे गॅस प्लँट उभारणीकरीता व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.११.२००६ चे सभेतील निर्णय क्र.८८३ अन्वये रुपये ८०,००,०००/-(रुपये ऐंशी लाख मात्र)

चे खर्चास मान्यता देण्यात येऊन, तज्ञ सल्लागार म्हणून मे.सफेस क्वॉलिटी मॅनेजमेंट, प्रा.लि.मुंबई यांचे दर स्वीकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले." (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**०२) निर्णय क्र.३४ मधील शेवटचा परिच्छेद-**

"उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या अ.नं.०२ नुसार प्रति आर रक्कम रुपये १,७६,०००/- मात्र या दराने सर्व्हे नंबर १०७ पैकीचे एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ८५ आर ०० चौरस मीटर संबंधीत जमीनमालक देण्यास तयार असल्यास, ही जमीन थेट खरेदी करण्यात यावी. तसेच मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना सदरील जमिनीचा ताबा संस्थानला वर नमुद केलेला विकास प्रकल्प राबविणेकामी लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने थेट खरेदी करीत असल्यामुळे त्यांचेकडे सुरु असणारे भूसंपादनाचे माध्यमातून कन्सेन्ट आवार्डने जमीन घेणेबाबतचे प्रकरण मागे घेण्यात येत असल्याबाबत कळविण्यात यावे. भूसंपादन प्रकरण मागे घेतल्यामुळे, रद्द करावे लागल्याने आतापर्यन्त शासनामार्फत करण्यात आलेल्या भूसंपादन कार्यवाहीपोटी शासन नियमानुसार ०३ टक्के आस्थापना शुल्क भरणेत यावे तसेच भूसंपादन कार्यवाहीसाठी भरणेत आलेली दोन तृतीयांश रक्कम परत घेणेबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील जमीन थेट खरेदी करणेकामी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबी पूर्ण करणेसाठी येणाऱ्या आवश्यक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. "

**<u>याऐवजी</u>**

**"**आजचे सभेपूढे श्री कैलास गोविंदराव कोते व इतर यांनी असे नमूद केले की सर्व्हे नं. १०७ मधील एकूण २ हेक्टर ८५ आर जमीनीकरीता रुपये १६००/- प्रति चौ.मी. अधिक १०% असा दर संस्थानने आम्हाला देऊ केला आहे.सदरचा दर आजच्या बाजार भावाचा विचार करता फारच कमी आहे. संस्थानच्या साई आश्रम प्रकल्पासाठी आमची जमीन देण्यास हरकत नाही मात्र आम्हास योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे. आमची जमिन ही सर्व्हे नं. १०८ मधील श्री बच्छानी यांचे जमिनी लगत आहे. त्यामूळे त्यांना देण्यात येणाऱ्या रेडीरेकनरचा दर रुपये २७००/- प्रति चौ.मि. अधिक १०% याप्रमाणे मिळावा अशी विनंती केली.

त्यांचे विनंतीबाबत चर्चा होऊन साई आश्रम प्रकल्पासाठी जमीनीची आवश्यकता, संस्थान लगतची जमीन या परिसरातील जमीनीच्या किंमती या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन रेडिरेकनरनुसार प्रति चौरस मिटर रुपये १६००/- मात्र याप्रमाणे प्रति आरला रक्कम रुपये १,६०,०००/- अधिक २०% जादा रक्कम नुसार प्रति आर रक्कम रुपये १,९२,०००/- या दराने स.नं. १०७ पैकीचे एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ८५ आर क्षेत्र संबंधित जमिन मालकांकडून थेट खरेदी करण्यात यावी. तसेच मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना सदरील जमिनीचा ताबा संस्थानला वर नमुद केलेला विकास प्रकल्प राबविणेकामी लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने थेट खरेदी करीत असल्यामुळे त्यांचेकडे सुरु असणारे भूसंपादनाचे माध्यमातून कन्सेन्ट आवार्डने जमीन घेणेबाबतचे प्रकरण मागे घेण्यात येत असल्याबाबत कळविण्यात यावे. भूसंपादन प्रकरण मागे घेतल्यामुळे, रद्द करावे लागल्याने आतापर्यन्त शासनामार्फत करण्यात आलेल्या भूसंपादन कार्यवाहीपोटी शासन नियमानुसार ०३ टक्के आस्थापना शुल्क भरणेत यावे तसेच भूसंपादन कार्यवाहीसाठी भरणेत आलेली दोन तृतीयांश रक्कम परत घेणेबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील जमीन थेट खरेदी करणेकामी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबी पूर्ण करणेसाठी येणाऱ्या आवश्यक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. " (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०३) निर्णय क्र.३९ मधील शेवटचा परिच्छेद-**

"उपरोक्त प्रमाणे सदरचे कामासाठी एकूण रु.६,७५,०००/- इतका खर्च येणार आहे. यापुर्वी श्री साईबाबा रुग्णालयातील सेंट्रल ऑक्सिजन, नायट्रस, व्हॅक्युम सिस्टिमचे काम मे.अलमेड ईक्वीपमेटं, मुंबई यांनी केलेले आहे. सदरचे कोटेशनवर डॉ. पी. एल. तिवारी यांनी वरील कामाबाबत शिफारस केलेली आहे.

मे. अलमेड इक्वीपमेटं यांनी ५०% रक्कम आदेशासोबत, तर उर्वरीत रक्कम मालाची डिलेव्हरी दिलेनंतर मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

**<u>याऐवजी</u>**

"उपरोक्त प्रमाणे सदरचे कामासाठी एकूण रु.६,७५,०००/- इतका खर्च येणार आहे. याचवेळी मे.डायमंड इलेक्ट्रॉनिक, मुंबई व सुप्रिम मेंडिकल, मुंबई यांनी सदर कामासाठी त्यांचे दरपत्रक सादर केलेले असून त्यांचे दरपत्रकाप्रमाणे वरील कामासाठी अनुक्रमे रुपये ९५१२२५ व रुपये ८,७१,८७५.०० एकूण खर्च येणार आहे. मे.अलमेड इक्वीपमेंट,मुंबई यांनी यापूर्वी काम केलेले असून त्यांना सदर कामाचा अनुभव असल्याने मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी शिफारस केलेली आहे.

मे. अलमेड इक्वीपमेटं यांनी ५०% रक्कम आदेशासोबत, तर उर्वरीत रक्कम मालाची डिलेव्हरी दिलेनंतर मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. " (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४) निर्णय क्र.५३ मधील शेवटचा परिच्छेद-**

" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील उपहारगृह सध्या ज्या पध्दतीवर चालू आहे तिच पध्दत चालू ठेवावी त्यामध्ये कोणताही बदल करु नये व धर्मशाळा विभागाकडील उपहारगृहासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करण्यात यावी असे ठरले."

**याऐवजी**

" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील उपहारगृह सध्या ज्या पध्दतीवर चालू आहे तिच पध्दत चालू ठेवावी त्यामध्ये कोणताही बदल करु नये व धर्मशाळा विभागाकडील उपहारगृहासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करण्यात यावी . जाहिरात देऊन नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यन्त अथवा तीन महिने यापैकी जे आधी घडेल तोपर्यन्त सध्याचे असलेले ठेकेदार श्री शंकर शेट्टी, शिवालया केटरर्स, मुंबई यांना 'आहे त्याच अटी-शर्तीवर ' दिनांक १७.२.२००७ पासून मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले." (कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२ व्यवस्थापन समितीचे दि. २५.११.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.११४.** दिनांक २५.११.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०३ दिनांक ११.०१.२००७ व दिनांक १.०२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निणर्य क्र.११५.** व्यवस्थापन समितीचे दि.११.०१.२००७ व दिनांक १.०२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**अ) दिनांक ११.०१.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त-**

**(०१) नियोजित हॉस्पिटलच्या प्रकल्प अहवालाच्या बीलावरील सर्व्हिस टॅक्स बाबत**

नियोजित श्री साईबाबा हॉस्पिटलचा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी डॉ.विनय कोठारी,मुंबई यांना दिनांक ८.५.२००६ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २१५ अन्वये रुपये २,५०,०००.०० मानधन देण्याचे ठरले आहे. या रकमेत सर्व्हिस टॅक्सचा स्वतंत्र उल्लेख नसल्यामूळे कर समावेशक असल्याचे गृहीत धरुन रुपये २,५०,०००.०० आदा करण्यात आलेले आहे.

प्रकल्प अहवालाच्या बीलापोटी रुपये ३,३०,६००.०० चे देयक (सर्व्हिस टॅक्स १०.२०%सह) सादर केले होते. डॉ.विनय कोठारी यांनी मानधनाच्या बिलावरील सर्व्हीस टॅक्सची मागणी केलेली आहे. यावर संस्थानचे कर सल्लागार श्री कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडे सर्व्हिस टॅक्स देणेबाबत मार्गदर्शन मागविले असता मानधनाच्या बिलावर सर्व्हिस टॅक्स लागू असतो असे दुरध्वनीवरुन सांगितले आहे.

मा.व्यवस्थापनन समितीचे निर्णयात मानधन रुपये २,५०,०००.०० ठरवितांना सर्व्हिस टॅक्सचा स्वतंत्र उल्लेख केलेला नाही. प्रकल्प अहवालाच्या मानधन बिलापोटी डॉ.कोठारी यांनी सुधारित देयक क्र. ३०७०/१०/११/२००६ रुपये २,७५,५००.०० सादर केले आहे. त्यामध्ये सर्व्हिस टॅक्स १०.२% रुपये २५,५००.०० स्वतंत्र दर्शविला आहे. बिलावर सर्व्हिस टॅक्स नंबर AABCH2650MST001 नमूद केला आहे. या बिलापोटी रुपये २,५०,०००.०० अदा करणेत आलेले आहेत. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी सदरहू सर्व्हिस टॅक्स देणेबाबत शिफारस केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

य़ावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ८.५.२००६ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २१५ अन्वये रुपये २,५०,०००.०० मानधन देण्याचे ठरले आहे. या रकमेत सर्व्हिस टॅक्सचा स्वतंत्र उल्लेख नसल्याने डॉ.विनय कोठारी यांची विनंती अमान्य करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०२) ई.सी.जी.मशिन बायबॅकबाबतचे कोटेशन उघडणेबाबत.**

सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०३) रुग्णालयासाठी साबन,निरमा,बॅटरी सेल इत्यादी खरेदी बाबत**

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी साबण, निरमा, बॅटरी सेल (मोठे, मध्यम व लहान) ची आवश्यकता असते. सदरची खरेदी हि एक वर्षाकरीता (सन २००७ - २००८) करावयाची असून त्याची तपशीलवार माहीती खालील प्रमाणे -

| अ.न. | वर्णन | दरमहा खप | वार्षिक मागणी | शिल्लक साठा दि.३१/१२/०६ | निव्वळ मागणी | अंदाजे रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | लाईफबॉय साबण १५० ग्रॅम | २०० | २४०० | ३४४ | २०५६ | ११.१२ | २२८६२.७२ |
| ०२ | निरमा पावडर १ किलो पॅक | ७० | ८४० | ६२ | ७७८ | १९.५० | १५१७१.०० |
| ०३ | बॅटरी सेल मोठे (पत्र्याचे) निप्पो हायपर | ४० | ४८० | ११९ | ३६१ | ८.८८ | ३२०५.६८ |
| ०४ | बॅटरी सेल मेडीयम (पत्र्याचे) निप्पो हायपर | ४० | ४८० | २७१ | २०९ | ६.६७ | १३९४.०३ |
| ०५ | बॅटरी सेल छोटे (पत्र्याचे) निप्पो हायपर | ५० | ६०० | २०२ | ३९८ | ३.२० | १२७३.६० |
| | | | | | एकूण रु. | | ४३९०७.०३ |

उपरोक्त प्रमाणे एक वर्षाकरीता सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.४३९०७.०३ ( रु. त्रेचाळीस हजार नऊशे सात मात्र) खर्च अपेक्षित असून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचे साहित्य शिर्डी,कोपरगांव,राहाता,अहमदनगर,नाशिक येथील विक्रेत्यांकडून कोटेशन्स मागणी करुन खरेदी करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०४) ई.सी.जी मशिनसाठी ट्रॉली खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये E.C.G मशिन ठेवण्यासाठी E.C.G मशिन ट्रॉलीची आवश्यकता आहे. सदर ट्रॉलीची श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिसेविका कार्यालयाने दि. ०८/०१/२००७ चे डि. पी. अन्वये १० नगाची मागणी केलेली आहे.

सदर ट्रॉली खरेदीकामी प्रती नग रु. ९२००/- याप्रमाणे एकुण १० नग E.C.G मशिन ट्रॉली खरेदीस रु. ९२०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे १० नग E.C.G मशिन ट्रॉली हि विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ९२,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०५) ग्लूकोमीटर मशिनसाठी लागणाऱ्या ग्लूकोस्टीक strips खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा व साईनाथ रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांची ब्लड शुगर तपासणे कामी ग्लुकोमीटर वापरले जाते. सदर ग्लुकोमीटरसाठी लागणा-या स्ट्रिप्स (Accuchek) या नेहमी लागत असतात. दोन्ही रुग्णालयास दरमहा साधारणत:१५ बाटल्याची अवश्यकता असते. एका बाटली मध्ये ५० Strips असतात. एका बाटलीची किंमत अंदाजे रु.१२०० पर्यंत आहे.

सदरच्या स्ट्रिप्स एका वर्षाकरीता खरेदी करावयाच्या आहे. एका वर्षाकरीता १८० बॉटल लागणार असुन त्यासाठी अंदाजे रु. २,१६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे १८० बॉटल ग्लुकोस्टीक स्ट्रिप्सची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु. २,१६,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्लूकोमीटर मशिनसाठी लागणाऱ्या ग्लूकोस्टीक strips खरेदीकामी स्पेसिफिकेशन्स व कंपनी निश्चित करुन कोटेशन्स मागविण्यात यावीत. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,१६,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०६) एम.आर.आय.मशिनचे टर्न की कामाबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयात लागणाऱ्या एम.आर.आय. मशिनचे खरेदीसाठी दि.१४.१०.२००६ चे सभेतील निर्णय क्र.८६० अन्वये इकडील पत्र क्र.१५८९५ दि.१३.११.२००६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदर मशिनची किंमत ५ कोटी ५ लाख इतकी आहे.

सदर मशिन बसवुन कार्यान्वीत करणेसाठी (Turnkey) कराव्या लागणाऱ्या कामाबाबत आपण वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती व निविदाधारकाने मशिनचे किंमतीसोबत सदर कामाचे देखील दर द्यावयाचे होते. परंतू जाहिरात दिल्यानंतर मशिन कोठे बसवयाचे याची जागा निश्चित नसल्यामुळे "टर्न की" च्या कामाबाबत चर्चा / वाटाघाटी करण्यात आल्या नव्हत्या.

सदरचे एम.आर.आय. मशिन बसवण्याची जागा निश्चित करण्यात आली असून मे.सिमेन्स लि.,मुंबई या कंपनीचे प्रतिनिधीने जागेचे पहाणी करुन मशिनपुर्वी करावयाचे कामाबाबतचा सविस्तर तपशिल दि.२८.१२.२००६ चे पत्रान्वये कळविले आहे तो खालीलप्रमाणे-

{01} Demolishing walls and modifying walls in the MRI area & makeing it as per required layout .

{02} Create opening in the hind wall for bringing in the magnet, closing the same externally and finishing the same.

{03} Strengthening the floor to meet Magnet floor loading.

{04} Preparing RF cabin floor area.

{05} Making chiller platform and covering chiller with aesthetical looking enclosure (Only sides)
{06} Providing A/C, installing with ducting as per requirement.
{07} Making the interiors and exterior (exposed side in console room) of the RF cabin including false ceiling, flooring, electricals & lighting inside RF cabin area.
{08} Cordoning the 0.5mT boundary.
{09} Dismantling the existing x-ray unit, shifting to the new location and reinstalling.
{10} Providing and installing mains panel, emergency switches, ON/OFF station and electrical service points as indicated in our electrical layout.

सदरचे कामासाठी त्यांनी एकुण रु.१०,७५,०००/- इतका खर्च कळविला आहे. मे.सिमेन्स लि., मुंबई हे सदरचे काम कोणताही नफा न घेता करणार आहे. मे. सिमेन्स लि. मुंबई यांनी सदरचे पत्रात कार्यादेशासोबत ५० टक्के आगाऊ रक्कम, "टर्न की" चे काम पुर्ण झाल्यांनतर ४० टक्के व एम.आर. आय. मशिन बसवुन कार्यान्वित केल्यांनतर १० टक्के रक्कम अशी मागणी केलेली आहे. सदरचे पत्र दि.२९.१२.२००६ रोजी मा.विश्वस्त डॉ.पी.एल. तिवारी साहेब यांना फॅक्स करणेत आले होते. त्यावर मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी साहेब यांनी सदरचे काम तातडीने चालू करणेबाबत आदेश दिलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मे.सिमेन्स लि,मुंबई यांचेशी दुरध्वनीव्दारे त्यांनी देऊ केलेले दरात सुट देणेबाबत विश्वस्तांनी विनंती केली असता ती त्यांनी अमान्य केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एम.आय.आय. मशिनचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे त्याच कंपनीकडून काम करुन घेतल्यास तांत्रिक बाबींची अडचण येणार नाही तसेच त्यांनी दिलेले दर हे कोणताही नफा न घेता दिलेले आहे त्यामुळे मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०७ <u>मे.सिमेन्स लि. या कंपनीच्या व्हेन्टीलेटरचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत...</u>**

श्रीसाईनाथ रुग्णालयातील अतिदक्षता विभागात सन २००० साली अत्यवस्थ रुग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देण्यासाठी मे.सिमेन्स लि.मुंबई या कंपनीचे एक व्हेन्टीलेटर हे मशिन एकुण रु.७,३९,२९९/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे.

सदर मशिनची अतिदक्षता विभागातील अत्यवस्थ रुग्णांना तातडीने आवश्यकता असल्यामुळे नेहमी वापरावे लागते. त्यामुळे सदरचे मशिन नेहमी अद्यावत असावे लागते. यापुर्वी सदरच्या मशिनचे मे.सिमेन्स लि.मुंबई यांचेकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले नव्हते. त्यामुळे सदरचे मशिनला दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे स्पेअर पार्ट कंपनीकडून वेळच्या वेळी उपलब्ध होत नव्हते व मशिन आवश्यकता असेल तेंव्हा वापरता येत नव्हते.सध्या सदरच्या व्हेन्टीलेटर (Servo ९०० C) मशिनची सर्व्हीस मे.सिमेन्स लि.मुंबई यांनी मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडे हस्तांतरीत केली आहे. तसे मे.सिमेन्स लि.मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.डीआर /केडी दि.१०.०६.२००४ व मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांनी त्यांचे ऑगस्ट २००४ चे पत्रान्वये कळविले आहे. सदरच्या मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे पत्र क्र. डब्ल्यु एल /१९० दि.०७.०७.२००६ अन्वये वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचे पेपर्स पाठविले आहेत व सर्व करांसहीत एकुण रु.३२,०००/- (अक्षरी रु.बत्तीस हजार मात्र) इतक्या रकमेची आगाऊ मागणी केली आहे. सदरच्या मशिनचे स्पेअर पार्ट हे फक्त मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडेच मिळतात. त्यामुळे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडेच करावे लागेल. तरी अतिदक्षता विभागातील मे.सिमेन्स लि.मुंबई या कंपनीच्या व्हेन्टीलेटर (Servo ९०० C) या मशिनचे मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यास व मे.मॅक्वेट इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना रु.३२,०००/-इतकी रक्कम आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सिमेन्स लि.,या कंपनीच्या व्हेन्टीलेटरचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी त्याच कंपनीकडून वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०८) <u>नवीन प्रसादालय विभागासाठी कुंड्या खरेदी करणे बाबत</u>**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निणर्यान्वये श्रीक्षेत्र येथे भेट देणा-या हजारो साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास व विना विलंब मिळावी या दृष्टीने अंदाजे ५५०० भक्त एकाच वेळेस प्रसाद भोजन घेवू शकतील असे अद्ययावत प्रसादालय इमारतीचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर असून काही महिण्यात हे काम पूर्ण होईल.

सध्या सुरु असलेल्या या सुसज्ज इमारतीला शोभेसे असे लॅन्डस्केपींग करणे व शोभेची झाडे लावणे प्रस्तावीत आहे. प्रसादालयसंदर्भामध्ये झालेल्या बैठकित मा.विश्वस्त श्रीमती.उर्मिला जाधव यांनी प्रसादालय इमारत पुर्णत्वास येईपर्यत शोभेची झाडे कुंडयामध्ये वाढवून नंतर त्याचे प्रसादालय परिसरामध्ये रोपण करणेबाबत सूचविलेले आहे.कुंडयामध्ये झाडे वाढविल्यामुळे प्रसादालय इमारत सुरु करणेपुर्वी त्यांचे रोपण केल्यास साईभक्तांना सुंदर नैसगिक वातावरणात प्रसाद घेतल्याचा वेगळाच आनंद मिळणार आहे.

शोभेची रोपे वाढविण्यासाठी ९०० कुंड्याची आवश्यकता आसून प्रति कुंडी रु.१२५ /- दराने साधारण रु.१,१२,५००/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरहू खरेदी कोटेशन्स मागवून करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंटेक्स निलकमल,इत्यादी नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागवून नवीन प्रसादालय विभागासाठी ९०० नग कुंड्या खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१२,५००.०० चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**(०९) <u>दुरध्वनी यंत्रणेसाठी आणखी एक नवीन पीआरआय लाईन घेणे बाबत</u>**

संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, **Siemens Hipath 4300 IP** ही अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून माहे ऑगस्ट, २००४ मध्ये खरेदी करुन, भारत संचार निगम लि., यांचेकडून घेण्यात आलेल्या एका पीआरआय लाईनव्दारे कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या पीआरआय लाईनव्दारे २५८५०० ते २५८९९९ असे एकूण ५०० अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन देण्याची सुविधा भारत संचार निगम लि., शिर्डी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. आतापर्यंत संस्थानचे विविध विभागांत संपर्कासाठी ४२५ दूरध्वनी कनेक्शन जोडून देण्यात आलेले आहे.

श्रीसाईभक्तांना सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत नुकतेच श्री साईबाबा हॉस्पिटल (Super Speciality Hospital) सुरु करण्यात आलेले असून, तेथे ९७ अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर नविन प्रसादालय व श्री साईभक्तांच्या निवासासाठी व्दारावती या भक्तनिवासाचे कामकाजही जोरात सुरु आहे. तसेच विविध विभागांचे कामकाज वाढत असल्याने, या ठिकाणी दूरध्वनींची मागणी वाढत आहे. सध्या संस्थानचे घेतलेल्या पीआरआय लाईनमधून ७५ दूरध्वनी कनेक्शन देण्याची क्षमता शिल्लक आहे.

उपरोक्तप्रमाणे,नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्रसादालय, व्दारावती भक्तनिवास तसेच विविध विभागांची मागणी व संस्थानचा वाढता विस्तार लक्षात घेता, भारत संचार निगम लि., यांचेकडून १००० दूरध्वनी कनेक्शन देण्याची क्षमता असणारी आणखी एक पीआरआय लाईन घेणे अत्यंत गरजेचे आहे. नव्याने घ्याव्या लागणाऱ्या पीआरआय लाईनबाबत भारत संचार निगम लि. शिर्डी यांचेशी चर्चा केली असता, ते संस्थानसाठी आणखी एक नवीन पीआरआय लाईन देणेस व या लाईनव्दारे २५९००० ते २५९९९९ पर्यंतचे १००० नंबर आरक्षित करण्यास तयार आहेत. सदर पीआरआय लाईन भारत संचार निगम लि. शिर्डी यांचेकडून घेणेसाठी कनेक्शन डिपॉझीट रुपये १५,०००/- व वायरींग चार्जेस रुपये ५,०००/- असे अंदाजे रुपये २०,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, संस्थानचे दूरध्वनी यंत्रणेसाठी भारत संचार निगम लि., यांचेकडून आणखी एक नवीन पीआरआय लाईन घेणेस व यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २०,०००/- पर्यंतचे खर्चास तसेच सदर पीआरआय लाईनव्दारे २५९००० ते २५९९९९ पर्यंतचे १००० नंबर आरक्षित करुन ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**(१०) <u>ध्वनीक्षेपण विभागासाठी यु.पी.एस खरेदी बाबत</u>**

ध्वनिक्षेपण-सीसीटीव्ही विभागामार्फत श्रीसाईबाबा समाधी मंदिरात होणाऱ्या चार आरत्यांसाठी माईक व्यवस्था केली जाते तसेच मंदीर परीसरात आरतीच्या व्यतिरिक्त साई मंत्रांच्या, भजनांच्या तसेच प्रवचन व किर्तनांच्या सी.डी. लावल्या जातात व त्या आधारे मंदीर परीसर व शिर्डी गांवात दूरवर ध्वनीक्षेपकामार्फत आवाज दिला जातो.

ज्यावेळेस माईक वरून आरती किंवा सी.डी. द्वारे मंत्र चालू असतात तेंव्हा संस्थान परीसरात एम.एस.इ.बी. मार्फत घेतलेला सप्लाय बंद झाल्यानंतर जनरेटर मार्फत सप्लाय चालू होणेसाठी सुमारे ३० ते ४० सेकंदांचा वेळ लागतो, त्या वेळेत आरती किंवा इतर कार्यक्रम चालू असतात ते बंद पडून त्यामध्ये व्यत्यय येतो.

यासाठी ध्वनिक्षेपण विभागाने ठेवलेल्या प्रस्तावान्वये दिनांक १६ आक्टोबर, २००२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र. ४९६ अन्वये २३०V, ३ किलोवॅट क्षमतेचा TVS कंपनीचा एक युपीएस दिनांक २१ मार्च, २००३ रोजी ६१,०००/- रूपयांना खरेदी केलेला आहे. सदर युपीएस आजपर्यंत विनाखंड चालू आहे.

सध्या श्रींच्या मंदीरात व संस्थान परीसरात संरक्षणाच्या दृष्टीने बसविलेल्या सुमारे २५ कॅमेऱ्यांचे दृष्य D.V.R. मध्ये रेकॉर्डींग होते व टी.व्ही. वर दिसते, त्याचे सर्व प्रकारचे काम व मेन्टेनन्स ध्वनिक्षेपण विभागामार्फत केले जाते.

परंतु महाराष्ट्र वीज बोर्डाची वीज गेल्यास जनरेटर चालू होईपर्यंत कॅमेरे (सिस्टीम) बंद पडतात व त्या काळातील व्हीडीओ रेकॉर्डींग बंद पडते शिवाय प्रत्येक वेळेस चालू असलेले जनरेटर

बंद होवून महाराष्ट्र बोर्डाची वीज २३० व्होल्टेज पेक्षा जास्त येण्याची शक्यता असते त्यामुळे सिस्टीममध्ये असलेले कॅमेरे, डीव्हीआर, पॉवर सप्लाय (कॅमेऱ्याचे इलीमीटर) इ. यंत्रणा बिघडण्याची शक्यता असते, युपीएस द्वारे व्होल्टेज नियंत्रित केले जाते.

वरील संपूर्ण यंत्रणेस यु.पी.एस. बसविल्यास सदर अडचणी येणार नाहीत तसेच मंदीरातील आरतीसाठी पूर्वी खरेदी केलेला टी.व्ही.एस. कंपनीचा यु.पी.एस. काही तांत्रीक दोषामुळे बंद पडल्यास या नवीन खरेदी करण्यात येणाऱ्या एकाच यु.पी.एस. वरून सप्लाय देण्याची व्यवस्था करता येईल.

ऑडीओ व सिक्युरिटी सिस्टीमच्या एकूण यंत्रणेचा लोड विचारात घेता ५KVA चा नवीन युपीएस घेणे आवश्यक आहे, त्यासाठी सन २००३ मध्ये खरेदी केलेल्या TVS कंपनीच्या यु.पी.एस. बाबत चौकशी केली असता ती कंपनी बंद झालेली आहे असे समजले, त्याऐवजी APC कंपनी चांगली असून सदर कंपनीचे युपीएस संस्थानचे माहीती तंत्रज्ञान विभागात बसविले असून ते नियमित चालू आहेत म्हणून नवीन युपीएस APC कंपनीचा खरेदी करणे योग्य राहील, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे -

APC कंपनीचा स्मार्ट युपीएस मॉडेल नंबर SURT 5000 XLI

या युपीएस ची ऊंची ४३२mm, रुंदी १३०mm व खोली ६६०mm (बॅटरी आत असलेला), १५ मिनिटे Backup ऑनसाईड तीन वर्षांच्या Warranty सह ०१ नग किंमत VAT, पॅकींग व फॉरवर्डींगसह १,००,०००/- असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ध्वनीक्षेपन विभागासाठी APC कंपनीचा स्मार्ट युपीएस मॉडेल नंबर SURT 5000 XLI यु.पी.एस कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-ध्वनी क्षेपण विभाग प्रमुख)

**(११) सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे होणाऱ्या अतिरिक्त गर्दीत निवासव्यवस्था करणेसाठी शामियाना कापडी मंडप उभारणेबाबत**

दि.२३/१२/२००६ ते दि.०१/०१/२००७ या कालावधीत नाताळ सुट्टया,वर्षअखेर, नूतन वर्षारंभ यामुळे शिर्डी येथे साईभक्तांची प्रचंड गर्दी झाली होती. दरम्यानचे कालावधीत साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी मोठया प्रमाणात शामियाना कापडी मंडप उभारुन त्याठिकाणी आवश्यक तेवढया गाद्या,चादरी, बछायती, सतरंज्या उपलब्ध करुन तसेच २४ तास चहा,कॉफी,दूध,नाष्टा त्याचबरोबर लाईट,पाणी, सर्व मंडपांचे ठिकाणी स्वयंसेवी प्रसादभोजनकक्ष, प्रसादलाडू,देणगी काऊंटर्स इत्यादी कारणांसाठी जादा काऊंटर्सची व्यवस्था करुन साईभक्तांचे निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान प्रचंड गर्दी होवूनही कोणाही साईभक्तांची कोणत्याही कारणासाठी तक्रार आलेली नाही. दिनांक २३.१२.२००६ ते १.१.२००७ या कालावधीत भक्तांचे निवासव्यवस्थेकरीता उभारण्यात आलेले कापडी शमीयाना मंडप व भाडोत्री गादी-चादर यासाठी एकूण रुपये १७,८४,५००.०० एवढा खर्च आलेला आहे.

दि.२५/०१/२००७ रोजी गुरुवार असून,त्यापुढे दि.२६,२७,२८, व ३० जानेवारी या दिवशी सुटया असल्यामुळे साईभक्तांच्या गर्दीत वाढ होण्याची शक्यता आहे. या कालावधीत साईभक्तांच्या निवासाची गैरसोय होवू नये म्हणून प्रसादालय व चौकशी निवासस्थान परिसर,साईनगर, साईबाबा धर्मशाळा,साईबाबा भक्त-निवासस्थान,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी आवश्यकतेनुसार शामियाना कापडी मंडप टाकण्यास मान्यता असावी. तसेच आवश्यकतेनुसार,नेहमीप्रमाणे चहा,कॉफी, दुध,नाष्टा,प्रसादभोजन,प्रसादलाडु, देणगी काऊंटर्स,क्लोकरुम इत्यादीची जादा व्यवस्था करुन साईभक्तांना सुविधा उपलब्ध करुन देता येतील. शामियाना कापडी मंडप उभारणीसाठी अंदाजे १० लाख रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

तरी दि.२४/०१/२००७ ते दि.३१/०१/२००७ या कालावधीत आठ दिवस आवश्यक तेवढे शामियाना कापडी मंडप नाताळ गर्दीचे काळात निश्चित केलेल्या मंजूर दराने उभारणी करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, तसेच दिनांक २३.१२.२००६ ते दिनांक ०१.०१.२००७ या नाताळ सुट्यांचे गर्दीचे कालावधीत उभारणी करण्यात आलेल्या शामीयाना कापडी मंडपासाठी झालेल्या रुपये १८,०८,५७३.०० चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक चौकशी/अधिक्षक भक्तनिवाससस्थान/धर्मशाळा प्रमुख)

**(१२) संस्थान कर्मचारी गणवेष शिलाईबाबत निर्णय घेणे.**

संस्थानमधील काय कर्मचाऱ्यांसाठी (स्त्री व पुरुष) गणवेषाचे कापड,साड्या इ.खरेदी तसेच शिलाई विहित पद्धतीने करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १३,१६,४५०/- चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ४.३.२००६ चे सभेतील निर्णय क्र.१६३ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आलेल्या निविदा दिनांक २५.५.२००६ चे उपसमितीचे सभेत समक्ष उघडण्यात आलेल्या होत्या. तसेच संबंधितांना मा.व्यवस्थापन समितीचे

दिनांक ३.६.२००६ चे सभेपुढे आमंत्रित करण्यात येऊन, निविदेतील दरावर सूट देणेबाबत सांगणेत आले होते. मात्र मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.७.२००६ चे सभेतील निर्णय क्र.४१७ अन्वये मे.रेमंड लि.,ठाणे या कापड उत्पादक कंपनीकडून कर्मचारी गणवेष कापड खरेदी करण्यात आलेले आहे.

कर्मचारी गणवेष शिलाईकामी जा.नं.एसएसएस-वशी-खरेदी-प्रशासन-१६७२२,०६, दि.२२.११.२००६ अन्वये दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशनसादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे दि.६.१.२००७ चे सभेत आमंत्रित करण्यात आले होते.

| **अ.नं.** | **कोटेशनसादरकर्त्याचे नाव** | **शेरा** |
|---|---|---|
| ०१ | स्टीचवेल मेन्स वेअर,लोणी | उपस्थित |
| ०२ | एस.एम.टेलर्स,शिर्डी | उपस्थित |
| ०३ | पवार एंटरप्राईजेस,पुणे | अनुपस्थित |
| ०४ | संकेत टेलर,लोणी | अनुपस्थित |
| ०५ | न्यू आर्ट टेलर,नाशिक | अनुपस्थित |
| ०६ | स्टॅण्डर्ड टेलर्स,नाशिक | अनुपस्थित |
| ०७ | डि.एस.टेलस ॲण्ड रेडिमेड,नाशिक | उपस्थित |
| ०८ | फेमस टेलर्स,नाशिक | उपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू कोटेशन्स उघडून याबाबत उपसमितीचे सभेत अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले होते. प्राप्त झालेले कोटेशन्स दिनांक ६.१.२००७ चे सभेत उघडण्यात आले होते.

त्यानुसार त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | सफरी (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला १ खिसा व बॅकसेंटरकट (डिझाईन एम्ब्रॉयडरी) | सफरी (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला १ खिसा व बॅकसेंटरकट | फुट शर्ट व फूल पॅन्ठ (शर्टला १ खिसा व पॅन्टला ३ खिसे) | फूल ॲप्रन (३खिसे) | हाफ ॲप्रन (तीन खिसे( | हाफ शर्ट व फुट पॅन्ट (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला १ खिसा एम्ब्रायडरी लोगोसह) | हाफ शर्ट व फुट पॅन्ट- पहारेकरी गणवेश (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला २ कव्हरसह खिसा, शोल्डर बेल्ट व व्हिसल लूप्स सह |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | ८४ नग | ३४८नग | १२६ नग | ८६ नग | २६ नग | ८०२ नग | १६०नग |
| ०१ | **स्टीचवेल मेन्स वेअर,लोणी**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>१६०.०० प्र.नग<br>१६०.०० प्र.नग | <br>१०१.०० प्र.नग<br>१०१.०० प्र.नग | <br>७५.०० प्र.नग<br>७५.०० प्र.नग | <br>२५.०० प्र.नग<br>२५.०० प्र.नग | <br>२२.०० प्र.नग<br>२२.०० प्र.नग | <br>६५.०० प्र.नग<br>६५.०० प्र.नग | <br>७५.०० प्र.नग<br>७५.०० प्र.नग |
| ०२ | **एस.एम.टेलर्स,शिर्डी**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>१००.०० प्र.नग<br>१००.०० प्र.नग | <br>९०.०० प्र.नग<br>९०.०० प्र.नग | <br>७०.०० प्र.नग<br>७०.०० प्र.नग | <br>४०.०० प्र.नग<br>४०.०० प्र.नग | <br>३०.०० प्र.नग<br>३०.०० प्र.नग | <br>६५.०० प्र.नग<br>६५.०० प्र.नग | <br>७५.०० प्र.नग<br>७५.०० प्र.नग |
| ०३ | **पवार एंटरप्राईजेस,पुणे**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>२६०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२५०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१५०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>७५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१६०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१७५.०० प्र.नग<br>अनुपस्थित |
| ०४ | **संकेत टेलर,लोणी**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>२००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१२५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>३५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>३०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>८०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१००.०० प्र.नग<br>अनुपस्थित |
| ०५ | **न्यू आर्ट टेलर,नाशिक**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>३२५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>३२५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१६०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१५०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२२५.०० प्र.नग<br>अनुपस्थित |
| ०६ | **स्टॅण्डर्ड टेलर्स,नाशिक**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>३१५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>३१५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१९०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१५०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१४०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१८५.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२००.०० प्र.नग<br>अनुपस्थित |
| ०७ | **डि.एस.टेलस ॲण्ड रेडिमेड, नाशिक**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>४००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>४००.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२७०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१५०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>१५०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२७०.०० प्र.नग<br>अनुपस्थित | <br>२७०.०० प्र.नग<br>अनुपस्थित |
| ०८ | **फेमस टेलर्स,नाशिक**<br>निविदेतील दर रुपये<br>चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर रुपये | <br>२९०.०० प्र.नग<br>२८१.०० प्र.नग | <br>२९०.०० प्र.नग<br>२८१.०० प्र.नग | <br>१७५.०० प्र.नग<br>१७०.०० प्र.नग | <br>१३०.०० प्र.नग<br>१२०.०० प्र.नग | <br>१२०.०० प्र.नग<br>११०.०० प्र.नग | <br>१७०.०० प्र.नग<br>१६५.०० प्र.नग | <br>१८५.०० प्र.नग<br>१८०.०० प्र.नग |

यावर सविस्तर चर्चा होऊन,खालीलप्रमाणे शिलाई कर्मचारी गणवेष आदेश देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**(अ) स्टीचवेल मेन्स वेअर,लोणी** यांना- **(१)** सफरी (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला १ खिसा व बॅकसेंटरकट (डिझाईन एम्ब्रॉयडरी) **(२)** सफरी(पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला १ खिसा व बॅकसेंटरकट **(३)** फुट शर्ट व फूल पॅन्ठ (शर्टला १ खिसा व पॅन्टला ३ खिसे) **(४)** फूल ॲप्रन (३खिसे) **(५)** हाफ ॲप्रन (तीन खिसे) (६) हाफ शर्ट व फुट पॅन्ट- पहारेकरी गणवेश (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला २ कव्हरसह खिसा, शोल्डर बेल्ट व व्हिसल लूप्स सह

**(ब) <u>एस.एम.टेलर्स,शिर्डी</u> यांना- (१)** हाफ शर्ट व फुट पॅन्ट (पॅन्टला २ साईट पॉकेट व १ बॅक पॉकेट शर्टला १ खिसा एम्ब्रायडरी लोगोसह)

याचवेळेस उपरोक्त टेलर यांनी गणवेष शिलाई कामी वापरावयाचे मटेरिअल संस्थानने ठरवून दिलेल्या ब्रॅण्ड/नमुना व कंपनीचे असावे, तसेच गणवेष शिलाई चुकल्यास स्वखर्चाने कापड खरेदी करुन गणवेष शिलाई करुन द्यावा लागेल, नमुना तयार झाल्यानंतर मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊनच पुढील शिलाई करावी, हे काम एक महिन्यात पूर्ण करण्यात यावे असे दोन्ही कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष सांगण्यात आले. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**(१३) <u>श्रीसाईबाबा रुग्णालय विभागातील कर्मचाऱ्यांना गणवेषासाठी ॲप्रन,सुटींग कापड व बेडशीट कापड खरेदीबाबत.</u>**

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ निर्णय क्र.६४८ नुसार श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टर्स, टेक्नीशियन व इतर स्टॉफसाठी आवश्यक असणारे गणवेष कापड तसेच बेडशीटसाठी आवश्यक असणारे सफेद बेडशीट कापड खरेदीस व त्या कामी येणारे रक्कम रु.११,४०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. मात्र प्रत्यक्षात सर्व कापड खरेदीस रु.४,१७,८१७/- व शिलाईकामी अंदाजे रु. ५०,०००/- असा एकूण रु. ४,६७,८१७/- खर्च येणार असल्याने कोटेशन मागणी करणेत आलेली होती. रुग्णालयातील स्टॉफ गणवेषाचे कापडासाठी मे.रेमंड लि., ठाणे यांना मान्य दराने पुरवठा आदेश देणेत आलेला असून त्यांचेकडील पुरवठा पुर्ण होत आलेला आहे. उर्वरित डॉक्टर्स, नर्स व टेक्नीशियन यांचे गणवेषासाठी आवश्यक असणारे ॲप्रन, सुटींग व बेडशीट कापड खरेदीकामी संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-साईबाबा रुग्णालय/ १४२२२/ २००६, दि.१३.१०.२००६ अन्वये दि.२०.१०.२००६ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ रोजी मा.विश्वस्तांसमोर उघडणेत येऊन त्यांना त्याच सभेत चर्चेसाठी आमंत्रित करणे आलेले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | |
|---|---|---|
| ०१ | सारडा इंटेरिअर, अ.नगर | उपस्थित |
| ०२ | कोहीनुर, अ.नगर | अनुपस्थित |
| ०३ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अ.नगर | उपस्थित |
| ०४ | आदिनाथ टेक्स-केम लि., सुरत | उपस्थित |
| ०५ | बंसल ट्रेडींग कंपनी, भोपाल | उपस्थित |

उपरोक्तपैकी क्र.४ व क्र. ५ चे कोटेशनधारकांनी रेडीमेड ॲप्रन व कपडयाचे दर दिलेले आहेत. श्री साईबाबा रुग्णालय विभागाने दि.२५.१२.२००६ चे टिपणीने कपडा खरेदी करुन शिलाई करणेस बराच कालावधी लागत असल्याने रेडीमेड कपडे घेण्याची विनंती केलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०१.२००७ चे सभेत पुरवठाधारकांकडून सुट दर पत्र घेणेत आलेले असून मा.उपसमितीने नमुने पाहून निर्णय घ्यावा असा निर्णय झालेला आहे. तसेच कापडाऐवजी रेडिमेड ड्रेस घेण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार पुरवठादारांनी खालीलप्रमाणे सुधारित दर दिलेले आहेत.

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | ॲप्रन कापड सफेद | | ॲप्रन कापड आकाशी | | सुटींग कापड फिकट गुलाबी | | बेडशीट कापड सफेद | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी- | ३०५ मीटर | | १९५ मीटर | | ८४८ मीटर | | १००० मीटर | |
| | | मुळ दर रु.प्र.मी. | सुधारित दर रु. प्र.मी. | मुळ दर रु.प्र.मी. | सुधारित दर रु. प्र.मी. | मुळ दर रु.प्र.मी. | सुधारित दर रु. प्र.मी. | मुळ दर रु.प्र.मी. | सुधारित दर रु. प्र.मी. |
| ०१. | सारडा इंटेरिअर, अ.नगर | --- | --- | --- | --- | --- | --- | ८६/-<br>६०/-<br>५३/-<br>९०/- | --<br>५४.००<br>--<br>९०.२५ |
| ०२. | कोहीनुर, अ.नगर | १५८/-<br>९६/-<br>१३०/- | --<br>--<br>-- | १९५/-<br>९६/-<br>१३०/- | --<br>--<br>-- | १३०/-<br>९६/- | --<br>-- | ५८/- | -- |
| ०३. | शिंगी ट्रेडींग कंपनी, अ.नगर | १७८.५० | -- | १७८.५० | -- | १७८.५० | -- | १७८.५० | -- |
| ०४. | आदिनाथ टेक्स-केम लि., सुरत | १५५/-<br>१८५/- | | १९५/-<br>१९५ | | २९०/-<br>३७५/- | | १००/-<br>११५/-<br>१२०/-<br>१११/-<br>१३५/-<br>११६/- | |
| ०५. | बंसल ट्रेडींग कंपनी, भोपाल | २२५/- | २००/- | २००/- | २००/- | ३२५/- | ३००/- | ११२/- | १००/- |

आजचे सभेत उपस्थित मा.विश्वस्तांनी ॲप्रन, शुटींग व बेडशीट कापडाचे निविदासादरकर्त्यांनी दिलेले नमुन्यांची पहाणी करुन मे.आदिनाथ टेक्स-केम लि.,सुरत यांचे खालीलप्रमाणे नमूने पसंत केले. त्यानुसार मे. मे.आदिनाथ टेक्स-केम लि.,सुरत यांना पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच नर्सेस स्टाफला रुग्णालयाचे मागणीनुसार ॲप्रन देण्यात यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.नं. | प्रकार | दर रुपये प्रति नग |
|---|---|---|
| ०१ | डॉक्टर ॲप्रन सफेद | १८५/- |
| ०२ | ॲप्रन आकाशी. | १९५/- |
| ०३ | नर्सेस ड्रेस फिकट गुलाबी | २९०/- |
| ०४. | मेल नर्स डेस | ३७५/- |
| ०५ | बेडशीट सफेद | ११६/- |

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**(१४) भक्तनिवासस्थान विभागाकरिता बेडशीट व उशीकव्हर खरेदीबाबत**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.१०.२००६ मधील निर्णय क्र.८२२ श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थानकडील खोल्यांकरिता खालीलप्रमाणे प्रिंटेड बेडशीट (५४"x ९०") व उशीकव्हर (१८"x २४") प्रत्येकी ८००० नग खेरदी करणेस व त्याकामी येणारी रक्कम रु.१५,२०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०९-११.१२.२००६ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदाधारकाचे लेटरहेडवर दर व बयाणा रक्कम तसेच आवश्यक कागदपत्रे असलेली सिलबंद निविदांची दि.२३.१२.२००६ अखेर मागणी करणेत आलेली आहे. मुदतीअंती प्राप्त झालेल्या खालीलप्रमाणे निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ मध्ये उघडणेत आलेल्या आहेत. तसेच संबंधितांना त्याच सभेपुढे आमंत्रित करणेत येऊन सुट दर पत्र देण्यात सांगणेत आलेले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | |
|---|---|---|
| ०१ | बुर्गूल टेक्सटाईल्स, सोलापूर | उपस्थित |
| ०२ | आदिनाथ टेक्स-केम लि., सुरत | उपस्थित |
| ०३ | कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर | उपस्थित |
| ०४ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अ.नगर | उपस्थित |
| ०५ | ओम गुरुदेव एजन्सी, सावळीविहीर | उपस्थित |
| ०६ | बांठिया एन्टरप्राईजेस, पुणे | उपस्थित |
| ०७ | सारडा इंटेरिअर, अ.नगर | उपस्थित |
| ०८ | दिपक ट्रेडींग कंपनी, सांगली | उपस्थित |
| ०९ | व्ही.एस.गोरे, पुणे | उपस्थित |
| १० | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक रोड | उपस्थित |
| ११ | न्यु लाहोटी गादी कारखाना, अ.नगर | अनुपस्थित |

सदरील सभेत बॉम्बे डाईंग व प्रकाश कॉटन या दोन कंपनीचेच बेडशीट घेणेबाबत निर्णय झालेला असून मा.उपसमितीने नमुने पाहून निर्णय घेणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार कोटेशनसादरकर्त्यांनी बॉम्बे डाईंग व प्रकाश कॉटनच्या बेडशीटचे व उशी कव्हरचे खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कंपनी | मूळ दर प्रती सेट रुपये | देऊ केले सुधारित दर प्रती सेट रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर | बॉम्बे डाईंग | १६२.०० | ११८.०० |
| ०२ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अ.नगर | बॉम्बे डाईंग-१ गोल्ड | २७२.०० | २४२.०० |
| | | प्रकाश कॉटन-३ | १६७.८० | १२८.०० |
| | | प्रकाश कॉटन-४ | १७९.२२ | १७०.०० |
| | | प्रकाश कॉटन-५ | १६८.०० | १६४.०० |
| ०३ | सारडा इंटेरिअर, अ.नगर | बॉम्बे डाईंग पटेल | २३५.०० | २११.५० |
| | | बॉम्बे डाईंग गोल्ड | २५३.०० | २२७.७० |
| | | प्रकाश कॉटन | १७८.०० | १६०.२० |
| ०४ | न्यु लाहोटी गादी कारखाना, अ.नगर | बॉम्बे डाईंग | २३८.०० | --- |
| | | प्रकाश कॉटन | १७९.०० | --- |

आजचे सभेत उपस्थित मा.विश्वस्तांनी बेडशीट व उशी कव्हरचे निविदासादरकर्त्यांनी दिलेले नमुन्यांची पहाणी करुन शिंगी ट्रेडींग कंपनी, अ.नगर यांचे प्रकाश कॉटन नं. ४ चे दर रुपये १७०/- प्रति सेट (बेडशिट व उशी कव्हर) दर मान्य करण्यात आले. त्यानुसार मे. शिंगी ट्रेडींग कंपनी, अ.नगर यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीने शिफारस केली होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त चारही कोटेशनसादरकर्त्यांना पुनश्च उपसमितीचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन,अंतिम निर्णय घेण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**(१५) धर्मशाळा (२०० रुम) येथील शौचालय,स्नानगृह,गादी, चादर कंत्राटाबाबत.**

धर्मशाळा या विभागाकडे साईभक्तांना गादी, चादर व शौचालय, स्नानगृह या सेवा देण्यासाठी अनुक्रमे (१) श्री भाऊसाहेब भोसले व (२) मे.साईराज या कंत्राटदारांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. त्यांचे कराराची मुदत दि.३१.१२.२००६ अखेर संपुष्टात येत असल्याने सदरचे दोन्ही कारणांसाठी दि.०१.०१.२००७ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटदार निवडीसंदर्भात निर्णयासाठी सदरचा विषय दि.०६.०१.२००७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत ठेवण्यात आला होता.

विद्यमान कंत्राटदारांचे कराराचा कालावधी दि.३१.१२.२००६ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी संबंधीत कंत्राटदारांचे नेमणूकीचा निर्णय होईपर्यंत दि.०१.०१.२००७ ते दि.३१.०१.२००७ एक महिना कालावधीसाठी सध्याचेच अटी-शर्तीवर आहे त्या दोन कंत्राटदारांना एक महिना मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे.

दि.०६.०१.२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये धर्मशाळा येथील शौचालय, स्नानगृह, गादी चादर निविदाधारकांना वाटाघाटीसाठी समक्ष हजर रहाणेबाबत कळविले होते. सभेमध्ये पाकिटे उघडून उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित सभागृहात बोलावून सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगण्यात आले होते. त्यानुसार भक्तांना गादी चादर व उशी कव्हर सेवा पुरविणेसाठी श्री. अशोक पराचा, नाशिक हे वगळता अन्य निविदाधारकांनी त्यांचे वाटाघाटीनंतरचे दर बंद स्वरुपात दिलेले आहेत. शौचालय व स्नानगृह सेवा पुरविण्यासाठी निविदेसोबत गुरुकृपा नागरी सेवा सहकारी संस्था लि., कल्याण यांनी निविदेसोबत बयाणा रक्कम भरलेली नाही. त्यामुळे त्यांचे निविदेचा विचार करता येणार नाही.

उर्वरित निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले बंद पाकिटे आजचे सभेत उघडणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

**(अ)गादी चादर-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति माह रुपये | बंद पाकिटात देऊ केलेले सुधारित दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले, शिर्डी | ३५,०००.०० | ४०,०००.०० |
| ०२. | सौ. चव्हाण योगिता संतोष, शिर्डी | ४३,९४४.०० | ४४,४४४.०० |
| ०३. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | ४५,०००.०० | --- |
| ०४. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | ४६,८००.०० | ४६,८००.०० |

**(ब) शौचालय व स्नानगृह-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति माह रुपये | बंद पाकीटात देऊ केलेले सुधारित दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले, शिर्डी | ३०,०००.०० | ४०,०००.०० |
| ०२. | सिद्धीविनायक एन्टरप्राईजेस, सोलापूर | ३५,५०१.०० | ४१,१८०.०० |
| ०३. | सौ. चव्हाण योगिता संतोष, शिर्डी | ३९,५००.०० | ४०,५००.०० |
| ०४. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | ४५,०००.०० | --- |
| ०५. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | ४६,८००.०० | ४६,८००.०० |
| ०६. | अशोक पराचा, नाशिक | ११,०००.०० | --- |
| ०७. | सेवा फौन्डेशन, अहमदनगर | २२,५५१.०० | ३०,०५१.०० |
| ०८. | साईराज कॉन्ट्रॅक्ट, श्री.एन.व्ही.गोविंदराव, शिर्डी | ४३,०००.०० | ५२,०००.०० |
| ०९. | गुरुकृपा नागरी सेवा सहकारी संस्था लि., कल्याण | ४०,००१.०० | ४५,००१.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,

०१) श्री साईबाबा संस्थानचे नवीन धर्मशाळेत भक्तांना गादी,चादर बेडशिट,रग,उशी (कव्हरसह) कराराने कंत्राट पध्दतीने पुरविणेकामी सौ.चव्हाण योगिता संतोष यांची रुपये ४४,४४४.०० प्रतिमहा ही निविदा स्वीकारण्यात यावी.

०२) श्री साईबाबा धर्मशाळा येथील शौचालय व स्नानगृह कराराने कंत्राट पध्दतीने चालविणेकामी पूर्वी कंत्राट घेतलेल्या सिध्दीविनायक एन्टरप्रायजेस,सोलापूर व साईराज कॉन्ट्रॅक्टर, श्री ए.व्ही.गोविंदराव, शिर्डी यांना उपसमितीचे पुढील सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे, नविन ठेकेदाराची नियुक्ती होण्यास अवधी लागणार असल्याने, नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत अथवा तीन महिने या पैकी जे आधी घडेल तोपर्यंत सध्याचे कंत्राटदार मे.साईराज (श्री.ए.व्ही.गोविंदराव),शिर्डी यांना

दिनांक १.२.२००७ पासून मुदत वाढ देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-धर्मशाळा प्रमुख)

**(१६) श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो सर्जरी व प्लॅस्टीक सर्जरी ऑपरेशन थिएटरचे ऑटोक्लेव्ह मशिन तसेच विद्युत पुरवठा करणेसाठी इलेक्ट्रिक केबल टाकणे, आर्थिंग करणे वगैरे कामांबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटलमधील नवीन M.R.I. मशिन बसविणेकरीता सिमन्स कंपनीला हॉस्पीटलमार्फत ऑर्डर देण्यात आलेली आहे. या मशिनला विद्युत पुरवठा करणे, वातानुकुलीत यंत्रणा उभारणे तसेच बांधकामात बदल करणे इ.कामासंबंधी श्री साईबाबा हॉस्पीटलने दिनांक २९-१२-२००६ रोजी आयोजित केलेल्या मिटींगमध्ये सिमन्स कंपनीचे इंजिनिअर, श्री. देशपांडे यांनी M.R.I. मशिन व वातानुकुलीत यंत्रणेला मशिनच्या विजभारानुसार नवीन अखंड केबल टाकण्यास व M.R.I. मशिनच्या चुंबकीय क्षेत्राच्या आत येणा-या सर्व केबल्स काढून दुसरीकडे शिफ्ट कराव्यात, असे सुचविले. तसेच न्युरो सर्जरी व प्लास्टीक सर्जरी ऑपरेशन थिएटरच्या १८ किलोवॅट ऑटोक्लोव्हसाठी सप्लाय उपलब्ध करून देण्याची मागणी श्री साईबाबा हॉस्पिटलकडून आली आहे.

या नविन M.R.I. मशिन व वातानुकुलीत यंत्रणा तसेच न्युरो सर्जरी व प्लास्टीक सर्जरी ऑपरेशन थिएटरचे १८ किलोवॅट ऑटोक्लोव्ह याकरीता साईनगर सबस्टेशन ते श्री साईबाबा हॉस्पीटल पर्यंत नविन अंडर ग्राऊंड केबल टाकाव्या लागणार आहेत. यापुर्वी हॉस्पीटलकरीता सिमेंट पाईपमधून केबल टाकलेल्या आहेत. हॉस्पीटलच्या वेळोवेळी वाढत जाणा-या लोडमुळे दरवेळेस नवीन केबल टाकून देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सिमेंट पाईपमध्ये नवीन केबल टाकण्यास जागा नाही. या नवीन टाकाव्या लागणा-या केबलकरीता साईनगर सबस्टेशन ते हॉस्पीटल पर्यंत नाली खोदाई करणे व ती बांधणे हेही काम करावे लागणार आहे.

साईनगर सबस्टेशन ते हॉस्पीटल केबल टाकणेकामी नाली खोदाई करणे, बांधणे, केबल पुरविणे व टाकणे, अर्थिंग करणे इत्यादि कामे करावी लागणार आहेत. कामासंबंधीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01) | Supplying & erecting & commissioning of Polycab/Finolex/Gloster make PVC arrmoured cable, 1100 V, grade with I.S.I.Mark, 3.1/2 core 50 Sq.mm. Aluminium conductor | 850 मीटर | रु. 00250.00 (प्रति मीटर) | रु. 2,12,500.00 |
| 02) | Supplying & erecting & commissioning of Polycab/Finolex/Gloster make PVC arrmoured cable, 1100 V, grade with I.S.I.Mark, 3.1/2 core 150 Sq.mm. Aluminium conductor. | 800 मीटर | रु. 00550.00 (प्रति मीटर) | रु.4,40,000.00 |
| 03) | Supplying & erecting & commissioning of L& T make Tripple pole metal clad HRC switch fuse unit, 415 / 500V, 250 A with neutral link with HRC fuses | 002 नग | रु. 09000.00 (प्रति नग ) | रु. 0,18,000.00 |
| 04) | Supplying & erecting & commissioning of L& T make Tripple pole metal clad HRC switch fuse unit, 415 / 500V, 400 A with neutral link with HRC fuses | 001 नग | रु. 011000.00 (प्रति नग ) | रु. 0,11,000.00 |
| 05) | Supplying & erecting & commissioning of Earthing set with Copper earth plate size 600 x 600 x 6mm and as peer IS code & standard. | 002 नग | रु.4500.00 | रु.0,09,000.00 |
| 06) | Supplying & erecting of Copper strip of 25 x 3mm size | 25 के.जी. | रु. 00450.00 (प्रति के.जी. ) | रु. 0,11,250.00 |
| 7) | A Excavation soft murum / soil road for preparing pit for poles stay or earth plates or for laying pipes & clearing the site by removing debris & making the site good. | 250 क्यु.मीटर | रु. 00100.00 (प्रती क्यु. मीटर) | रु.0,25,000.00 |
| 8) | Providing cable trench ( Nali) with brickwork . | 150 क्यु.मीटर | रु. 01295.00 (प्रति क्यु.मीटर) | रु. 1,94,250.00 |
| 9) | Supplying & erecting of heavy duty flange type brass cable glands for 3.1/2 x 50 sq.mm. cable (No=0) | 004 नग. | रु. 00150.00 (प्रति नग) | रु.0,00,600.00 |
| 10) | Supplying & erecting of heavy duty flange type brass cable glands for 3.1/2 x 150 sq.mm. cable. (No=001) | 004 नग. | रु. 00200.00 (प्रति नग) | रु.0,00,800.00 |
| 11) | Supplying & erecting of crimping type Aluminum lugs conforming to lSI suitable for cable up to 50 sq.mm | 016 नग. | रु. 00015.00 (प्रति नग) | रु.0,00,240.00 |
| 12) | Supplying & erecting crimping type Aluminium lugs conforming to lSI suitable for cable up to 150 sq.mm. | 016 नग. | रु. 00030.00 (प्रति नग) | रु.0,00,480.00 |
| | | | एकुण रक्कम :- | रु. 9,23,120.00 |

उपरोक्त कामासाठी अंदाजे रक्कम रुपये ९,२३,१२०.०० मात्र खर्च अपेक्षित असून सदरहू काम करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**(१७) शालेय गणवेशात बदल करणेबाबत.**

श्रीसाईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु.केजी ते इ. १० वी पर्यंतचे वर्ग चालविले जातात. शाळा स्थापनेपासून विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी निळा रंगाचा ड्रेस वापरात आहे. सदरचा रंग लवकरच खराब होत असून ड्रेस मळसर दिसत असल्याने रंग बदलून तो नवीन रंगाचा ड्रेस सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून घेण्याचा विचार आहे. प्रतिवर्षी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांना शाळेमार्फत ना नफा ना तोटा या तत्वावर गणवेश पुरविले जात असत. सदरचे गणवेश खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येवून विक्री शाळेमार्फत करण्यात येत असल्याने बराचसा वेळ त्यात खर्च होत असे. शिवाय पुरवठाधारक गणवेश वेळेवर उपलब्ध करून देत नसल्याने विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश देता येणे शक्य होत नव्हते. त्यामुळे पालक शिक्षक व प्राचार्या यांचेकडे तक्रार करत. तसेच सर्वच पालक दरवर्षी नवीन ड्रेस खरेदी करत नाहीत व काही पालक खाजगी दुकानदाराकडून ड्रेस खरेदी करत असल्याने जवळ जवळ ३५ ते ४० टक्के ड्रेस शाळेत तसेच पडून राहत. त्यामुळे संस्थानचे नुकसान होत असे. त्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.१०-१२/०४/२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४६ अन्वये कोटेशन सादरकर्त्यास शाळेत परस्पर विद्यार्थ्यांना गणवेश विक्री करणेस व त्यासाठी शाळेतील एक खोली एक महिन्यासाठी देणेबाबत निर्णय झालेला आहे. सन २००३-०४ या वर्षी कोटेशन्सधारकांनी गणवेश पुरविले आहेत. त्यानंतर स्थानिक बाजारपेठेत ड्रेस उपलब्ध झाल्याने आजतागायत विद्यार्थी पालक खाजगी दुकानदारांकडून ड्रेस खरेदी करत आहेत.

सध्याचा ड्रेस निळया रंगाचा असून ड्रेसचा रंग लवकरच खराब होत आहे व ड्रेस मळसर दिसत असल्याने रंग बदलून फिकट गुलाबी, फिकट पिवळा,फिकट नारंगी व त्यावर चौकट डिझाईन असलेला या पैकी कुठलाही एक रंगांचा ड्रेस घ्यावा असे नम्र मत आहे. या ड्रेस सोबत ज्यु.केजी ते इ. १० वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी एक स्वेटर तसेच इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या वर्गासाठी एक पी.टी.ड्रेस आवश्यक आहे. त्यासाठी सोबतचे तक्त्यात नमूद केले प्रमाणे ड्रेसची आवश्यकता लागणार असून कोटेशन्सधारकाकडून खरेदी विभागामार्फत कोटेशन्स मागवून चांगल्या दर्जाचा व आकर्षक ड्रेस पुढील वर्षापासून निवड झालेल्या कोटेशन्सधारकाकडून शाळा सुरु होतेवेळी शाळेत समक्ष विक्री करून विद्यार्थ्यांना ड्रेस देता येतील. या विद्यार्थी/ विद्यार्थ्यीनीसाठी दोन ड्रेस , एक स्वेटर व एक पीटी ड्रेस या कामी अंदाजे खर्च रु.९,५०,०००/- अपेक्षित असुन या ड्रेसची खरेदी विद्यार्थी पालक परस्पर करणार आहेत.

वरीलप्रमाणे विद्यार्थी/विद्यार्थीनींचा ड्रेसचा रंग निश्चित करणे तसेच खरेदी विभागामार्फत कोटेशन्स मागवून निवड झालेल्या कोटेशन्सधारकांकडून ड्रेस शाळेतच एक खोली देवून विद्यार्थी पालकांना ड्रेस खरेदी करणेस सांगता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपसमितीचे दि.३०.१२.२००६ रोजीचे सभेत पालकांची सभा आयोजित करून गणवेशाचा पॅटर्न ठरविणेत यावा असे ठरले आहे.

आजचे सभेत याबाबत चर्चा होऊन, यासाठी भरपूर वेळ जाणार असल्याने तसेच पालकांची भूमिका संस्थानने सर्व सुविधा मोफत दयाव्यात अशी असल्याने त्यात वेळ न घालविता दि.११.०१.२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन उपसमिती सभेमध्ये सदर विषय फेर विचारार्थ ठेवून ज्यु.केजी ते इ. १० वी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सध्याचा ड्रेसचा रंग बदल करून नवीन आकर्षक रंगामध्ये ड्रेस, सोबत स्वेटर व पी.टी.ड्रेस असा ड्रेसचा पॅटर्न ठरविण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मीडियम स्कुल)

**(१८) संगणक शिक्षकांना तासिका वेतनवाढ देणे बाबत.**

संस्थानचे श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूलकडे ज्यु.के.जी. ते इयत्ता १० वी पर्यन्त सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण सक्तीचे केलेले असून २० संगणकांनी परिपूर्ण अशी अद्यायावत संगणक कक्षाची उभारणी केलेली आहे. व त्याकरीता प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी श्री कैलास निवृत्ती जेजूरकर व श्री संतोष एकनाथ बावके यान दोन स्वतंत्र संगणक शिक्षकांची तासिका बेसिसवर दिनांक २६.७.२००४ पासून नेमणूक करण्यात आलेली आहे.

सध्या हे शिक्षक रुपये १५/- प्रति तास (३० मिनिटाचा एक तास) याप्रमाणे काम करीत आहेत. परंतू त्यांना देण्यात येणारा मेहनताना अत्यंत कमी असल्याने शासकीय नियमानुसार या शिक्षकांना तासिका वेतनवाढ देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**(१९) दर्शन लाईन लेंडीबागेत जिना उभारणे बाबत.**

श्रींचे दर्शनासाठी शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीचे तळमजला व पहिल्या मजल्यावर दर्शन लाईनची व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दीचे वेळेस सदर हॉल भरल्यानंतर मंदिर परिसरातील कॉरीडोअरचे टॅरेस स्लॅब वरुन दर्शन लाईन लेंडीबागेत घेण्यात येते. लेंडीबागेतील जीना चढून साईभक्तांना टेरेसवर जावे लागते. गर्दीचे वेळेस सदर जिन्यामधुन आवश्यकते पेक्षा जास्त साईभक्तांची गर्दी झाल्यास साईभक्तांना त्रास होतो. सध्या सदर जिन्यामधुन पुर्व बाजूस प्रवेश करुन

जावे लागते. त्याऐवजी लेंडीबागेचे बाजूस दर्शन लाईन येत असल्यामुळे त्या बाजुला प्रवेश करावा अशी सुचना संरक्षण अधिकारी यांनी दि.१३/११/२००६ रोजीचे पत्राव्दारे केली आहे. याबाबत आर्किटेक्ट मे.निकम पाटील,श्रीरामपूर यांनी समक्ष पहाणी करुन सध्या असलेल्या जिण्याच्या उत्तरेला नव्याने आर.सी.सी. जिना उभारणेबाबत प्लॅन व एस्टीमेट सादर केले आहे.

याकामी अंदाजे रु.८६,५३३/- मात्र खर्च अपेक्षित आहे. याबाबत मा.उपसमितीचे दिनांक ३१/१२/२००६ रोजीचे सभेत चर्चा होऊन आर.सी.सी. जिना उभारणे ऐवजी एम.एस.स्ट्रक्चर मध्ये जिना उभारण्यात यावा व याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यता यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(२०) <u>संस्थानचे रुग्णालयात प्रॅक्टीससाठी परवानगी मिळणेबाबत डॉ.सौ.सुलभा शरद गाडे यांचे अर्जाबाबत</u>**

डॉ.सौ.सुलभा शरद गाडे, यांनी त्यांचे दिनांक १४.१२.२००६ चे अर्जान्वये त्या राहूरी येथे S.V.N.H आयुर्वेदिक कॉलेजमध्ये एम.डी (स्त्री रोग प्रसुतीतंत्र) च्या तिसऱ्या वर्षास असुन संस्थानचे रुग्णालयात विनामोबदला पाच महिन्याकरीता प्रॅक्टीस करणेस विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.सौ.सुलभा शरद गाडे यांना संस्थानचे श्रीसाईनाथ रुग्णालयात विनामोबदला तीन महिन्याकरीता प्रॅक्टीस करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**(२१) <u>तलाठी कार्यालय शिर्डी यांना मंगलकार्यालयात तात्पुरते स्वरुपात रुम मिळणे बाबत तहसिल कार्यालय,राहाता यांचे पत्राबाबत</u>**

तहसिल कार्यालय,राहता यांनी त्यांचे दिनांक २.१.२००७ चे पत्रान्वये शिर्डी येथील तलाठी कार्यालयाचे जागेवर महसूल भवन व तलाठी कार्यालयाचे नवीन बांधकाम करावयाचे असल्याने त्या ठिकाणी असलेल्या तलाठी कार्यालयाचे तात्पुरते स्थलांतर करावयाचे असल्याने संस्थानचे मंगलकार्यालयाची एक खोली तात्पूरत्या पाच ते सहा महिन्यासाठी मिळावी अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, तलाठी कार्यालय शिर्डी यांनी त्यांचे नवीन कार्यालयाचे बांधकाम पूर्ण होईपर्यन्त पाच ते सहा महिन्यासाठी मंगलकार्यालयातील एक खोली विनामुल्य देण्यात यावी. सदर खोलीचे नियमाप्रमाणे लाईट बील आकारण्यात यावे , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**ब) <u>दिनांक १.०२.२००७रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त-</u>**

**०१)<u>लुज नोट काऊंटींग मशिन खरेदीबाबत.</u>**

दक्षिणापेटीतील लुज नोटा मोजणीसाठी सध्या वापरात असलेल्या मशिन जुन्या झाल्याने जलद व अचुक अशा मोजणीसाठी नविन ३ लुज नोट काऊंटींग मशिन (मॉडेल डे-ला-रु नंबर ८६७२) खरेदी करणेबाबतचा विषय ठेवण्यात आला होता. सदरच्या विषयावर चर्चा होऊन या मशिन खरेदीसाठी वेगवेगळया कंपन्यांचे कोटेशन मागविण्यसात येऊन सदरचे कोटेशन मा.उपसमितीचे सभेसमोर ठेवण्यात यावे असे ठरले. या अनुषंगाने संदर्भ २ नुसार दि.२३.०९.२००६ रोजी मा.उपसमितीचे सभेत सदरचे कोटेशन ठेवण्यात येऊन मे. कोरस (इं) लि. पुणे यांचेकडून सदरच्या मशिनचे प्रात्यक्षिक पाहून त्या खरेदी करण्यात याव्यात असे ठरले.

उपरोक्त मा.उपसमितीचे निर्णयाप्रमाणे या मशिन खरेदी करण्यातपूर्वी प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी मे. कोरस (इं) लि. पुणे यांना कळविण्यात आले होते. परंतु सदरच्या मशिन उपलब्ध होण्यासाठी बराचसा कालातधी लागू शकतो असे त्यांनी कळविले, तसेच या ऐवजी याच कंपनीच्या नविन मशिन डे-ला-रु मॉडेल नंबर ८६५० सध्या बाजारात उपलब्ध असल्याचेही त्यांनी कळविले आहे. दक्षिणापेटी मोजणीसाठी लुज नोट काऊंटीग मशिनची सध्या तातडीची आवश्यता असल्याचे व उपरोक्त उल्लेखीत मशिन मॉडेल ८६७२ सध्या उपलब्ध होत नसल्याने या ऐवजी ८६५० या मॉडेलच्या तीन मशिन खरेदी करण्यासाठी पुरवठादारांकडून कोटेशन मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१ | द कोरस(इं) लि.,पुणे |
| ०२ | सुलभ एन्टरप्राईजेस,पुणे |
| ०३ | वरद एन्टरप्राईजेस,पुणे |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | वर्णन | कोटेशनमध्ये देऊ केलेले दर रुपये. |
|---|---|---|---|
| ०१ | द कोरस(इं) लि.,पुणे | De-La-Rue ८६५० | ९०,०००/-+ व्हॅट १२.५ % |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | सुलभ एन्टरप्राईजेस,पुणे | De-La-Rue ८६५० | १,००,०००/-+ व्हॅट १२.५ % |
| ०३ | वरद एन्टरप्राईजेस,पुणे | De-La-Rue ८६५० | १,१०,०००/-+ व्हॅट १२.५ % |

उपरोक्तप्रमाणे मे.कोरस (इं) लि. पुणे यांनी सदरच्या मशिनसाठी कळविलेला दर सर्वात कमी (एका मशिनकरीता रु. ९०,०००/- + व्हॅट १२.५ % ) असल्याने या मशिन्स त्यांचेकडून खरेदी करण्यात याव्यात तसेच नविन मशिन खरेदी करतांना याच कंपनीच्या - डे-ला-रु मॉडेल-२६२० या जुन्या तीन मशिन (प्रती मशिन रु.१०,०००/- या किमतीस) परत करुन याप्रमाणे एकूण रु.३०,०००/- वजावट करुन बीलाची रक्कम आदा करणेस, तसेच या मशिन व दक्षिणामोजणीसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व काऊंटींग मशिनकरीता प्रत्येक वर्षी करावा लागणाऱ्या वार्षिक दुरुस्ती व देखभाल कराराची (AMC) रक्कम आदा करण्योस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**०२)नगर-मनमाड रोड डिव्हायडरचे सुशोभिकरण करणेकामी उघडलेल्या कोटशनवर निर्णय होणेबाबत.**

नगर मनमाड रोड डिव्हाडर सुशोभिकरण करणेकामी साईप्रसाद बिल्डींग ते नविन भक्त निवास पर्यंत रोड डिव्हाडर लांबी १४२५ मी व रुंदी १.४० मी आहे. नगर मनमाड रोड डिव्हाडर मध्ये लॉन लावून त्यामध्ये शोभेची रोपे लावावयाची आहे. यासाठी पुणे,नाशिक, अहमदनगर येथून मागविण्यात आलेली कोटेशन्स व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.१.२००७ चे सभेत समक्ष उघडण्यात आली. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.न. | नाव व पत्ता | दर लॉन रुपये | दर रोपे फायकस रु. | दर रोपे डुरंटा रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | पापायाज नर्सरी,नाशिक | ८.०० | ४.५० | २.५० |
| ०२ | तपोवन नर्सरी ,नाशिक | -- | -- | -- |
| ०३ | वृंदावन नर्सरी,पुणे | ३०.०० | २५०.०० | ८.०० |
| ०४ | गिरमे फार्म,पुणे | २०.०० | १५०.०० | ८.०० |
| ०५ | सहयाद्री नर्सरी, अस्तगांव ता.राहाता जि,अ.नगर | ३२.०० | १५०.००<br>४९५.०० | ७.७५ |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कोटेशन्सधारकांनी देऊ केलेल्या दरात मोठ्या प्रमाणात तफावत असल्याने कोटेशन्सधारकांना उपसमितीचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे, असे चर्चेत ठरले होते. परंतू व्यवस्थापन समितीचे बैठकीपूर्वी दरम्यान उपसमितीचे बैठक न झाल्यामूहे उपरोक्त पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे दर कमी करणेबाबत विनंती करण्यात आली. या पुरवठाधारकांपैकी पापायाज नर्सरी,नाशिक यांनी कोटेशनमध्ये नमूद केलेली लॉन, डुरंटा,फायकस रोपे पुरविणेस असमर्थता दर्शविली आहे. इतर तीन पुरवठाधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.न. | नाव व पत्ता | दर लॉन रुपये | दर रोपे फायकस रु. | दर रोपे डुरंटा रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | पापायाज नर्सरी,नाशिक | शिल्लक नाही | शिल्लक नाही | शिल्लक नाही |
| ०२ | तपोवन नर्सरी ,नाशिक | -- | -- | -- |
| ०३ | वृंदावन नर्सरी,पुणे | २७.०० | १४०.०० | ६.०० |
| ०४ | गिरमे फार्म,पुणे | १९.०० | १५०.०० | ७.०० |
| ०५ | सहयाद्री नर्सरी, अस्तगांव ता.राहाता जि,अ.नगर | १९.०० | १५०.०० | ७.५० |

निम्नतम दराचे पुरवठाधारक सह्याद्री नर्सरी,अस्तगांव व गिरमे फार्म, पुर्ण यांचेकडून लॉन, वृंदावन नर्सरी पूणे यांचेकडून डुरंटा व वृंदावन नर्सरी, पुणे यांचेकडून फायकस रोपे खरेदी करण्यात यावे सदरचे काम उन्हाळा सुरु होणेपूर्वी करण्याचे दृष्टीने निम्नतम दराचे ठेकेदार यांचेकडून लॉन, रोपे उपलब्ध न झाल्यास त्याच दरात अथवा व्दितीय निम्नतम दराचे ठेकेदार यांचेकडून खरेदी करण्यात यावे. तसेच याकामी आवश्यक पोयटाही विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**०३)समाधि मंदीर परिसरातील महाद्वारांजवळ सुशोभित चप्पल स्टॅण्ड करणेकामी आलेल्या निविदावर वाटाघाटीने निर्णय घेणे.**

संस्थानचे समाधी मंदिर परिसरात चार महाद्वारांजवळ सध्या चारही तात्पुरत्या स्वरुपात मंडप स्टॉल उभारणी करुन विनामुल्य पादत्राणे ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/११/२००६ रोजीचे सभेत समाधी मंदिर परिसरात चार महाद्वारांजवळ सुशोभित चप्पल स्टँड तयार करणेकामी येणार रुपये ६ लक्ष खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. याकरिता दि.१८ डिसेंबर,२००६ ते दि.२५ डिसेंबर,२००६ अखेर कोऱ्या निविदा अर्ज विक्रीची मुदत देण्यात आली होती. तसेच सिलबंद निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि.२७ डिसेंबर,२००६ पर्यंत देण्यात आली होती. या विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी निविदा विकत घेतलेल्या आहेत.

| अ.नं | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. अजिल फॅब्रीटेक, पुणे |
| ०२. | मे. अक्षदा एन्टरप्रायजेस, नाशिक |

| | |
|---|---|
| ०३. | मे. प्रणित पॉलीमेकर्स, वाशी |
| ०४ | मे. भिगांरवाला एन्टरप्राईजेस, अ.नगर |

उपरोक्त पैकी खालील तीन पुरवठादार यांनी विहीत मूदतीत सिलबंद निवीदा सादर केल्या आहे.

| अ.नं | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. अजिल फॅब्रीटेक, पुणे |
| ०२. | मे. अक्षदा एन्टरप्रायजेस, नाशिक |
| ०३. | मे. प्रणित पॉलीमेकर्स, वाशी |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.१.२००७ चे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे देऊ केले आहेत.

| **अ.नं** | **निविदाधारकांचे नांव** | **निविदेतील दर रुपये** | **चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१. | मे. अजिल फॅब्रीटेक, पुणे | ८,२३,६८०/- | अनुपस्थित |
| ०२. | मे. अक्षदा एन्टरप्रायजेस, नाशिक | ११,२५,४५०/- | १०,६९,१७७.५० |
| ०३. | मे. प्रणित पॉलीमेकर्स, वाशी | ८,६४,०००/- | ७,६०,०००/-<br>सर्व करासह एकत्रित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. प्रणित पॉलीमेकर्स, वाशी यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना ३० दिवसांत चप्पल स्टँड करुन देणेची अट घालून कार्यादेश देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग पमुख)

**०४) इ.सी.जी.मशिन बायबॅक करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

श्रीसाईनाथ हॉस्पीटलमध्ये मे.बी.पी.एल.ली,मुंबई या कंपनीचे एकुण ०९ ई.सी.जी. मशीन आहेत. त्यापैकी एक मशीन ऑटोमॅटीक ६१०८ या प्रकारचे व ०८ मशीन्स मॅन्युअल १०८ प्रकारचे आहेत. त्यापैकी ०१ ऑटोमॅटीक ६१०८ मशीन व मॅन्युअल १०८-०६ नग मशीन्स वापरून वापरून खराब झालेले आहेत.

त्यासाठी ०१ ऑटोमॅटीक मशीन ६१०८ व मॅन्युअल १०८-०६ नग मशीन्स कंपनीकडे बायबॅक करून तेवढेच नग नविन मशिन्स विविध कंपन्यांकडून कोटेशन मागवुन खरेदी करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.१,८५,७००/-च्या खर्चास मा.व्य.समिती सभा दि.२५/११/०६ निर्णय क्र.९१३ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.त्यासाठी सदर प्रकारच्या मशिनचा पुरवठा करणाऱ्या एकुण ०६ कंपन्या/ अधिकृत डीलर यांचेकडुन दि.१५/१२/२००६ अखेर कोटेशन मागविण्यात आले असून त्यापैकी खालीलप्रमाणे चार कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

1) M/s.Devi Surgicals,
C/o.Gandhi Enterprises, B-25,Ambar Plaza,
Near HDFC Bank,S.T.Stand Road, Ahmednagar-414 001.
2) M/s.Hospicare,
C/o.Mr.Pramod Shahane, Tawalewada,
Near Mahanagarpalika, Ahmednagar-414 001
3) M/s.Saitrons Medical Equipment,
Near Pravara Medical Trust Campus, Shop No.G-01,Utility Complex,
Loni Sangamner Road, A/Post.Loni-413 736, Tal. Rahata, Dist. Ahmednagar.
4) M/s.Recorders & Medicare Systems (P) Ltd.
81/5,Phase-1 Industrial Area, Chandigarh-160 002.

वरीलपैकी अ.क्र.१ ते ३ हे बंद कोटेशन व अ.क्र.४ चे कोटेशन पाकीटावर कोटेशन असल्याचे नमुद केले नसल्यामुळे टपालात चुकून उघडून प्राप्त झाले आहे.तरी अ.क्र.४ चे कोटेशन देखील सदरचे बायबॅक करताना विचारात घ्यावे असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे ई.सी.जी. मशीन खरेदी करण्यासाठी मागविण्यात आलेले कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

यावेळी चार कोटेशनधारकांपैकी खालील तीन कोटेशनधारक चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

1) M/s.Devi Surgicals, Ahmednagar
2) M/s.Hospicare, Ahmednagar
3) M/s.Saitrons Medical Equipment, Loni,Tal.Rahata,Dist.Ahmednagar.

त्यावेळी उपरोक्त ४ बंद कोटेशन समितीसमक्ष उघडण्यात येउन त्यातील तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे-

**Type of Machine- make-BPL, Model १०८ (Single Channel)**

| Sr | Name of Party A | Qty B | Rate of new Machine as Per Quotation C | Rate of new Machine After Negotiation D | Buyback Value of old Machine in Quotation E | Buyback Value of old Machine after Negotiation F | Net Value of Machine (D-F) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | M/s.Devi Surgical, A'Nagar(BPL) | 06 | 21000/- | 20000/- | 5000/- | 5000/- | 15000/- |
| 2. | M/s.Hospicare,A'Nagar (Schiller) | 06 | 47250/- 61875/-(Int.) | 40000/- 59875/-(Int.) | 1500/- | 2500/- | 37500/- 57375/-.) |
| 3. | M/s.Saitrons Medical Equipment,Loni(BPL) | 06 | 20000/- | 20000/- | 5000/- | 6500/- | 13500/- |
| 4. | M/s.Recorders & Medicare Systems Pvt.Ltd.Chandigarh. (RMS) | 06 | RMS 15500/- +01Nos.Machi ne free | 15500/- +01Nos.Mac hine free | No uyback | No Buyback | 15500/- |

**Type of Machine- Model -Automatic 6108 make- BPL**

| Sr | Name of Party A | Qty . B | Rate of new Machine as Per Quotation C | Rate of new Machine After Negotiation D | Buyback Value of old machine in Quotation E | Buyback Value of old Machine after Negotiation F | Net Value of Machine (D-F) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | M/s. Devi Surgical, A'Nagar (BPL) | 01 | 100000/- (12 annel) | 100000/- | 6000/- | 10000/- | 90000/- |
| 2. | M/s.Hospicare, A'Nagar (Schiller) | 01 | 61875/- 76500/-(Int.) (12 Channel) | 59875/- 74500/-(Int.) | 5000/- | 5000/- | 54875/- 69500/- |
| 3. | M/s.Saitrons Medical Equipment , Loni. (BPL) | 01 | 93000/- (12 Channel) | 93000/- | 7000/- | 15600/- | 77400/- |
| 4. | M/s.Recorders & Medicare Systems Pvt.Ltd.Chandigarh(RM S) | 01 | 35000/- (12 Channel) | 30000/- (by fax) | No Buyback | No Buyback | 30000/- |

उपरोक्त पुरवठा धारकांशी चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या त्यांनी चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर वरील तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहेत.यावर सविस्तर चर्चा होउन मे.साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट,लोणी यांनी BPL कंपनीचे दर दिलेले असुन ते निम्नतम आहेत. BPL कंपनी नामांकित असुन त्यांच्या मशिन उत्तम प्रतीच्या असल्यामुळे त्यांचे निम्नतम दर स्विकारण्यात यावेत व जुने मशिन मे.साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट,लोणी यांना परत करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०५) प्लॅस्टिक सर्जरी विभागासाठी Tissue Expander खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात प्लॉस्टिक सर्जरीच्या शस्त्रक्रिया नविनच कार्यान्वीत करण्यात येत आहे. सदरच्या प्लास्टिक सर्जरीच्या शस्त्रक्रियेसाठी Tissue expander ची आवश्यकता असते. सदर Tissue expander ची दि.०४/१२/२००६ च्या पत्रान्वये प्लॉस्टिक सर्जन डॉ. करमरकर यांनी प्रत्येक साईजचे दोन नग या प्रमाणे ९ साईजचे १८ नगांची मागणी केलेली आहे.

वरील एक नगाची अंदाजे किंमत रु.९,५००/- या प्रमाणे ९ नगासाठी अंदाजे रु.८५,५००/- चा खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त १८ नग Tissue expander विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८५,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०६) स्ट्रेचर ट्रॉलीवर रेक्झीन मॅट्रेसेस खरेदीबाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅज्युएल्टी वार्ड शस्त्रक्रिया गृह इत्यादी ठिकाणी रुग्णांची ने-आण करणे कामी नविन १२ स्ट्रेचर ट्रॉली खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या ट्रॉलीवर त्याच साईजच्या रेक्झीन कव्हर असलेल्या मॅट्रेसेसची आवश्यकता असलेबाबत अधिसेविका कार्यालयाने त्यांचे डि.पी.क्र.१९६९ दि. १४/१२/२००६ अन्वये १२ नगांची मागणी केलेली आहे.

एका रेक्झीन मॅट्रेसेसची अंदाजे किंमत प्रती नग रु. ४२४६/- आहे यानुसार एकुण १२ नग मॅट्रेसेस खरेदीकामी रु. ५०,९५२/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे रेक्झीन स्ट्रेचर मॅट्रेसेस विहित पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ५०,९५२/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०७) श्रीसाईनाथ रुग्णालय नेत्र शल्य विभागासाठी हत्यारे खरेदीबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरचे नेत्रशल्य चिकित्सा विभागासाठी लागणा-या हत्यारांपैकी काही हत्यारे वापरून वापरुन खराब झालेली आहे. त्यामुळे नेत्रशल्य विशारद डॉ. अजित पाटील यांनी काही (११ प्रकरच्या) हत्यारांची मागणी केलेली आहे. सदरची हत्यारे दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी तातडीने आवश्यक आहे. याकामी अंदाजे रु. ४०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित असून खालीलप्रमाणे हत्यारे तातडीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ४०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| | |
|---|---|
| 01 | Needle Holder- 10 |
| 02 | Rectus muscle holding forceps- 06 |
| 03 | Wescott Conjuctival Scissors- 10 |
| 04 | Corneal Scissors- 06 |
| 05 | Corneal Forceps- 20 |
| 06 | Macfersons Forceps- 20 |
| 07 | Vannas Scissors- 10 |
| 08 | Suture Typing Forceps- 20 |
| 09 | Baraqure Microneede holder- 10 |
| 10 | IOL Dialer- 10 |
| 11 | Classocal Simcoe Connulae- 10 |

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरकामी कोटेशन मागणी करुन मा.कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८) श्रीसाईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळेसाठी RA-५० Auto Analyser मशिन खरेदीबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात दैनंदिन रक्त लघवीच्या तपासण्या करणे कामी सन १९९३ साली उपरोक्त मशिन मे. बायर डायग्नोस्टीक इंडिया लि., अहमदाबाद यांचेकडून खरेदी करण्यात आले होते.

सदर मशिन सुमारे १३ वर्षापुर्वीचे असुन सदरचे मशिन वारंवार बंद पडते व वारंवार दुरुस्त करावे लागते. तेव्हा प्रयोगशाळा विभागाने त्यांचे दि.१५/०१/२००७ चे पत्राअन्वये नविन मशिन मिळणेबाबतची मागणी केलेली आहे. नविन मशिनची अंदाजे किंमत रु.३,००,०००/- पर्यंत आहे.

श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता अशाच प्रकारचे एक मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेबाबत मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/११/२००६ निर्णय क्रमांक ८७५(२७) अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्याच मशिनचे कोटेशन बरोबर या मशिनसाठी कोटेशन मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळेसाठी RA-५० Auto Analyser मशिन नामांकित कंपन्याकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणार अंदाजे रक्कम रुपये ३ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०९) प्लॅस्टिक सर्जरी ऑपरेशन थिएटर करिता बायनोक्यूलर लूप खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात जनरल ओ.टी.मध्ये प्लॅस्टिक सर्जरीसाठी Binocular Head-Worn Loupe ची आवश्यकता असते. त्यासाठी जनरल ओ.टी. विभागाने त्यांचे डि.पी.क्र. ७८ दि. १७/०१/२००७ अन्वये सदर ०१ नग मागणी केलेली आहे. सदरचे एक नग Binocular Head-Worn Loupe साठी अंदाजे रु.१,१६,०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे Binocular Head-Worn Loupe विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,१६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१०)श्रीसाईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरकरिता एन्डोस्कोपीक इन्स्टूमेंट खरेदीबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागातील Endoscopic Instrument हि दुरुस्त होत नसल्याने ऑपरेशन थिएटर विभागाने डि.पी. क्र. ७५९४ दि. २५/१२/२००६ अन्वये खालीलप्रमाणे नविन इन्स्टुमेंटची मागणी केलेली आहे.

| Sr. no. | Description | Qty. nos |
|---|---|---|
| 1 | 26173 SA- SZABO BERCI- Assistant Needle Holder FLAMIGO JAW with Intergreated Scissor Straight. Handle Size 5 mm, Length, 33 cm, for used 2/0, 4/0 Suture Material needle suze SH Ethicon EN- S (Ski) v (U.SSC) | 1 nos |
| 2 | 3351 D FS. Click Line Forcep Insert Claw Forcep 2x3 Teeth Sungle Action Jaw size 10 mm, Length 36 mm | 1 nos |
| 3 | 33310 ME 1 Click Line Forcep Insert MANHES Grasping Forcep Jaw with Multiple Teeth width of Jaw 4.8 mm for Atraumatic and Accurate Grasping Single Action Jaw size 5 mm, Length 36 cm | 1 nos |

| | | |
|---|---|---|
| 4 | 33310 MB Click Line Forcep Insert MANHES Biopsy Focep Single Action Jaws size 5 mm, Length 36 cm | 1 nos |
| 5 | 33122 Plastic Handle with MANHES Style Ratchet with Connector Pin for Unipolar Coagulation | |
| 6 | 33321 MD Click Line KELLY Disecting and Grasping Forcep Rotating with Connector Pin for Unipolar Coagulation ssize 5 mm, Length 36 cm, Double Action Jaw Consiting of 33121 Plastic Handle without Ratchat 33300 Outer Tube Insulated 33310 MD Forcep Insert. | |
| 7 | Washer for 10 mm Trochar | 20 nos |
| 8 | Washer for 5 mm Trochar | 20 nos |
| 9 | Bowl Handling Forcep | 1 nos |

उपरोक्त हत्यारे नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. २,२५,३७१/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**११) पेशंटचे ड्रेस खरेदी करणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल दिनांक १५/०५/२००६ रोजी सुरु झाले असून हॉस्पिटलकरीता लागणा-या लिननची खरेदी मे.सेंच्युरी टेक्सटाईल्स मिल्स,मुंबई यांचेकडून करण्यात आलेली असून त्याचे लिनन शिवून घेण्यात आले आहे.

तथापि, पेशंटला शिवून घेण्यात आलेले ड्रेस सर्व वॉर्डला मागणी व गरजेप्रमाणे दिल्याने सध्या स्टॉकला शिल्लक नाहीत. याकामी दिनांक २७/०७/२००६ रोजी कापड खरेदीसाठी टिपणी सादर केली होती त्यास मान्यता मिळून मा.व्य.सभा दिनांक १९/०८/२००६ चे निर्णय क्र ६५० अन्वये व्यवस्थापन समितीचीही रु.५०,०००/- (अक्षरी रु. पन्नास हजार मात्र) खर्चास मान्यता मिळाली आहे.

सदरची मान्यता कापड खरेदीस घेतली होती, परंतु कापड घेवून पुन्हा टेलरकडून शिवुन घेण्यास बराच कालावधी लागु शकतो म्हणून सध्या हॉस्पिटलच्या नर्सेस गणवेश व ॲपरन्स, बेडशीट अशा सर्व आवश्यक असलेल्या रेडीमेड ड्रेसच्या खरेदीची कार्यवाही खरेदी विभागामार्फत चालू आहे त्यातच पेशंटच्या ड्रेससाठी जास्त कालावधी जाण्यापेक्षा व भरती होणा-या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली वाढ पाहता पेशंटचे ड्रेसही रेडीमेडच घ्यावेत. ज्यात मेल पेशंटकरीता चॉकलेटी पट्टयांचे व फिमेल पेशंटकरीता निळया पट्टयांचे ड्रेस साधारणतः तीन प्रकारच्या साईजमध्ये तातडीने खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१२) वैद्यकीय बीलात सवलत मिळणेबाबत,कु.उषा शामराव साळवे,दहिगाव बोलका, श्री.शेख खाँजा शेखलाल, जानेफळ, श्री.रावसाहेब बाळाजी सुपेकर,शिंगणापूर, श्री.सुभाष शंकर साळी, नाशिक, यांचे अर्ज.**

**१) श्री. शामराव किसन साळवे,** रा. दहिगांव बोलका, यांनी दि. १७/१०/२००६ च्या अर्जान्वये त्यांची मुलगी कु. उषा शामराव साळवे, वय १२ वर्षे ही मेंदुज्वराने आजारी होती, तीला दि. १/१०/२००६ पासून ते दि.१७/१०/२००६ पर्यंत श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते, व तीच्यावर आपल्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचार चालू असतांना ICU विभागामध्ये दि.१७/१०/०६ रोजी सकाळी सा.१०.२५ वाजता तीचे दुदैवी निधन झाले.

श्री. शामराव किसन साळवे यांनी विनंती केली आहे की, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने ते रु. २५,८११/- एवढा खर्च करु शकत नाही.

श्री. शामराव साळवे हे एका हाताने (कोपरापासून हात नसल्याने) अपंग आहेत, तसेच श्री. शामराव साळवे यांनी कु. उषा साळवे ही पाच महिन्याची असतांना त्यांनी दत्तक म्हणून घेतली होती तसेच श्री. साळवे हे एका हाताने अपंग असनूही मोलमजुरी व मिळेल ते काम करुन कु. उषा हीचे पालन पोषण करीत होते परंतू तीचे दुदैवाने निधन झाले.

श्री. शामराव साळवे हयांची वैद्यकीय बिल रु. २५,८११/- भरण्याची ऐपत नसल्याने त्यांनी संपूर्ण बिल माफ करावे म्हणून विनंती केली आहे. तसेच ते बी.पी.एल. कार्ड (दारीद्रय रेषेचे) रेशनकार्ड धारक आहे.

**२) श्री. शेख खलील खाँजा** रा. जानेफळ ता. वैजापूर यांनी विनंती अर्ज केला आहे की, त्यांचे वडील शेख खाँजा शेखलाल, हे आपले श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदय विकाराने आजारी असून त्यांची हृदयशस्त्रक्रिया आपल्या हॉस्पिटलमध्ये झालेली आहे, त्यासाठी त्यांना रु. ६०,०००/- इतका खर्च आहे असा हॉस्पिटलचे डॉ. नरोडे यांनी खर्चाचा दाखला दिला आहे.

श्री. शेख खाँजा शेखलाल, यांनी डिपॉझिट दि. ३०/०८/२००६ पावती नं. ०००६६९, रु. ३०,०००/- भरलेले आहेत व उर्वरीत रक्कम रु. ३०,०००/- त्यांनी सवलत मिळणेबाबत विनंती केली आहे.

मा. अध्यक्ष जयंत ससाणे सो. यांनी श्री. शेख खाँजा शेखलाल यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे, तरी त्यांना बीलात जास्तीत जास्त सवलत दयावी अशी शिफारस केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत रहीवाशी दाखला,उत्पन्नाचा दाखला व १०० रु. स्टॅप पेपर वरती उत्पन्नाची व कौटूंबिक माहीती दिलेली आहे.

श्री. शेख खाँजा शेखलाल यांचे उर्वरीत बील रू. ३०,०००/- माफ होणेबाबत विनंती केली होती तसेच मा. अध्यक्ष महोदय यांनी समक्ष शिफारस पत्रावर रु. १०,०००/- सवलत दयावी असे नमुद केले आहे.

**<u>३) श्री. रावसाहेब बाळाजी सुपेकर</u>** रा. शिंगणापूर, ता. कोपरगांव यांनी विनंती केली आहे की, हृदय शस्त्रक्रियासाठी आपल्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट झाले असून त्यांची अ‍ॅजोग्राफी बायपास करणेकामी आपले हॉस्पिटलचे डॉ. विदयुत कुमार यांनी रु. ६०,०००/- खर्च दर्शविला आहे, तसेच त्यांनी विनंती केली आहे की, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून रु. २५,०००/- भरुन उर्वरीत रक्कम माफ करावी अशी विनंती केली आहे.

मा. उपाध्यक्ष श्री. कोल्हे यांनी दि. २३/०८/२००६ चे शिफारसी अन्वये श्री. रावसाहेब बाळाजी सुपेकर, यांची परिस्थिती गरीबीची असल्याने तसेच ते भटक्या जमातीचे असल्याने त्यांचेकडून एकूण रु. २५,०००/- बिल आकारणी करुन उर्वरीत बिल माफ करावे अशी शिफारस केली आहे.

मा.उपाध्यक्ष यांचे सुचनेप्रमाणे श्री. सुपेकर यांचेवर आवश्यक शस्त्रक्रिया व उपचार केलेले आहेत त्यांनी अर्जासोबत रहीवाशी दाखला, उत्पन्नाचा दाखला, दारिद्रय रेषेखालील उत्पन्नाचा दाखला, हे कागदपत्रे जोडलेली आहेत.

श्री.सुपेकर यांना एकूण वैद्यकीय बिल रु. ६०,०००/- झाले असून त्यांनी रु. २५,०००/- डिपॉझिट पावती नं. ७०६ अन्वये भरलेले आहेत व उर्वरीत रक्कम रु. ३५,०००/- भरणे बाकी आहे.

**<u>४) श्री. सुभाष शंकर साळी</u>**, रा. नाशिक यांनी दि. १८/०८/२००६ च्या अर्जान्वये -हदय शस्त्रक्रिया आपल्या साईबाबा हॉस्पिटलमध्ये होणार असून त्यासाठी ५०,०००/- रु. खर्च अपेक्षित आहे, तसा हॉस्पिटल डॉक्टरांचा खर्चाचा दाखला जोडला आहे.

श्री.सुभाष शंकर साळी, यांनी विनंती केली आहे की, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने ते रु. ५०,०००/- खर्च करु शकत नाही, तसेच त्यांनी जास्तीत जास्त रु. ३०,०००/- (तीस हजार रु.) पर्यंत डिपॉझिट भरणार आहेत व उर्वरीत रक्कम रु. २०,०००/- ( वीस हजार रु. ) सवलत मिळणे बाबत विनंती केली आहे.

मा. उपाध्यक्ष श्री. शंकरराव कोल्हे यांनी दि. १८/०८/२००६ चे शिफारशी अन्वये श्री.सुभाष शंकर साळी, यांना जास्तीत जास्त सवलत दयावी अशी शिफारस केली आहे.

तरी श्री. सुभाष शंकर साळी, यांनी अर्जासोबत रेशनकार्ड झेरॉक्स, उत्पन्नाचा दाखला, व रहीवाशी दाखला, इ. कागदपत्रे जोडली आहे, तसेच ते बी.पी.एल. कार्ड (दारीद्रय रेषेचे) रेशनकार्ड धारक नाही.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. शामराव किसन साळवे यांना रुपये २५,८११/- श्री. शेख खलील खाँजा यांना रुपये १०,०००/- श्री. रावसाहेब बाळाजी सुपेकर यांना रुपये ३५,०००/- व श्री. सुभाष शंकर साळी यांना रुपये २०,०००/-माफ करणेत यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय))

**१३) <u>हृदय शस्त्रक्रिया व डायलेसीस बीलात सवलत मिळणेबाबत,श्री.रंगनाथ माणिक भागवत व इतर ४ यांचे अर्जाबाबत.</u>**

**<u>१) श्री रंगनाथ माणिक भागवत</u>** रा. एरंडगाव, ता. शेवगाव, जि. अ. नगर, यांचे (Angoplasty) हृदय शस्त्रक्रियेकरिता डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी रु. ५१०००/- इतका अंदाजे खर्च सांगीतला आहे, परंतु दि.१५/११/२००६ रोजी ऑपरेशनच्या वेळी वेगळा स्टेन टाकावा लागल्यामुळे त्यांना एकुण १,१४,०००/- व शस्त्रक्रियेनंतर ५,०६८/- असे एकूण १,१९०६८/- इतका खर्च आला आहे.

श्री.भागवत यांचे विनंती अर्जानुसार रक्कम रु ८१,०००/- भरण्यास तयार आहेत, मा. विश्वस्त श्री. अभंग सो. यांचे पत्रान्वये श्री. भागवत यांचेकडून कमीत कमी फी आकारावी अशी शिफारस केली आहे.

**<u>०२) श्री. पाथरकर भगवान अंबादास</u>** यांचा दि.१८.१२.२००६ चा विनंती अर्ज.

श्री. पाथरकर यांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी रु. ५१,०००/- इतका खर्च अपेक्षित खर्च सांगीतला आहे.

श्री. पाथरकर यांच्या विनंती अर्जानुसार ते रु.१५,०००/- भरु शकतात. मा. विश्वस्त श्री. राधाकृष्ण विखे यांचे पी.ए. यांनी श्री. पाथरकर यांच्या बीलात जास्तीत जास्त सवलत देण्याची विनंती केली आहे.

**३) श्री. सुर्यभान रघुनाथ जगताप,** रा. अंदरसुल, यांचा दि. ११/१२/०६ रोजीच्या विनंती अर्जानुसार त्यांचे काका दगु महादु जगताप यांची हृदय शस्त्रक्रियेसाठी डॉ. नरोडे यांनी रु. ५१,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याचा दाखला दिला आहे.

मा. उपाध्यक्ष श्री. काल्हे साो. यांचे शिफारस पत्रान्वये श्री. जगताप हे रु. ५१,०००/- पैकी ते रु.१६,०००/-भरण्यास तयार असून उर्वरीत वैद्यकीय बिल रक्कम रु. ३५,०००/- माफ करावे अशी शिफारस केली आहे.

**४) श्री. अंबादास दगडूजी अमृतवाड,** रा. संगमनेर, यांचा दि.६/१०/०६ रोजीचा विनंती अर्ज.

श्री. अमृतवाड हे किडनीच्या विकाराने पिडीत असल्याने त्यांना डायलेसीस उपचार हयात असेपर्यत करावे लागणार आहे, प्रत्येक वेळेचा डायलेसिसचा अंदाजे खर्च रु.१२००/- इतका येतो.संस्थानचे हॉस्पिटलमध्ये डायलेसिस मशीनसोबत डायलायझर टयुब मोफत मिळाल्याने त्याचे बिल आकारण्यात येत नसल्याने एकवेळच्या डायलेसिससाठी रु. ६००/- इतका खर्च येतो, तरी अमृतवाड यांनी प्रत्येक वेळेसच्या डायलेसिसच्या बिलामध्ये ५०% सवलत दयावी अशी विनंती केली आहे.

मा.विश्वस्त श्री. खांबेकर यांनी रुग्णाचे डायलेसिस नाममात्र दराने करावे अशी शिफारस केली आहे.

श्री.अमृतवाड हे हयात असेपर्यंत प्रत्येक वेळच्या डायलेसीसच्या बिलात ५०% सवलत देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णय होणेस्तव, सविनय सादर.

**५) श्री. आण्णासाहेब भिमाजी गुंजाळ,** रा.संगमनेर यांचा दि.२१/१२/०६ रोजीचा विनंती अर्ज.

श्री. गुंजाळ, हे किडनीच्या विकाराने पिडीत असून त्यांना डायलेसीस उपचार करावे लागते, त्यासाठी प्रत्येक वेळेस डायलेसीसचा खर्च अंदाजे रु. १२००/- इतका येतो.

आपल्या हॉस्पिटलमध्ये डायलेसिस मशीनसोबत डायलायझर टयुब मोफत मिळाल्याने त्याचे बिल आकारण्यात येत नसल्याने एकवेळच्या डायलेसिससाठी रु. ६००/- इतका खर्च येतो, तरी श्री. गुंजाळ यांनी प्रत्येक वेळेसच्या डायलेसिसच्या बिलामध्ये ५०% सवलत दयावी अशी विनंती केली आहे. मा. विश्वस्त, आ. श्री. विखे साो. यांनी डायलेसिसच्या होणा-या बिलात जास्तीत जास्त सवलत दयावी अशी शिफारस केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रंगनाथ माणिक भागवत, यांना रुपये ३८,०६८.००, श्री भगवान आंबादास पाथरकर यांना रुपये ३५,०००/- व श्री सुर्यभान रघुनाथ जगताप यांना रुपये ३५,०००/- बीलात सवलत देण्यात यावी.

तसेच श्री अंबादास दगडूजी अमृतवाड, श्री आण्णासाहेब भिमाजी गुंजाळ यांचे अर्जाबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१४) जुने खराब ट्यूब व टायर विक्री बाबत.**

वाहन विभागाकडील वाहनांचे खालील प्रकारचे टायर/टयुब वापराने खराब झाल्याने त्यांची कोटेशनच्या उच्चतम दराने विक्री करणेकामी १४ व्यापाऱ्यांना जा.नं.एसएसएस/वशी-दप्तर/२६६/१८२८१/०६ दि.२९/१२/२००६ नुसार अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पत्रे देण्यात आलेली आहेत. त्यापैकी ५ व्यापाऱ्यांना दरपत्रके दिलेली आहे. श्री.शेख इसाक इब्राहिम,औरंगाबाद व्यापाऱ्यास पाठविलेले पत्र परत आलेले आहे.

| अ.नं. | साईज | टायरची संख्या | टयुबची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | १३-०६-२८ | ०२ | - |
| ०२ | ९-००-२० | ०६ | ०४ |
| ०३ | ७-५०-१६ | १५ | १६ |
| ०४ | २३५/७५आर १५ | ०७ | ०७ |
| ०५ | २१५/७५ आर १५ | २२ | ०७ |
| ०६ | २१५/७५ आर १४ | ०२ | ०२ |
| ०७ | १६५/८० आर १५ | ०५ | ०८ |
| ०८ | ०४-५०-१० | ०६ | ०७ |
| ०९ | ०६-००-१६ | ०३ | ०१ |
| १० | १७५/७० आर १५ | ०४ | ०३ |
| | **एकूण -** | **७२** | **५५** |
| ११ | खराब फ्लॅप | ४० किलो | |

दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | साईज | परिमाण | मे.भगवानदास टायर्स, लासलगाव | श्री.अकबर पठाण, कोपरगाव | मे.न्यू इंडिया स्क्रॅप सेंटर कोपरगाव | मे.इंडिया रबर प्रॉडक्टस् औरंगाबाद | श्री.एस.के.फ्यूम औरंगाबाद |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जुने टायर-१३-०६-२८ | नग-०२ | **९००.००** | ५००.०० | ४९०.०० | ८००.०० | ७५०.०० |
| ०२ | जुने टायर-९-००-२० | नग-०६ | **३००.००** | २००.०० | ८०.०० | ८०.०० | ६०.०० |
| ०३ | जुने टायर-७-५०-१६ | नग-१५ | २७५.०० | **४००.००** | ३८६.०० | ३७०.०० | ३१०.०० |
| ०४ | जुने टायर २३५/७५ आर १५ | नग-०७ | ८०.०० | २००. | ५१.०० | **२२०.००** | १९०.०० |
| ०५ | जुने टायर-२१५/७५ आर १५ | नग-२२ | ८०.०० | १५०.०० | १५१.०० | **१७०.००** | १५०.०० |
| ०६ | जुने टायर- २१५/७५ आर १४ | नग-०२ | ७०.०० | २००.०० | ५१.०० | **२२०.००** | १८५.०० |
| ०७ | जुने टायर- १६५/८० आर १५ | नग-०५ | ६५.०० | १५०.०० | ३०.०० | **१७०.००** | १४५.०० |
| ०८ | जुने टायर- ०४-५०-१० | नग-०६ | ५०.०० | **१२५.००** | ५१.०० | ३०.०० | २०.०० |
| ०९ | जुने टायर-०६-००-१६ | नग-०३ | **२००.००** | **२००.००** | १२५.०० | १०५.०० | ९५.०० |
| १० | जुने टायर- २७५/७० आर १५ | नग-०४ | ५०.०० | १५०.०० | १०५.०० | **१७०.००** | १४५.०० |
| ११ | जुन्या ट्यूब-९-००-२० | नग-०४ | **१२५.००** | १००.०० | -- | ७.०० | ५०.०० |
| १२ | जुन्या ट्यूब-०७-५०-१६ | नग-१६ | **७५.००** | **७५.००** | -- | ३०.०० | ०८.०० |
| १३ | जुन्या ट्यूब-२३५/७५आर १५ | नग-०७ | ३५.०० | **५०.००** | -- | १५.०० | ०८.०० |
| १४ | जुन्या ट्यूब २१५/७५ आर १५ | नग-०७ | ३५.०० | **५०.००** | -- | १५.०० | ०८.०० |
| १५ | जुन्या ट्यूब- २१५/७५ आर १४ | नग-०२ | ३०.०० | **५०.००** | -- | १५.०० | ०८.०० |
| १६ | जुन्या ट्यूब- १६५/८० आर १५ | नग-०८ | ३०.०० | **७५.००** | -- | १५.०० | ०८.०० |
| १७ | जुन्या ट्यूब-०४-५०-१० | नग-०७ | **२५.००** | **२५.००** | -- | १५.०० | ०८.०० |
| १८ | जुन्या ट्यूब-०६-००-१६ | नग-०१ | ६०.०० | **७५.००** | -- | २०.०० | ०८.०० |
| १९ | जुन्या ट्यूब- १७५/७० आर १५ | नग-०३ | २५.०० | **७५.००** | -- | -- | ०८.०० |
| २० | खराब प्लेंप- | ४० कि. | १.५० | -- | २.०० | **३.००** | २.०० |

१) मे. इंडिया रबर प्रॉडक्स, औरंगाबाद यांचे नावासमोर दर्शविलेल्या वस्तूची उच्चतम दराने विक्री करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

२) मे.भगवानदास टायर्स, लासलगांव व श्री. अकबर पठाण, कोपरगांव यांचे अ.नं.९,१२,१७ चे खालील प्रमाणे दर समान असल्याने त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/ वाटाघाटीस बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | तपशील | संख्या | मे.भगवानदास टायर्स, लासलगाव | | श्री.अकबर पठाण, कोपरगाव | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
| ०१ | जुने टायर - ०६-००-१६ | ०३ नग | २००.०० | अनुपस्थित | २००.०० | २५०.०० |
| ०२ | जुन्या टयुब - ७-५०-१६ | १६ नग | ७५.०० | अनुपस्थित | ७५.०० | ९०.०० |
| ०३ | जुन्या टयुब - ०४-५०-१० | ०७ नग | २५.०० | अनुपस्थित | २५.०० | ३०.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. इंडिया रबर प्रॉडक्स, औरंगाबाद यांचे नावासमोर दर्शविलेल्या वस्तूची उच्चतम दराने विक्री करणेस तसेच चर्चा/वाटाघाटीमध्ये श्री अकबर पठाण, कोपरगांव यांनी देऊ केलेले उच्चतम दर स्वीकारुन जुने टयूब व टायर देणेस मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,दप्तर विभाग)

**१५) आय.टी.आय परिसरात भक्तांसाठी तातडीने बांधण्यात आलेल्या संडास बाथरुमचे बिलाबाबत.**

नाताळ सुट्टीनिमित्त होणारी भक्तांची गर्दी लक्षात घेऊन संस्थानचे निवासस्थाने पूर्ण भरलेनंतर भक्तांची राहण्याची सोय करणेसाठी संस्थानतर्फे प्रसादालय परिसर, साईनगर मैदान, धर्मशाळा परिसर, जुनी जि.प.शाळा, साईउद्यान नविन भक्तनिवास परिसर, क्रिडांगण, कन्याशाळा व इं.मे.स्कूल चे पुढील व पाठीमागील भाग इत्यादी ठिकाणी तात्पुरते मंडप टाकून भक्तांची निवासाची सोय करण्यात आली होती. त्यासाठी भक्तांची संडास बाथरुमची व्यवस्था करणे आवश्यक होते. याकरीता शिर्डी नगरपंचायत,कोपरगांव नगरपरिषद, राहुरी नगरपरिषद यांचेकडून प्रत्येकी दोन मोबाईल टॉयलेट ब्लॉक आणण्यात येऊन अनुक्रमे जुनी जि.प.शाळा, नविन भक्तनिवास, क्रिडांगण इत्यादी ठिकाणी ठेवण्यात आले होते.

कन्याशाळा व इंग्लिश मिडीअम स्कूलच्या वर्गखोल्यांही भक्तांचे निवासासाठी देण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे तेथे सध्या असलेले, टॉयलेट ब्लॉक अपुरे पडणार होते. तेथे मंडप टाकून निवासाची व्यवस्था केलेल्या भक्तांना संडास बाथरुमची व्यवस्था करणेबाबत मा.अध्यक्ष सो., यांनी बांधकामामध्ये त्यांनी तात्पुरते संडास-बाथरुमची व्यवस्था करणेबाबत सुचना केली. त्यानुसार आय.टी.आय. इमारतीचे उत्तरेस सहा संडास व सहा बाथरुमची सोय करण्यात आली आहे. यासाठी लागणारे चौकटी व दरवाजे तसेच पुरषांकरीता बाथरुमसाठी बांधलेल्या ओट्यावर बसविणेसाठी रफ शहाबाद फरशी इकडील विभागामार्फत देण्यात आलेली आहे.

सदरचे काम तातडीने तसेच वेळेत (दोन दिवसात) पूर्ण करणेचे दृष्टीने ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी. एल., पुणे यांनी संमती दर्शविली होती व त्यासाठी त्यांचेकडे पुरेसे मनुष्यबळ, मशिनरी उपलब्ध होते. त्यामुळे सदरचे काम ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी.एल.,पुणे यांचेकडून त्यांचे प्रसादालयाचे कामाचे मंजुर निविदेतील दरानुसार तातडीने करुन घेणेत आलेले आहे.

याकामी ठेकेदार यांनी दि. १८/०१/२००७ चे पत्रान्वये रुपये ६७,२४४.५५ मात्रचे बील सादर केले आहे.

सदर बीलाची तपासणी केली असता इकडील विभागाने पुरविलेल्या मटेरीअल व्यतिरिक्त ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी.एल.पुणे यांना कामाचे बिल रु.५९,२३३.०० मात्र देय होते. तरी ठेकेदार मे.आय.व्ही. आर. सी.एल.,पुणे यांना आय टी आय जवळ बांधलेल्या तात्पुरत्या टॉयलेट ब्लॉकचे बील रुपये ५९,२३३.०० मात्र अदा करणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१६) <u>सर्व्हे नं.१०७ मधील जागेत हेलिपॅडचे खडीकरण व डांबरीकरण कामासाठी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत</u>**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.१.२००७ चे सभेतील निर्णयानुार जगसन एअरलाईन्स,नवी दिल्ली यांचेमार्फत हेलिकॉप्टर सेवा सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार स.नं.१०७ मध्ये हेलीपॅडचे खडीकरण व डांबरीकरणाचे रुपये २.११ लक्ष रकमेचे कामासाठी जा.नं. १५२१ दिनांक ३०.०१.२००७ चे पत्रान्वये खालील स्थानिक ठेकेदारांकडून कोटेशन्स मागविण्यात आले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,कोपरगांव |
| ०२ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कंपनी,राहाता |
| ०३ | श्री साई कुमार माळोदे,साकुरी |
| ०४ | श्री संतोष नागनाथ गुंजेगावकर,निघोज |
| ०५ | श्री विक्रांत रासकर,कोपरगांव |
| ०६ | श्री चंद्रकान्त खंडू जाधव,पिंपळवाडी |

सिलबंद कोटेशन्स सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१.१.२००७ ठेवण्यात आली होती. त्यानुसार खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन्स सादर केले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,कोपरगांव |
| ०२ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कंपनी,राहाता |
| ०३ | श्री संतोष नागनाथ गुंजेगावकर,निघोज |

उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव | कोटेशनमधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,कोपरगांव | ०.०७% कमी | ५% कमी |
| ०२ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कंपनी,राहाता | १०% अधिक | अनुपस्थित |
| ०३ | श्री संतोष नागनाथ गुंजेगावकर,निघोज | २% अधिक | १% अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,कोपरगांव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बाधकाम विभागप्रमुख)

**१७) <u>मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बससेवा करीता नवीन बसेस खरेदी करणे बाबत.</u>**

श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता देश विदेशातून दररोज हजारो लाखोंच्या संख्येने साईभक्त शिर्डीत दाखल होत असतात. शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांचे सुविधाकरिता श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीतर्फे अल्पदरात प्रसाद भोजनाची सोय करण्यात आलेली आहे. परंतू भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे सध्याचे प्रसादालय अपुरे पडत असल्याकारणाने शिर्डी पोलिस स्टेशनेच मागील बाजूस संस्थानचे जागेत नवीन प्रसादालयाचे काम चालू आहे.

नवीन प्रसादालयाचे काम येत्या तीन महिन्यात पूर्ण होणार आहे. भक्तांसाठी छत व सावली असलेला पादचारीमार्ग तयार करणेस तांत्रिक अडचणीमुळे बराच कालावधी लागणार असल्याने तसेच मंदीर परिसर ते नवीन प्रसादालय अंतर थोडे जास्त असल्याकारणाने साईभक्तांचे सुविधाकरिता प्रसादालयाचे काम पूर्ण झालेनंतर मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय मोफत बससेवा सुरु करावयाची असलेने प्रसादालय विभाग प्रमुख यांनी चार बसेसची मागणी केलेली आहे व बसथांबा करिता खालील पर्याय सुचविले आहेत.

१)जुन्या प्रसादालयाच्या वेटींग रांगांचे समोरील जागेचा वापर बसथांबा करीता करता येईल

किंवा

२) श्रीसाईबाबा संस्थानचे पिंपळवाडीरोड प्रवेशद्वार (उत्तरकडील) समोरील श्रीसाईबाबा एम्प्लॉईज क्रे.क्रो. ऑप.सोसायटी लि.,चालवित असलेले शौचालय पाडून त्याठिकाणी बस थांबा करता येईल.

सध्या श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे वाहन विभागात उपलब्ध असलेल्या १० बसेसचा वापर खालीलप्रमाणे होत आहे.

अ) इंग्लिश मीडियम स्कूलची मुले ने-आण करणेकामी- स्कुलबस ०५

ब) भक्तनिवासस्थान ते मंदिर परिसर साईभक्त ने-आण करणेकामी ०३
क) नगरसुल रेल्वे स्टेशन ते शिर्डी साईभक्त ने-आण करणेकामी ०२

एकूण बसेस १०

मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बससेवा सुरु करणेकरिता उपलब्ध बसेस अपुरी पडणार असल्याने प्रसादालय विभाग प्रमुख यांचे मागणीनुसार नवीन चार बसेस खरेदी कराव्या लागतील याकामी अंदाजे रुपये ५५-६० लाख खर्च अपेक्षित आहे.

तरी मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बससेवा सुरु करणेकरिता चार बसेस खरेदी करणेकामी येणारे अंदाजे रु.५५-६० लाख मात्रचे खर्चास व अधिकृत डिलरकडून कोटेशन बोलाविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तरचर्चा होऊन, मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बससेवा सुरु करणेकरिता चार बसेस लेलँड या कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.६० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच बस थांब्याबाबत बसेस खरेदी केल्यानंतर निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**१८) <u>डॉ.संजय जयवंत तांबे,चिंचपूर ता.संगमनेर यांचे अर्जाबाबत</u>**

डॉ.संजय जयवंत तांबे,चिंचपूर ता.संगमनेर यांनी त्यांचे दि.१.२.२००७ चे अर्जान्वये ते MBBS पदवीधर असून, संस्थानचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूक मिळणेबाबत विनंती केलेली आहे. डॉ.तांबे यांची वैद्यकीय संचालक, डॉ.ढवळे यांनी मुलाखत घेऊन,त्यांना RMO पदावर नेमणूक देणेबाबत शिफारस केली असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**१९) <u>डॉ.एस.एस.डांगे,साकुरी,ता.राहाता यांचे अर्जाबाबत</u>**

डॉ.एस.एस.डांगे,साकुरी,ता.राहाता यांनी त्यांचे दि.१.२.२००७ चे अर्जान्वये संस्थानचे श्रीसाईबाबा रुग्णालयाकडे मानद सर्जन म्हणून आठवड्यातून एकदा विनामूल्य काम करण्यास परवानगी मागीतली असून त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**२०) <u>नवीन प्रसादालयाकरिता सर्व प्रकारच्या ट्रॉलीज्, वर्कींग टेबल, जेवणाचे टेबल व राईस कुकर स्पेशीफिकेशन प्रमाणे तयार करुन घेणेबाबत</u>**

आजचे सभेत किचन सोल्यूशनचे कन्सल्टंट श्री.किरण मांजरेकर व मे.कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि. गोकूळ शिरगांव ता.करवीर जि.कोल्हापर यांचे प्रतिनिधी श्री कूलकर्णी हे उपस्थित होते. त्यांनी नवीन प्रसादालयाची पहाणी करुन व प्रसादालयातील कर्मचाऱ्यांशी चर्चा करुन नवीन प्रसादालयासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या ट्रॉलीज्, वर्कींग टेबल, जेवणाचे टेबल व राईस कुकर यांचे गेज,डिझाईन व स्पेशीफिकेशन निश्चित केले असून, सदरचे समान मोठ्या प्रमाणावर खरेदी करावे लागणार आहे. याकरिता सर्व प्रकारच्या ट्रॉलीज्, वर्कींग टेबल, जेवणाचे टेबल व राईस कुकर यांचा एक एक नमुना मे कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि. या पुरवठादारांकडून तयार करुन घेऊन सदरचे सर्व नमूने खरेदी उपसमितीमध्ये मंजूर करुन घेऊन त्या नमुन्यामध्येच पुरवठाधारकांनी माल पुरविण्यात यावा यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदा मागणी करुन खरेदीच्या विहीत पध्दतीने खरेदी करता येईल असे कन्सलटंट श्री किरण मांजरेकर यांनी सांगितले त्यानुसार याकामी नमुन्यादाखल सर्व प्रकारच्या ट्रॉलीज्, वर्कींग टेबल, जेवणाचे टेबल व राईस कुकर खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,२५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.०४ नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता जानेवारी ,२००७.**

**(ब) माहे जानेवारी, २००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जानेवारी,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जानेवारी,२००७ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.११६** (A) माहे जानेवारी,२००७ मधील जमा रुपये १३,३०,७६,६०२.४० व खर्च रुपये ११,३५,२६,७२६.०० चा तक्ता,दिनांक ३ फेब्रुवारी,२००७ अखेरीस रुपये २५२,६८,०३,०८६.०० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे जानेवारी,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या एकूण रुपये ५,६०,०८,५३७.०० देणगीचा तक्ता, माहे जानेवारी,२००७ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व

इतर वस्तुचा रुपये १,६७,३३९.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे जानेवारी,२००७ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र.११६ (B).** माहे जानेवारी,२००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रुपये २४,९३,५४४.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना माहे जानेवारी,२००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.११६ (C).** माहे जानेवारी,२००७ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता अंतररुग्ण रुपये २५,५६४.०० व बाह्य रुग्ण रुपये ९९,४४२.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ३७,१००.०० ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे डिसेंबर,२००६ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीबाबत.**

**निर्णय क्र.११६ (D)** माहे डिसेंबर,२००६ मध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ८,६१,९९१/- सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०५. माहे डिसेंबर,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.११६(E)** माहे डिसेंबर, २००६ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या २८,५०० कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.११७ (F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात आली. तसेच कॅन्टीन दुरुस्ती (भक्तनिवासस्थान) कामाचे अंतिम बील आदा करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.११६ (G)** माहे जानेवारी, २००७ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय न.०५ श्रीसाईबाबा हॉस्पीटल येथे रुग्णांचे नातेवाईकांना थांबणेसाठी ए बिल्डींग टेरेसवर व औषध दुकान गाळयासमोर शेड उभारणेकामी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.११७.** श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कार्डीयाक रिकव्हरीचे समोर रुग्णांचे नातेवाईकांची गर्दी टाळणेचे दृष्टीने 'ए' इमारत टेरेसवर तसेच औषध दुकानासमोर पॉलिकार्बोनेट शिटस् वापरुन शेड तयार करणेस दि. २५/११/२००६ मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ८९० नुसार रु. ५,८२,९००.०० मात्र इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. याकामाचे आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी असोशिएटस यांनी कोऱ्या निविदा तयार केल्या असून त्यानुसार सदर कामासाठी दै.लोकमत व दै. गांवकरी या वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा सूचनेनुसार सदर कामाचे कोऱ्या निविदा फॉर्मची विक्रीची मुदत दि. ०९.०२.२००७ अखेर ठेवण्यात आलेली आहे व सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. १०.०२.२००७ रोजी सकाळी ११.०० वा.पर्यत ठेवणेत आली होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.तंटक टेक्नोक्रेटस्, नाशिक |
| ०२ | मे.रेखा एंटरप्राईजेस,नाशिक |
| ०३ | मे.एम.एस.शेल्टर्स, नाशिक |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजच्या सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.तंटक टेक्नोक्रेटस्, नाशिक | ८,०३,५४२.०० | ७,७९,४३६.०० |
| ०२ | मे.रेखा एंटरप्राईजेस,नाशिक | ८,२५,०००.०० | ८,०१,०००.०० |
| ०३ | मे.एम.एस.शेल्टर्स, नाशिक | ७,६२,०००.०० | ७,४५,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एम.एस.शेल्टर्स, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०६ श्रीसाईनाथ रुग्णालय व धर्मशाळा येथील सांडपाणी टाक्यांवर स्लॅब टाकणेकामी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.११८.** संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं. १४८/२ मध्ये धर्मशाळा इमारतीचे सांडपाणी शुद्धीकरण करुन त्याचा टॉयलेट फ्लशींग व गार्डनींगसाठी पुर्नवापर करणे करीता रिसायलींग सिस्टीमची दैनंदिन देखरेख व देखभाल ही पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येते.पाणीपुरवठा विभाग यांनी दि.०३/११/०६ चे टिपणीद्वारे सदर पाण्यास दुर्गंधी येत असल्याने ते पाणी झाडांना अगर लॉनला देता येत नाही. पाणी उष्ण असल्याने झाडांना दिल्यास झाडे जळुन जाण्याचा संभव आहे. त्यासाठी सदर प्लॅन्ट बंद करून त्याठिकाणी सेप्टीक टँक तयार करावा व त्याचे पाणी ड्रनेजला जोडणेत यावे,असा प्रस्ताव दिला आहे. याप्रमाणे सेप्टीक टँकमधून बाहेर पडणाऱ्या पाण्यावर सिस्टीममध्ये उपलब्ध असणाऱ्या बायोफिल्टर्सव्दारे पुन्हा प्रक्रिया करता येईल, तथापी त्यासाठी सदर सिस्टीमचे सल्लागार एनर्जी टेक,सोल्युशन्स प्रा.ली.,पुणे यांचेमार्फत सदर बायोफिल्टर्स बाबत मार्गदर्शन घेता येईल. दरम्यान सेप्टीक टँकमधून बाहेर पडणारे पाणी सरळ ड्रेनेजला जोडता येईल.

सदर सिस्टीमच्या कलेक्शन टँकचे सेप्टीक टँकमध्ये रुपांतर करणेसाठी त्यामध्ये पार्टीशन भिंतीचे बांधकाम करुन आर.सी.सी. स्लॅबचे आच्छादन करावे लागेल त्यासाठी आर.सी.सी. स्लॅब, वीट बांधकाम, मॅनहोल्स, ड्रेनेज कनेक्शन इ. अनुषंगिक कामांसाठी निकम पा.असो.यांचे एस्टीमेटनुसार दोन कलेक्शन टँकसाठी मिळून एकूण रु. ३,४०,९१०.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे काम करणेसाठी व्यवस्थापन समितीचे दि. २५/११/२००६ च्या सभेत निर्णय क्र. ८८८ अन्वये धर्मशाळा इमारतीचे आर्किटेक्ट निकम पाटील यांचेकडून प्लॅन व इस्टीमेट बनवून कोऱ्या निविदा विक्री करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कोऱ्या निविदा विक्रीसाठी दि. ०१/०२/२००७ ते दि. ०७/०२/२००७ पर्यंत मूदत देण्यात आली आहे. सिलबंद निविदा सादर करण्याची अंतीम मूदत दि. ०९/०२/२००७ पर्यंत ठेवण्यात आली होती.

त्यानुसार श्री पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांची एकच निविदा प्राप्त झालेली आहे. त्याबाबत अशा स्वरुपाच्या कामासाठी यापूर्वी ज्या बांधकाम ठेकेदारांनी संस्थानकडे निविदा सादर केलेल्या आहेत, त्यापैकी किमान पाच निविदासादरकर्त्यांकडून फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०७ मौजे येसगांव येथे साईभक्तांसाठी संस्थानमार्फत निवासस्थळ उभारणेकामी आलेल्या निविदांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.११९.** श्रीक्षेत्र शिर्डी येथे साईबाबांचे दर्शनासाठी मध्यप्रदेश,गुजरात, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातून साईभक्त मनमाड-अहमदनगर या महामार्गाने शिर्डीस येतात. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४/१०/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९७ अन्वये चर्चा होऊन येसगांव तसेच देर्डे चांदवड येथे त्याचप्रमाणे गुहा ता. राहुरी येथेही निवासस्थळ तथा विश्रांतीस्थान बांधणेकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करण्यात यावे असे ठरले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट अमृता पवार,नाशिक यांना जा.नं. १७००८ दि. ०७/१२/२००६ रोजी सदर कामाचे नेमणुकपत्र देण्यात आले व त्यांचेकडून येसगांव निवासस्थळाचे प्लॅन, एस्टीमेट व निविदा तयार करुन घेण्यात आल्या आहेत. सदर बांधकाम सुरु करणे आगोदर येसगांव येथील ग्रामपंचायतीने देऊ केलेली जागा संस्थानकडे विनामुल्य हस्तांतर होणे आवश्यक असून त्याबाबतची कार्यवाही सध्या चालू आहे. दि. ०५/०२/२००६ रोजीचे वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन को-या निविदा फॉर्मची विक्री दि. ०५/०२/२००७ ते दि. ०९/०२/२००७ पर्यंत ठेवण्यात आली आहे. सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि. १०/०२/२००७ सकाळी ११.०० वाजेपर्यंतची मूदत देण्यात आली होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.ममता कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०२ | मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगाव |
| ०३ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगाव |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजच्या सभेत उघडण्यात आल्या.तसेच आजचे सभेपूढे प्रस्तावित बांधकामाच्या आर्किटेक्ट आमृता पवार ह्या उपस्थित होत्या. बांधकामाविषयी त्यांचेशी चर्चा करण्यात आली. त्यावेळेस आर्किटेक्ट आमृता पवार यांनी असे सांगितले की, सदरील निविदेतील साहित्याचे दर हे सन २००६-२००७ मधील डि.एस.आर नुसार घेण्यात आलेले आहेत. यामध्ये सिमेंट दर रुपये ३०००/- प्रति टन, स्टीलचा दर रुपये २५७००/- प्रति मे.टन व स्ट्रक्चर स्टिलचा दर रुपये २९,६००/- प्रति मे.टन असा आहे. मात्र प्रत्यक्ष या साहित्याच्या बाजारभावामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.याबाबत सविस्तर चर्चा होऊन सध्याचे प्रचलित डी.एस.आर सन २००६-२००७ नुसार सिमेंट,

एन्फोर्समेंट स्टिल व स्ट्रक्चरल स्टिल यांचे बेसिक दर कार्यादेशात नमूद करावेत. सदर बेसिक दर व प्रत्यक्ष खरेदीचा दर यामधील फरक अधिक स्वरुपात असेल तर तो बांधकाम ठेकेदार यांना आदा करण्यात यावा. सदरहू फरक हा वजा स्वरुपात असेल तर तो ठेकेदार यांचेकडून वसूल करावा. याप्रमाणे अटी शर्तीचा समावेश कार्यादेशात करण्यासाठी व याकामी येणारे योग्य त्या जादा खर्चास मंजूरी देण्यात आली. तदनंतर निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.ममता कन्स्ट्रक्शन, नाशिक | १०.२४ % अधिक | ९.२४ %अधिक |
| ०२ | मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगाव | २४ % अधिक | ८ % अधिक |
| ०३ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगाव | २३.५० % अधिक | १८.५० % अधिक |

उपरोक्तप्रमाणे मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगाव यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना उपरोक्त अटी शर्तीचा समावेश करुन कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०८** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील एम.आर.आय.मशिनला विद्युत पुरवठा करणेसाठी इलेक्ट्रिक केबल टाकणेचे कामाकरिता प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेडरधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१२०.** श्रीसाईबाबा हॉस्पीटलमधील नवीन M.R.I. मशिन बसविणेकरीता सिमन्स कंपनीला हॉस्पीटलमार्फत ऑर्डर देण्यात आलेली आहे.या मशिनला विद्युत पुरवठा करणे, वातानुकुलीत यंत्रणा उभारणे तसेच बांधकामात बदल करणे इ.कामासंबंधी श्री साईबाबा हॉस्पीटलने दिनांक २९-१२-२००६ रोजी आयोजित केलेल्या मिटींगमध्ये सिमेन्स कंपनीचे इंजिनिअर, श्री. देशपांडे यांनी M.R.I. मशिन व वातानुकुलीत यंत्रणेला मशिनच्या विजभारानुसार नवीन अखंड केबल टाकण्यास व M.R.I.मशिनच्या चुंबकीय क्षेत्राच्या आत येणा-या सर्व केबल्स काढून दुसरीकडे शिफ्ट कराव्यात, असे सुचविले. तसेच न्युरो सर्जरी व प्लास्टीक सर्जरी ऑपरेशन थिएटरच्या १८ किलोवॅट ऑटोक्लोव्हसाठी सप्लाय उपलब्ध करून देण्याची मागणी श्री साईबाबा हॉस्पिटलकडून आली आहे.

या नविन M.R.I.मशिन व वातानुकुलीत यंत्रणा तसेच न्युरो सर्जरी व प्लास्टीक सर्जरी ऑपरेशन थिएटरचे १८ किलोवॅट ऑटोक्लोव्ह याकरीता साईनगर सबस्टेशन ते श्री साईबाबा हॉस्पीटल पर्यंत नविन अंडर ग्राऊंड केबल टाकाव्या लागणार आहेत. यापुर्वी हॉस्पीटलकरीता सिमेंट पाईपमधून केबल टाकलेल्या आहेत. हॉस्पीटलच्या वेळोवेळी वाढत जाणा-या लोडमुळे दरवेळेस नवीन केबल टाकून देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सिमेंट पाईपमध्ये नवीन केबल टाकण्यास जागा नाही. या नवीन टाकाव्या लागणा-या केबलकरीता साईनगर सबस्टेशन ते हॉस्पीटल पर्यंत नाली खोदाई करणे व ती बांधणे हे ही काम करावे लागणार आहे.

साईनगर सबस्टेशन ते हॉस्पीटल केबल टाकणेकामी नाली खोदाई करणे, बांधणे, इलेक्ट्रिकल केबल पुरविणे व जमिनीतून टाकणे, अर्थिंग करणे इत्यादि कामे करावी लागणार आहेत. त्यानुसार या कामासाठी येणाऱ्या रु. ९,२३,१२०.०० इतक्या खर्चास तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविण्यासाठी मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितिच्या दिनांक ११-०१-२००७ रोजी झालेल्या उपसमितीसमोर सादर करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितिच्या उपसमितीने या प्रस्तावास तसेच येणा-या खर्चास व हे काम तातडीचे असल्याने तात्काळ वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेसाठी तत्वतः मान्यता दिली आहे. त्यानुसार याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेत आलेले असून टेंडरविक्री ही मुंबई कार्यालय तसेच शिरडी येथील कार्यालयातून करण्यात आली आहे. टेंडरविक्रीचा कालावधी दि.२३-०१-२००७ ते दि. ३०-०१-२००७ असा होता व टेंडर स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.३१-०१-२००७ होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक |
| ०२ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक |
| ०३ | मे.मनिषा इलेक्ट्रीकल्स,नाशिक |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजच्या सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ९,९०,७६२.०० | ९,५०,७६२.०० |
| ०२ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक | ९,९८,१८८.०० | ९,६३,१८८.०० |
| ०३ | मे.मनिषा इलेक्ट्रीकल्स,नाशिक | ११,०२,१४४.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.०९ लेथ मशिन व प्रेस मशिन खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.१२१.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१/१२/२००६ चे सभेतील निर्णयानुसार पाणी पुरवठा विभागासाठी हेवी डयुटी लेथ मशिन खरेदी करणेसाठी मंजुरी देण्यात येवुन दिनांक ०६/०१/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कोटेशन्स मागविणेस तोंडी आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार -

०१. जय इक्विपमेंट & मेटल वर्क्स, अहमदनगर .

०२. पुनम पंप & स्पेअर्स, अहमदनगर.

०३. किसान पंप & स्पेअर्स, अहमदनगर.

०४. कामदा मशिन्स & टुल्स, अहमदनगर.

०५. लव्हली मशिनरी कार्पोरेशन, नाशिक.

यांचेकडून कोटेशन्स प्राप्त झालेले असून पुर्वीचे मंजुरीनुसार सिंडीकेट कंपनीचे लेथ मशिनची मागणी करण्यात आलेली होती. परंतू तज्ञ व्यक्तिंकडून मिळालेल्या माहितीनुसार लिडर कंपनीचे लेथ मशिन हेवी असल्याने लिडर कंपनीचे कोटेशन्स मागविण्यात आलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो सर्व सदस्यांना पुरविण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

परंतू चर्चा/वाटाघाटीसाठी एकही कोटेशन्सधारक उपस्थित नसल्याने कोटेशन्ससादरकर्त्यांनी तुलनात्मक तक्त्यात देऊ केलेले खालीलप्रमाणे दर स्वीकारणेत यावेत असे ठरले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | |
|---|---|---|---|
| | | लेथ मशिन | प्रेस मशिन |
| ०१ | जय इक्विपमेंट & मेटल वर्क्स, अहमदनगर | २,००,०००.००<br>+१२.५% व्हॅट | ९५,०००.००<br>+१२.५% व्हॅट |
| ०२ | पुनम पंप & स्पेअर्स, अहमदनगर. | १,९०,०००.००<br>+१२.५% व्हॅट | ९५,०००.००<br>+१२.५% व्हॅट |
| ०३ | किसान पंप & स्पेअर्स, अहमदनगर. | १,७३,०००.००<br>+१२.५% व्हॅट | ८८,५००.००<br>+१२.५% व्हॅट |
| ०४ | कामदा मशिन्स & टुल्स, अहमदनगर. | १,४०,०००.००<br>+१२.५% व्हॅट | **६५,०००.००**<br>+१२.५% व्हॅट |
| ०५ | लव्हली मशिनरी कार्पोरेशन, नाशिक. | **१,३५,०००.००**<br>+१२.५% व्हॅट | ८५,०००.००<br>+१२.५% व्हॅट |

यावर सविस्तर चर्चा होऊन,लेथ मशिन खरेदीकामी लव्हली मशिनरी कार्पोरेशन, नाशिक व प्रेस मशिन खरेदीकामी कामदा मशिन्स & टुल्स, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं.१० वाहनांचा विमा उतरविणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१२२.** वाहन विभागात कार, बसेस, रूग्णवाहिका, व मालवाहतूक अशी एकूण ३५ वाहने वापरात आहेत. सदर वाहनांचा इन्शुरन्स न्यु इंडिया एन्शोरन्स कंपनी लि. यांचेकडे भरण्यात येत होता. परंतु, स्पर्धात्मक दरांचा फायदा घेण्याचे दृष्टीने राष्ट्रीयकृत कंपन्याकडून दरपत्रके मागविण्याच्या सुचना दि. ३.६.२००५ रोजी लेखाशाखे कडून करण्यात आल्याने प्रत्येक महिण्याला दि.न्यु इंडिया एन्शोरन्स, कं.लि., दि.ओरीएन्टल इंश्योरन्स कं. लि., युनायटेड इंडिया कं. लि., नॅशनल इंन्शुरन्स कं.लि. दरपत्रके (कोटेशन) मागविण्यात येत होते.

वाहन विभागातील ३५ वाहनांचा विमा वेगवेगळया तारखेला उतरवुन घ्यावा लागत असलेने कार्यालयीन अडचणी निर्माण होत होत्या त्यामुळे यापुर्वी दि.न्यु इंडिया एन्शोरन्स कंपनी लि. कडून इंन्शुरन्स उतरवुन घेतलेला असलेने त्यांचेकडून दि.३१ मार्च २००७ अखेर टप्या-टप्याने इंन्शुरन्स उतरवुन घेतलेला आहे.

या पुढे दि.०१/०४/२००७ ते दि.३१/०३/२००८ अखेर एक वर्षाकरीता सर्व वाहनांचा एकत्रित विमा उतरविण्याचा असलेने याकामी अंदाजे रू.७ ते ८ लाख मात्र खर्च अपेक्षीत असलेने तसेच राष्ट्रीयकृत कंपन्या दि.न्यु इंडिया एन्शोरन्स, कं.लि., दि. ओरीएन्टल इंश्योरन्स कं. लि., युनायटेड इंडिया कं. लि., नॅशनल इंन्शुरन्स कं.लि. यांचेकडून दरपत्रके (कोटेशन) मागविणे बाबतचा प्रस्ताव दि.०६/०१/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णयाकरीता सादर करण्यात आला होता. सदर सभेत अंदाजे रू.७ ते ८ लाख मात्रचे खर्चास व राष्ट्रीयकृत कंपन्याकडून कोटेशन बोलाविणेस मान्यता मिळालेली आहे.

दि.०६/०१/२००७ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार वरील ०४ राष्ट्रीयकृत कंपन्याकडून वाहन विभाग जा.नं.१३७६ दि.२६/०१/२००७ ने दि.०५/०२/२००७ अखेर पोहोचतील अशा प्रकारे कोटेशन बोलाविण्यात आलेली होते.

त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | विमा कंपनीचे नाव |
|---|---|
| ०१ | दि ओरिएन्टल इंश्योरन्स कं.लि.,श्रीरामपूर |
| ०२ | नॅशनल इन्शुरन्स कं.,लि.,कोपरगाव |
| ०३ | युनायटेड इंडिया कं.लि., श्रीरामपूर |
| ०४ | दि.न्यू इंडिया एन्शोनन्स कं.लि., श्रीरामपूर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कंपनीच्या प्रतिनिधींना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | विमा कंपनीचे नाव | एकूण IDV | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | दि ओरिएन्टल इंश्योरन्स कं.लि., श्रीरामपूर | १,३७,६९,५३३.०० | ४,०६,५८३.०० | ३,९०,०००.०० |
| ०२ | नॅशनल इन्शुरन्स कं.,लि., कोपरगाव | ------ | ३,८३,५७७.०० | अनुपस्थित |
| ०३ | युनायटेड इंडिया कं.लि., श्रीरामपूर | १,५०,१५,६००.०० | ४,०९,०८३.०० | ३,७९,०८३.०० |
| ०४ | दि.न्यू इंडिया एन्शोरन्स कं.लि., श्रीरामपूर | १,४९,६२,९३६.०० | ४,४५,१७५.०० | ४,११,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, युनायटेड इंडिया कं.लि.,श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.११** **मुळ अंदाजपत्रक सन २००७-२००८**

**निर्णय क्र.१२३.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

"(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील. "

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक २८ फेब्रुवारी, २००७ पर्यत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे अपेक्षित आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००६-०७ | अंदाजपत्रक २००७-०८ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१. | प्रारंभीची शिल्लक | २,२६,८०,००० | २,२७,००,००० | १ % | २०,००० | % |
| ०२. | अपेक्षित अनावर्ती जमा | ११७,८६,१६,२०० | १२४,२०,७५,००० | ६३% | ६,३४,५८,८०० | ५% |
| ०३. | अपेक्षित आवर्ती जमा | ४५,४१,००,००० | ५१,२८,६०,००० | २६% | ५,८७,६०,००० | १३% |
| ०४. | ठेवीच्या परतफेडी व्दारेमिळणारे उत्पन्न | २४,४४,७८,८०० | २०,५८,३९,००० | १०% | ३,८६,३९,८०० | -१६ % |
| **एकुण अपेक्षित जमा :-** | | १८९,९८,७५,००० | १९८,३७,४७,००० | १००% | ८,३५,९९,००० | ४% |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००६-०७ | अंदाजपत्रक २००७-०८ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१. | अपेक्षित अनावर्ती खर्च | ८८,९१,२०,००० | ८६,३४,९४,००० | ४४% | २,५६,२६,००० | - ३% |
| ०२. | अपेक्षित आवर्ती खर्च | ११,७६,९०,००० | १४,०२,०२,००० | ०७ % | २,२५,१२,००० | १९ % |
| ०३. | अपक्षित किरकोळ खर्च | २३,०५,००० | २६,३०,००० | ० % | ३,२५,००० | १४ % |
| ०४. | न्यासाच्याउदीष्टांवरील अपेक्षित खर्च | ५९,३६,१०,००० | ६१,६३,५७,००० | ३१% | २,२७,११,३१३ | ४% |
| ०५. | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | २७,४४,५०,००० | ३२,७९,४१,००० | १६ % | ५,३४,९१,००० | १९ % |
| ०६. | अंतिम शिल्लक | २,२७,००,००० | ३,२८,५०,००० | २ % | १,०१,५०,००० | १% |
| **एकुण अपेक्षित खर्च :-** | | १८९,९८,७५,००० | १९८,३४,७४,००० | १०० | ८,३५,९९,००० | ४% |

अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार, "व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक

उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल. "

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २००७-०८ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च (व्यवस्थापन समितीवरील खर्च, कर्मचा-यांचे वेतन व भत्ते, कंत्राटी कर्मचा-यांवर होणारा खर्च व कर्मचा-यांवर होणारा इतर अनुषंगीक खर्च ) भागविण्यासाठी अधिनियमातील १० टक्के तरतुद अत्यंत कमी पडणार आहे.

सन २००४-०५ या आर्थिक वर्षा प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. तसेच सन २००५-०६ या वर्षीही वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. वरील दोनही प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत. सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन होणांरा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाला विंनती करावी लागेल. तथापी वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण अहवालात व्यवस्थापन निधीमधुन करावयाच्या खर्चाबाबत वेगळे मत प्रदर्शित केले आहे. त्याबाबत सविस्तर टिपण तयार करुन पाठविणेबाबत त्यांना विनंती करण्यात आलेली असुन ते प्राप्त होताच त्याअनुषंगाने शासनाकडे प्रस्ताव सादर करता येईल.

मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च- तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल तरतुदीमध्ये चार वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न साधारणतः रुपये **१२४ कोटी** मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठयाप्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये भरीव वाढ झालेली दिसत आहे. या मोठया योजनाना आवश्यक निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून वेळोवेळी आवश्यकते नूसार काही प्रमाणात गुंतवणूकांचे रोखीकरण करावे लागेल. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट " ङ" व "ब "म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २००७-०८ चे आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१२ सन २००५-२००६ वैधनिक लेखापरिक्षण अहवालातील मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावयाचे विषय**

**निर्णय क्र.१२४.** सन २००५-०६ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेले, शरद एस.गायकवाड, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांनी संस्थानचे लेखापरिक्षण पूर्ण केले असून, त्यासंदर्भातील लेखापरिक्षण अहवाल संस्थानला सादर केला आहे. सदर अहवालातील काही बाबींना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन कार्यवाही करणेबाबत वैधानिक लेखापरिक्षक यांनी सुचित केलेले आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-

**(ii)** Balances of following Funds be transferred to “Building Fund” with the approval of the Committee.
Gurusthan Building Development Fund
Medical College Building Fund

**04. Gratuity Reserve ... … Rs.7,31,79,037.49**

As against accumulation of funds of Rs. 7,31,79,037.49, Sansthan had invested Rs. 3,25,50,645.00 with Group Gratuity Scheme of Life Insurance Corporation of India, Pune Divisional Office. Thus there is a shortfall of Rs. 4,06,28,392.49 in investments upto 31.03.2006 which should be made good at the earliest.

**05. Liabilities …… Rs. 6,59,70,962.38**

Liabilities as on 31.03.2006 include Deposits Refundable, Creditors for Expenses and Creditors for Supplies. Unclaimed balances for more that three years under these heads be suitably treated with permission of the committee.

**अ)** उपरोक्त मुद्दा क्र. ०४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. ३१ मार्च, २००६ अखेर संस्थान लेख्यांमध्ये, संस्थान कर्मचाऱ्यांना देय असलेली उपदान रक्कम रु. ७,३१,७९,०३७.४९ एवढी आहे. संस्थानने भारतीय जीवन विमा महामंडळ, विभागीय कार्यालय पुणे, यांचेकडील समुह उपदान तथा जीवन विमा योजना संस्थान कर्मचाऱ्यांना लागू केलेली असून त्याअन्वये दि. ३१ मार्च, २००६ अखेर एकूण रक्कम रु. ३,२५,५०,६४५.०० भारतीय जीवन महामंडळाकडे जमा केलेली आहे. तथापि, वैधानिक लेखापरिक्षक यांनी नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु. ४,०६,२८,३९२.४९ मात्र अद्याप जमा करणे बाकी आहे. सदर रक्कम लवकरात लवकर भारतीय जीवन विमा महामंडळाकडे जमा करणेबाबत त्यांनी सुचीत केले आहे. त्यानुसार सदर रक्कम भारतीय जीवन विमा महामंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे.

**ब)** उपरोक्त मुद्दा क्र. ०२ (ii) व ०५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून संस्थानकडे पडून असलेल्या देय रकमा तसेच संस्थान लेख्यांमध्ये तरतूद करुन देय दाखविण्यात आलेल्या परंतू संबंधीतांकडून त्याबाबत मागणी नसल्यामुळे अद्यापही देय दिसत असलेल्या रकमाही संस्थान लेख्यांमधून कमी करणेबाबत वैधानिक लेखापरिक्षक यांनी सुचीत केले आहे. याशिवाय मुद्दा क्र. ०२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संस्थान लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेले काही निधी एकत्रीत करुन दर्शविण्यात यावे असेही सूचीत केले आहे.

त्याअनुषंगाने त्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

| Sr No | Particulars | Amount to be Transferred Rs. | Amount to be credited to |
|---|---|---|---|
| 1 | Deposits | 9,52,957.89 | Other Income A/c |
| 2 | Unpaid Salary | 1,06,346.00 | Staff Welfare Fund A/c |
| 3 | Outstanding Liabilities | 3,03,432.00 | Prior Period Income A/c |
| 4 | Gurusthan Bldg Development Fund | 23,011.65 | Building Fund |
| 5 | Medical College Bldg Fund | 29,253.58 | Building Fund |
| 6 | ICCU Bldg Development Fund | 42,00,507.22 | Hospital Building Development Fund |
| 7 | Investment Fluctuation Fund | 67,916.31 | Other Income A/c |

**क)** उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली कार्यवाही केल्यानंतरही देय रकमेबाबत मागणी आल्यास त्या त्या वर्षात खर्च दाखवून रक्कम आदा करावी लागेल.

तरी वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण अहवालात सुचीत केल्यानुसार उपरोक्त "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु. ४,०६,२८,३९२.४९ मात्र भारतीय जीवन विमा महामंडळ पुणे यांचेकडे पुढील आर्थिक वर्षात टप्याटप्याने जमा करणेस, "ब" आणि "क" मध्ये नमुद केल्याप्रमाणे, लेखापरिक्षकांचा सल्ला घेऊन, कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१३ लेखापरिक्षण व गुंतवणूक समित्यांची स्थापना करणे.**

**निर्णय क्र.१२५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.१४ एस.बी.आय.गोल्ड बॉण्ड स्कीममधील सोने गुंतवणूक मुदतपूर्तीनंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत**

**निर्णय क्र.१२६.** संस्थानने दि.२६ फेब्रुवारी, २००१ रोजी स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या सुवर्ण ठेव योजनेमध्ये २४,८९१.०८० ग्रॅम सोने, तीन वर्षाच्या कालावधीसाठी , द.सा.द.शे. ०३% या व्याजदराने स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिवाजी पार्क, मुंबई यांचे मार्फत गुंतविण्यात आले होते. या सोन्याचे संस्थान लेख्यांमधील पुस्तकी मुल्य (Book Value) रु. ९४,९१,२३७.०० एवढे आहे. या गुंतवणूकीची मुदत दि. २६ फेब्रुवारी, २००४ रोजी संपल्यानंतर पुन्हा तीन वर्षाकरीता द.सा.द.शे. ०.५०% या व्याजदराने त्याच योजनेत पुनर्गुंतवणूक करण्यात आलेली आहे. सदर गुंतवणूकीची मुदत दि. २६ फेब्रुवारी, २००७ रोजी संपत आहे.

स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या सुवर्ण ठेव योजनेत, गुंतवणूक करतेवेळी, मुदतपूर्तीनंतर मिळणारे मुल्य हे सोन्याच्या स्वरुपातच मिळावेत असा पर्याय संस्थानने निवडलेला होता. त्यानुसार मुदतपूर्तीनंतर, गुंतवणूक करण्यात आलेले शुद्ध सोने २४,८९१.०८० ग्रॅम अधिक त्यावरील ३ वर्षाचे द.सा.द.शे. ०.५०% या दराने व्याज संस्थानला मिळू शकेल. परंतु, सदर गुंतवणूकीवरील व्याजदर हा अत्यंत कमी असल्याने, संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी, या योजनेत गुंतविलेल्या सोन्याचे मूल्य रोख स्वरुपात स्विकारुन जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या बॅंकेकडे सदर रक्कम गुंतविण्यात यावी असे सूचीत केले आहे. तसेच सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातही त्यांनी खालील प्रमाणे मत प्रदर्शीत केलेले आहे.

"Moreover sizable amount was blocked by storing the Gold which could also be invested in Fixed Deposit fetching attractive rate of interest."

उपरोक्त सोने गुंतवणूकीचे मुल्य रोख स्वरुपात स्विकारावयाचे असल्यास त्याबाबत संबंधीतांकडून माहिती मागवून कार्यवाही करता येईल.

तरी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सुवर्ण ठेव योजनेत, सोन्याच्या स्वरुपात, केलेल्या गुंतवणूकीच्या मुदतपूर्तीनंतर मिळणारे मुल्य हे सोन्याच्याच स्वरुपात अथवा रोख रकमेत स्विकारावे किंवा कसे याबाबत मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,यापूर्वी संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेले सोने व चांदी वस्तु-अलंकार वितळवून मिळणा-या शुध्द सोने व चांदी पासून श्री साईंची प्रतिमा असलेले नाणी, पेंडंटस् तयार करुन भक्तांना त्यावेळी असलेल्या सोने-चांदीच्या बाजारभावाप्रमाणे विक्री केल्या जात होत्या. परंतु सध्या सदरची विक्री बंद असल्याने अशा सोन्या व चांदीच्या नाणी व पेंडंटस् करीता भक्तांची मागणी मोठयाप्रमाणात वाढत आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई यांचेकडे सुवर्ण ठेव योजनेअंतर्गत गुंतविण्यात आलेले सोने २४,८९१.०८० ग्रॅम त्यांचेकडून सोन्याच्या स्वरुपात स्विकारण्यात यावे. सदर सोने इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडे जमा करुन त्यापासून पूर्वीप्रमाणेच नाणी व पेंडंटस् तयार करण्यात येऊन भक्तांना त्याची बाजारभावाप्रमाणे विक्री करण्यात यावी.

तसेच संस्थानकडे देणगीरुपाने साधारणतः ३ वर्षापासून जमा असलेले सोने- चांदी वस्तु-अलंकार संस्थान स्ट्राँगरुम मध्ये पडून आहेत. सदर सोने-चांदी वस्तु-अलंकार मोठया प्रमाणावर असल्याने स्ट्राँग रुममधील जागाही सदर वस्तु साठविणेकामी कमी पडत आहे. त्यासाठी सदर सोने-चांदी वस्तु-अलंकारही इंडिया गव्हर्नमेंट, मुंबई यांचेकडे नेऊन वितळविण्यात याव्यात व त्यापासून मिळणा-या शुध्द सोने-चांदीपासून भक्तांसाठी नाणी व पेंडंटस् तयार करण्यात यावी. याकामी आवश्यक विमा करणेत यावा व पोलिस संरक्षणही घेणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१५** **प्रस्तावित पवनचक्की प्रकल्पाच्या "सी फॉर्म" वरील अभिप्रायाबाबत.**

**निर्णय क्र.१२७.** विद्युत विभागामार्फत अपरंपारिक उर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प उभारणेकामी प्रस्तावित करण्यात आलेले आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारे **बीड** खरेदी करण्यासाठी ०३ टेंडर संस्थानला प्राप्त झालेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२५.११.२००६ रोजीच्या सभेत बीड सादरकर्त्यांचे टेक्नीकल बीड हे मिटकॉन, पुणे यांचेकडे तपासुन घेऊन त्यावर त्यांचा स्पष्ट अहवाल व अभिप्राय घ्यावा असे ठरले. या अनुषंगाने मिटकॉन, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक जीपीडी/आरई/एसएसएसटी/ २००६.०७ दि.१२.१.२००७ चे पत्र प्राप्त झाले असुन पत्रामध्ये संस्थानजवळ सेल्स टॅक्स रजिष्ट्रेशन ( सी-फॉर्म ) असल्यास संस्थानचे पवनचक्की प्रकल्पाचे किंमतीतील १० % रक्कम वाचणार असून, संस्थानचा यामध्ये जवळजवळ १.२० कोटी इतका फायदा होणार असल्याचे त्यांनी कळविले आहे.

मिटकॉन, पुणे या कंपनीकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार सेल्स टॅक्स रजिष्ट्रेशन मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही लेखाशाकेकडून करण्यात यावी असे विदयुत विभागकडून कळविण्यात आले आहे. या अनुषंगाने लेखाशाखेमार्फत संस्थानचे सल्लागार श्री पी.सी.जोशी, अॅडव्होकेट,हायकोर्ट यांचेकडे विचारणा केली असता त्यांचे दिनांक २३.०१.२००७ चे पत्र संस्थानला प्राप्त झालेले असुन, यामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे सल्ला दिलेला आहे : -

"Considering the legal position and the impact of the express specific provisions under the Shree Saibaba Sansthan Trust ( Shirdi ) Act 2004 , I would advise you to retrain from obtaining the registration as proposed by M/s Mitcon Consultancy Agencies Ltd, especially when such registration will entail permanent liability under Section 16 (5) for payment of VAT till such time as the registration certificate is cancelled any time in future."

वरीलप्रमाणे दिलेल्या सल्ल्याचा विचार करता संस्थानने सेल्सटॅक्स रजिष्ट्रेशन केल्यास सदरचे रजिष्ट्रेशन रद्द होईपर्यंत संस्थानला विक्री-कर भरावा लागणार आहे. त्यामुळे संस्थानमधून विक्री करण्यात येणा-या प्रत्येक वस्तुवर संस्थानला विक्री-कर भरावा लागेल. विद्युत विभागाने प्रस्तावित केलेल्या प्रकल्पात मिळणारी सुट जरी रु. १.२० कोटी असली तरी सदरच्या रजिष्ट्रेशन मुळे होणारा संभावित खर्च हा प्रति वर्षी ८ ते १० कोटी रुपये असणार आहे

नव्यानेच साईबाबा रुग्णालयात सुरु करण्यात आलेल्या मेडीकल स्टोअर्समुळे संस्थानची गणना "व्यापारी " व्याख्येत होऊ शकते. त्या अनुषंगाने विक्रीकर विभाग, अहमदनगर यांच्याकडून रुग्णालय विक्रीकर भरणेविषयी एक पत्रदेखील प्राप्त झालेले आहे. तरी सल्लागारांच्या सल्ल्यास अनुसरुन पवनचक्की प्रकल्पासाठी "**सी**" फॉर्म मिळविणे व मेडीकल स्टोअर्समधून औषध विक्री बंद करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्त प्रस्तावाबाबत श्री.पी.सी.जोशी,अॅडव्होकेट,हायकोर्ट यांनी दिलेल्या लेखी अभिप्रायावर सविस्तर चर्चा झाली. तसेच श्री.ए.एल.कुलकर्णी, कर सल्लागार,कोपरगाव यांनी समक्ष येऊन, याबाबत सभेस सविस्तर माहिती दिली.

त्यानुसार पवनचक्की प्रकल्पासाठी "सी" फॉर्म घेण्यात येऊ नये तसेच मेडिकल स्टोअर्स त्वरीत बंद करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/विद्युत विभाग प्रमुख/वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१६ मौजे निमगांव हद्दीतील शिर्डी पोलिस स्टेशनची जागा संस्थानला मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१२८.** **(अ)**श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी दररोज अंदाजे २५ ते ३० हजार साईभक्त भेट देत असतात. या साईभक्तांना श्री साईंचे दर्शन सुलभरितीने व्हावे या दृष्टीने संस्थानमार्फत विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या सोयी-सुविधांमध्ये निवास व प्रसादभोजन व्यवस्था प्रामुख्याने करण्यात येत आहे. भोजन सुविधेत प्रामुख्याने, भक्तांसाठी चहा,कॉफी, दूध, बिस्किटे, नाष्टापाकिटे तसेच सकाळी १० ते रात्रौ १० अशी १२ तास अविरत प्रसादभोजन उपलब्ध नाममात्र किंमतीत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सध्या संस्थानमार्फत, साईप्रसाद इमारतीतील तळमजल्यावर असलेल्या प्रसादालय विभागामार्फत साईभक्तांना प्रसाद भोजन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या प्रसादालयात एकाच वेळेस १००० भक्त भोजन घेऊ शकतील असा हॉल व त्याबरोबर अनुषंगिक असे उपभांडार, रसोडा, शीतगृह, अतिथी कक्ष, कार्यालय ईत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या प्रसादालयात दररोज सुमारे १५-२० हजार साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. उत्सवाच्या व सुट्टीच्या कालावधीत हीच संख्या ३०-३५ हजार पर्यन्त जाते. अशा गर्दीच्या कालावधीत प्रसादभोजनाची सुविधा अत्यंत अपुरी पडते.

यासाठी मा.व्यवस्थापन समितीने विविध निर्णयांन्वये, श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास, विनाविलंब उपलब्ध व्हावी, कोणताही भक्त भोजनाशिवाय उपाशी राहू नये यादृष्टीने सर्व सोयींनीयुक्त असे अद्यायवत प्रसादालय उभारणेचा निर्णय घेतलेला आहे.

**(ब)** उपरोक्त विवेचनानुसार, मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेनुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून भूसंपादन केलेल्या मौजे निमगांव शिवारातील गट नंबर ८० व गट नंबर ८५ मध्ये ०८ एकर ०५ गुंठे क्षेत्रामध्ये प्रसादालय इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

एकाच वेळेस ५५०० भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशी क्षमता असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. या इमारतीमध्ये तळमजल्यासह एक मजला असून, प्रसाद भोजन बनविणेकामी आवश्यक असणाऱ्या सर्व अद्यायवत सुविधा करण्यात येणार आहेत. त्यापैकी वाहनतळ, शुध्द पाणी पुरवठा व्यवस्था, उपभांडार गृह, प्रतिक्षागृह, भांडे धुण्यासाठी डिश वॉशिग मशिन, भाजीपाला साठवणुकीसाठी शीतगृहाची सोय, प्रसाद भोजन बनविणेकामी एलपीजीकरीता प्लॅन्टची व्यवस्था, सोलर व जनरेटर करीता सुविधा, वायुवीजन व अग्नीशमन व्यवस्था आदि महत्वाच्या सुविधा करण्यात आलेल्या आहेत. तसेच भाविकांसाठी विरंगुळा-विसावा म्हणून बाग-बगीचा व प्रशस्त अंतर्गत रस्तांच्या अंतर्भाव या प्रकल्पांतर्गत करण्यात आलेला आहे. या प्रकल्पासाठी सुमारे रक्कम **रुपये २१ कोटी** मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेद ब मधील विवेचनानुसार, नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम मौजे निमगांव शिवारातील गट नंबर ८० पैकी व ८५ पैकी मधील जमिनीत सुरु आहे. या जमिनीचे शेजारीच, मौजे निमगांव शिवारात गट नंबर ८० पैकी जागेत सध्या खालीलप्रमाणे तीन इमारती आहेत :

०१) शिर्डी पोलिस स्टेशन
०२) पोलिस अधिकारी व कर्मचारी वसाहत
०३) पोलिस अधिकारी विश्रामगृह

उपरोक्त तीनही इमारतीबरोबर, राहिलेल्या शिल्लक मोकळया जागेत पोलिस कर्मचाऱ्यांची साप्ताहिक परेड, वसाहतीतील मुलांना खेळणेसाठी क्रिडांगण तसेच शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या भेटीचे वेळेस बाहेर गांवावरुन येणाऱ्या पोलिस दलांच्या वाहनासाठी वाहनतळ व बंदोबस्त म्हणून वापर केला जातो.

संस्थानमार्फत नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम उपरोक्त पोलिस स्टेशनच्या मागील बाजूस, गट नंबर ८० व ८५ पैकी असलेल्या उर्वरित क्षेत्रात सुरु असून, या नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम ३० टक्के पूर्णत्वास आलेले आहे. येत्या ०६ महिन्यात या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

**(ड)** सद्य:स्थितीत नियोजित प्रसादालय इमारतीकडे जाणेसाठी अहमदनगर-मनमाड रस्त्यापासून, गट नंबर ८०-८५ मध्ये जाणेसाठी, शिर्डी पोलिस स्टेशन इमारतीचे दक्षिण बाजूस म्हणजेच, हॉटेल सिध्दांतचे उत्तर बाजूस अस्तित्वात असलेल्या ०३ मीटर रुंदीचे रस्त्याचे डांबरीकरण संस्थानचे निधीतून सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत करण्यात येणार आहे. या रस्त्याशिवाय इतर कुठलाही रस्ता सध्या अस्तित्वात नाही किंवा उपलब्ध नाही. नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेनंतर व ही इमारत वापरात आणलेनंतर सदरहू अरुंद रस्त्याने साईभक्तांना तसेच स्थानिक रहिवाशांना जाणे-

येणे अत्यंत गैरसोयीचे होणार आहे. तसेच या रस्त्याने लहान - मोठया वाहनांची वर्दळ खूपच वाढणार असून वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची मोठया प्रमाणावर शक्यता आहे.

याकरीता मौजे निमगांव शिवारातील गट नंबर ८० पैकी असणाऱ्या शिर्डी पोलिस स्टेशनची जागा संस्थानला मिळणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

(०१) शिर्डी पोलिस स्टेशनच्या ताब्यात असलेली संपूर्ण जमीन ताब्यात घेणे व त्यासाठी पोलिस खात्यास मौजे निमगांव शिवारातील इतर पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे.

किंवा

(०२) शिर्डी पोलिस स्टेशनच्या ताब्यात असलेल्या जमिनीतून नियोजित प्रसादालय इमारतीकडे जाणेकामी योग्य रुंदीचा, (कमीत कमी १८ मीटर रुंदी) रस्ता तयार करणेसाठी जागा मिळविणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव हद्दीतील शिर्डी पोलिस स्टेशनची जागा संस्थानला मिळणेकामी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री आर.आर.पाटील यांना मा.अध्यक्ष महोदय यांनी समक्ष भेटून सदरची जागा संस्थानला मिळणेचे दृष्टीने प्रयत्न करावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१७** **गुरुस्थान नंदादीप जवळील निंब व पिंपळ वृक्ष यांचा पहाणी अहवाल.**

**निर्णय क्र.१२९.** दि.१७/११/२००६ रोजी इन्स्टियुट ऑफ जेनटीक्स व ट्री ब्रिडींग कोईमतूर येथील वरिष्ठ संशोधक श्री.डॉ.एस मुरगेशन यांनी गुरुस्थान नंदादिप जवळील निंब व पिंपळवृक्ष यांना भेट दिली त्यावेळी मा.कार्यकारी अधिकारी,वरीष्ठ मुख्य अभियंता श्री.आहेर आर.बी. व बगीचा विभागाचे श्री.भणगे ए. बी. उपस्थित होते.

डॉ.मुरुगेशन यांनी गुरुस्थान निंबांची व नंदादिप जवळील पिंपळांची पाहणी करुन काही फोटो घेतले त्याच प्रमाणे त्यांच्या प्रयोग शाळेत तपासणीसाठी झाडांची नमुने घेतले आहे.त्यात झाडाची साल,नविन व जूनी झाडांची पाने , झाडांच्या खोडाजवळील माती, झाडांची नविन व जूनी वाळलेल्या फांदया व पिंपळाच्या झाडांला आलेली फळे इन्स्टियुट ऑफ जेनटीक्स व ट्री ब्रिडींग कोईमतूर यांनी झ ाडांची नमुने त्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली असता खालील प्रमाणे तपशिल व त्यावर उपाय सुचविलेले आहेत.

<u>तांत्रिक रिपोर्ट खालील प्रमाणे</u>

| | |
|---|---|
| **०१) नमुना** | १) निंबवृक्ष<br>२) पिंपळवृक्ष |
| **०२) नमुन्याचा भाग** | - पाने,साल,व माती. |
| **०३) नमुना घेणाराचे नाव** | - श्री.डॉ.मुरगेशन,शास्त्रज्ञ |
| **०४)नमुना घेतल्याची तारीख** | - दिनांक १७/११/२००६. |
| **०५)नमुना मिळाल्याची तारीख** | - दिनांक १८/११/२००६. |
| **०६) नमुन्याची परिस्थीती** | - १) पिवळी व वाळलेली निंबाची पाने<br>२) पिवळे व लाल टिपके असलेली पिंपळाची पाने व वाळलेली साल व ओली माती |
| **०७) नमुना घेतल्याचे ठिकाण** | - श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर,शिर्डी ,(महाराष्ट्र) |
| **०८) सुक्ष्म अभ्यास करणारे** | - रोग निदान तज्ञ व इतर सहकारी |
| **०९) सुक्ष्म अभ्यास/पृथकरण केल्याची तारीख** | - १) मॉईरचर (ओलावा) प्लेट पध्दत १८-११-०६<br>२) मायक्रोस्कोप निरीक्षण पध्दत १८-११-०६<br>३) कल्चर टेकनिक २०-११-०६<br>४) सिरीयल डायलुशन पध्दत २०-११-०६ |
| **१०) सुक्ष्म अभ्यास किंवा /पृथकरण केल्याची पध्दती** | -१) मॉईचर (ओलावा) प्लेट पध्दत<br>२) मायक्रोस्कोप निरीक्षण पध्दत<br>३) कल्चर टेकनिक<br>४) सिरीयल डायलुशन पध्दत |

त्याची तपासणी करुन त्यावर रोग आहे. किंवा नाही यांचे निदान करावे लागेल.

**<u>त्यावर करावयाच्या उपाय योजना</u>**

**१) तेलाचा वापर :-** झाडांच्या जवळ पुजा करते वेळी पडणारे तेल लवकर बंद करावे त्यामुळे मातीची सुपीकता कमी होते व त्यामधील अन्नद्रव्य तयार करणारे सुक्ष्म जीवाणू ,नत्र,स्फुरद यावर परिणाम होतो.

**२) अगरबत्ती ,हळद कुंकू व इतर पावडर यांचा वापर :-** झाडाच्याखोडाजवळ पुजेच्या वेळी अगरबती,हळदी-कुंकू यामध्ये रसायन असल्यामुळे ते जमिनीवरील अन्नघटक व मुळांना हनिकारक आहे.त्यामुळे तेथे अगरबती व हळदी कुंकू यांचा वापर बंद करावा.

**३) दिप आराधना :-** झाडांच्या समोर आठवडयातून दोनदा दिप चालू असतो.पुजेच्या दूस-या दिवशी झाडांच्या पानांवर पाणी मारुन स्वच्छ करावे त्यामुळे त्यावर बसलेली कार्बनकाजळी व तेलाचा थर निघून जातील व पाने स्वच्छ राहतील.

**४) बुरशीजन्य उपाय:-** झाडांना जास्तपाणी होवून देवू नका २ ग्रॅम बावीस्टीन ०१ लिटर पाण्यात टाकून हे मिश्रन झाडांच्या खोडाभोवती टाकावे.

हया अहवाल असे सुचविलेले आहे की पुजेचे वेळी भक्ताकंडून तेल,तूप,दुध,हळद, कापूर, व कुंकू हे झाडांच्या खोडाच्या जवळील जमिनीत पडल्यामुळे तेथील मातीत मिश्र होते यामुळे जमिनीतील ऑक्सीजन व सुक्ष्म अन्नद्रव्य व सुपिकता यावर परिणाम झालेला आहे. अशावेळी येथील माती बदलणे आवश्यक आहे. ही माती बदलून त्यामध्ये लाल माती ,नदीवरील माती व शेणखत योग्य प्रमाणात घेवून ते झाडाभोवती टाकावे लागेल. .यामुळे झाड परत ताजे तवाणे होईल. यात थोडे योग्य प्रमाणात रासायनिक खते वापरल्यासमुळांना चांगले राहिल.

माती बदलवणे व योग्य प्रमाणात घेण्याचे काम जोखमीचे व काळजीपूर्वक करवयाचे असल्यामुळे आमच्या इन्स्टियुटचे प्रतिनिधी /मी स्वतः व दोन शास्त्रज्ञ डिसेंबर महिण्यात येऊन काम करुन देवू ,त्यासाठी लागणारे मटेरिअल तयार ठेवावे .आमचा येण्याचा कार्यक्रम कळवून हे काम करुन देण्यास तयार आहोत असे कळविले आहे.

दिनांक १६/१२/२००६ रोजी **फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयुट, डेहराडून (उत्तराचंल )** येथ्रील शास्त्रज्ञ डॉ.सुभाष नाटीयाल व डॉ.एन.एस. के.हरिष यांनी संस्थान भेट दिली त्यावेळी त्यांनी मंदिर परिसरातील गुरुस्थान मंदिराजवळील निंबवृक्षाची व लेंडीबागेतील नंदादीप जवळील निंबवृक्षाची व पिंपळ वृक्षाची पाहणी केली गुरुस्थान मंदिराजवळ आसलेल्या निंबवृक्षाची सदय:स्थितीः याबाबत त्यांनी अहवाल वजा- सूचना दिलेल्या आहेत.

**०१) गुरुस्थान:-** गुरुस्थानच्या शेजारी क्रॉक्रीटीकरण केल्यामुळे झाडांची हानी होत आहे. त्यामध्ये
१.कॉक्रीटींग व फरशीमुळे झाडांची साल (गर्डीलींग) तुटली जात आहे. त्यामुळे पानाकडून तयार झालेले अन्न मुळापर्यंत व मुळाकडुन अन्न व पाणी पानांकडे जाण्याचा प्रभाव कमी झाल्याने झाडाच्या सुधारणेत फरक झालेला आहे.
२ झाडांच्या खोडा भोवती फरशी बसविल्याने मुळांना खेळती हवा मिळत नाही. त्यामुळे पाणी व हवा यांचा समतोल राहत नाही.
३.कॉक्रीटीकरणामुळे झाडांच्या आसपास कोठेही पाणी झिरपत नाही.
४. झाडा जवळ मोकळी जागा केली तर मुळांची कार्य करण्याची क्षमता वाढेल .
५ झाडांच्या भोवती बसविलेल्या लोखंडाची जाळी झाडाच्या सालीत घुसलेली असून त्यामुळे झाडास इजा होत आहे.
६. मंदिराच्या छतामुळे झाडास इजा झालेली आहे.

**उपाय :-** १. गुरुस्थान निंबाशेजारील बसवलेली फरशी व कॉक्रटीकरण कमीत कमी १ फुट अंतरापर्यंत तातडीने काढून टाकावे व खोडाजवळील माती मोकळी करुन पाणी देता येईल असे करावे.
२.फरशी व कॉक्रीटीकरण काढते वेळी झाडांचे मुळे व साल यांची नुकसान होणार नाही याची काळजी घेणे.
३. झाडाला नियमित पाणी देणेसाठी ठिंबक सिंचन किंवा मातीचे गाडगे ठेवावे
गुरुस्थान मंदिराचे छत झाडापासून कमीत कमी १ फुट अंतर सोडून असावे झाडांला लावललेली लोखंडी जाळी काढून घ्यावी.

**नंदादीप :-** नंदादीप शेजारील निंबाचे झाड हे वाळलेले आहे.व फक्त खोड उभे आहे.पिंपळांचे झाड सुध्दा वाढीसाठी तणावाखाली असून शेंडयाकडील फांदया वाळलेल्या आहेत. ही परिस्थीती क्रॉक्रीटीकरण व दगडाचे बांधकाम केल्यामुळे आहे. त्यामुळे झाडाला आवश्यक असणारी खेळती हवा व पाणी झिरपण्याचे प्रमाणात फरक झालेला आहे.

**उपाय:-**

१. पिपंळाच्या झाडांच्या भोवतीलची फरशी व क्रॉक्रीटीकरण काढून घ्यावे.जेणे करुन झाडाला हवा व पाणी झिरपण्याचे प्रमाण वाढले.
२.भक्तांना पिपंळाच्या झाडाभोवती प्रदक्षिणा घालणेसाठी २ मीटर अंतरावरुन फेन्सींग करुन दर्शनाची सोय करावी.
३. फरशी व कॉक्रीटीकरण काढते वेळी झाडांचे मुळे व साल यांची नुकसान होणार नाही याची काळजी घेणे.

४. पिंपळाच्या वाळलेल्या फांदया धारदार करवतीने कापून  कापलेल्या जागेवर किटकनाशक औषध (चुबाटीया पेस्ट ) लावणे.

तज्ञांनी वरील प्रमाणे  सुचविलेल उपाय योजनापैकी तेल,अगरबती ,हळद, कुंकू न टाकणे झाडाचे बाजूने १'० फरशी कॉक्रीट तोडून झाडांना नियमित पाणी देता येईल. या उपाय योजना त्वरीत करण्यात येत आहेत. उर्वरीत तांत्रिक उपाय योजना संबधीत तज्ञांचे मार्गदर्शनानुसार करुन घेता येईल. झाडाच्या बाजूने २ मिटर अंतरापर्यत कॉक्रीट तोडणे फरशी काढणे या कामा बाबत गुरुस्थान मंदिर जिनौध्दारासाठी नेमलेले आर्किटेक्ट श्री.बॉबी विजयकर यांचे कडून खर्चाचा प्रस्ताव व आराखडा तयार करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, तज्ञांनी दिलेल्या अभिप्रायानुसार व आराखडयानुसार कार्यवाही करण्यात यावी याकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**दिनांक १७.०२.२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-**

**विषय नं.१८** **शिर्डी येथे विमानतळ उभारणे बाबत**

**निर्णय क्र.१३०.** शिर्डी येथे 'श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सध्या बरेचसे साईभक्त रस्त्यांनी प्रवास करतात, या व्यतिरिक्त इतर प्रवास सुविधा उपलब्ध नाही, बरेचसे साईभक्त मुंबई, पुणे, हैद्राबाद तसेच देशातील इतर भागातून येत असतात. ते प्रामुख्याने एस.टी.बसेस,खाजगी बसेस किंवा त्यांचे स्वतःचे वाहनातून प्रवास करतात. एकंदरीत भारताच्या बाहेरील भागातून येणारे साईभक्त, मंबई किंवा पुणे पर्यन्त हवाई मार्गे येतात व तेथून ते खाजगी वाहनाने प्रवास करतात, त्यामुळे नगर किंवा नाशिक मार्गे प्रवास केला तरी प्रवासाचा कालावधी सहा तासांपेक्षा जास्त होतो. त्यामुळे यात्रेकरुंना महामार्गावरील वाहतूक तसेच खराब रस्ते इत्यादी अडचणींना तोंड दयावे लागते. महाराष्ट्र शासनाने विविध ठिकाणांहून विमान वहातूक सुविधा शिर्डी येथे उपलब्ध करणेबाबत व सर्व सोयींयुक्त विमानतळ शिर्डी येथे विकसीत करणेबाबत ठरविले आहे.

महाराष्ट्र राज्यात विमानतळ विकसीत करणेसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विमानतळ प्राधीकरण कं.लि., (MADC) नेमणूक केलेली आहे. MADC ने शिर्डी पासून ५ कि.मी. अंतरावर असलेले सावळीविहीर (बु ) परिसराचा सविस्तर सर्वेक्षण करुन सदर क्षेत्राची निवड केली आहे. श्री साईबाबा संस्थानचे जवळ असले कारनाने तसेच महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून मोठ्या प्रमाणात जमिनीची उपलब्धता होणार असल्याने या साईटची निवड करण्यात आलेली आहे. तसेच शिल्लक खाजगी जमिन घेणेबाबत MADC यांनी प्रक्रिया चालू केलेली आहे. MADC यांनी विमानतळ विकसित करणेकरीता मे.एल.ॲण्ड टी, रामबील, चेन्नई यांची सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. सल्लागार यांनी तयार केलेल्या नकाशानुसार एकूण ५३० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यापैकी २६० हेक्टर जमिन MSFC कडून घेता येईल व उर्वरीत १७० हेक्टर खाजगी जमिन संपादीत करण्याची गरज आहे. सल्लागार यांनी तयार केलेल्या प्राथमिक अंदाजपत्रकानुसार सदरचे विमानतळ विकसित करणेकामी जमिनीचे किंमतीसह जवळपास रु. ८५ कोटी खर्च अपेक्षीत आहे.

सल्लागार व MADC यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतातून व बाहेरुन बऱ्याच Airline & charter flight operator शिर्डी येथून व शिर्डीसाठी त्यांची विमानसेवा देण्यास इच्छुक आहेत.

विमानतळाच्या जागेच्या प्रश्नाविषयी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा केली असून MADC निवड केलेली सध्याची जागा श्री साईबाबा संस्थानच्या भक्तांसाठी विमानतळासाठी योग्य आहे.

सदरचे विमानतळ श्री साईबाबा संस्थानसाठी जास्त उपयुक्त असून, त्यामुळे महाराष्ट्र नव्हे तर देशाच्या इतर भागातून येणारे भक्तांचाही वहातुकीचा प्रश्न मिटणार आहे. विविध प्रदर्शन उच्चवर्गातील MADC सहभाग चालू असतांना देश व विदेशातून तसेच पुष्कळ अनिवासी भारतीयांनी शिर्डी येथे येण्याची इच्छा प्रकट केली आहे. पंरतू हवाई मार्ग नसल्यामुळे ते येऊ शकत नाहीत शिर्डी येथे विमानतळ विकसीत करणेबाबत दि. ०३/०८/२००६ रोजी आयुक्त जिल्हाधिकारी , MSFC चे अधिकारी व सल्लागार यांचे बरोबर बैठक घेतली आहे. MADC ला हे विमानतळ पूर्ण होण्याची खात्री आहे. याकामासाठी निधीची उपलब्धता आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थान हे विमानतळ विकसीत करणेसाठी सहभाग घेण्यासाठी पुढे येईल. या प्रकल्पासाठी श्री साईबाबा संस्थान ट्रस्टने निधीची मदत करावी अशी अपेक्षा आहे.श्री साईबाबा संस्थानने याकामासाठी रु. ३० ते ३५ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिल्यास प्रकल्प उभारणेस मदत होईल आणी साईभक्तांच्या वाहतुकीचा प्रश्नही सुटेल तसेच शिर्डीला भेट देण्या-या भक्तांच्या संख्येत वाढ होऊन सदर क्षेत्राचा विकासही होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, MADC ज्या ठिकाणी विमानतळाची जागा निश्चित करेल त्या ठिकाणी विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत

विहीत पध्दतीने शासनाची मान्यता घेऊन योग्य ती आर्थिक मदत करण्यात येईल असे कळविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१९** **कर्नाटक राज्य शासनास शिर्डी येथे साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी एक एकर जागा उपलब्ध करुन देणे बाबत**

**निर्णय क्र.१३१.** **(अ)**कर्नाटक राज्याचे मत्स्यपालन मंत्री श्री.बी.नागाराजा शेट्टी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांचेकडील पत्र क्रमांक एमएफएम/१३६२/२००६, दिनांक ०८ डिसेंबर, २००६ रोजीचे पत्राचा तपशील थोडक्यात खालीलप्रमाणे :

"आपणांशी कोलूर येथे दिनांक १४ ऑक्टोबर,२००६ रोजी झालेल्या चर्चेस अनुसरुन, मी खालील बाबी आपल्या लक्षांत आणून देत आहे व त्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती करतो.

श्रीसाईबाबा मंदिर, शिर्डी, श्री महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर, श्री सिध्देरामेश्वरा मंदिर, सोलापूर आणि श्री पांडूरंग मंदिर, पंढरपूर येथील मंदिरे भारतात प्रसिध्द आहेत. आमच्या (कर्नाटक) राज्यातून बहुसंख्य भक्त या मंदिराना दर्शनासाठी नियमित भेट देत असतात. आमचे असे लक्षात आले आहे की, याठिकाणी भेट देणाऱ्या भक्तांना मोठया प्रमाणात गैरसोयींना तोंड द्यावे लागते. याकरीता (कर्नाटक) शासन असा विचार करीत आहे की, भक्तांना कायमस्वरुपी मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. या सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी कर्नाटक शासनाच्या देणगी विभागामार्फत धर्मशाळा बांधण्याचे नियोजन आहे.

भक्तांना मुलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने उपरोक्त ठिकाणी एक एकर जागा विनामूल्य अथवा नाममात्र किंमतीस उपलब्ध करुन द्यावी. ही योजना दोन्ही राज्यांच्या मैत्रीचे एक उत्तम प्रतिक ठरेल.

सदरील पत्रास अनुसरुन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक १० जानेवारी, २००६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे :

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कर्नाटक राज्याचे मत्स्यपालन मंत्री श्री. बी.नागाराजा शेट्टी यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेल्या संदर्भांकित दिनांक ०८ डिसेंबर,२००६ च्या पत्राची प्रत आपणाकडे पाठविण्यात आहे.

मा.मंत्री, कर्नाटक राज्य यांनी आपल्या पत्रात आपल्या मंदिर परिसरात कर्नाटकातील भक्तगणांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता प्रत्येकी एक एकजर जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने आपले अभिप्राय कृपया तात्काळ शासनास कळविण्यात यावेत.

**(ब)**उपरोक्त परिच्छेदातील विवेचनावरुन असे लक्षात येते की, मा.मंत्री, कर्नाटक राज्य यांनी श्री क्षेत्र शिर्डी येथे कर्नाटक राज्यातून श्री साईंच्या दर्शनार्थ भेट देणाऱ्या भक्तांसाठी मूलभूत सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेकामी धर्मशाळा बांधणेकरीता एक एकर जागेची मागणी विनामूल्य अथवा नाममात्र किंमतीस केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांन्वये, सध्या संस्थानमार्फत सध्याचे धर्मशाळा इमारतीशेजारील मोकळया जागेत अद्यायवत सुविधा असलेल्या २४० खोल्यांच्या निवासस्थान इमारतीचे बांधकाम सुरु आहे. तसेच शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी) यांचेमार्फत श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व शैक्षणिक संकुलाजवळील संस्थान मालकीच्या जागेत व भूसंपादनाने घेण्यात येणाऱ्या सर्व्हे नंबर १०७ पैकी व १०८ पैकी जमिनीत / जागेत सर्व सुविधेनेयुक्त अशा "साईआश्रम" या निवासस्थान प्रकल्पाचे बांधकाम लवकरच काम सुरु होत आहे.

"साईआश्रम" या निवासस्थान प्रकल्पाचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

०१) विभाग "ऐ" मध्ये तळमजला अधिक ३ मजले असलेल्या १३ इमारतीमध्ये १६६४ खोल्या.

०२) विभाग "बी" मध्ये तळमजला अधिक ३ मजले असलेल्या ०३ इमारतीमध्ये ३८४ खोल्या.

०३) विभाग "एम" मध्ये फक्त तळमजला असलेल्या एका इमारतीत १४ दुकानगाळे.

०४) विभाग "एस" मध्ये संरक्षण व्यवस्थेसाठी तीन सुरक्षाकेंद्र.

०५) विभाग "आर" मध्ये तळमजला अधिक एक मजला असलेल्या एका इमारतीत उपहारगृह, देखभाल दुरुस्ती केंद्र व पहिल्या मजल्यावर ०१ भोजनकक्ष व ०२ मोठे धर्मशाळा कक्ष तसेच तळघरात भांडारगृह अशी सुविधा.

उपरोक्त निवासस्थान प्रकल्पाचा विचार करता, २२८८ खोल्या भक्तांसाठी उपलब्ध होणार असून यामध्ये १५ ते १६ हजार भक्तांची राहण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय भक्तांसाठी उपहारगृह, भोजन, करमणुकीचे साधन असलेल्या बगिचे आदि सुविधा उपलब्ध होणार आहेत. याशिवाय संस्थानमार्फत मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील भूसंपादनाने घेण्यात आलेल्या जमिनीमध्ये निवासस्थान, ध्यानमंदिर, भव्य उद्यान प्रकल्प, हेलिपॅड उभारणी आदिचे नियोजन करण्यात येत आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, भविष्यामध्ये श्री क्षेत्र शिर्डी मध्ये साईभक्तांना मुलभूत सेवा-सुविधा मोठया प्रमाणावर उपलब्ध होणारच आहेत व यासाठी संस्थानलाच जागेची / जमिनीची

आवश्यकता भासणार आहे. यासाठी संस्थान शिर्डी व शिर्डी परिसरात उपलब्ध होणाऱ्या जागा / जमिनी सध्या खरेदी करीत आहे तसेच भूसंपादनाच्या माध्यमातून मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

मा.मंत्री, कर्नाटक राज्य यांनी भक्तांच्या मुलभूत सेवा-सुविधा निर्माण करण्यासाठी मागणी केलेली एक एकर जमिनीची मागणी भावनिकदृष्टया योग्य आहे, मात्र सध्या संस्थानमार्फत त्यांना जागा उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही, असे नम्र मत आहे. तथापि, मौजे नांदुर्खी, तालुका राहाता येथील सुमारे ४२ एकर जमीन संस्थानला विनामुल्य मिळणार आहे. सदर जमिनीचा ताबा संस्थानला मिळाल्यानंतर अशा स्वरुपाच्या इमारती उभारणेकरीता जागा उपलब्ध करुन देणे शक्य होईल, असा अभिप्राय न्याय व विधी विभागास कळविता येईल.

**(क)** उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनानुसार, कर्नाटक राज्यशासनास एक एकर जागा उपलब्ध करुन देणेबाबतचा अभिप्राय महाराष्ट्र शासनास कळविणेबाबत अथवा जागा उपलब्ध करुन देण्यात यावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कर्नाटक राज्यशासनास एक एकर जागा संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत तत्वतः मान्यता देण्यात आली मात्र याकामी योग्य ती जागा निवडण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. तद्नंतर योग्य त्या अटी शर्ती नुसार सदरील जागा शासनाच्या मान्यतेने उपलब्ध करुन देण्यात यावी. असे ठरले.

याचवेळी संस्थानमार्फत तिरुपती येथे खरेदी करावयाचे जागेसाठी मा.विश्वस्त पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी तिरुपती येथे जावे असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२०** **शिर्डी येथे गेस्ट हाऊस बांधणेकामी जागा भाडेपट्टयाने जागा मिळणेकामी मे.अलोक इंडस्ट्रीज लि.मुंबई यांनी केलेल्या विनंतीबाबत**

**निर्णय क्र.१३२.** अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई यांनी दि.२६.१२.२००६ रोजीचे पत्राव्दारे शिर्डी येथे त्यांचे कंपनीतर्फे गेस्ट हाउस बांधण्याचा मानस असून त्यासाठी संस्थानतर्फे भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती केली आहे.

सदर कंपनी हि कापड उद्योगात अग्रेसर असून त्यांचे सिल्व्हासा, वापी, नवी मुंबई याठिकाणी कापड कारखाने आहेत. त्यांचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. त्यांची वार्षिक उलाढाल रु.१४००.०० कोटी असून त्यापैकी रु.३५० कोटीचे कापड निर्यात केले जाते.

सदर कंपनीमार्फत सामाजिक दृष्टीकोनातून निरनिराळया धार्मिक ठिकाणी गेस्ट हाउस बांधण्याचे नियोजन आहे. शिर्डी येथे स्थानिक संस्थेच्या सहकारातून मध्यम आकाराचे गेस्ट हाउस बांधण्याचा सदर कंपनीचा विचार आहे. त्यामध्ये ३-४ बेडरुम संडास बाथरुमसह, हॉल, किचन तसेच ड्रायव्हर, नोकरांकरीता स्वतंत्र निवासव्यवस्था तसेच गाडयांकरीता गॅरेज अशाप्रकारचे बांधकाम करण्याचे प्रयोजन आहे. त्यासाठी प्रत्येकी साधारण १५००-२००० चौ.फुट बांधकाम करण्याची आवश्यकता असून एकूण साधारण १००००-१२००० चौ.फुट जागेची बांधकामाकरीता आवश्यकता आहे, असे सदर कंपनीने कळविले आहे.

सदर गेस्ट हाउसचे बांधकाम संस्थानतर्फे करण्यात यावे. सदर बांधकामासाठी निवडण्यात येणाऱ्या ठेकेदारास व आर्किटेक्ट यांना त्यांचे कंपनीमार्फत फी रक्कम देण्यात येईल. तसेच संस्थानने ठरविलेल्या अटी व शर्तीस आम्ही अधिन राहू. सदर प्रकल्प बांधकामाकरीता येणारा खर्च कंपनी देण्यास तयार आहे.

याशिवाय सदर बांधकामाची दुरुस्ती व देखभाल हि साईबाबा संस्थानने करावयाची असून साईभक्तांना निवासाकरीता खोल्या देण्याची व्यवस्थाही संस्थानने करावयाची आहे. तसेच सदर निवासस्थाना मध्ये त्यांचे कंपनीकरीता एक सुट हा त्यांचे कंपनीच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता संस्थानने राखीव ठेवायची आहे. असा सदर कंपनीचा प्रस्ताव आहे.

**ब) कोटेशन मागवून खरेदी..साखर ९१०० क्विंटल (एम ३० ग्रेड)**

कॅन्टीन तसेच प्रसादलाडू बनविणेसाठी आवश्यक साखर खरेदीसाठी सन २००६-०७ मध्ये अ.नगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालूक्यातील ५० कि.मी.च्या परिसरातील कारखान्यांकडून दरपत्रके मागवून तसेच संस्थान वाहनाने वाहतूक करुन खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती. मात्र पुर्ण वर्षात मे.संजीवनी सहकारी साखर कारखाना, सहजानंदनगर यांचेच दरपत्रक आलेले होते. सन २००७-०८ मध्येही कारखाना तसेच संस्थान वाहनाने वाहतूक अशा दराचे टेंडर मागवून व वाहतुक खर्चाबाबत शहानिशा करून खरेदीस अथवा एकच कोटेशन प्राप्त झाल्यास त्यांचे मान्य दराने खरेदीस मान्यता देण्यात आली. प्रसादलाडूचा खप वाढलेला असल्याने तसेच पारायण, सोहळा आदी सार्वजनिक कार्यक्रमांना साखर देणगी देत असल्याने साखरेची वाढीव मागणी केलेली आहे.

**क) जाहिर निविदा मागवून खरेदी..**

**०१. किराणा माल, कडधान्ये व मसाल्याचे पदार्थ**

प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल, कडधान्ये व मसाले पदार्थ इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदांची विक्री करून ठराविक मुदतीत निविदा व मालाचे नमुने मागवून, मा.विश्वस्त समितीचे सभेमध्ये नमुने निवडून, तसेच संबंधितांना समक्ष चर्चेसाठी बोलावून त्यांनी दिलेल्या सुट दरांचा विचार करुन तसेच नमुने पाहून अंतिम निर्णय घेतला जातो. त्याप्रमाणेच सन २००७-०८ साठीचे खरेदीकामी कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**०२. वनस्पती तूप - २१५ क्विंटल**

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक वनस्पती तूप मे.विप्रो लिमीटेड, अंमळनेर, जिल्हा जळगांव यांचेकडून तसेच मे.पारख फुडस (कारगील फुडस), पुणे या उत्पादक कंपन्यांकडून त्या-त्या वेळी अस्तित्वात असणा-या दराने थेट खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती. मात्र वनस्पती तूप हे वर्षातून तिन ते चार वेळेस खरेदी करावयाचे असल्याने व तूपाची डिलेव्हरी ही संपुर्ण रकमेचा आगाऊ डि.डि.देऊन कारखान्यांतून घ्यावी लागत असल्याने, सन २००७-०८ मध्ये वनस्पती तूप वार्षिक निविदेमध्ये समाविष्ट करणेचे प्रयोजन आहे त्यास मान्यता देण्यात आली. टेंडरमधील दर जास्त वाटल्यास उपरोक्त उत्पादकांकडून बाजारभावाने खरेदीस मान्यता देण्यात आली.

**०३. सोना मसुरी तांदुळ- ५००० क्विंटल**

सन २००६-०७ मध्ये मा.विश्वस्तांचे उपस्थितीत आंध्रप्रदेशातून तिन ते चार तांदुळ कारखान्यांमधील नमुने समक्ष पाहून सोना मसुरी तांदुळ खरेदी करणेत आलेला होता. सन २००७-०८ मध्ये निविदेमध्ये सोना

मसुरी तांदुळ मागणी करणेस तसेच आवश्यकता वाटलेस मा.विश्वस्तांच्या उपस्थितीत आंध्रप्रदेश किंवा इतर उत्पादक प्रदेशामधून तांदुळ खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

**०४. गावरान तूप- ४५०० क्विंटल**

प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे गावरान तूप सन २००६-०७ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दोन टप्प्यात निविदा मागवून खरेदी करणेत आले होते. सन २००७-०८ साठीही दि.०१.०४.०७ ते ३०.०९.०७ या सहामाहिसाठी २२५० किग्रॅ. व ०१.१०.०७ ते ३१.०३.२००८ या सहामाहिसाठी २२५० किग्रॅ. अशा वेगवेगळया निविदा मागवाव्यात. तसेच लूज ३५ किग्रॅ. कॅन व १५ किग्रॅ. डब्यातील ॲगमार्क तूपासाठी निविदा मागणी करून खरेदी करण्यात यावी असे ठरले.

**०५. चहा- ५५ क्विंटल व कॉफी-५ क्विंटल**

कॅन्टीन विभागासाठी सन २००७-०८ मध्ये ब्रुक बॉण्ड सुपर डस्ट, टाटा सीटीसी डस्ट व सपट सीटीसी डस्ट तसेच कॉफीसाठी ब्रुक बॉण्ड कॅफे गोल्डची निविदा मागणी करून खरेदी करण्यात यावी असे ठरले.

**०६. बिस्कीटे - पार्ले व ब्रिटानीया**

कॅन्टीनमध्ये दैनंदिन विक्रीकामी आवश्यक असणारे पार्ले प्रॉडक्टसचे ८८/१००/२२० ग्रॅम, क्रॅकजॅक व मोनॅको तसेच ब्रिटानीया प्रॉडक्टसचे ८८/१००/२५० ग्रॅम, फिफ्टी-फिफ्टी, स्नॅक्स, सनर्फिस्ट बिस्कीटे कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून खरेदी करणेस तसेच श्री साईभक्तांचे मागणीनुसार वरील कंपन्यांचे ब्रॅण्ड पैकी काही नवीन खरेदी करावयाची झाल्यास त्यास मान्यता देण्यात आली.

**०७. पॅकेज्ड् ड्रींकींग वॉटर -०१ लिटर व ५०० एमएल पॅकींग**

शासनाच्या नियमानुसार आयएसआय स्टॅण्डर्ड मान्यता प्राप्त पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर उत्पादनाच्या निविदा मागणी करून १ लिटर व ५०० एमएल पॅकींगमध्ये ड्रीकींग वॉटर खरेदीस मान्यता देण्यात आली.

**०८. गाय दूध - दररोज अंदाजे १६०० लिटर**

कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठीचे गाय दूध ३.५ ते ३.८ फॅट व ८.५ एसएनएफ गुणवत्तेचे दूध खरेदी कामी निविदा मागणी करून खरेदीस मान्यता देण्यात आली.

**०९. डिश वॉशिंग मशिन लिक्वीड, लिक्वीड सोप व क्लिनींग पावडर-**

प्रसादालयाकडील भांडे धुण्याच्या मशिनसाठी आवश्यक असणारे डिश वॉशिंग मशीन, साफसफाईसाठी लिक्वीड सोप व क्लिनींग पावडरसाठी निविदा मागणी करून खरेदीस मान्यता देण्यात आली.

सन २००६-०७ मध्ये आर्थिक उलाढालीबाबत निकष देण्यात आलेला असल्याने योग्य क्षमतेच्या पुरवठादाराकडून निविदा सादर केल्या गेल्या होत्या. सन २००७-०८ मध्येही खालीलप्रमाणे वार्षिक उलाढालीबाबत निकष देवून त्या निकषानुसार निविदांची मागणी करण्यात यावी.

| अ.नं. | तपशिल | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१. | किराणामाल-तांदुळ, डाळी, कडधान्ये व इतर | रु.४,०१,६३,३५१/- | रु.५०,००,०००/- |
| ०२. | सुर्यफूल/मका तेल | रु.८६,१०,५००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०३. | गावरान तूप (सहामाही खरेदी) | रु.५,१७,५०,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०४. | चहा व कॉफी | रु.६,६१,५००/- | रु.१०,००,०००/- |
| ०५. | गाय दुध | रु.७५,९२,०००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०६. | बिस्कीटे | रु.१९,६४,०००/- | रु.२०,००,०००/- |
| ०७. | पॉलिकप | रु.११,१८,२५०/- | रु.२०,००,०००/- |
| ०८. | प्लॅस्टीक पिशवी | रु.३५,२१,८५६/- | रु.३०,००,०००/- |
| ०९. | मिनरल वॉटर | रु.१०,८३,७५०/- | रु.१०,००,०००/- |

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३९ फायबर क्रेटस् व प्लॅस्टिक बादल्या व मग खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१५१. (अ)**श्रीसाईभक्तांना अल्पदरात देण्यात येणाऱ्या मोतीचूर लाडूप्रसाद पाकिटांची विक्री ही कॅन्टीन विभागामार्फत करण्यात येत असल्याने लाडूची पाकिटे ठेवणेसाठी अत्यावश्यक असलेले प्लॅस्टीक क्रेटस कॅन्टीन विभागाने तातडीने खरेदी करुन मिळणेस विनंती केलेली होती. कॅन्टीन विभागाकडे ६० क्रेटस शिल्लक असल्याने नाताळाचे सुट्टीमध्ये प्रसादलाडू विक्रीसाठी साईभक्तांची अडचण होऊ नये म्हणून ४० नग जेबीसी ५४३६४०० मॉडेल असलेले निलकमल कंपनीचे क्रेटसची मागणी केल्याने संबंधित पुरवठाधारकांशी संपर्क साधून त्वरीत दरपत्रके पाठविणेस सांगणेत आलेले होते.

प्राप्त झालेल्या दरपत्रकातील न्युनतम दराने मे.निलकमल क्रेटस ॲण्ड बिन्स प्रा.लि., मुंबई यांना जा.क्र.१७९६४/२३.१२.२००६ अन्वये रक्कम रु.२३,०३१.२० चा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. मे.निलकमल क्रेटस, मुंबई यांनीही तातडीची सेवा देऊन क्रेटसचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. दि.२४ ते दि.२६.१२.२००६ चे कालावधीत भक्तांची विक्रमी गर्दी झाल्याने कॅन्टीन विभागाने दि.२५.१२.२००६ चे प्रस्तावाने पुन्हा ४० क्रेटसची मागणी केलेली होती. संस्थानमार्फत दि.२९ ते ३१.१२.२००६ असा तिन दिवस शिरडी महोत्सव साजरा करण्यात येणार होता. तसेच नववर्षाच्या होणाऱ्या गर्दीमुळे कॅन्टीन विभागाने ६ नविन लाडू काऊंटर चालू केलेले असल्याने मे.निलकमल क्रेटस, मुंबई यांचेकडूनच तातडीने

४० क्रेटस मंजूर दराने खरेदी करणेत आलेले आहे. याकामी एकुण ८० क्रेटससाठी रु.४६,०६२.४० खर्च आलेला आहे.

**(ब)**श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान व चौकशी विभागामार्फत साईभक्तांना अल्पदरात रुमसेवा उपलब्ध करुन दिली जाते. प्रत्येक रुममध्ये भक्तांचे आंघोळीसाठी प्लॅस्टीक बादल्या ठेवण्यात आलेल्या आहेत. यापूर्वीच्या बादल्या खरेदी करुन बराच कालावधी झालेला असल्याने चौकशी व भक्तनिवासस्थान विभागाने तातडीने बादल्या व मग खरेदी करुन मिळणेची विनंती केलेली होती. दि.२४ ते २६.१२.२००६ चे दरम्यान सुट्टयामुळे साईभक्तांची गर्दी वाढल्याने संस्थानमार्फत ठिकठिकाणी मंडप उभारणेत आलेले होते. तसेच भक्तांची अडचण होऊ नये म्हणून शैक्षणिक संकुलातील वर्ग/हॉल घेऊन भक्तांची व्यवस्था करणेत आलेली होती. त्यामुळे साईभक्तांना आंघोळीसाठी तातडीने प्लॅस्टीक बादल्या व मगाची व्यवस्था करणेसाठी सिंटेक्स व पारस कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून दराबाबत विचारणा करणेत आलेली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | प्लॅस्टीक बादल्या (३०० नग) | प्लॅस्टीक मग (५०० नग) | डिलेव्हरी |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.भिंगारवाला एन्टरप्राईजेस, अ.नगर | रु.३४०.०० प्र.नग सिंटेक्स कंपनी | -- | ७ दिवसात |
| ०२ | शिंगवी मेडीकेअर्स प्रा.लि., अ.नगर | रु.१०६.५२ प्र.नग पारस कंपनी | रु. ८.८७ पारस कंपनी | त्वरीत |

मे.शिंगवी मेडीकअर्स, अहमदनगर यांचे दर कमी असल्याने व पुरवठा त्वरीत होणार असल्याने त्यांचेकडून भक्तनिवासस्थानसाठी २०० नग बादल्या, चौकशी विभागासाठी १०० नग बादल्या व ५०० मग खरेदी करणेत आलेले आहे. त्यासाठी एकुण रु.३६,३९१/-खर्च आलेला आहे.

तरी मे.निलकमल क्रेटस ॲण्ड बिन्स प्रा.लि., मुंबई या क्रेटस उत्पादीत कंपनीकडून खरेदी करणेत आलेल्या एकुण ८० नग क्रेटस खरेदीस व मे.शिंगवी मेडीकेअर्स प्रा.लि., अहमदनगर यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या ३०० नग प्लॅस्टीक बादल्या, ५०० नग प्लॅस्टीक मग खरेदीस व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४०** **श्रीसाईभक्तांचे निवासासाठी असलेल्या खोलीत श्री साईबाबांचा फोटो लावणेबाबत जादा आलेल्या खर्चा बाबत.**

**निर्णय क्र.१५२.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.१२.२००५ निर्णय क्र.३९ नुसार भक्तांचे वास्तव्यासाठी देण्यात येत असलेल्या इमारतीमधील प्रत्येक खोल्यामध्ये श्री साईबाबांचा संस्थानचा अधिकृत फोटो लावण्यात यावा असा निर्णय झालेला आहे. तसेच सदरील फोटो हे मुंबई येथील देणगीदार श्री विराशेठ हे उपलब्ध करुन देणार होते. याबाबत निवासस्थान विभागाने त्यांचेकडे बऱ्याचवेळा पाठपुरावा केलेला होता तथापि त्यांचे कुटूंबातील व्यक्ती आजारी असल्यामुळे ठरावाप्रमाणे फोटोची पुर्तता होणेस विलंब लागणार असल्याचे त्यांचेकडून दूरध्वनीवरुन सांगणेत आलेले होते. त्यामुळे सदरील फोटो हे कोटेशन मागवून खरेदी करावे अशी साईबाबा भक्तनिवासस्थान, चौकशी विभाग व धर्मशाळा विभाग प्रमुखांनी विनंती केलेली होती.

त्यानुसार श्रीसाईबाबांचे लॅमिनेशन असलेले, १२" x १५" साईजचे, ८२० नग फोटोसाठी शिरडी येथील फोटो लॅमिनेशन पुरवठादारांशी संपर्क साधून दरपत्रके पाठविणेस सांगणेत आलेले होते. प्राप्त दरपत्रके उघडणेत येऊन मे.बाबा डोडीया फोटो नॉव्हेल्टी, शिरडी यांना संस्थान जा.क्र. एसएसएस/खरेदी-साभनि/ १०८६५/२००६ दि.१६.०८.२००६ अन्वये रु.५५/-प्रती नग या न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेला असून त्यांनी मागणीप्रमाणे सर्व फोटोंचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. याकामी रक्कम रु.४५,१००/- खर्च आलेला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबांचे लॅमिनेशन असलेले ८२० नग फोटो खरेदीचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४१** **गर्दीचे काळात अहमदनगर, नाशिक येथून वेळोवेळी खरेदी करण्यात आलेल्या भाजीपाल्याबाबत.**

**निर्णय क्र.१५३.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४० (ड-८) नुसार प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, शिरडी, सावळीविहीर, राहाता इ.ठिकाणचे मोंढयावरुन जाहिर लिलावाने खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार आठवडयाच्या सोमवार व गुरुवारी तसेच आवश्यकतेनुसार शनिवार किंवा इतर दिवशी भाजीपाला खरेदी करणेत येत आहे.

माहे नोव्हेंबर मध्ये दिपावली सुट्टीमुळे साईभक्तांच्या गर्दीत वाढ झालेली होती. त्यावेळी कोपरगाव, सावळीविहीर तसेच राहाता इत्यादी ठिकाणी भाजीपाल्याची आवक कमी झाल्याने नाशिक येथील अपंग महिला औदयोगिक सहकारी संस्था मर्यादित, नाशिक या संस्थेकडून कांदा, बटाटा व

लसूण खरेदी करणेत आलेला आहे. यापूर्वीही त्यांचेकडून आवश्यकतेनुसार भाजीपाला खरेदी करणेत आलेला आहे. माहे डिसेंबर महिन्यातही सुट्टया जोडून आल्याने श्री साईभक्तांची विक्रमी गर्दी झालेली होती. त्यावेळी संस्थानमार्फत ठिकठिकाणी मंडप टाकणेत येऊन नाष्टा पाकिटाची व जेवणाची सोयही मंडपातच करणेत आलेली होती. त्यावेळी कोपरगांव येथून आणलेला भाजीपाला कमी पडल्याने अपंग महिला सहकारी संस्थेकडून कांदा, बटाटा व लसूणाची मागणी करणेत आलेली होती.

संस्थानमार्फत शिरडी महोत्सव दि.२९ ते ३१.१२.२००६ असा साजरा करणेत येणार होता. तसेच नववर्षानिमीत्त होणा-या गर्दीच्या वेळी ऐनवेळी प्रसाद भोजनाची अडचण होऊ नये म्हणून व सदरील संस्थेकडून जादा पुरवठा करणेची क्षमता असल्याने या अपंग महिला सहकारी संस्थेकडून भाजीपाला खरेदी करणेत आलेला आहे. त्यामुळे श्री साईभक्तांना प्रसाद भोजनाची कुठलीही अडचण झालेली नाही. श्री सिद्धी विनायक, अपंग महिला यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या मालाचा बिलाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | बिल क्र व दिनांक | तपशिल | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | ०४/१६.११.२००६ | बटाटा, कांदा व लसूण | रु. ४२,९८९.०० |
| ०२. | ए-५/२१.११.२००६ | बटाटा, कांदा व लसूण | रु. ६१,०८२.२५ |
| ०३. | ए-६/०५.१२.२००६ | बटाटा, कांदा व लसूण | रु. ५५,३९०.५० |
| ०४. | ए-७/२१.१२.२००६ | बटाटा, कांदा व लसूण | रु. ३५,६४२.५० |
| ०५. | ए-८/२८.१२.२००६ | बटाटा व लसूण | रु. ४०,७८१.०० |
| ०६. | ए-९/२९.१२.२००६ | कांदा व बटाटा | रु. २५,७७२.०० |
| ०७. | ए-१०/०३.०१.२००७ | बटाटा, कांदा व लसूण | रु. ४९,०४१.०० |
| ०८ | ए-११/१२.०१.२००७ | कांदा | रु. २८,५७२.०० |
| | | एकुण | रु. ३,३९,२७०.२५ |

तरी श्री सिद्धी विनायक, अपंग महिला औदयोगिक सहकारी संस्था मर्यादित, नाशिक यांचेकडून वेळोवेळी खरेदी करणेत आलेल्या भाजीपाल्याचे खरेदीस व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री सिद्धी विनायक, अपंग महिला औदयोगिक सहकारी संस्था मर्यादित, नाशिक ही संस्था भाजीपाल्याचे खरेदी विक्रीचा व्यवसाय करते किंवा कसे याबाबत शहानिशा करणेकामी मा.विश्वस्त पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची समिती नेमण्यात आली. या समितीने याबाबत सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा व त्यानंतर सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४२ संस्थान पुस्तके/फोटो, दैनंदिनी-दिनदर्शिका छपाईसाठी नवीन प्रेसधारकांची नांवी निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणे बाबत.**

**निर्णय क्र.१५४. (अ)** श्रीरंग प्रकाशन प्रा.लि., नाशिक यांनी त्यांचे दि.२८.०९.२००६ चे संदर्भिय पत्रासोबत त्यांचे प्रेसचे माहितीपत्रक सोबत पाठविले असून, त्यांच्या प्रेसचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत कळविले आहे.

श्रीरंग प्रकाशन प्रा.लि., नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या माहिती पत्रकानुसार खालील तपशिलाप्रमाणे माहिती सादर केली आहे.

१) प्रेसचे संपूर्ण नाव व पत्ता :- श्रीरंग प्रकाशन प्रा.लि., एम.जी. रोड, नाशिक -२

२) मालकाचे नाव व पत्ता :- श्रीमती विक्रमजी सारडा (संचालक)
ए-३८, नाईस, सातपूर नाशिक ७

३) रजिस्ट्रेशन व कालावधी :- सन १९७५ पासून

४) खाजगी मालकी किंवा कंपनी आहे त्यासंबंधी संपूर्ण माहिती :- प्रा.लि. कंपनी आहे.

५) इमारत मालकी/भाडोत्री क्षेत्रफळ :- इमारत स्वमालकीची आहे. एकूण क्षेत्रफळ ८००० स्के.फुट.

६) मशिनरीचा तपशिल :- अ) एका रंगात छपाई मशिन - २ नग
ब) दोन रंगी छपाई मशिन - २ नग
क) चार रंगात छपाई मशिन - १ नग
ड) परफेक्ट बायडींग - १ नग
इ) सेविंग मशिन - २ नग

७) पुस्तके/फोटोची छपाई केली जाते काय :- होय

८) कर्मचारी संख्या :- अ) कुशल कर्मचारी :- ०८
ब) अकुशल कर्मचारी :- १०
क) इतर कर्मचारी संख्या :- ५

९) स्वतःची डी.टी.पी व्यवस्था आहे काय व कोणकोणत्या भाषेत :- होय, हिंदी, मराठी, इंग्रजी, व गुजराथी भाषेत डी.टी.पी व्यवस्था आहे.

१०) संस्थानची कामे यापूर्वी केली आहे काय ? नाही

११) वार्षिक उलाढाल २००४-२००५ :- रुपये १२,४७,७५,४९५/-
१२) फोटो लॅमिनेशनची/बायडींगची व्यवस्था स्वतःची आहे काय ? होय.

**(ब)** साई सिक्युरिटी प्रिंटर्स् लि., बंगलोर यांनी त्यांचे दि.०४.०१.२००७ चे संदर्भिय पत्रासोबत त्यांचे प्रेसचे माहितीपत्रक सोबत पाठविले असून, त्यांच्या प्रेसचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत कळविले आहे

०१) प्रेसचे संपूर्ण नाव व पत्ता :- साई सिक्युरिटी प्रिंटर्स् लि., बंगलोर
०२) मालकाचे नाव व पत्ता :- मा. श्री. आर भास्करन, डायरेक्टर
प्लॉट नं.२५६, ४ था फेज, ८ वा क्रॉस, पिन्या इंडस्ट्रीयल एरिया, बंगलोर ५६० ०५८.
०३) रजिस्ट्रेशन व कालावधी :- सन २०.०३.१९९४ पासून
०४) खाजगी मालकी किंवा कंपनी आहे त्यासंबंधी संपूर्ण माहिती :- प्रा.लि. कंपनी आहे.
०५) इमारत मालकी/भाडोत्री क्षेत्रफळ :- इमारत स्वमालकीची आहे. एकूण क्षेत्रफळ ३०००० स्के.फुट.
०६) मशिनरीचा तपशिल :- अ) एका रंगात छपाई मशिन - ३ नग
ब) दोन रंगी छपाई मशिन - १ नग
क) चार रंगात छपाई मशिन - १ नग
ड) परफेक्ट बायडींग (स्टीचींग) - ९ नग
इ) सेविंग मशिन (पचिंग मशिन) - २ नग
०७) पुस्तके/फोटोची छपाई केली जाते काय :- होय
०८) कर्मचारी संख्या :- अ) कुशल कर्मचारी :- ९५
ब) अकुशल कर्मचारी :- १००
क) इतर कर्मचारी संख्या :- २५
०९) स्वतःची डी.टी.पी व्यवस्था आहे काय व कोणकोणत्या भाषेत :- होय, हिंदी, इंग्रजी, तेलगू भाषेत डी.टी.पी व्यवस्था आहे.
१०) संस्थानची कामे यापूर्वी केली आहे काय ? नाही
११) वार्षिक उलाढाल २००४-२००५ :- रुपये २१५००४७६१.३३
१२) फोटो लॅमिनेशनची/बायडींगची व्यवस्था स्वतःची आहे काय ? होय.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रकाशीत प्रकाशने विभागचे पुस्तके/फोटो/दैनंदिनी व दिनदर्शिकेचे उत्कृष्ट छपाईसाठी तसेच प्रकाशनांचा दर्जा सुधारणेसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार खालील १८ निवडक प्रेसधारकांची निवड करण्यात आली आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील विषय नं. २९ निर्णय क्र.६७८ नुसार नवीन ११ प्रेसधारकांचे निवडक प्रेसधारकांचे यादीत नावे समाविष्ट करण्यात आले असून, सध्या एकूण २९ निवडक प्रेसधारकांची यादी प्रकाशने विभागाकडे असून, उपरोक्त प्रेसधारकांकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रकाशने विभागाकडील पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन पाठवून छपाईचे काम करुन घेण्यात येत आहेत.

वरील तपशिलानुसार सध्या प्रकाशने विभागाकडून खालील निवडक प्रेसधारकांना छपाई कामाची कोटेशन पाठवून छपाई कामाची प्रतिपूर्ती केली जाते.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |
| १७ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १८ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १९ | सेफ ऑफसेट प्रायव्हेट लिमिटेड,मुंबई |

| | |
|---|---|
| २० | न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई |
| २१ | नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड,मुंबई |
| २२ | कल्याणी कार्पोरेशन ,पुणे |
| २३ | ओनस इम्प्रेशन,मुंबई |
| २४ | निर्मल ऑफसेट प्रा.लि.,नाशिक रोड. |
| २५ | दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| २६ | ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि. वडाळा,मुंबई |
| २७ | उचिता ग्राफिक प्रिटंर्स प्रा.लि., मुंबई |
| २८ | एस.व्ही.एंटरप्राईझेस् ,मुंबई |
| २९ | प्रेमियर प्रेस, सिकंदराबाद |

मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.१-३/४/२००१ चे सभेतील विषय नं.३७ निर्णय क्र.१४५ तसेच मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि.२९-३१/०३/२००४ चे सभेतील विषय नं. २६ निर्णय क्रमांक १३८ यात संस्थानची प्रकाशने छपाई कामी कोटेशन मागवितांना छपाई कर्त्यांची वार्षिक उलाढाल ही एक कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असावी अशी अट घालण्यात आली असून, तसेच खालील तपशिलाप्रमाणे प्रेसधारकाचे माहिपत्रकात प्रेसधारकाकडून परिपूर्णपणे पात्रता असलेस त्यांचे नांव निवडक प्रेसधारकांच्या यादीत घेण्यात आली आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे "अ" यात दर्शविले प्रमाणे श्रीरंग प्रकाशन प्रा.लि., नाशिक व "ब" यात दर्शविलेप्रमाणे साई सिक्युरिटी प्रिंटर्स् लि., बंगलोर यांनी त्यांचे संदर्भिय पत्रासोबत पाठविलेल्या माहिती पत्रकानुसार त्यांचेकडून परिपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने तसेच त्यांची वार्षिक उलाढाल ही एक कोटीपेक्षा जास्त असल्याने सदर दोन्ही प्रेसधारकांची नावे निवडक प्रेसधारक म्हणून निवड करणेविषयी निर्णय होऊन त्यांचे नांव संस्थानचे निवडक प्रेसधारक यादीत समाविष्ट करून घेणेस व त्यांचेकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रकाशने विभागाकडील पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन पाठवून छपाईचे काम करून घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४३ श्रीसाईपदनंदा सत्संग,बंगलोर द्वारा प्रकाशित श्रीसाईबाबांचे कन्नड भाषेतील पुस्तके संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५५.** सदरहू विषय तहकुब ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४४ त्रिमिती व्हिज्यूअल्स,मुंबई द्वारा थ्रि डी फोटोंचे कोटेशन बाबत..**

**निर्णय क्र.१५६.** त्रिमिती व्हिज्युअल्स् प्रा.लि., मुंबई यांनी दि.१९ सप्टेंबर २००६ चे कोटेशन पत्राव्दारा थ्रिडी फोटोंचे निर्मितीबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४५ श्रीसाईनाथ रुग्णालय व धर्मशाळा नं.०१ या दोन्ही ठिकाणी सोलर वॉटर हिटींग सिस्टम बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.१५७.** श्रीसाईनाथ रुग्णालयातील रुग्णांसाठी गरम पाण्याची आवश्यकता असते,त्यांची व्यवस्था करणेकरीता, श्री साईनाथ रुग्णालय सुरु असलेल्या धर्मशाळा इमारत नं.२ वरील छतावर सोलर सिस्टिम यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्यास रुग्णालयातील रुग्णांना त्याचा फायदा कमी खर्चात होऊ शकेल. सध्या पाणी गरम करणेकरीता, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गिझरशिवाय इतर काहीही सुविधा उपलब्ध नाही.

गरम पाण्याची आवश्यकता ही रुग्णांना स्पजिंग करणे, स्नान करणे इत्यादि तसेच ऑपरेशन थिएटरमधील हत्यारे, साहित्य स्वच्छ करणेकरीता गरम पाण्याचा वापर करण्यात येतो. याकरीता साधारणपणे एका दिवसासाठी ५००० लिटर पाण्याची आवश्यकता असते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१) | पेशंट (१०० कॉट ) | - | ०१८०० लि. |
| ०२) | नातेवाईक + स्टाफ | - | ००५०० लि. |
| ०३) | ऑटोक्लेव्ह मशिन्स् | - | ००८०० लि. |
| ०४) | स्टरलायझरस | - | ००२०० लि. |
| ०६) | हॉस्पिटल फ्लोअर क्लिनिंग व इतर | - | ०१००० लि. |
| ०७) | ऑपरेशन थिएटर | - | ००५०० लि. |
| ०८) | आयसीसीयु | - | ००२०० लि. |
| | एकुण लिटर | - | ०५००० लि. ( अंदाजे ) |

तरी श्री साईनाथ रुग्णालयासाठी साधारणपणे ५००० लिटर क्षमतेचे पाणी गरम होऊ शकेल, अशी योग्य क्षमतेची व चांगल्या कंपनीची सोलर सिस्टिम बसविणेस मंजूरी मिळावी, तसेच सदर सोलर सिस्टीमची बसवून मिळणेकामी श्री साईनाथ रुग्णालयाने कळविले आहे.

याचप्रमाणे धर्मशाळा क्र. ०१ मध्ये साधारणतः १००० भक्तांसाठी १००० x १५ लि. प्रमाणे १५००० लिटर गरम पाण्याची आवश्यकता आहे. म्हणजे श्री साईनाथ रुग्णालयासाठी ५००० लि. +

धर्मशाळा क्र.०१ साठी १५००० लि. याप्रमाणे एकुण २०,००० लिटर्स क्षमतेची सोलर वॉटर सिस्टिम बसवावी लागणार आहे.

जर सोलर सिस्टिमचा (अपारंपारीक उर्जेचा ) वापर केला तर वीजबीलात बचत होऊन शाश्वत गरम पाणीही मिळू शकेल. सध्याच्या काळात सर्व ठिकाणी वीज भारनियमन चालू आहे. भविष्यात वीज कपातीचे संकटही येऊ शकते. त्याकरीता ही सोलर सिस्टिम बसविली तर पर्यावरणाचे, वीजबचतीचे दृष्टीने ध्येय साध्य होऊ शकेल.

उपरोक्त २०००० लिटर्सच्या सोलर सिस्टिमसाठी साधारणतः प्रती लिटर रू.१२५.०० प्रमाणे रुपये २५,००,०००.००/ इतका खर्च येऊ शकेल. हा खर्च साधारणतः दोन वर्षाच्या गरम पाण्यासाठी लागणा-या वीजबील आकाराइतका असून प्रकल्पासाठी लागणारा खर्च दोन वर्षातच भरुन निघू शकतो. यासाठी मेडा,पुणे यांचेकडे विचारणा केली असता, सोलर सिस्टिमचे कामी महाऊर्जामार्फत सौर उष्णजल सयंत्र बसविण्यासाठी प्रति लि. रुपये ७.०० + १२.५ सर्व्हिस टॅक्स या दराने सेवाशुल्क आकारुन सयंत्र बसविण्यासाठी निविदा मसूदा तयार करणे, सयंत्र बसवत असताना मटेरीअल चेक करणे, सयंत्र आस्थापीत केल्यानंतर पाहणी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, इत्यादी सेवा पुरविल्या जातात. संयत्रासाठी निविदा मागविणे व उत्पादकाला कार्यादेश देवून रक्कम आदा करण्याबाबतची कार्यवाही संस्थानला करावी लागतात. मा.व्यवस्थापन समितीत प्रस्ताव मान्य झाल्यानंतर मेडा यांचेकडून टेंडर डॉक्युमेट तयार करून घेऊन नंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर बोलवावे लागतील.

या प्रकल्पासाठी अंदाजे एकुण खर्च रु.२५,००,०००.०० + रू. १,५७,५००.०० (महाउर्जा सेवाशुल्क) = रु. २६,५७,५००.०० इतका अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.४६** **साठवण तलावावरील वॉटर पंप करीता व मशिनरीकरीता अॅडीशनल व स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविणेसाठी व स्वतंत्र ११ के.व्ही. लाईन टाकणेसाठी आलेल्या जादा खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.१५८.** साठवण तलावावरील वॉटर पंप व मशिनरी करीता अॅडीशनल व स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविणेबाबत व स्वतंत्र ११ के.व्ही. लाईन टाकणेकामी रु. ०५,८०,५९०.०० इतक्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४-०२-२००६ चे सभेतील विषय क्र. २९ निर्णय क्र.२९ अन्वये मान्यता मिळालेली होती.

मा. सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राहाता यांनी पत्र क्र. ए.ई./जीएडी/टेक/ आरएचटी/३७१६ दि. १५-०७-२००६ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार कमी दर दिलेले मे.विजय इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांना जा.क्र.एसएसएस / विद्युत / ९८८३ /२००६ दिनांकः-२५-०७-२००६अन्वये रू. ०५,०४,८५४.०० चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सदर काम पूर्ण होताना व ही स्वतंत्र ११ के.व्ही.लाईन ओढताना अनेक ठिकाणी शेतक-यांच्या शेतबांधाचे विरोधामुळे व एन.ए.प्लॉट च्या अडचणीमुळे लाईनचे काम थांबले होते. त्यावेळी लाईन लवकरात लवकर चालू व्हावी म्हणून यामधून मार्ग काढण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने शेतकऱ्यांशी चर्चा करून दाखविलेल्या मार्गावरून लाईन टाकून लाईनचे काम पूर्ण करण्यात आले होते. ही लाईन व सबस्टेशन दिनांक ३०-११-२००६ रोजी चालू करण्यात आलले आहे.

आता मे. विजय इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांनी केलेल्या कामाचे फायनल बील रु. ५,६८,०९१.०० इतक्या रक्कमेचे बील सादर केलेले आहे. या बीलासोबत त्यांनी एक पत्र सादर केले असून, संस्थान जा.क्र. एसएसएस / विद्युत / ९८८३ / २००६ दिनांक २५-०७-२००६ अन्वये रु. ०५,०४,८५४.०० ( रु.पाच लाख चार हजार आठशेचोपन्न मात्र ) इतक्या रकमेचा आपल्या कनकुरी पाणीपुरवठा साठवण तलावासाठी स्वतंत्र ११ के.व्ही.लाईन शिर्डी फिडरवरुन ओढण्याचे कामासाठी कार्यादेश मिळाला होता. सदर काम पूर्ण होताना व ही स्वतंत्र ११ के.व्ही.लाईन ओढताना अनेक ठिकाणी शेतक-यांच्या शेतबांधाचे विरोधामुळे व एन.ए.प्लॉट च्या अडचणीमुळे आणि संस्थानच्या वॉटर सप्लायच्या अधिका-यांनी काम चालू असताना वेळोवेळी व वेगवेगळ्या दिलेल्या सूचनेनुसार लाईन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या इस्टीमेटनुसार न होता, लांबून झाली आहे. तरी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या इस्टिमेटपेक्षा वाढीव खर्च रु. ६३,२३७.०० ( रु. त्रेसष्ट हजार दोनशे सदतीस मात्र) इतका झालेला असून कृपया वाढीव खर्चाची रक्कम मिळावी, ही विनंती. असे नमूद केले आहे.

कार्यादेशातील अटीनुसार मा. सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, राहाता यांनी हे बील तपासून बीलावर, रक्कम आदा करण्यास शिफारस करण्यासाठी स्वाक्षरी केली आहे. बील तपासून बीलाची दुरुस्त केलेली रक्कम रु. ५,५९,६२३.०० इतकी होते. व वाढीव रक्कम रु. ५,५९,६२३.००-रु.०५,०४,८५४.००=रु.५४,७६९.०० इतकी होते. मे. विजय इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांना ही वाढीव रक्कम रु.५४,७६९.०० धरुन होणाऱ्या रुपये ५,५९,६२३.०० इतक्या

रकमेचे बील आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.४७ सिक्युरिटी सिस्टमसाठी टी.व्ही.खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.१५९.** श्रीसाईबाबांची चारही मंदीरे व मंदीर परीसरात सिक्युरीटी सिस्टीमसाठी व्हीडीओ रेकॉर्डींगचे एकूण - २७ कॅमेरे बसविलेले आहेत, त्यांचे दृष्य संरक्षण कार्यालयात दिसणेसाठी खालीलप्रमाणे टी.व्ही. बसविलेले आहेत.

| अ.नं. | तपशील | टी.व्ही. संख्या |
|---|---|---|
| ०१ | १६ कॅमेऱ्यांवरील व उर्वरीत ११ कॅमेऱ्यांवरील एकानंतर एक दृष्य दिसणेसाठी | ०२ टी.व्ही. |
| ०२ | मंदीर परीसरात प्रवेश करण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी चारही गेटवर बसविण्यात आलेल्या चार कॅमेऱ्यांचे दृष्य नियमित दिसणेसाठी | ०४ टी.व्ही. |
| ०३ | द्वारकामाई मंदिरातील दृष्य दिसणेसाठी | ०१ टी.व्ही. |
| ०४ | याशिवाय सिक्युरिटी सिस्टीम व्यतिरिक्त स्वतंत्र यंत्रणेद्वारे चारही मंदिरात ०४ कॅमेरे बसविलेले आहेत, त्यांचे एकानंतर एक दृष्य दिसणेसाठी | ०१ टी.व्ही. |
| | **एकूण** | **०८ टी.व्ही.** |

वरीलप्रमाणे एकूण ०८ टी.व्ही. संरक्षण कार्यालयात नियमीत चालू आहेत.

याशिवाय समाधी मंदीराच्या वरच्या रुममध्ये संरक्षण कार्यालयाने नवीन नियंत्रण कक्ष तयार करुन तेथे वायरलेस यंत्रणा कार्यान्वित केली आहे तेथेच नवीन नियंत्रण कक्षात वर वर्णन केलेल्या २७ कॅमेऱ्यांचे व मंदीरांचे दृष्य दिसावे यासाठी ०८ टी.व्हीं.ची मागणी केली आहे. वरील संवेदनशील ठिकाणांच्या हालचालीवर नवीन नियंत्रण कक्षातील संरक्षण विभागाचा कर्मचारी लक्ष ठेवू शकेल असे संरक्षण अधिकारी यांनी टिपणीद्वारे म्हटले आहे.

नवीन भक्तनिवासस्थान विभागात तेथील व्हीआयपी व नॉन ए.सी. अशा एकूण ०५ ब्लॉकमध्ये भक्तांच्या मनोरंजनासाठी १४ इंची ०५ ब्लॅक अॅन्ड व्हाईट टी.व्ही. सन १९९९ पासून ठेवलेले आहेत त्याऐवजी रंगीत टी.व्ही. मिळावेत अशी त्यांची मागणी आहे. सदर टी.व्हीं. ना रिमोट नसल्याने भक्तांना स्वतः उठून टी.व्ही. च्या पॅनल स्वीचवरुन चॅनल व चित्राची क्वालिटी बदलावी लागते, त्यामुळे टी.व्हीं. चे स्वीच लवकर खराब होतात. हल्ली हे टी.व्ही. शक्यतो कोणी वापरत नाही त्यामुळे तेथे नवीन रंगीत टी.व्ही. ठेवणे आवश्यक आहे.

वरील दोन्ही विभागांच्या मागणीप्रमाणे एकूण १३ टी.व्ही. खरेदी करणे आवश्यक आहे. ध्वनिक्षेपण-सी.सी.टी.व्ही. विभागात आवश्यक तेवढे २१ इंची टी.व्ही. शिल्लक नाहीत. चालू असलेले टी.व्ही. बंद पडल्यास त्या ठिकाणी बदलण्यासाठी फक्त ०२ टी.व्ही. शिल्लक आहेत.
श्री साईबाबा हॉस्पिटलकडून रुग्णांच्या डीलक्स व ए.सी. रुम मध्ये एकूण १७ नग सोनी कंपनीचे फ्लॅट २१" टी.व्ही. मॉडेल नंबर KVHM२१M८० किंवा त्याचा नवीन नंबर KVSW२१२M८० या टी.व्हीं. ची मागणी केली होती, त्यास दिनांक २५/११/२००६ रोजीच्या मा.व्य.समितीचे सभेत खरेदी विभागामार्फत कोटेशन पध्दतीने टी.व्ही. खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे.

तरी रुग्णालयाकरीता खरेदी करण्यात येणाऱ्या दराप्रमाणे त्याच कंपनी व त्याच मॉडेल नंबरचे १३ नग टी.व्ही. प्रती नग १२,०००/- रुपये प्रमाणे खरेदी करण्यास व त्यासाठी येणारे रुपये १,५६,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यानी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे सिक्युरिटी सिस्टमसाठी आवश्यक असणारे १३ नग फ्लॅट टी.व्ही. कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५६,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**विषय नं.४८ नविन प्रसादालय इमारतीत ऑडिओ, व्हीडीओ सिस्टम बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.१६०.** नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम चालू असून सदर काम सुमारे ३ ते ४ महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी जनरल व व्हीआयपी हॉलमध्ये साईभक्तांना प्रसाद घेताना, तसेच जेवणाच्या प्रतीक्षा लाईनमध्ये असलेल्या भक्तांना प्रसादालयातून देण्यात येणाऱ्या योग्य त्या सूचना, याशिवाय मंदीर परीसरातील साईमंत्र, आरत्या ऐकू याव्यात याकरीता साऊंड सिस्टीम तसेच भक्तांना जेवण करताना श्री साईंच्या मंदीरांचे थेट दर्शन टी.व्ही. च्या स्क्रीनवर व्हावे यासाठी व्हीडीओ सिस्टीम अशी ऑडीओ व्हीडीओ सिस्टीमची उभारणी करावयाची आहे. यासाठी मुंबई येथील कुटेक (Cutech) कन्सल्टींग इंजिनिअर्स प्रा. लि. चे डायरेक्टर साईभक्त श्री एम. पी. कारडोझ यांना दि. १४/०१/२००७ रोजी समक्ष बोलावून प्रत्यक्ष साईड दाखविली आहे, त्यानुसार त्यांनी ऑडीओ व्हीडीओ सिस्टीमचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन देण्याचे मान्य केलेले आहे. या कामासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक त्यांनी ईमेलद्वारे पाठविले आहे. संपूर्ण प्रस्ताव व टेंडर नोटीस ते तयार करुन देणार आहेत. सदर काम एक साईभक्त म्हणून ते करुन देणार आहेत, त्यासाठी संस्थानकडून मोबदला घेणार नाहीत असे त्यांनी सांगितले आहे.
०१) व्हीडीओ सिस्टीमकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | नग | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| १. | प्रसाद भोजनाचे हॉलमध्ये व प्रतीक्षा लाईन (क्यू) मध्ये ५५" प्लाझमा Hitachi कंपनीचे टी.व्ही. | ०८ | ३०,००,०००/- |
| २. | सन्माननीय अतिथींसाठीच्या प्रसाद भोजनाच्या एकूण ०४ हॉलमध्ये ३२" L.C.D. प्लाझमा टाईप Hitachi किंवा व्हीडीओकॉन कंपनीचे टी.व्ही. | ०८ | ८,००,०००/- |
| ३. | टी.व्ही. साठी केबल (RG५९ + RGB) | अंदाजे २००० मिटर | ३,५०,०००/- |
| | | एकूण | ४१,५०,०००/- |

**०२)ऑडीओ सिस्टीमकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**

| अ.नं. | तपशील | नग | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| १. | बुस्टर ॲम्प्लीफायर्स २५० वॅट | ०४ | ६०,०००/- |
| २. | स्पीकर ५० वॅट | ०६ | २१,०००/- |
| ३. | स्पीकर ४ वॅट कॉलम | २० | २४,०००/- |
| ४. | स्पीकर वायरींग | २००० मीटर | १,०५,०००/- |
| ५. | मल्टीमिडीया स्विचर | ०१ | ४०,०००/- |
| ६. | रॅक ४२U | ०२ | ८६,०००/- |
| ७. | Miscellaneous | -- | २५,०००/- |
| ८. | अंदाजे खर्च ऑडीओ व्हीडीओसाठी ४५,११,००० वर ५% | -- | २,२५,५५०/- |
| ९. | फायबर ऑप्टीक केबल युनिट फायबर टू आर.एफ. सिग्नल | ०१ | १,००,०००/- |
| १०. | फायबर ऑप्टीक केबल नोड, टर्मिनेशन इ. | ०३ | |
| ११. | क्लोज सर्कीट कॅमेरे व यंत्रणा(कामावर नियंत्रण ठेवणेसाठी) | -- | २,००,०००/- |
| | | एकूण | ७,८६,५५०/- |

**<u>एकूण (अंदाजित) खर्च -</u>**

व्हीडीओ सिस्टीमकरीता रुपये - ४१,५०,०००/-

ऑडीओ सिस्टीमकरीता रुपये - ७,८६,५५०/-

**एकूण ४९,३६,५५०/-**

उपरोक्तप्रमाणे, नवीन प्रसादालय इमारतीचे ठिकाणी ऑडीओ-व्हीडीओ सिस्टीम उभारणी करणेसाठी साईभक्त व Director श्री एम.पी. कारडोझ, कुटेक कन्सल्टींग इंजिनिअर्स प्रा.लि, मुंबई मो.नंबर ९१-९३२२३३८६०१ यांनी दिलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे रुपये पूर्णांकित ५०,००,०००/- (पन्नास लाख मात्र) एवढा खर्च अपेक्षित आहे. वर्तमानपत्रात जाहीरात देऊन, टेंडर मागणी करुन सदर काम करुन घेता येईल.

तरी नवीन प्रसादालय इमारतीचे ठिकाणी ऑडीओ व्हीडीओ यंत्रणा उभारणी करणेस व त्यासाठी येणारे रुपये ५०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन प्रसादालय इमारतीचे ठिकाणी तूर्त ऑडीओ यंत्रणा उभारणी करणेस व याकामी रक्कम रुपये १० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**विषय नं.४९ प्रसादालयातील चपात्या(पोळी)प्रसाद लाडू/बर्फी व अन्न पाकिटे (नाष्टा पाकिटे)तयार करणेसाठी ठेकेदाराचे नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.१६१.** **(०१)** प्रसादालयात प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांसाठी चांगल्या प्रतीच्या चपात्या (स्वामी नारायण पोळी) मिळाव्यात. म्हणून सन १९९९ पासून चपात्या बनविण्याचे काम टेंडर पध्दतीने देण्यात येत आहे. सन २००६-०७ साठी चपाती (आटा+मैदा) बनविण्याचे कंत्राट श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, साळंगपुर यांना रु.३८०/- प्रति क्विंटल दराने देणेत आलेले आहे. यामध्ये त्यांचेकडील कामगारांना निवास, दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामुल्य देण्यात येत आहे. सदर टेंडरची मुदत दि.३१/०३/२००७ रोजी संपत आहे.

**(०२)** श्रीसाईभक्तांना संस्थानतर्फे मोतीचूर प्रसादलाडूची प्रति पाकिट रु.१०/- (तीन नग) या सवलतीचे दराने विक्री करण्यात येते. सदर प्रसाद लाडू बनविण्याचे काम टेंडर पध्दतीने देण्यात आलेले आहे. सन २००६-२००७ साठी प्रसाद लाडू बनविण्याचे कंत्राट श्री माधव गंगाराम नाईकवाडी रा. अंदरसुल यांना रु.११०/- प्रति हजारी दराने देण्यात आलेले आहे.यामध्ये त्यांचेकडील कामगारांना दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामुल्य देण्यात येत आहे. मात्र त्यांचेकडून ३ उत्सवांचे व ३ श्रमपरिहार भोजनाचे मिष्टान्न मोफत बनवून घेण्यात येतात. तसेच प्रसाद भोजन व नाष्टा पाकीटामध्ये गोड पदार्थ म्हणून बर्फी देण्यात येते. सदर बर्फी बनविण्याचे काम हे सुध्दा लाडू कंत्राटदार श्री माधव गंगाराम नाईकवाडी यांनाच रु.१.३०/- प्रति किलो (साखर) या दराने दिलेले असून त्याचीही मुदत दि.३१/०३/२००७ रोजी संपत आहे. सदरचे कामगारांना निवासासाठी साईउद्यान इमारतीमधील २ खोल्या देण्यात आलेल्या आहेत. मात्र कंत्राटदाराकडून प्रचलित दराने सेवा आकार वसूल करण्यात येतो.

**(०३)** साईभक्तांना संस्थानतर्फे नाष्टयाकरीता सकाळी ७.०० ते १०.०० यावेळेत नाष्टा पाकिटे रु.३.०० या सवलतीचे दरात विक्री करण्यात येतात. सदर नाष्टा पाकीटात ५ पु-या, सुकी भाजी व गोड पदार्थ म्हणून

बर्फी देण्यात येते. नाष्टापाकीट बनविणेचे काम सौ.रोहिणी राजेंद्र कोते व्दारा श्री साईबाबा समाज विकास संस्था, शिरडी यांना रु.००/५० पैसे प्रति पाकीटास मजुरी या दराने देण्यात आलेले असून त्यांची मुदत दि.३१/०३/२००७ अखेर संपत आहे. याकामी लावलेल्या कामगारांना एक वेळ चहा व एक वेळ भोजन विनामुल्य देण्यात येते.

उपरोक्त तीनही ठेकेदार विनातक्रार व जबाबदारीने कामे करीत असून त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांचे ठेकेदारीची मुदत दि. ३१/०३/०७ अखेर संपुष्टात येत आहे.

दि. ०१/०४/२००७ पासून पुढील १ वर्षे कालावधीसाठी मुदत वाढ मिळावी या कारणासाठी त्यांनी लेखी अर्ज सादर केलेले आहेत. तसेच कामगारांचे रोजंदारीचे दर वाढलेले असल्याने त्यांनी खालीलप्रमाणे दर वाढवून मिळावा अशी मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | सध्याचा दर | मागणी केलेला/ सुधारीत दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी , चपाती ठेकेदार | रु. ३८०/- प्रति क्विंटल | ४५०/- प्रति क्विं. | सर्व्हीस टॅक्स भरणे झाल्यास तो संस्थानने भरावा. |
| २) | श्री माधव गंगाराम नाईकवाडी, मोतीचूर लाडू व बर्फी ठेकेदार | मोतीचूर लाडू दर रु.११०/- प्रति हजारी<br>बर्फी दररु.१.३०/- प्रति किलो (साखर) | रु. १२५/- प्रति हजारी<br>रु.१.३०/- प्रति किलो.(साखर) | सर्व्हीस टॅक्स भरणे झाल्यास तो संस्थानने भरावा. |
| ३) | सौ.रोहीणी राजेंद्र कोते व्दारा, श्रीसाईबाबा समाज विकास संस्था, शिरडी, अन्नपाकीटे ठेकेदार | रु.००.५० पैसे प्रति पाकीटास | रु. ००.६० पैसे प्रति पाकीटास | सर्व्हीस टॅक्स भरणे झाल्यास तो संस्थानने भरावा. |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तीनही ठेकेदारांना सध्याचे दरात १०% अधिक सर्व्हीस टॅक्स अशी दरवाढ करुन दि.१.४.२००७ पासून पुढे एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. मात्र श्री.नाईकवाडी यांनी बर्फी तयार करण्याचे कामाचे दरात दरवाढ मागीतलेली नसल्याने ती देण्यात येऊ नये असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग/कॅंटीन विभागप्रमुख)

**विषय नं.५०** **मौजे पांढूर्ली येथील देणगी मिळालेल्या जागेत पाणी व लाईट व्यवस्था करणेस येणारे खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१६२.** मौजे पांढुर्ली ता.सिन्नर येथील गट नं. ४९ क्षेत्र ४९ आर (४९०० चौ.मि.) हे सौ.सिंधुबाई विजयराव दळवी पो.पांढुर्ली ता.सिन्नर यांनी देणगी दिलेल्या जागेमध्ये श्री साईंच्या पदयांत्रीसाठी पालखी थांबा वास्तु उभारणी प्रस्तावित आहे. त्यासाठी त्याठिकाणी लवकरच बांधकाम सुरू करावयाचे असल्याने सदर ठिकाणी पाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

त्यासाठी दिनांक १९/०१/२००७ रोजी समक्ष पाहणी केली असता तेथे बोअरवेल किंवा विहीर घेवून पाण्याची व्यवस्था करता येईल. त्यामुळे जमिनीतील पाणी स्पॉट पाहणारे व्यक्तीस समक्ष घेवून गेलो असता त्यांनी बोअरवेल/विहीर घेण्याचे स्पॉट दाखविले आहे. तसेच तेथे शेजारी नाला व कॅनॉल असल्याने बोअरवेल पेक्षा विहीरीस पाण्याचा स्त्रोत जास्त राहील असे नम्र मत आहे. त्याचप्रमाणे तेथे बोअरवेल किंवा विहीर घेतल्यास पाणी उपसा करण्यासाठी इलेक्ट्रिक मोटारची व्यवस्था करावी लागेल. त्याकरीता शेजारील प्लॉट मधून गेलेले वीज कनेक्शन वरून वाढीव कनेक्शन घेवून इलेक्ट्रिक कनेक्शन करावे लागेल. त्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे नियमाप्रमाणे कोटेशन रक्कत व इतर चार्जेस हे सर्व आपणास भरावे लागणार आहे.

वरील कामी अंदाजे खालील तक्त्याप्रमाणे खर्च येईल.

**<u>०१. बोअरवेल करीता -</u>**

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | बोअरवेल घेणे - ३५० फुट. | रुपये १५,०००/- |
| ०२ | इलेक्ट्रिक कनेक्शन - २ पोल कोटेशन | रुपये ३०,०००/- |
| ०३ | इलेक्ट्रिक मोटार व पाईप. | रुपये १७,०००/- |
| ०४ | थ्री फेज इलेक्ट्रिक कनेक्शन कोटेशन | रुपये २०,०००/- |
| ०५ | पिटर मशिन खरेदी (लाईट नसल्यास पर्यायी व्यवस्था) | रुपये २०,०००/- |
| | एकुण अंदाजे खर्च - | रुपये १,०२,०००/- |

**<u>०२. विहीरीकरीता -</u>**

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | विहीर खोदाई - अंदाजे ४० फुट. | रुपये ५०,०००/- |
| ०२. | विहीर बांधकाम (कडे टाकणे) | रुपये ३०,०००/- |
| ०३ | इलेक्ट्रिक कनेक्शन - २ पोल कोटेशन | रुपये ३०,०००/- |
| ०४ | इलेक्ट्रिक मोटार व पाईप. | रुपये १७,०००/- |
| ०५ | थ्री फेज इलेक्ट्रिक कनेक्शन कोटेशन | रुपये २०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ०६ | पिटर मशिन खरेदी (लाईट नसल्यास पर्यायी व्यवस्था) | रुपये २०,०००/- |
| | एकुण अंदाजे खर्च - | रुपये १,६७,०००/- |

तथापी बोअरवेल ऐवजी विहीर घेतल्यास खर्च वाढीव येत असला तरी पाण्याचा स्त्रोत हा कायमस्वरुपी राहण्याची शाश्वती आहे. त्यामुळे तेथे विहिर घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,६७,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.५१ फुटलेल्या सिटेंक्स टाक्या विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६३.** पाणी पुरवठा विभागाकडे असलेल्या खालीलप्रमाणे सिन्टेक्स टाक्या हया बरेच वर्षे वापरल्यामुळे फूटलेल्या असल्याने निरुपयोगी झालेल्या असल्याने त्यांची जाहिर लिलावाने विक्री करणेस व सदरच्या सिंटेक्स टाक्या पाणीपुरवठा विभागाचे डेडस्टॉकमधून कमी करणेस मान्यता देण्यात आली

| अ.नं | संगणक कोड नंबर | ॲसेट टाईप | डेडस्टॉक रजि. पान. | अ.नं. | सिन्टेक्स टाकी क्षमता | नग | मुळ किंमत | खरेदी तारीख | उपयोगाचा कालावधी | घसारा वजा जाता किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | PWT-५००२ | TANK | ९२ | ७१ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०२ | PWT-५००२ | TANK | ९२ | ७२ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| 03 | **PWT-५००२** | TANK | ९३ | ७३ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०४ | PWT-५००२ | TANK | ९३ | ७४ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०५ | PWT-५००२ | TANK | ९३ | ७५ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०६ | PWT-५००२ | TANK | ९३ | ७६ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०७ | PWT-५००२ | TANK | ९३ | ७७ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०८ | PWT-५००२ | TANK | ९३ | ७८ | १००० लिटर्स | ०१ | ३३००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | १२५६.०० |
| ०९ | PWT-५००४ | TANK | ८५ | २९ | २००० लिटर्स | ०१ | ६६००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | २५१२.०० |
| १० | PWT-५००४ | TANK | ८५ | ३० | २००० लिटर्स | ०१ | ६६००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | २५१२.०० |
| ११ | PWT-५००४ | TANK | ८६ | ३१ | २००० लिटर्स | ०१ | ६६००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | २५१२.०० |
| १२ | PWT-५००४ | TANK | ८६ | ३२ | २००० लिटर्स | ०१ | ६६००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | २५१२.०० |
| १३ | PWT-५००४ | TANK | ८६ | ३३ | २००० लिटर्स | ०१ | ६६००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | २५१२.०० |
| १४ | PWT-५००१ | TANK | ८१ | ०१ | ५००० लिटर्स | ०१ | १६,५००=०० | २/११/१९९८ | ८ वर्षे २ महिने | ४९२०.०० |

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.५२ श्रीरामनवमी उत्सव-२००७ मध्ये समाधी मंदिरावर हेलीकॅप्टरने पुष्पवृष्टी करणे बाबत**

**निर्णय क्र.१६४.** सालाबादप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव श्री साईबाबा संस्थान,विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने साजरा करण्यात येतो. चालू वर्षी दिनांक २६.३.२००७ ते दिनांक २८.३.२००७ अखेर तीन दिवस श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे

ओ.एस.एस अेव्हीअेशन प्रा.लि.भोपाळ यांनी दिनांक १० जानेवारी,२००७ चे विनंती पत्राने श्रीरामनवमी उत्सव कालावधीत उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक २७.३.२००७ रोजी हेलिकॅप्टरमधून श्रींचे समाधी मंदिर व सभोवतालच्या परिसरात पुष्पवृष्टी करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सन २००६मध्ये व्यवस्थापन समितीचे दिनांक ४.२.२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र.९६ अन्वये अशा प्रकारची परवानगी देण्यात आली होती. सन २००६ मधील उत्सवकाळात दिनांक ७.४.२००६ रोजी माध्यान्ह आरतीनंतर पुष्पवृष्टी करण्यात आली होती.

यंदाचे वर्षी सोमवार दिनांक २६.३.२००७ ते बुधवार दिनांक २८.३.२००७ अखेर तीन दिवस रामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे मुख्य दिवशी मंगळवार २७.३.२००७ रोजी पुष्पवृष्टी करणेस व संरक्षणाकरीता शिर्डी पोलिस स्टेशन मार्फत यावर नियंत्रण ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**विषय नं.५३ लिलावाने विक्री करण्यात आलेली वाहने डेडस्टॉकमधून कमी करणे बाबत.**

**निर्णय क्र.१६५.** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार व शासन मान्यते नुसार खलील प्रमाणे वाहन विभागाकडील जुन्यावाहनांचा जाहीर लिलाव दि.१७/०९/२००६ रोजी संस्थानच्या विहीत कार्यपध्दतीनुसार करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | संगणक कोड नं. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | खरेदी दिनांक | डेडस्टॉक किंमत |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | VEH-६०१६ | एमएच-१७/एच-७०१ | ॲम्बेसॅडर कार २०००क्लासिक DSL; AC आसन क्षमता ४+१ | २४/०५/२००० | ४,५९,०००.०० |
| | TAP-८०६ | | टेप (पायोनियर कं.) | | १०,०००.०० |
| ०२ | VEH-६००३ | एमएच-१७/सी-३५३६ | टाटा सुमो SE; Non AC आसन क्षमता ९+१ | १३/०१/१९९७ | ३,६८,१५५.०० |
| | TAP-८०२ | | टेप (कार टेप) | | ४,२००.०० |
| ०३ | VEH-६००७ | एमएच-१७/सी-६७६९ | टाटा४०७ शववाहिनी | ३१/१२/१९९७ | ४,९९,८६६.०० |
| ०४ | VEH-६००८ | एमएच-१७/सी-७०७८ | बजाज मिनीडोर मालवाहतुक | २८/१२/१९९८ | १,४०,०००.०० |
| ०५ | VEH-६००८ | एमएच-१७/सी-७०७९ | बजाज मिनीडोर मालवाहतुक | २८/१२/१९९८ | १,४०,०००.०० |
| ०६ | VEH-४०३ | एमएच-१७/सी-५१०० | ४०७टेम्पो कचरावाहतुक | ०६/०६/१९९६ | ३,३६,७५५.०० |
| ०७ | VEH-५०८ | एमएच-१७/एफ-३४३५ | सुपर ट्रेलर | १२/०७/१९८५ | २७,५००.०० |
| ०८ | VEH-५०६ | एमएच-१७/एफ-३४३४ | बोस्टील ट्रेलर | २३/०५/१९८५ | २७,५००.०० |
| | एकूण रक्कम | | | | २०,१२,९७६.०० |

वरील वहाने खालील प्रमाणे व्यक्तींनी खरेदी केलेल्या आहेत.

| अ.नं. | लिलाव घेणाऱ्या व्यापाऱ्याचे नांव | लिलावात घेतलेले वाहन | | लिलाव ३ वार रक्कम (रू) | व्हॅटसह (१२.५%) एकूण रक्कम जमा | ले.शा.पा.नं. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. दिलीप हरीभाऊ पवार, पुणे. | ॲम्बेसॅडोर कार | एमएच-१७/ एच-७०१ | १,२१,०००.०० | १,३६,१२५.०० | १५७०८/१६६० डी.डी. |
| ०२ | श्री. सोमाथ शिवाजी भोसले, शिरडी. | टाटा सुमो | एमएच-१७/ सी-३५३६ | १,२२,०००.०० | १,३७,२५०.०० | १५६९८ / १५७०९ |
| ०३ | श्री. दिनेश सिताराम कदम. अहमदनगर | टाटा४०७ शववाहिनी | एमएच-१७/ सी-६७६९ | १,५२,०००.०० | १७१,०००.०० | १५६९५ / १५७०५ |
| ०४ | श्री. अकबरखा सांडेखॉ पठान, कोपरगांव. | बजाज मिनीडोर | एमएच-१७/ सी-७०७८ | ५०,०००.०० | ५६,२५०.०० | १५७२५/१५७८६/ १५७८७ |
| ०५ | श्री. दत्तु शंकर गायकवाड रांजनगांव दे. | बजाज मिनीडोर | एमएच-१७/ सी-७०७९ | ५७,०००.०० | ६४,१२५.०० | १५६९६ / १५७०६ |
| ०६ | श्री. शिवाजी काशीनाथ शेरकर. पुणतांबा. | टाटा४०७ कचरावाहिनी | एमएच-१७/ सी-५१०० | १,३६,०००.०० | १,५३,०००.०० | १५७४५ |
| ०७ | श्री. दादासो.भाऊसो. कोते., शिरडी. | सुपर ट्रेलर | एमएच-१७/ एफ-३४३५ | ३६,०००.०० | ४०,५००.०० | १५६९७ / १५७०४ |
| ०८ | श्री. भाऊसो. जगन्नाथ सालपुरे, पिंपळवाडी. | बोस्टील ट्रेलर | एमएच-१७/ एफ-३४३४ | ३७,०००.०० | ४१,६२५.०० | १५७०१ |
| | | | एकूण रक्कम | ७,११,०००.०० | ७,९९,८७५.०० | |

तरी वरील प्रमाणे लिलाव झालेली ०८ वाहने डेडस्टॉक मधुन कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.५४** **माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तंत्रज्ञ या पदावर करण्यात आलेल्या मानधन तत्वावरील तात्पूरत्या स्वरुपाच्या नेमणूकीस मुदतवाढ मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१६६.** **(अ)**मा.व्यवस्थापन समितीचे ०४ फेब्रुवारी, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१ अन्वये, ई-टेम्पल अंतर्गत कार्यालयाचे आर्थिक व्यवहारासंबंधी कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी, आयआयएमव्ही, पुणे यांचेकडून तयार करण्यात आलेल्या संगणक आज्ञावलींमध्ये, भविष्यात वेळोवेळी अपरिहार्यपणे कराव्या लागणाऱ्या बदलांसाठी (Adjustments), व्यवस्थापनाच्या बदलत्या व वाढत्या गरजांनुसार आवश्यक ते फेरफार (Modifications) करणेसाठी व विस्तारासाठी (Enhancement) सदरील आज्ञावलींची दुरुस्ती-देखभाल करणेकामी, श्री. प्रसाद नारायण जोशी यांची तात्पुरत्या स्वरुपात "तंत्रज्ञ" म्हणून एकत्रितरित्या रुपये ८,०००/- मात्र या मानधनावर दिनांक ०१ मार्च, २००६ पासून पुढील एक वर्षासाठी नेमणूक करण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे. या निर्णयानुसार प्रशासन शाखा आदेश क्र. ७५२ दिनांक २२ मार्च, २००६ नुसार श्री. जोशी यांची घ्तंत्रज्ञङ म्हणून तात्पुरते स्वरुपात नेमणूक करण्यात आलेली आहे. श्री. जोशी यांची तात्पुरते नेमणूकीची मुदत दिनांक२८ फेब्रुवारी,२००७ अखेर संपत आहेत.
**(ब)** उपरोक्त निर्णयांस अनुसरुन, श्री. जोशी हे घ्तंत्रज्ञङ म्हणून माहिती तंत्रज्ञान विभागात काम करत आहेत. सध्या ते पगारबिल संगणक कार्यप्रणाली, आवक विभागाचे सॉफ्टवेअर, काऊंटर्सवरील इतर सर्व संगणक कार्यप्रणालीत आवश्यकतेनुसार अनुषंगिक फेरफार व बदल करणे, त्यांचा विस्तार करणे इत्यादी कामे चांगल्याप्रकारे सांभाळीत आहेत. त्यांनी संस्थान कर्मचाऱ्यांचे परिपूर्ण पगार बीलाची संगणक कार्यप्रणाली पूर्ण केली असून, सध्या या संगणक प्रणालीवरच संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांचे पगारबिले तयार करण्यात येत आहेत.

कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विविध संगणक आज्ञावलींमध्ये, भविष्यात कराव्या लागणाऱ्या बदलांसाठी (Adjustments), गरजेनुसार आवश्यक ते फेरफार (Modifications) करणेसाठी व आज्ञावलींच्या विस्तारासाठी (Enhancement) तसेच संगणकीय जाळ्याची देखभाल दुरुस्तीसाठी (Network Maintainance) आपणांस या क्षेत्रातील अनुभवी तंत्रज्ञाची अत्यंत आवश्यकता आहे. सध्या आपणाकडे या क्षेत्रातील परिपूर्ण असे तंत्रज्ञ उपलब्ध नाहीत. श्री. जोशी हे सध्या त्यांचेवर सोपविण्यांत आलेले कामकाज अत्यंत चांगल्याप्रकारे सांभाळीत आहेत. त्यांच्या कामाची गुणवत्ता व संस्थानला असलेली आवश्यकता याचा विचार करुन त्यांना पूर्वी देत असलेले रुपये ८,०००/- मासिक मानधनामध्ये रुपये १,०००/- वाढ करुन पुढील एक वर्षासाठी रुपये ९,०००/- प्रतिमहा एकत्रित मानधन देवून, त्यांना तात्पुरत्या स्वरुपाच्या नेमणुकीस पुढील एक वर्षासाठी मुदत वाढ देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

श्री.जोशी यांची मुदत दिनांक ०१ मार्च, २००७ पासून पूढे एक वर्षासाठी वाढविणेस व त्यांच्या मासिक मानधनात रुपये १,०००/- वाढ करुन त्यांना प्रतिमहा एकत्रित रुपये ९,०००/- (अक्षरी रुपये नऊ हजार ) या मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात "तंत्रज्ञ" म्हणून नेमणूक देणेकामी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५५** **नवीन प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी व संगणकीय सुविध उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.१६७.** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, **Siemens Hipath ४३००IP** ही अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून माहे ऑगस्ट, २००४ मध्ये खरेदी करुन, कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या अत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान या ठिकाणी तीन एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या तिन्ही एक्सचेंजमध्ये एकूण १६ Analog कार्डस् बसविण्यात आले आहेत. या १६ Analog कार्डस्व्दारे एकूण ३८४ अंतर्गत दूरध्वनी विविध विभागांना संदेशवहनासाठी देण्यात आलेले आहेत.

श्रीसाईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत नुकतेच श्री साईबाबा हॉस्पिटल (Super Speciality Hospital) सुरु करण्यात आले असून, या ठिकाणी ९६ अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर श्री साईभक्तांच्या निवासासाठी व्दारावती या भक्तनिवास इमारतीचे काम चालू आहे. तसेच श्रीसाईभक्तांची भोजनाची व्यवस्था होणेसाठी अत्याधुनिक नविन प्रसादालय इमारतीचे कामकाज सुरु असून, ते अंतिम टप्प्यात आहे. या प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी व संगणकीकरण सेवा- सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागणार आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

**अ) <u>अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था-</u>** नविन प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी या इमारतीचे स्वतंत्र कक्षामध्ये सिमेन्स कंपनीच्या अद्ययावत दूरध्वनी यंत्रणेतील एक स्वतंत्र इ.पी.ए.बी.एक्स. बसवून, त्या इ.पी.ए.बी.एक्स. पासून नविन प्रसादालयाच्या विविध कार्यालयांत अंतर्गत दूरध्वनी देण्याचे नियोजन आहे.

सदर ठिकाणी अंतर्गत दूरध्वनी कार्यान्वीत करण्यासाठी खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| Sr.No. | Configuration | Qty. | Total Price |
|---|---|---|---|
| 01. | **Siemens Hipath** AP 3300 IP ready Distributated Access Point equipped with conference, MOH & Standard Features with support for Networking on Fibre. | 01 | 8,00,000.00 (कर अतिरिक्त ) |
| | **a)** 08 P & T Lines | 01 | |
| | **b)** 24 Digital Extensions | 01 | |
| | **c)** 24 Analog Extensions | 04 | |
| | **d)** Battery Back up for this site Sealed maintanance free (SMF) batteries. | 01 | |
| | **e)** MDF (Crone type) 200 x 200 | 01 | |
| | **Total** | | **8,00,000.00** (कर अतिरिक्त ) |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे नविन प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी साहित्य खरेदी करावे लागणार असून, यासाठी अंदाजे रुपये ८,००,०००/- (कर अतिरिक्त ) चा खर्च अपेक्षित आहे. सदरील साहित्य नामांकित कंपन्यांकडून खरेदी करता येतील.

**ब) <u>संगणकीय सुविधा</u> -** नविन प्रसादालय इमारतीमध्ये प्रसादालय कार्यालय, तिकीट बुकींग काऊंटर, देणगी काऊंटर, स्टोअर, किचन रुम, व्हीआयपी इत्यादी ठिकाणची कामे संगणकाव्दारे करण्यात येणार

आहे. सदर ठिकाणी संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| Sr.N. | Configuration | Qty. | Total Price |
|---|---|---|---|
| 01. | 22 U Rack (floor mount Rack) | 01 Nos. | 22,000.00 |
| 02. | LIU 24 port | 02 Nos. | 8,000.00 |
| 03. | Fiber Patch cord | 02 Nos. | 9,600.00 |
| 04. | Outdoor 12 Core Fiber Cable | 1200 trs. | 2,34,000.00 |
| 05. | HDPE Pipe | 1200 trs. | 55,200.00 |
| 06. | Optical Fibre Connectors | 24 Nos. | 28,800.00 |
| 07. | Optical Fibre Couplers | 24 Nos. | 8,400.00 |
| 08. | Switches -One layer3 & One layer2 | 02 Nos. | 2,30,000.00 |
| 09. | UPS ३ 1.5 KVA ३APC | 01 Nos. | 25,000.00 |
| 10. | Labour Charges | | 75,000.00 |
| | | | 6,56,400.00<br>(कर अतिरिक्त ) |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे नविन प्रसादालय इमारतीमध्ये संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी साहित्य खरेदी करावे लागणार असून, यासाठी अंदाजे रुपये ६,५६,४००/-(कर अतिरिक्त ) चा खर्च अपेक्षित आहे. सदरील साहित्य नामांकित कंपन्यांकडून दरपत्रके मागवून विहित पध्दतीने खरेदी करता येतील.

उपरोक्त परिच्छेद अ व ब नुसार नविन प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी व संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी येणारे एकत्रित अंदाजे रुपये १४,५७,०००/- (कर अतिरिक्त ) च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.५६** **आंतराष्ट्रीय मंदिर परिषद २००७ (Temple Summit)शिर्डी येथे भरविणे बाबत**

**निर्णय क्र.१६८.** देश विदेशातील देवस्थानांना एका मंचावर आणून, एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण करणे, पर्यटनाला चालना देणे, देवस्थान कमिटीच्या व्यवस्थापनाविषयीची एकमेकांमध्ये देवाण-घेवाण करणे, अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन भक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देणे, देवस्थानाच्या कार्यपध्दती व व्यवस्थापनामध्ये अधिकाधिक सुधारणा करणे, देवस्थान व भक्तांच्या सुरक्षिततेविषयी केलेल्या उपाय योजनांची इतर देवस्थानांना माहिती देणे, देणगी व इतर मार्गाने निधी उभा करण्याची साधणे शोधून त्याचे काटेकोर व्यवस्थापन करणे, सर्वधर्मसमभाव जागृत करणे इ. मुख्य हेतूने प्रेरित होऊन, आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे. या देवस्थान परिषदेची मागील वर्षीची परिषद श्री सिध्दीविनायक टेम्पल, मुंबई यांनी आयोजित करुन विविध एजन्सीज्च्या मदतीने यशस्वीपणे पार पाडली आहे. या वर्षीची मंदिर परिषद शिर्डी येथे भरविणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ ऑगस्ट, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६९४ नुसार ठरले आहे. सदर परिषद यशस्वीपणे पार पाडणेसाठी खालीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

**(अ)** आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद शिर्डी येथे एप्रिल, २००७ मध्ये भरविणेकामी साधारणपणे दोन ते तीन दिवस परिषदेचा कालावधी असावा, असे मंदिर परिषद भरविणेचे नियोजन करणाऱ्या प्रतिनिधींनी कळविले आहे. पहिल्या दोन दिवसांत परिषदेसाठी आलेल्या विविध मंदिरांच्या प्रतिनिधींनी आपापल्या मंदिरांची माहिती (Presentation) सादर करणे तसेच दुसऱ्या दिवशी एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण (Group Discussion) व तिसऱ्या दिवशी शिर्डी परिसरातील पर्यटन स्थळे / मंदिरे यांना भेटी देणे असे नियोजन राहणार आहे. मंदिर परिषदेच्या पहिल्या दोन रात्री सहभागीर्थीच्या मनोरंजनासाठी विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावेत. परिषदेच्या कालावधीसाठी एप्रिल महिन्यातील तीन दिवसांच्या तारखा निश्चित करणे आवश्यक आहे.

**(ब)** मुंबई येथे जानेवारी, २००६ मध्ये आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद भरविणेसाठी श्री सिध्दीविनायक देवस्थान मुंबई यांनी ज्या विविध एजन्सींची मदत घेतली होती. त्या एजन्सींच्या प्रतिनिधींना या क्षेत्रातील पुरेसा अनुभव असल्याने, त्यांना आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद शिर्डी येथे भरविणेसाठी विविध मंदिरांना निमंत्रण देणे, त्याचा पाठपुरावा करणे, वेळोवेळी कार्यक्रमांची माहिती देणे, त्यांच्याशी सतत संपर्कात राहणे, शिर्डी येथील परिषदेचे नियोजन करुन त्यासाठी सहकार्य करणे आदि. कामांसाठी त्यांची मदत घ्यावी लागणार असून, त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना मानधन द्यावे लागणार आहे.

| अ.नं. | प्रतिनिधीचे नाव व कंपनी | कालावधी (साधारण) | मानधन रक्कम (प्रतिमहा) |
|---|---|---|---|
| ०१ | अशिष वेंगुर्लेकर,कॅटलेसेस मिडीया सिस्टीम, मुंबई | ३ महिने | २५,०००/- |
| ०२. | श्रीराम पेडणेकर<br>कॅटलेसेस मिडीया सिस्टीम, मुंबई | ३ महिने | २५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | सौ. मनिषा जोशी | ३ महिने | २०,०००/- |

या सर्वांचा एकत्रितरित्या समन्वय ठेवून परिषद भरविणेबाबतची बहुतेक सर्व जबाबदारी श्री. अशोक नाडकर्णी, मुंबई यांच्यावर सोपवावी लागणार आहे. श्री. नाडकर्णी यांनी श्री सिध्दीविनायक देवस्थानच्या वतीने भरविलेल्या सन-२००६ च्या पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उत्कृष्ट नियोजन करुन सदर परिषद यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यामुळे त्यांना मंदिर परिषद भरविणेबाबत ज्ञान / अनुभव असल्याने, त्यांना या कामासाठी एकत्रित रुपये एक लाख मानधन द्यावे, असे मत आहे.

श्री. सिध्दीविनायक देवस्थान, मुंबई यांनी भरविलेली परिषदेस श्री. गिरीष कुलकर्णी **(Invents Media & Comm. Pvt. Ltd. Pune)** यांनीही मदत केलेली असून, शिर्डी येथील परिषदेस मदत करणेसाठी त्याचा मोबदला म्हणून त्यांनी रुपये तीन ते पाच लाख मानधन मागितले आहे. त्यांनी मागितलेले मानधन हे जास्त आहे. शिर्डी येथे भरविण्यात येणाऱ्या परिषदेची जबाबदारी श्री. अशोक नाडकर्णी हे घेत असल्याने, श्री गिरीष कुलकर्णी यांना कोणत्याही प्रकारचे मानधन न देता श्री. अशोक नाडकर्णी यांच्यावरच ही जबाबदारी टाकावी, असे मत आहे.

उपरोक्त **परिच्छेद अ** प्रमाणे शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद भरविणेच्या माहे एप्रिल, २००७ मधील तारखा निश्चित करणेस तसेच **परिच्छेद ब** प्रमाणे प्रतिनिधींची नेमणूक करुन, त्यांचे मानधनास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद दिनाक २८ व २९ एप्रिल, २००७ रोजी घेण्यात यावी, असे ठरले. मुंबई येथे जानेवारी- २००६ मध्ये आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद भरविणेसाठी काम पाहिलेले श्री. अशोक नाडकर्णी व त्यांच्या प्रतिनिधींनी श्री. सिध्दीविनायक देवस्थान, मुंबई येथे परिषद घेऊन ती यशस्वी पार पाडली असल्याने त्यांना व्यवस्थापन समिती समोर शिर्डी येथे २००७ ची व्दितीय आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद भरविणेसाठी कशी तयारी करण्यात आहे त्यावर साधारण किती खर्च अपेक्षित आहे व त्यांच्या प्रतिनिधींचे /त्यांचे मानधन किती द्यावयाचे आहे याबाबतीत त्यांचेशी सविस्तर चर्चा करुन प्रोजेक्ट वर प्रात्यक्षित सादर करण्यात सांगितले. त्याप्रमाणे श्री.अशोक नाडकर्णी यांच्या सोबत आलेल्या सौ.मनिषा जोशी यांनी शिर्डी येथील परिषदेची करण्यात येणाऱ्या तयारीच्या नियोजनाबाबत, जागेबाबत व परिषदेसाठी येणाऱ्या अंदाजे खर्च तसेच स्पॉन्सरशिप मधून मिळणाऱ्या उत्पादनाबाबत सविस्तर प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्याचप्रमाणे श्री. गिरीष कुलकर्णी यांचे उपस्थित प्रतिनिधींचे मानधन जास्त असल्याने त्यांचा प्रस्ताव नाकारुन श्री. अशोक नाडकर्णी यांचे प्रस्तावास पुढीलप्रमाणे तत्त्वत: मान्यता देण्यात आली.

०१. श्री. अशोक नाडकर्णी यांनी दाखविलेला अंदाजित खर्च रु. २५,००,०००/- (अक्षरी रु. पंचविस लाख मात्र) यास मान्यता देण्यात आली.

०२. श्री. अशोक नाडकर्णी यांनी सदर परिषदेसाठी काही स्पॉन्सर मिळाले तर ते संस्थानचे मान्यतेने घेण्यात यावेत. त्याचप्रमाणे हे स्पॉन्सर मिळविणेसाठी काही खर्च अगर रक्कम लागल्यास मा.कार्यकारी अधिकारी यांच्या संमतीने देण्यात यावी. तसेच परिषदेचे सोव्हीनिअर काढण्यात यावे, त्यासाठी जाहिराती मिळविण्याचा प्रयत्न करावा. जाहिरातदारांना व स्पॉन्सर्सनां परिषदेमध्ये काही वेळ देण्यात यावा. जाहिरात मिळविणेकामी योग्य ते कमिशन मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने संबंधितांना देण्यात यावे.

०३. श्री. अशोक नाडकर्णी व त्यांचे प्रतिनिधींचे मानधन पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावे.

अ) श्री. अशोक नाडकर्णी यांनी परिषद भरविणेसाठी व त्याबाबत संपूर्ण जबाबदारी घेण्याबाबत त्यांना एकूण एकत्रित मानधन रु.१,००,०००/- (रु.एक लाख मात्र) व रु.३,०००/- संदेश देवाण-घेवाणसाठी येणाऱ्या खर्चासाठी मान्यता देण्यात आली.

ब) सौ. मनिषा जोशी यांना रु.२०,०००/- प्रतिमहा मानधन व रु.१,०००/- प्रतिमहा संदेश देवाण-घेवाणकामी येणाऱ्या खर्च असे तीन ते चार महिन्यासाठी तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

क) श्री. आशिष वेंगुर्लेकर यांना रु.२५,०००/- प्रतिमहा मानधन व रु.१,०००/- प्रतिमहा संदेश देवाण-घेवाणकामी येणाऱ्या खर्च असे तीन ते चार महिन्यासाठी तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

ड) श्री. श्रीराम पेडणेकर यांना रु.२५,०००/- प्रतिमहा मानधन व रु.१,०००/- प्रतिमहा संदेश देवाण-घेवाणकामी येणाऱ्या खर्च असे तीन ते चार महिन्यासाठी तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

०४. आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद उपस्थित राहणाऱ्या मंदिराच्या प्रतिनिधींना निवासस्थानाची सोय नविन भक्तनिवासस्थान येथे करावयाची असल्याने तेथील आवश्यक त्या खोल्यांची डाकडूजी , बांधकाम विभागाने त्वरीत करावी, त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

०५. आंतरराष्ट्रीय मंदिर परिषदेसाठी उपस्थित राहणाऱ्या मंदिराच्या प्रतिनिधींना उत्तम नाष्टा व जेवणाची सोय प्रसादालय विभागामार्फत करण्यात यावी, असे ठरले.

०६. आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद भरविण्याचे नियोजनाचे बहुतेक कामकाज संस्थानच्या मुंबई कार्यालयातून चालणार असल्याने श्री अशोक नाडकर्णी व त्यांच्या प्रतिनिधींना आवश्यकते प्रमाणे दयावा लागणारा खर्च मुंबई कार्यालयातून देण्यात यावा, असे ठरले.

०७. आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद भरविणेसाठी कामकाजाचे वाटप मा.कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित प्रशासकीय अधिकारी व विभाग प्रमुख यांना करुन द्यावे.

०८. आंतरराष्ट्रीय मंदिर परिषदेची जागा नवीन प्रसादालय येथे तळमजल्यावर घेण्यासाठी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी सूचविले, त्याप्रमाणे त्यास मान्यता देण्यात आली.

०९. आंतरराष्ट्रीय मंदिर परिषदेचे निमंत्रण पाठविताना जगभरातील मोठया साईमंदिरांच्या प्रतिनिधींना पाचारण करण्यात प्राधान्य देण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.५७** **श्रीमती वर्षा धुरी, इंडियन टेलिनेंट सर्व्हीस मुंबई यांचे स्टॉल देणेकामी परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१६९.** सदरहू विषय तहकूब करण्यात आला.

**विषय नं.५८** **महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी संघ,मुंबई व महात्मा फुले कृषी विद्यपीठ, राहूरी यांना दिलेल्या जागेस मुदत वाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.१७०.** १) संस्थानने खालील तपशिलाप्रमाणे जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता वापरांसाठी दिलेले आहेत.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी दरमहा फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त निवासस्थान गाळा क्रमांक ०१ | महाराष्ट्र राज्य हातमाग सह. महासंघ मर्यादिंत मुंबई | दरमहा रुपये ५५०/- | हातमाग उत्पादित कापड विक्रीसाठी | ०६-०३-२००६ ते ०५-०२-२००७ |
| ०२ | साईबाबा भक्त निवासस्थान गाळा क्रमांक ११ | महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी. | दरमहा रुपये ५५०/- | माहिती केंद्र चालविणे कामी | २५-०३-२००६ ते २४-०२-२००७ |

२) उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित,मुंबई यांची दिनांक ०५-०२-२००७ रोजी मुदत संपत असल्याने पुढील ११ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत त्यांचा प्रस्ताव इकडील कार्यालयास दि. १३/०१/२००७ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी "०५/०२/२००७ अखेर मुदत संपत असल्याने करारनाम्याचे नुतनीकरण दिनांक ०६/०२/२००७ पासून दि ०५/०१/२००८ अखेर ११ महिन्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी विनंती केलेली आहे यापूर्वी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित,मुंबई खालील दर्शविलेप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे.

१) दिनांक ०६/०८/२००१ ते दिनांक ०५/०७/२००२ अखेर
२) दिनांक ०६/०७/२००२ ते दिनांक ०५/०६/२००३ अखेर
३) दिनांक ०६/०६/२००३ ते दिनांक ०५/०५/२००४ अखेर
४) दिनांक ०६/०५/२००४ ते दिनांक ०५/०४/२००५ अखेर
५) दिनांक ०६/०४/२००५ ते दिनांक ०५/०३/२००६ अखेर
६) दिनांक ०६/०३/२००६ ते दिनांक ०५/०२/२००७ अखेर

३) त्याचप्रमाणे महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहूरी यांची दि. २४/०२/२००७ रोजी मुदत संपत असल्याने पुढील ११ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत त्यांचा प्रस्ताव इकडील कार्यालयास दिनांक ०९/०१/२००७ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी सदरहू केंद्रांच्या गाळयास दि २५/०२/२००७ ते दि. २४/०१/२००८ या ११ महिन्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी विंनती त्यांनी केलेली आहे यापूर्वी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी खालील दर्शविलेप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे.

१) दिनांक २५/०८/२००१ ते दिनांक २४/०७/२००२ अखेर
२) दिनांक २५/०७/२००२ ते दिनांक २४/०६/२००३ अखेर
३) दिनांक २५/०६/२००३ ते दिनांक २४/०५/२००४ अखेर
४) दिनांक २५/०५/२००४ ते दिनांक २४/०४/२००५ अखेर
५) दिनांक २५/०४/२००५ ते दिनांक २४/०३/२००६ अखेर
६) दिनांक २५/०३/२००६ ते दिनांक २४/०२/२००७ अखेर

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता तसेच संस्थेचे स्वरुप (महाराष्ट्र शासन पुरस्कृत व्यवसाय/विद्यापीठ ) लक्षात घेता जागा वापरास दिलेली आहे. लिव्ह ॲड लायसन्स तत्वावर गाळयास मुदतवाढ देता येईल. दोन्हीही संस्थाचे मागील लायसेन्स फी रुपये ५५०/- मध्ये १० % वाढ करून म्हणजे रक्कम प्रत्येकी रुपये ६०५/- मात्र ठरविता येईल तरी.

४) महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई, कॅम्प शिरडी यांना ०६/०२/२००७ पासून ११ महिने व महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहूरी यांना दि.२५/०२/२००७ पासनू पुढील ११ महिने कालावधी करिता पूर्वीचेच अटी व शर्तीस आसरून व मासिक परवाना प्रत्येकी रक्कम रुपये ६०५/- मात्र आकारून व तसेच प्रत्येकी मिटर रिडीग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲड लायसेसी तत्वावर गाळयास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५९** **मानधन/फिक्स वेतनावरील पाल्यांच्या शैक्षणिक फी परताव्या बाबत**

**निर्णय क्र.१७१.** गत मा.विश्वस्त मंडळाचे निर्णय व प्रचलित पध्दत यास अनुसरुन संस्थान कर्मचा-यांना त्यांचे सन २००५-२००६ या शैक्षणिक फी परताव्याकामी संस्थानच्या १०३५ कायम कर्मचा-यांपैकी ज्यांची मुले शिक्षण घेत आहेत, अशा कर्मचा-यांनी ३१८ पाल्यांच्या शैक्षणिक फी परताव्याची मागणी केलेली होती. त्यापैकी नियमानुसार २७७ पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा रु.५,५४,११८/- (रु.पाच लाख,चोपन्न हजार एकशे अठरा मात्र) अदा केलेला असुन देय न होणारे ४१ अपात्र अर्ज दप्तरी ठेवणेत आलेले आहेत.

आता सन २००६-२००७ चा शैक्षणिक शुल्काचा परतावा प्रचलित पध्दतीने (शासकीय दरानुसार) २६१ कर्मचा-यांना रु.६,४०,३७५/- (सहा लाख,चाळीस हजार,तीनशे पंच्याहत्तर मात्र) फी परतावा अदा करण्यात आलेला आहे.

सन २००६-२००७ मध्ये नियत (फिक्स) वेतनावर (रुग्णालये व इतर विभाग ) साधारण १२०० नविन कर्मचा-यांच्या नेमणुका झालेल्या आहेत. त्यांच्या नेमणुक आदेशात संस्थान नियमाप्रमाणे देय होणारे सर्व फायदे लागु राहातील. असे नमुद केलेले आहे.

१०३५ कायम कर्मचा-यांपैकी सन २००५-२००६ मध्ये २७७ कर्मचा-यांना रु.५,५४,११८/- (रु.पाच लाख,चोपन्न हजार एकशे अठरा मात्र) व सन २००६-२००७ मधील मंजुर बजेट रक्कम रुपये १२,१०,०००/- पैकी २६१ कर्मचा-यांना रु.६,४०,३७५/- (सहा लाख,चाळीस हजार,तीनशे पंच्याहत्तर.) शैक्षणिक फीचा परतावा देण्यात आलेला आहे.

पुर्वीचे १०३५ कायम कर्मचा-यांचा वरीलप्रमाणे फी परतावा विचारात घेता श्री साईबाबा रुग्णालय व इतर नव्याने नेमणूक केलेल्या सुमारे १२०० कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फीचा परतावा करणेकामी अंदाजे रु.७,५०,०००/- (रु.सात लाख पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.६०** **श्रीरेणूकादेवी संस्थान श्रीक्षेत्र माहूर गड प.ट्र.नं.२१८५ (नांदेड) या देवी संस्थानच्या विकासात्मक कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१७२.** विश्वस्त,श्री रेणूकादेवी संस्थान माहूर,ता.माहुर जिल्हा-नांदेड यांनी त्यांचे दि.०४/०१/२००७ चे पत्रान्वये," रेणूकादेवी संस्थान हे महाराष्ट्रातील साडे तीन शक्तीपीठा पैकी एक मुळ पीठ आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील राज्यातुन लाखोंचे संख्येने भाविक श्री दर्शना करीता या ठिकाणी येतात. संस्थानच्या वतीने भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून भाविकांच्या व्यवस्थेकरीता विकासात्मक कामे करण्याचा मंदीर प्रशासनाचा प्रयत्न चालु आहे. मुख्य मंदिर हे सहयाद्री पर्वताच्या टेकडीवर असून मराठवाडया मागासलेल्या विभागात असल्यामुळे सरकार कडून आजपर्यंत विकासात्मक कामांना कोणताही निधी उपलब्ध झालेला नाही.

श्री रेणूकादेवी संस्थान माहूरच्या वतीने भाविकांच्या मुलभूत गरजा पुरविण्याच्या उद्देशाने विकासात्मक आराखडा तयार करुन भाविकांसाठी प्रतिक्षालय,पाकगृह,अभिषेक सभागृह,कठडे (बॅरीकेस्ट) पिण्याचे पाणी, सुलभ सौच्छालय,इत्यादी सोई उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने किमान एक कोटी चार लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

करीता आपणांस विनंती करण्यात येते की, श्री रेणूकादेवी संस्थान माहूर यांना आर्थिक मदत म्हणून एक कोटी चार लाख रुपये अनुदान रुपात मंजुर करुन श्री रेणूकादेवी संस्थानला सर्वतोपरी सहकार्य करुन सहानूभूती दाखवावी ही अपेक्षा,असे कळविलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरेणूकादेवी संस्थान श्रीक्षेत्र माहूर गड प.ट्र.नं.२१८५ (नांदेड) यांना भाविकांच्या मुलभुत गरजा पुरविण्यासाठी रुपये ५०,००,०००/-(अक्षरी रुपये पन्नास लाख मात्र) मंजूर करण्यात यावे. श्रीरेणूकादेवी संस्थान श्रीक्षेत्र माहूर गड यांचेकडून विकास कामाचा प्रकल्प अहवाल मागविण्यात यावा. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.६१** **श्रीमहालक्ष्मी देवस्थान कोल्हापूर यांना विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१७३.** अध्यक्ष, देवस्थान व्यवस्थापन समिती,कोल्हापूर, यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या संदर्भीय पत्रामध्ये " महाराष्ट्राची कुलस्वामिनी व असंख्य भक्तांचे श्रध्दास्थान असलेली कोल्हापूरची महालक्ष्मी देवस्थान हे प्राचीन व ऐतिहासिक दृष्टया महत्व असलेले शक्तीपीठ आहे. या देवीस महाराष्ट्रातून तसेच बहुसंख्य राज्यातुन व परदेशी पर्यटकांचीही गर्दी वाढू लागली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आपण कोल्हापूर दौ-यात असतांना मंदिरास भेट देऊन विविध प्रकल्पाचे उद्घाटन केलेले आहे. नुकतेच श्री साईबाबा संस्थानने विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडून श्री तुळजाभवानी देवस्थान तुळजापूर व श्री विठ्ठल रुख्मिणी देवस्थान पंढरपूर या देवस्थानांना भरीव आर्थिक मदत दिलेली आहे. त्या अनुषंगाने श्री

महालक्ष्मी देवस्थानच्या वतीने खालील कामे पुर्ण करणेस श्री साईबाबा संस्थानकडुन आर्थिक मदत मिळणेस विनंती केलेली आहे.

१) भक्तांचे ऊन पावसापासुन संरक्षण होणेसाठी क्यु रोलींग- रु.१,२५,०००/-

२) नैवद्य घराचे नुतनीकरण -रु.६,५०,०००/-

३) देवालय आवारात फ्लोरींग करणे -रु.३५,००,०००/-

४) प्रसाद केंद्राचे नुतनीकरण - रु.३,००,०००/-

५) अन्नछत्र इमारत - रु.२०,००,०००/-

६) वॉटर प्रुफिंग - रु.५,००,०००/-

७) भक्तांना निवासस्थान बांधने - रु.२,००,००,०००/-

८) सोलर वॉटर प्लॅन्ट बसविणे - रु. १०२.३७५/- लाख. एकुण खर्च रुपये -३,७३,१२,५००/- असुन देवस्थानचे उत्पन्न अत्यल्प आहे याकरिता वरील सर्व कामासाठी श्री साईबाबा संस्थान शिर्डी या न्यासाकडुन सुमारे ३ कोटीची आर्थिक मदत मिळाणेसाठी शिफारस करणेची विनंती केलेली आहे.

कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग मुंबई यांनी त्यांचे दि.१५/०६/२००६ चे पत्रामध्ये (१) अध्यक्ष देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापुर यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेले दि.२६०४/०६ चे पत्र व (२) श्री सुनिल केदार,विधान सभा सदस्य सावनेर यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेले दि.२९/०३/२००६ चे पत्र. अशा दोन पत्रांच्या प्रती आपणाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहेत. सदर पत्रातील विषयासंबधीच्या कार्यवाहीबाबत आपला अहवाल तात्काळ शासनास सादर करण्यात यावा, अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमहालक्ष्मी देवस्थान कोल्हापूर यांना भाविकांच्या मुलभुत गरजा पुरविण्यासाठी रुपये ५०,००,०००/-(अक्षरी रुपये पन्नास लाख. मंजूर करण्यात यावे. श्रीमहालक्ष्मी देवस्थान कोल्हापूर यांचेकडून विकास कामाचा प्रकल्प अहवाल मागविण्यात यावा. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.६२** **आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मदत व पुनर्वसन पूर्व तयारीसाठी लागणारी साधनसामुग्री खरेदीसाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.१७४.** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अहमदनगर यांनी दि.२४/०१/२००७ चे पत्रान्वये "माहे ऑगस्ट २००६ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठया प्रमाणावर पूरपरिस्थिती निर्माण झाली होती या पुरामुळे राज्यात मोठया प्रमाणावर जिवीत व वित्तीय हानी झाली पूराच्या या आपत्तीचा फटका अहमदनगर जिल्हयालाही मोठया प्रमाणावर बसला. जिल्हयातील कोपरगांव, श्रीरामपूर संगमनेर राहाता, राहूरी, नेवासा, शेवगांव, श्रीगोंदा या तालुक्यांमध्यै पूराचे पाणी लोकवस्तीत घुसल्यामुळे मोठया प्रमाणावर मदत व पुनर्वसन कार्य राबविले गेले जिल्हा प्रशासनाने स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा वापर करुन तसेच या कामासाठी लष्कराला पाचारण करुन लोकांना लष्कराच्या बोटीद्वारे व हेलिकॅप्टरद्वारे सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापना अधिनियम २००५ अन्वये जिल्हयात विविध नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीचा सामना करण्यासाठी करावयाचे पूर्वनियोजन करणे महत्वाचे असल्याने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. अहमदनगर जिल्हयात पुर, भुकंप, वादळ, आग, रस्ते व रेल्वे अपघात, औद्योगीक अपघात या सारख्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती उद्‌भवु शकतात. आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रामुख्याने आपत्ती येण्यापूर्वी करावयाची कार्यवाही आपत्ती दरम्यान बाधीत व्यक्तींसाठी शोध व बचाव कार्य आणि मदत व पुनर्वसनाची कार्यवाही या तीन टप्प्यांमध्ये कार्यवाही करण्यात येते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये जिल्हयातील विविध यंत्रणाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ व साधनसामग्रीचा वापरामध्ये योग्य समन्वय ठेवून आपत्ती नियोजन करण्यात येते.

आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्हयात जिल्हास्तरावर ३६ जणांचे व तालुकास्तरावर प्रत्येकी १५ जणांचा समावेश असलेल्या शोध व बचाव पथक स्थापण्यात आलेले आहे. सदर पथकातील सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आलले आहे. सदर पथकातील सदस्यांना सानधसामग्री उपलब्ध करुन दिल्यास शोध व बचाव कार्य प्रभाविपणे पार पाडता येईल व आपत्ती उद्‌भवल्यास जिवीत व वित्तीय हानी कमी करणेकामी सदर पथकांचा उपयोग होईल.

जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या साधनसामग्री व्यतीरीक्त आपत्ती व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे साधनसामग्रीची आवश्यकता आहे. हे सर्व साहित्य श्री साईबाबा संस्थानमार्फत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणास उपलब्ध करुन दिल्यास आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडता येईल.

| अ.नं. | वस्तुचे नांव | अंदाजे किंमत (प्रती नग रुपये) | आवश्यक नग | एकूण किंमत पये |
|---|---|---|---|---|
| १ | लाईफ जॅकेट | १५००/- | १०० | १,५०,०००/- |
| २ | लाईफ बोया (जिवनरक्षक रींग) | ३५००/- | ३० | १,०५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | फायबर बोट (ऑन बोर्ड मशीन) | ४०००००/- | ७ | २८,००,०००/- |
| ४ | गॅस कटर्स | ३१००/- | १० | ३१,०००/- |
| ५ | तंबु | ८६४०/- | २० | १,७२,८००/- |
| ६ | पोर्टेबल जनरेटर्स २५०० W | ७००००/- | २ | १,४०,०००/- |
| ७ | स्ट्रेचर | २५००/- | १० | २५,०००/- |
| ८ | सर्च लाईट | ३०००/- | १० | ३०,०००/- |
| ९ | सेफ्टी हेल्मेट | १३००/- | ५० | ६५,०००/- |
| १० | गम बुट्स | १०००/- | ५० | ५०,०००/- |
| ११ | फायर इक्टींग्वीशर | ३०००/- | १५ | ४५,०००/- |
| १२ | हेड पूली (सिंगल) | ७००/- | १० | ७,०००/- |
| १३ | हेड पूली (डबल) | १०००/- | १० | १०,०००/- |
| १४ | वायर रोप (२० फुट) | ७००/- | १० | ७,०००/- |
| १५ | नायलॉन रोप (४०० मिटर) | २०००/- | १० | २०,०००/- |
| १६ | मनिला रोप (४०० मिठर) | ४०००/- | १० | ४०,०००/- |
| १७ | रीफलेक्टीव जॅकेट | ७०००/- | ५० | ३५,०००/- |
| १८ | साधनसामग्री वाहतूक वाहन | ७०००००/- | १ | ७,००,०००/- |
| १९ | ॲम्बुलन्स | ५०००००/- | १ | ५,००,०००/- |
| २० | टॉर्च | ५००/- | २० | १०,०००/- |
| एकुण-रुपये एकोण पन्नास लाख बेचाळीस हजार आठशे मात्र. | | | | ४९,४२,८००/- |

श्रीसाईबाबा संस्थानमार्फत आपण पुढाकार घेऊन आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने सदर साधनसामग्री उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेणेत यावी. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.६३ महारोगी सेवा समिती, वरोरा, जि.चंद्रपूर,आनंदवन,यांचे अभियानास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१७५.** श्री.कौस्तुभ विकास आमटे,महारोगी सेवा समिती वरोरा,मु.पो.आनंदवन,जि.चंद्रपुर,यांनी दि.०३/०१/२००७ चे पत्रान्वये मा.अध्यक्ष महोदय यांचे नांवे पाठविल्या पत्रात "त्यांनी 'चेतना अभियान' सुरु केलेले असुन सदरच्या अभियानात ग्रामिण भागातील तरुण युवक/शेतकरी यांना शेती/उद्योगधंद्याबाबत प्रशिक्षण देणार असुन सदरच्या प्रशिक्षणाचा ग्रामिण भागातील लोकांना फायदा होणार आहे. सदरच्या अभियानासाठी श्री साईबाबा संस्थानकडुन एक कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळावी," अशी विनंती केलेली आहे. मा.अधक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे उपाध्यक्ष, यांनी दि.१९/०१/२००७ चे पत्रान्वये "श्री बाबा आमटे यांचे सुपूत्र डॉ.विकास आमटे हे अनेक वर्षापासून कुष्टरोगपिडीतांच्या उध्दारासाठी मोठया प्रमाणांत सामाजिक उपक्रम राबवित आहेत. कुष्टरोगपिडीतांच्या पुर्नवसनासाठी त्यांनी आनंदवन नावांने राष्ट्रीय सामाजिक उपक्रम सुरु केलेला असुन त्यासाठी आपल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी व त्याबाबत बैठकीत निर्णय करण्यात यावा, ही विनंती," असे कळविले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) " छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडुन कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था,सार्वजनीक वाचनालय,रुग्णालय,आधारगृह,किंवा इतर धर्मादाय अथवा धार्मिक संस्था,अथवा कला वा साहित्याशी सबंधित असेलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करुन घेणेसाठी, अनुदान देण्याची तरतुद आहे."

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री कौस्तुभ विकास आमटे,महारोगी सेवा समिती वरोरा, मु.पो.आनंदवन,जि.चंद्रपुर यांनी चालू केलेल्या "चेतना अभियानासाठी" तसेच आनंदवन प्रकल्पासाठी एकत्रित रुपये एक कोटी संस्थानमार्फत आर्थिक अनुदान देण्यात यावे, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.६४ विविध संस्थांना देण्यात आलेल्या शिध्याबाबत**

**निर्णय क्र.१७६. (अ)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | मा.श्री पुरुषोत्तम भानुदास गायके, तालुकाध्यक्ष,जिल्हा वारकरी सेवा संघ,वैष्णव नगर मिरी रोड,घोडेगांव ता.नेवासा जि.अहमदनगर | मौजे घोडेगांव येथे दिनांक २३.२.२००७ ते दिनांक २.३.२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह सोहळा कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

तरी मा.श्री पुरुषोत्तम भानुदास गायके, तालुकाध्यक्ष,जिल्हा वारकरी सेवा संघ,वैष्णव नगर मिरी रोड,घोडेगांव ता.नेवासा जि.अहमदनगर यांना दि.२३/०२/२००७ ते दि. २/०३/२००७ अखेर मौजे घोडेगांव येथे होणारे अखंड हरिनाम सप्ताह सोहळा कार्यक्रमाचे महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात रु. १५,०००/- पर्यंतच्या वस्तूरुपाने शिधा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(ब)** तसेच खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.सुनिल पो. मोरगे, अध्यक्ष, नॉर्दन ब्रँच मित्र मंडळ, नॉर्दन ब्रँच मोरगे वस्ती, वार्ड नं. ७, श्रीरामपूर, जि. अहमदनगर | दि.२३/०१/२००७ते द.३०/०१/२००७ अखेर ज्ञ ज्ञानेश्वरी पारायण व भागवत किर्तन सोहळा कार्यक्रम होणार असून दि.३०/०१/०७ रोजीचे काला महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०२. | अरुणजी महाराज, श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान, भामाठाण, (भामानगर), ता.श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर | धर्मनाथ बीज उत्सवानिमित्त रामायण कथा व ज्ञ ानेश्वरी पारायण सोहळा दि.१३/०१/२००७ ते दि. २१/०१/२००७ अखेर कार्यक्रम. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०३. | श्री विश्वनाथ नानासाहेब मुठे, अध्यक्ष, श्री संत तुळशिराम महाराज सप्ताह कमेटी, मुठेवाडगांव,ता.श्रीरामपूर, ज.अहमदनगर, | संत तुळशिराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीज्ञानेश्वर पारायण सोहळा, दि. १९/०१/२००७ ते दि.२६/०१/२००७ अखेर कार्यक्रम. | काल्याच्या कीर्तनाचे महाप्रसादासाठी शिधा मिळणेबाबत. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक/सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

अ.नं.०१ व अ.नं.०३ या मंडळांने मागीलवर्षीही शिधा स्वरुपात मागणी केलेली होती. त्यांना रु. २४,९२३.१५ मात्र व रु.२४,९७१.९५ पर्यंतची शिधास्वरुपात मदत अनुक्रमे करण्यात आली होती. अ.नं.०२ मधील संस्थेने पहिल्यांदाच मागणी केलेली आहे. उपरोक्त संस्थेंचे अर्ज हे साध्या कागदावर आहेत.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण) (अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

सद्या मा.व्यवस्थापन समितीची सभा नसलेने मा.अध्यक्ष यांचे संमतीने शिधा देता येईल.

तरी (०१) श्री.सुनिल पो. मोरगे, अध्यक्ष, नॉर्दन ब्रँच मित्र मंडळ, नॉर्दन ब्रँच मोरगे वस्ती, वार्ड नं. ७, श्रीरामपूर, जि. अहमदनगर याना दि. २३/०१/२००७ ते दि.३०/०१/२००७ अखेर होणा-या ज्ञानेश्वरी पारायण व भागवत किर्तन कार्यक्रमासाठीचे दि.३०.०१/२००७ रोजीचे कालाकीर्तन महाप्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या व अ.नं. ०२) अरुणजी महाराज, श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान, भामाठाण, (भामानगर), ता.श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर यांना धर्मनाथ बीज उत्सवानिमित्त रामायण कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.१३/०१/२००७ ते दि. २१/०१/२००७ अखेर होणा-या कार्यक्रमास रु. १५,०००/- मात्र पर्यंतच्या व अ.नं. ०३) श्री विश्वनाथ नानासाहेब मुठे, अध्यक्ष, श्री संत तुळशिराम महाराज सप्ताह कमेटी, मुठेवाडगांव यांना श्री संत तुळशिराम महाराज यांचे पुण्यतिथीनिमित्त आयोजित श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि. १९/०१/०७ ते दि.२६/०१/२००७ अखेर होणा-या कार्यक्रमास रु.२५,०००/- मात्र पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

**विषय नं.६५ भोपाळ येथे साई संमेलन भरविणे बाबत.**

**निर्णय क्र.१७७.** श्री.फारुक सरकारी, भोपाल, यांचे दि. १०/०१/२००७ रोजीचे पत्रान्वये भोपाल येथील भक्तांसाठी भोपाल येथे साई भक्त संमेलन आयोजित करण्याचे असून त्यासाठी श्री साईबाबा संस्थानतर्फे पादुका दर्शन सोहळा व साई भक्त संमेलन आयोजित करावा अशी विनंती केली आहे. तसेच सदर बाबतीत कश्याप्रकारे संमेलन आयोजित करावयाचे याबाबत सविस्तर माहिती मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

साईभक्त संमेलन कार्यक्रम हा अधिनियम २००४, १७(ड) मध्ये समितीचे कर्तव्य व अधिकार मध्ये नमुद केलेप्रमाणे - श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल. या नुसार घेता येईल. त्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

तथापि संमेलन भरविणेबाबत व तारखा निश्चिती बाबतीत संबंधीतांशी सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारचे संमेलन भोपाल येथे भरविलेस इतरत्र ठिकाणच्याही मागण्या येतील व त्याठिकाणीही संमेलन भरविणे अनिवार्य ठरेल.

भोपाल येथे साई संमेलन भरवावयाचे असेल तर संस्थानमार्फत फक्त पादुका व फोटो दर्शनासाठी नेता येतील व इतर सर्व खर्च म्हणजे संस्थान कर्मचा-यांची निवास/भोजन व्यवस्था, जाहिरात प्रसिध्दी, इ. संबंधीत संस्थेने वा मंडळांनी करावा, असे संबंधीतांना कळविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५/जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.६६** **अपंगाच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा २००६-२००७ करीता शिधा मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.१७८.** सदरहू विषयावरील चर्चा तहकूब करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.६७** **संस्थानला अकुशल,कुशल व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडणे.**

**निर्णय क्र.१७९.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कामगार पुरविणेसाठी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे.क्रिस्टल ट्रेड कॉम प्रा.लि., मुंबई यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी ( गुजरात ) प्रा.लि., मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-०३-२००६ पासून ते दि.२८-०२-२००७ अखेर या कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे. सदर ठेकेदारीची/कराराची मुदत दि.२८-०२-२००७ अखेर संपत आहे.

त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दीस देऊन मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा " मागविणेत आल्या होत्या. " सिलबंद निविदा " फॉर्मस् विक्रीची मुदत दि.१८-०१-२००७ पासून ते दि.३०-०१-२००७ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३१-०१-२००७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानला अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी मान्यताप्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे शिरडी कार्यालयास २७ " सिलबंद निविदा " व मुंबई कार्यालयास ११ " सिलबंद निविदा " अशा खालीलप्रमाणे एकूण ३८ "सिलबंद निविदा " प्राप्त झालेल्या आहेत.या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता |
|---|---|
| १ | बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं.)लि.,<br>नासिक-पुणे रोड,नासिक- ४२२१०१ |
| २ | फ्युलड लाईट सिक्युरिटी सर्व्हीसेस,पुणे- २८ |
| ३ | प्रतिक सर्व्हीसेस, (श्री.बाळासाहेब किसन साबळे) श्रमिक नगर, नासिक |
| ४ | श्रीकृष्ण एन्टरप्राईजेस, कोथरुड, पुणे-४११०२९ |
| ५ | श्री.सिताराम बापू वैद्य,मु.पो.शिरडी ता.राहाता |
| ६ | श्री.शिवानंद लहु काळे,मु.पो.शिरडी ता.राहाता |
| ७ | श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, सावेडीरोड, अहमदनगर |
| ८ | प्रशांत औद्योगिक कामगार व सुरक्षा रक्षक सहकारी संस्था मर्यादित, निगडी,पुणे-४११०४४ |
| ९ | जयभवानी एंटरप्राईजेस, चिंचवड, पुणे |
| १० | बी.व्ही.जी.इंडिया लि.,शिवाजीनगर, पुणे ४११००५ |
| ११ | प्रखर सिक्युरिटी ॲन्ड अलाइड सर्व्हीसेस, एम.जी.रोड, पुणे-४११००१ |
| १२ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., एम.जी.रोड, पुणे-४११००१ |
| १३ | शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी , पंधेसरा, सुरत |
| १४ | ईगल हंटर सोलुशन्स लि.,जोगेश्वरी (पु ) मुंबई-४०००६० |
| १५ | सोल्जर्स इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सीज, मु.पो.देवळाली , नासिक |
| १६ | गार्डीयन फॅसिलीटीज मॅनेजमेंट (नागपुर ) प्रा.लि.,मानखुर्द(प )मुंबई ४०००४३ |
| १७ | श्री साई एन्टरप्राईजेस,चिंचवड,पुणे-१९ |
| १८ | बिसेफ, चंदन नगर, पुणे- ४११०१४ |
| १९ | एस.डी.बी.सिसको (इं) लिमिटेड,कोंडवा खुर्द, पुणे-४११०४८ |
| २० | रिलासयन्स एन्टरप्रायजेस,ईस्ट स्ट्रीट, पुणे-४११००१ |
| २१ | ईगल आय एन्टरप्राईज,वापी |
| २२ | ओम साई सर्व्हीसेस,सिडको, औरंगाबाद-४३१२१० |
| २३ | मे.साई सर्व्हीसेस, सिन्नर |
| २४ | मे. महात्मा फुले मल्टी सर्व्हीसेस, परभणी-४३१४०१ |
| २५ | बेस्ट सर्व्हीसेस,शिवाजीनगर पुणे-४११००५ |
| २६ | मेडिएटर्स ॲन्ड अजंटा सिक्युरिटी प्रा.लि.,सिडको, औरंगाबाद-४३१००३ |
| २७ | व्हिज सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.ठाणे (प )-४००६०२ |
| २८ | मे.ज्वाला सिक्युरिटी फोर्स,कामठीरोड, नागपूर-१७ |

| | |
|---|---|
| २९ | मे.सिध्दार्थ सिक्युरिटी ॲन्ड डिटेक्टीव्ह फोर्स,गोरेगांव (वेस्ट )मुंबई-४००१०४ |
| ३० | मे.एक्स सर्व्हीसमन मल्टीपल सर्व्हीसेस ॲन्ड कन्सलटंस्,येरवडा, पुणे-४११००६ |
| ३१ | मे.टॉप अँगल सिक्युरिटी ॲन्ड डिटेक्टीव्हज प्रा.लि., अंधेरी (ईस्ट ) मुंबई-४०००९९ |
| ३२ | मे.फलॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हीसेस, कांदिवली ( ईस्ट )मुंबई-४००१०१ |
| ३३ | मे.ड्रॅगॉन सर्व्हीसेस,अंधेरी (वेस्ट ) , मुंबई- ४०००५३ |
| ३४ | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (वेस्ट ) मुंबई-४०००५६ |
| ३५ | मे.शेरपा सिक्युरिटी सर्व्हीसेस, खार (वेस्ट ), मुंबई-४०००५२ |
| ३६ | मे.टायगर सिक्युरिटी ॲन्ड डिटेक्टीव्ह सर्व्हीसेस, अंधेरी (ईस्ट ), मुंबई- ४०००५९ |
| ३७ | मे.क्रिष्णा सिक्युरिटी सर्व्हीसेस, घाटकोपर (ईस्ट )मुंबई-४०००७५ |
| ३८ | मे.ॲविकॉन ॲव्हीएशन कन्सल्टींग सर्व्हीसेस प्रा.लि.,खार (वेस्ट ), मुंबई- ४०००५२ |

उपरोक्त निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थपन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

तसेच सध्याचे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत दि.२८-०२-२००७ अखेर संपुष्टात येत आहे. नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे टेंडर उघडून, स्टेटमेंट तयार करुन, निविदाधारकांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे इत्यादी नेमणूक प्रक्रियेला सुमारे दोन महीन्यांचा कालावधी लागणार आहे. म्हणून कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याच्या मे. बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे व मे.क्रिस्टल ट्रेड कॉम प्रा.लि., मुंबई यांचेमार्फत पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांच्या तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी ( गुजरात ) प्रा.लि., मुंबई यांचेमार्फत पुरविण्यात येणा-या कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांचे ठेकेदारीस /करारास सध्याचे कंत्राटासंबंधातील करारातील अटी व शर्तीस अधीन राहून दि.०१-०३-२००७ पासून दोन महीने मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.६८ कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१८०.** याबाबत मा.श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील यांचे अध्यक्षतेखाली मा श्री जयंत मुरलीधर ससाणे मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, मा.श्री पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे आस्थापना उपसमितीने अंतिम निर्णय घ्यावा,असें ठरलें. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.६९ साफ सफाईसाठी कर्मचारी मिळणेबाबत नगरपंचायत शिर्डी यांचे पत्र..**

**निर्णय क्र.१८१.** श्रीसाईबाबांच्या पुनीत स्पर्शाने पावन झालेल्या शिर्डी शहरात हजारो साईभक्त दररोज दर्शनासाठी येत असतात.साईभक्तांचे व शहरातील नागरिकांचे आरोग्याकरीता शिर्डी नगरपंचायतीमार्फत सध्या साफसफाईची मोहीम उघडण्यात आलेली आहे.या मोहिमेअंतर्गत काही ठिकाणी साफसफाई करण्यात आलेली असून ब-याच ठिकाणी साफसफाई अपुर्ण आहे.कारण शिर्डी नगरपंचायतीकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही.

तसेच संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियाना अंतर्गत नगरपंचायतीस जिल्हास्तरीय व विभागीय स्तरीय पुरस्कार मिळालेला आहे.यावर्षीही पुरस्कार मिळणेकरिता विविध योजना राबविणे आवश्यक आहे.

स्वच्छ व सुंदर शिर्डी करीता शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी संयुक्तरित्या मोहीम राबविणे आवश्यक आहे.तरी श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी साफसफाई करणेकरीता शिर्डी नगरपंचायतीस दररोज ५० कर्मचारी पुरवावेत ही नम्र विनंती. " अशी शिर्डी नगरपंचायत यांनी संदर्भित पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

तरी सदर मागणी प्रमाणे आपणास ५० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरविणे कामी खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

अ]५० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | ११८=०९ |
| ०२. | प्रॉ.फंड १३.६१% | १६=०७ |
| ०३. | सर्व्हिस चार्ज ०.७५% | ०=८८ |
| ०४. | प्रति दिन प्रति कर्मचारी रु | १३५=०४<br>x ५० कर्मचारी |
| | | रु.६७५२=०० एक दिवसा करिता<br>x ३६५ दिवसांकरीता |
| | | रु.२४,६४,४८०=०० |
| ०५. | +१०% वर्षात होणरी अपेक्षित वाढ | रु.२,४६,४४८=०० |
| | एकुण रुपये | २७,१०,९२८=०० |

ब]तसेच दि.१८/१/२००७ रोजी मा.का.अ.सो यांचे कक्षात वरिल विषयाने शिर्डी नगर पंचायतीचे पदाधिका-यांबरोबर झालेल्या सभेत शिर्डी नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष श्री.अभय शेळके यांनी संस्थानचे स्वच्छता विभागाने खालील ठिकाणी साफसफाईची कामे करावीत अशी समक्ष सुचना केलेली आहे.

| अ.नं. | कामाचे ठिकाण |
|---|---|
| १) | पिंपळवाडी रोड- श्री मनोज कुमार पथ नगर- मनमाड रोड पासून ते हॉटेल साईयश पर्यंत दोनही बाजूचे फुटपाथ सहित |
| २) | पालखी रोड दोनही बाजूने |
| ३) | हॉटेल ऋषिकेश ते एस.टी.स्टँड पर्यंतचा नगर- मनमाड रोड दोनही बाजूचे फुटपाथ सहित |

तरी याबाबत मा.कार्यकारी अधिकारी सो यांनीही समक्ष आदेश दिलेला आहे.तरी अ.क्र.१ ते ३ या ठिकाणची साफसफाई करणेकामी "अ"मधील कर्मचा-यांचे वेतनाव्यतिरिक्त स्वच्छता साहित्य उदा. खराटे, बी.एच.सी पावडरला पर्यायी पावडर,लिक्वीड सोप,नायलॉन ब्रश,लोखंडी दोन चाकी कचरा गाडया,सिमेंटच्या गोल कचरा कुंडया,स्प्रे पंपस व पंपाचे स्पेअर पार्टस्,किटकनाशक औषध,क्लिनींग रॉडस् व टुल्स,इत्यादी स्वच्छता साहित्य खरेदी कामी एक वर्षासाठी अंदाजे रु.२,००,०००/- मात्र पर्यंत खर्च येईल.

तरी उपरोक्त "अ"प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ५० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या ५० कंत्राटी कर्मचा-यांचे वेतना पोटी एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रु.२७,१०,९२८/- मात्र पर्यंत खर्च येईल.

तसेच अ + ब प्रमाणे संस्थानचे स्वच्छता विभागामार्फत साफसफाईची कामे करावयाची असल्यास अ) रु.२७,१०,९२८/-+ ब) रु.२,००,०००/- असा एकुण अंदाजे रुपये २९,१०,९२८/- मात्र पर्यंत खर्च येईल.

तरी फक्त "अ" मधील कंत्राटी अकुशल ५० कर्मचारी पुरविणे कामी अंदाजे एकुण रु.२७,१०,९२८/- मात्र पर्यंतचे खर्चास किंवा " अ+ब " मधील कामे एकत्रीत करावयाची असल्यास अ) रु.२७,१०,९२८/-+ ब) रु.२,००,००० =रु.२९,१०,९२८/-मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेस विनंती आहे. तसेच या करीता सन २००७-२००८ चे स्वच्छता विभागाचे अंदाजपत्रकात तरतूद करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शिर्डी नगरपंचायत यांना शिर्डी शहरातील साफसफाईकामी तुर्त २५ कर्मचारी एक वर्षासाठी देण्यात यावे. याकामी स्वच्छता विभागाचे अंदाजपत्रकात या खर्चाची तरतूद करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-स्वच्छता विभागप्रमुख)

**विषय नं.७०** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी यांचा मासिक इन्सेन्टीव्ह मिळणेबाबतचा अर्ज**

**निर्णय क्र.१८२.** याबाबत वैद्यकीय उपसमितीने अंतिम निर्णय घ्यावा,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७१** **कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणसेवक यांचे मानधनात वाढ करणे बाबत**

**निर्णय क्र.१८३.** सदरहू विषय तहकूब ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.७२** **कनिष्ठ अभियंता,स्थापत्य या पदावर नेमणूक होणे बाबत श्री गणेश रत्नाकर कोराटे यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१८४.** श्री.गणेश कोराटे यांची नेमणूक त्यांचे वडील श्री.रत्नाकर कोराटे हे श्री साईबाबा संस्थान कडे सेवेत असतांना त्यांचे निधन झाल्याने त्यांचे जागेवर अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर एकत्रित नियत वेतन रु. २०००/- नियत वेतनावर प्रथम दोन वर्षे परिवीक्षाधीन कालावधीसाठी करण्यात आलेली आहे. त्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

**संपूर्ण नांव** **:-** श्री. गणेश रत्नाकर कोराटे
**हुद्दा** **:-** मदतनीस ( वर्ग-४ कर्मचारी) बांधकाम विभाग
**जन्मतारीख** **:-** ०१/०८/१९८३
**शैक्षणिक पात्रता** **:-** इयता १२ वी बी.ई.सिव्हील प्रथम वर्षे(नेमणूकीच्या वेळी)
**सेवेत कायम झाल्याचा दिनांक** **:-** दि.०१ /०९/२००५
**सध्याची शैक्षणिक पात्रता** **:-** बी.ई (सिव्हील) मे-२००५.

श्री.कोराटे यांनी **दि.१९/०१/२००६** रोजीचे अर्जात "मी माहे **जून २००५** रोजी पुणे विद्यापीठातून ही पदवी घेऊन उत्तीर्ण झालेलो आहे. त्यासाठी यापूर्वी शिक्षणाकरीता श्री साईबाबा संस्थानने जे सहकार्य केले त्याबद्दल साईबाबांचा व आपल्या सर्वांचा सदैव ऋणी आहे. माझ्या शिक्षणाचा संस्थानला फायदा व्हावा व मला श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी मिळावी अशी माझी इच्छा आहे. तरी माझी कनिष्ठ अभियंता या पदावर नेमणूक करावी " अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर, उपमुख्य अभियंता बांधकाम यांचेकडून जा.नं.एसएसएस/वशी-०१/२१८७/२००६ दि.११/०८/२००६ अन्वये स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला होता.

सदर पत्रास अनुसरुन उपमुख्य अभियंता बांधकाम यांनी **दि.२७/०८/२००६** चे टिपणीने श्री कोराटे यांचेबाबत अभिप्राय इकडील कार्यालयास सादर केला असून त्यात," सध्या श्री गणेश कोराटे,वर्ग-४ कर्मचारी,बांधकाम विभाग यांची त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार बांधकाम विभागाकडे

सध्या सुरु असणारे बांधकामासंबंधीत कामकाजात मदत घेतली जात आहे.कामकाजाचे बाबतीत ते कष्टाळू व प्रामाणिक आहेत.बांधकामाबाबत तांत्रिक व प्रत्यक्ष कामकाजाचा व्यापक अनुभव येईपर्यंत ते वरिष्ठ मुख्य अभियंता व शाखा अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता या पदाचे काम स्वतंत्ररित्या पेलू शकतील.श्री कोराटे यांची कनिष्ठ अभियंता या पदावर,कनिष्ठ अभियंता या पदासाठी देय असलेल्या वेतनश्रेणीत नेमणूक करण्यास हरकत नाही."असे नेमूद केलेले आहे.

श्री कोराटे यांची सुरवातीस मदतनीस या पदावर नियुक्ती करणेत आलेली होती.तथापि त्यांनी बी.ई.सिव्हील परिक्षा उत्तीर्ण केलेनंतर दि.०१/०९/२००५ पासून त्यांची बदली बांधकाम विभागाकडे त्याच पदावर करणेत आलेली आहे.

श्री कोराटे यांना सध्या वर्ग-०४ चे पदाची **रु.२५५०-५५-२६६०-६०-३२००** हि वेतनश्रेणी दि.०१/०९/२००५ पासून देण्यात आलेली आहे.त्यांना उपरोक्त उपमुख्य अभियंता व प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्रायानुसार कनिष्ठ अभियंता पद द्यावयाचे ठरल्यास,**रु.५५००-१७५-९०००** ही वेतनश्रेणी द्यावी लागेल.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता श्री कोराटे यांना कनिष्ठ अभियंता,हे पदनांम व त्यापदाची वेतनश्रेणी रु. **रु.५५००-१७५-९०००** देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०८.२००६ चे सभेत निर्णय क्र.६२६ अन्वये संस्थानमध्ये कंत्राटीपध्दतीने काम करणारे कनिष्ठ अभियंते यांना यांना दरमहा रुपये ७,०००/- एकत्रित निश्चित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक देण्यात आलेली आहे, त्याच प्रमाणे श्री कोराटे यांना रुपये ७०००/- एकत्रित वेतन देऊन नेमणूक देण्यात यावी व शासनाकडून कंत्राटी कामगारांच्या नेमणूकीस मान्यता मिळालेनंतर श्री.कोराटे यांनाही इतर क. अभियंत्याप्रमाणे वेतनश्रेणी देणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७३** **सिनिअर बायो-मेडिकल इंजिनिअर या पदावर नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.१८५.** श्री.राजेश रमनलाल वाकडे यांनी दि.२५/११/२००६ रोजीच्या अर्जान्वये सिनियर बायोमेडिकल इंजिनियर हे पद मिळावे ,म्हणून विनंती अर्ज केला असून, त्यावर " डॉ.पी.एल.तिवारी,विश्वस्त यांनी त्यांना कमीत-कमी प्रति महिना रुपये- १५,०००/- द्यावेत ", असे अभिप्राय दिले आहे.

त्यांस अनुसरुन श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि. २७/११/२००६ रोजीचे टिपणी अन्वये श्री वाकडे यांना डॉ.पी.एल.तिवारी यांचे आदेशानुसार सिनियर बॉयोमेडीकल इंजिनियर या पदावर नेमणुक देऊन रुपये- १५,०००/- प्रती महिना इतके वेतन देणेबाबत नमुद केले असून, त्यावर " प्रशासकीय अधिकारी यांनी पुढील कार्यवाहीसाठी आस्थापना विभागाकडे पाठवावे ", असे अभिप्राय दिलेले आहे. तसेच श्री वाकडे यांनी दि.०१/१२/२००६ रोजीचे अर्जान्वये केलेल्या कामाचा अहवाल देऊन सिनिअर बॉयोमेडिकल इंजिनियर हे पद मिळणेबाबत अर्ज केला आहे, व त्यावर श्री कैलास कोते, माजी विश्वस्त यांची शिफारस आहे. तसेच मा.आ.राधाकृष्ण विखे पाटील,विश्वस्त यांनी त्यांचे दि.२९/११/२००६ रोजीचे पत्रान्वये मा.श्री ससाणे, अध्यक्ष यांना श्री राजेश वाकडे यांना श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी आकृतिबंधानूसार सिनियर बायोमेडिकल इंजिनियर हे पद देणेबाबत विचार व्हावा ,असे कळविले आहे.

श्री.वाकडे यांची रुपये- ५५००-१७५-९००० या वेतन श्रेणीत श्री साईनाथ रुग्णालयाकडे नेमणूक असून त्यांना दरवर्षी वार्षिक पगारवाढ दिली जाते. त्यांची श्री साईनाथ रुग्णालयातील सेवा २ वर्षे ५ महिने झालेली आहे.त्यांचे सध्याचे मुळ वेतन रुपये -५८५०+ महागाई वेतन -२९२५ + महागाई भत्ता +२५४५+ घरभाडे भत्ता-४३९+ वहातूक भत्ता-७५ असा एकुण पगार रुपये- ११,८३४/- आहे. सिनियर बायोमेडीकल इंजिनियर वेतनश्रेणी रु.-६५००-२००-१०५०० मध्ये सुरुवातीचा एकुण पगार रु.१३,४१०/-(एच.आर.ए.वैगेरेसह) आहे. तथापि रुग्णालयात जाहीरात देऊन मुलाखतीव्दारे भरलेल्या पी.आर.ओ., एच.आर.मॅनेजर,मटेरियल मॅनेजर इत्यांदीना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार प्रती महिना रुपये- ८०००/- एकत्रीत मानधन देण्यात येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतिबंधात सिनियर बॉयोमेडिकल इंजिनियर हे पद आहे.तथापी श्रीसाईबाबा रुग्णालयाचे आकृतिबंधास शासनाकडून मान्यता येणे आहे.

त्यामुळे श्री वाकडे यांना तूर्त सिनियर बॉयोमेडिकल इंजिनियर हे पद देता येईल. त्या पदाची वेतनश्रेणी श्रीसाईबाबा हॉस्पीटलचे आकृतिबंधास शासनाची मान्यता आले नंतर देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयाबाबत वैद्यकीय उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.७४** **श्रीसाईनाथ हॉस्पिटलकडील डॉक्टरांना श्री साईबाबा हॉस्पिटलकडील डॉक्टरांप्रमाणे वेतन देणे बाबत.**

**निर्णय क्र.१८६.** याबाबत वैद्यकीय उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.७५** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी (RMO) यांना क्लिनीकल असिस्टंट पद देणेबाबत.**

**निर्णय क्र.१८७.** याबाबत वैद्यकीय उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.७६** **श्री मिलींद लालचंद सोनवणे, ज्यु.कॅथलॅब टेक्निशियन यांचे मानधन वाढीबाबत.**

**निर्णय क्र.१८८.** याबाबत वैद्यकीय उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.७७** **गट 'क' व 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी आश्वासीत प्रगती योजना लागू करणे बाबत.**

**निर्णय क्र.१८९.** याबाबत आस्थापना उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.७८** **मयत कर्मचाऱ्यांचे एका नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेणे बाबत.**

**निर्णय क्र.१९०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७९** **श्रीरामपूर भूसंपादन कक्षास मुदतवाढ देणे बाबत**

**निर्णय क्र.१९१.** संस्थानकरीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा.उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे.या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | नायब तहसिलदार संवर्गातील | कंन्सलटंट | ०१. | रु. ७,०००/- |
| ०२. | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु. ४,५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०२ | रु. ४,०००/- |
| ०४. | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | **एकुण** | **०५.** | |

सदरहू कक्षाकडे भू-संपादनासाठी एकुण सहा प्रकरणे कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहेत. या कक्षाला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली असून दि.३१/०८/२००५ अखेर कक्षाची मुदत संपल्यानंतर तेव्हापासून हा कक्ष बंद होता.तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरच्या कक्षाची मुदत व तसेच सदर कक्षाकडे नेमणूक करण्यात आलेल्या व सध्या कामास असलेल्या कर्मचाऱ्यांची मुदत ( कंन्सलटंट-०१,कंत्राटी कुशल कामगार-०२, व कंत्राटी अकुशल कामगार-०१ ) त्यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन दि.०१/०५/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आलेली मुदत दि.३१/१०/२००६ संपुष्टात आलेली आहे.

आता मा.उपविभागीय अधिकारी यांनी,क्रमांक कावि/भूसं-२/२८४१/२००६ दि.२७/१२/२००६ अन्वये, संस्थानची एकूण नऊ भू-संपादन विषयक प्रकरणे चालू असून सदर प्रकरणांचे निर्गतीसाठी एक वर्षाचा कालावधी लागेल असे कळविलेले आहे.सदर सल्लागार या पदावर इच्छुक उमेदवार झाल्यानंतर त्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव नंतर सादर करण्यात येईल तथापि,श्री पवार लिपीक ऐवजी संगणक टंकलेखक ज्ञ ाान असलेले श्री सदाफळ के.आर.व श्रीमती एम.एम.फोफसे लिपीका यांचे ऐवजी श्री. शिवाजी काशिनाथ जाधव व श्री गायकवाड प्रदिप असे एकूण तीन कर्मचारी दि.०१/११/२००६ पासून कार्यरत असून त्यांना दि.३१/१०/२००७ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी असे कळविले आहे.

तसेच मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर तथा भू-संपादन अधिकारी यांनी क्रमांक कावि/भूसं-२/१७/२००७ दि.०८/०१/२००७ अन्वये नायब तहसिलदार संवर्गातील (भू-संपादन सल्लागार) पद रिक्त आहे.सदर पदावर श्री प्रकाश सखाराम गाडे सेवानिवृत्त नायब तहसिलदार हे काम करणेस इच्छूक असून त्यांनी दि.२८/१२/२००६ रोजी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

त्याकरीता सदर पदावर श्री गाडे यांना भू-संपादनाचा अनुभव असल्याने त्यांची दि.१०/०१/२००७ पासून नियुक्ती करण्यात आलेली आहे." असे कळविलेले आहे.

श्री गाडे सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचेबाबत दि.१९/०१/२००७ रोजी सकाळी १२.१५ वाजता दुरध्वनीवर श्रीरामपूर उपविभागीय कार्यालयात चौकशी केली असता," श्री गाडे हे एक दिवस कामावर आले व प्रकृती अस्वस्थामुळे मी काम करु शकत नाही असे लिहून ठेवून गेले व परत आले नाही. व मुदत संपल्यामुळे सध्या सदर कक्षात कोणीही कामावर येत नाही. अशी माहिती मिळाली.

तथापि,दि.०९/११/२००६ रोजी श्री बी.आर.वाव्हळ यांनी श्रीरामपूर भू-संपादन कक्ष येथे सल्लागार या पदासाठी जे मानधन दिले जात आहे.त्या मानधनावर मी काम करण्यास इच्छूक असून सदर भू-संपादन कक्षात सल्लागार म्हणून नियुक्ती मिळावी अशी विनंती केलेली आहे.

श्री. वाव्हळ यांनी पूर्वी या कक्षाकडे काम केलेले आहे. त्यांची सल्लागार पदी नेमणूक करणेबाबत तसेच सदर कक्षाकडे पूर्वी काम करत असलेले श्री पवार व श्रीमती फोफसे यांची

पुर्वीप्रमाणेच कंत्राटदारा मार्फत नेमणूक करुन सदर कक्षास एक वर्षे मुदतवाढ देण्यात द्यावी ." अशा सुचना मा.अध्यक्ष साो यांनी दिलेल्या आहेत.

तरी मा.उपविभागीय अधिकारी भू-संपादन तसेच मा.अध्यक्ष महोदय यांच्या सुचना/आदेश विचारात घेऊन सदर कक्षास एक वर्षे मुदतवाढ देणेबाबत व कक्षाकडे मंजूर असलेल्या कर्मचाऱ्यापैकी सल्लागारपदी श्री. वाव्हळ, तसेच वरील प्रमाणे इतर कर्मचारी लावणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर कक्षास दिनांक३१.१०.२००७ अखेर मुदतवाढ देण्यात यावी व सल्लागारपदी श्री.वाव्हळ, तसेच वरील मंजूरीप्रमाणे इतर कर्मचारी लावणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८०** **परिसेवीका पदावर पदोन्नती देणे बाबत.**

**निर्णय क्र.१९२.** याबाबत आस्थापना उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं ८१** **डॉ.अनिषा टंडन यांचे वेतनवाढीबाबत**

**निर्णय क्र.१९३.** याबाबत वैद्यकीयउपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.८२** **डॉ.आर.जी.ढवळे, वैद्यकीय संचालक यांचे वेतन व इन्सेन्टीव्ह प्रति महा रुपये ६५,०००/- मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१९४.** याबाबत वैद्यकीय उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.८३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.१९५.** श्रीसाईबाबा हॉस्पीटल व श्रीसाईनाथ हॉस्पीटकडे वैद्यकिय अधिकारी तसेच आर.एम.ओ या पदावर नोकरी मिळणेबाबत खालील प्रमाणे उमेदवारांनी अर्ज करुन श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे काम करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली होती.

उपरोक्त अर्जाबाबत,मा.डॉ.तिवारी विश्वस्त साो.तसेच वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे दि.१८/१२/२००६ रोजीचे अभिप्राय व मंजूर टिपणीस अनुसरुन,संबंधीत उमेदवारांच्या मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पद व वेतनश्रेणी निहाय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधास मंजूरीचे अधीन राहून,खालीलप्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ. नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन / वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१.. | डॉ.श्रीकांत मधुकर नागरे | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८१५१/०६ दि.२७/१२/०६ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफिसर (आर.एम.ओ)मा.एकत्रित वेतन रु.१७०००/- |
| ०२. | डॉ. संदिप नामदेव शिंदे | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८१५३/०६ दि. २७/१२/०६ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (आर.एम.ओ.) मा.वेतन रु.१७,०००/- |
| ०३. | डॉ. मृणालीनी शामराव देसाई | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८१५०/०६ दि.२७/१२/०६ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (आर.एम.ओ.) मा.वेतन रु.१७,०००/- |
| ४. | डॉ.पंडीत वेंकटराव बुटूकणे | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-१/१८१४९/०६ दि. २७/१२/०६ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (आर.एम.ओ.) मा.वेतन रु.१७,०००/- |
| ०५. | डॉ. शिरीषा एम. | एम.बी.बी.एस. (डि.जी.ओ) | जा.नं.एसएसएस/वशी-१/१८२६२/०६ दि. २७/१२/०६ श्री साईनाथ हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (आर.एम.ओ.) मा.वेतन रु.१८,०००/- |
| ०६. | डॉ.धनंजय ज्ञानेश्वर बोराडे | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८१५२/०६ दि. २७/१२/०६ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (आर.एम.ओ.) मा.वेतन रु.१७,०००/- |
| ०७. | डॉ. राजेंद्र प्रतापराव बोलधने | एम.बी.बी.एस एम.डी. | जा.नं.एसएसएस/वशी-१/२३०/०७ दि.६/०१/२००७श्रीसाईबाबा हॉस्पीटल | क्लिनीकल असि.(स्त्री रोग व प्रसुती ) मा.वेतन रु. २५,०००/ |
| ०८. | डॉ. कृष्णा मधुकर गिरी | एम.बी.बी.एस एम.डी.(मेडी) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८३३१/०६ दि.२९/१२/२००६श्रीसाईबाबा हॉस्पीटल | फिजीशियन मा.वेतन रु. ३०,०००/- |
| ०९. | डॉ.कमलेश प्र.कोठावदे | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३२३/०७ दि.०८/०१/२००७ | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ) मा. वेतन रु. १७,०००/- |
| १०. | डॉ.संदीप एस.कोकाटे | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-१/१८२५६/०६ दि.२७/१२/२००६ | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ) मा. वेतन रु. १७,०००/- |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१.** **नव्याने नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी समूह विमा पॉलीसी घेणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१९६** श्रीसाईबाबा संस्थानचे मालमत्तेचा विविध प्रकारचा विमा, इतर आर्थिक जोखमीचा विमा तसेच कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ प्रमाणे एकुण **११८४** कर्मचा-यांचा समुह विमा स्पर्धात्मक पध्दतीने निविदा मागवुन दि ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी लि. शाखा सगंमनेर यांचेकडे उतरविण्यात

आलेला आहे. सदरचे विम्यापोटी प्रिमियम रक्कमही आदा करण्यात आलेली आहे. सदरहु विम्याची मुदत **दिनांक ०९ जुलै, २००७ अखेर** संपत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच इतर विभागात नवीन कर्मचा-यांच्या नव्याने नेमुणका करण्यात आलेल्या आहेत. नव्याने नेमणुक झालेल्या कर्मचा-यांची संख्या,पगार,वेतनश्रेणी तसेच अनुषंगीक माहीती आस्थापना विभागाकडून मागविण्यात आली होती. त्यानूसार आस्थापना विभागाने माहे ऑगस्ट,२००६ ते डिसेंबर,२००७ अखेर एकुण १०७२ नव्याने नेमणुक झालेल्या १०७२ कर्मचा-यांची वेतनश्रेणी निहाय यादी कळविलेली आहे.

यापुर्वीच्या संस्थानचा सर्व प्रकारचा विमा दि ओरीएण्टल इंन्श्योरेंस कपंनी, संगमनेर यांचेकडे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उतरविण्यात आलेला असल्याने उपरोक्त कर्मचा-यांचा समुह विमा उतरविणेकामी संबंधिताना विचारणा करण्यात आली होती. शाखा प्रबंधक, दि ओरीएन्टल ऐश्योरेंस कंपनी लिमिटेड, संगमनेर यांनी त्यांचे दिनांक ०९ फेब्रुवारी, २००७ रोजीचे पत्रान्वये १०७२ कर्मचा-यासाठी प्रिमियम रक्कम रुपये ३३,८२४/- मात्र कळविलेली होती. सदरची प्रिमियम रक्कम पुर्वीच्याच मंजुर दराने असल्याने ग्राहय धरण्यात आलेली आहे. दि ओरीएन्टल इंश्योरेंन्स कंपनी लि.,शाखा संगमनेर यांचे कडून १०७२ कर्मचा-यांची दिनांक ०९ फेब्रुवारी , २००७ ते ०९ जुलै, २००७ अखेर १५१ दिवससाठी विमा पॉलिसी घेण्यात येऊन प्रिमियम रक्कम आदा करण्यात आलेली आहे.

तरी नव्याने नेमणुक झालेल्या १०७२ कर्मचां-याचा कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ नुसार अन्वये दि ओरीएन्टल ऐश्योरेंन्स कंपनी लिमिटेड यांना आदा करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३३,८२४ /- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१९७** १५ फेब्रुवारी,२००७ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध रक्कम दि.१५.२.२००७ अखेर | ३,९०,००,०००.०० |
| | **एकूण-** | **३,९०,००,०००.००** |

वरील तपशीलानुसार दैनंदिन खर्च वजा जाता साधारणतः रक्कम रुपये ३,९०,००,०००.०० गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. सदर रक्कम खालीलप्रमाणे गुंतविण्यात यावी असे ठरले.

अ ) श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये मॅक्वेट टेबल खरेदी करण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम रु.९० लाख स्टेट बँक ऑफ इंडिया, शिर्डी यांचेकडे ४६ दिवसांसाठी त्यांचेकडील प्रचलीत व्याजदरानुसार ठेवण्यात यावी. तसेच आंध्र बँक शिर्डी यांचेकडील नित्यप्रसादालय या संस्थानच्या बचत खाते नंबर १११ मधील रक्कम रु.१० लाख आंध्र बँक शिर्डी यांचेकडील नित्यप्रसादालय अन्नदान या तरतूदीनुसार त्यांचेकडेच उच्चमत व्याजदराने गुंतविण्यात यावी.

ब ) उपरोक्तप्रमाणे रु.९० लाख वजा जाता उर्वरित गुंतवणूकीसाठी उपलब्ध असलेल्या रकमेची गुंतवणूक न करता सदरची रक्कम ही भूसंपादनासाठी संस्थानच्या बचत खात्यात तशीच राखुन ठेवण्यात यावी. तसेच जमीन खरेदी व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ते विकास कामासाठी करावयाच्या भूसंपादनासाठी मोठी रक्कम आदा करावी लागणार असल्याने, विविध बँकांतील काही गुंतवणूकींचे आवश्यकतेनुसार रोखीकरण करण्यात यावे असे ठरले. तसेच त्याबाबतचा सविस्तर अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात यावा. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३.** **मौजे पांगरी, ता.सिन्नर येथील श्रीमती बबाबाई पांडूरंग पांगारकर यांनी संस्थानला देणगी दिलेल्या २० आर जमीनीत पालखी थांबा उभारणे बाबत**

**निर्णय क्र.१९८** मौजे पांगरी, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील साईभक्त श्री. पांडुरंग बाबुराव पांगारकर व श्रीमती बबाबाई पांडूरंग पांगारकर यांनी त्यांची मौजे पांगरी हद्दीतील गट नं. ५१९/अ/१पै मधील ८१ आर पैकी २० आर जमिन दिनांक १६ ऑगस्ट, २००५ रोजी बक्षीस पत्राने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना दिलेली आहे. सदर जमिनीचे सिमांकन करणेकामी, सरकारी मोजणी करणेकामी मा. तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, सिन्नर यांचेकडेस दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ रोजी अर्ज करणेत आलेला आहे.

मौजे पांगरी ता.सिन्नर हे गांव शिर्डी - मुंबई राज्यमार्गावर असून या रस्त्याने मुंबई व मुंबई परिसरातून पदयात्री वर्षभर शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येत असतात.

मा.व्यवस्थापन समितीचे धोरणात्मक निर्णयानुसार, मुंबई शिर्डी या पालखी पदयात्री मार्गावर ठिकठिकाणी पालखी थांबे बांधण्याचे प्रयोजन आहे. त्यानुसार सध्या सिन्नर येथे पालखी थांबा बांधकाम सुरु करणेत आले आहे. तसेच पांढुर्ली येथेही पालखी थांबा बांधकाम सुरु करणेत येत आहे. याप्रमाणे

मौजे पांगरी येथे बक्षीस पत्राने मिळालेल्या जागेत पदयात्री पालखी थांबा उभारता येईल त्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रक्कम रु. १५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी आर्किटेक्ट निकम पा.असो. श्रीरामपूर यांचेकडून बांधकाम नकाशे व सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविण्याकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला.

सदर प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन, मौजे पांगरी, तालुका सिन्नर येथील संस्थानला देणगी दाखल मिळालेल्या २० आर जमिनीमध्ये सर्व सुविधेनेयुक्त असा पालखी थांबा उभारणेकामी येणारे अंदाजित रक्कम रुपये १५ लाख मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. आर्किटेक्ट निकम पा.असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून नियोजित पालखी थांब्याचे बांधकाम आराखडे व सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच पालखी थांब्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बांधकामाच्या निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४.** **श्री साईबाबा भक्तनिवास येथे जनरल संडास व बाथरुमची व्यवस्था करणे बाबत.**

**निर्णय क्र.१९९** श्रीसाईबाबांचे दर्शाासाठी येणाऱ्या साईभक्तांचे निवासासाठी सन १९९३ साली प्रसाधागृहासह ५०० खोल्याची असलेली भक्तनिवास इमारत बांधण्यात आली आहे. याच इमारतीत दोन जनरल हॉलसह ११ मोठे हॉल्स व्यवस्था या इमारतीमध्ये करण्यात आली आहे.

गर्दीचे कालावधीत रुम व हॉल व्यतिरिक्त प्रतिक्षा हॉल, गॅलरी या ठिकाणीही साईभक्त थांबतात. सदरची संख्याही सुमारे १००० पर्यंत असते. तसेच या व्यतिरिक्त मंडप व्यवस्थाही करण्यात येते. या सर्व साईभक्तांसाठी जनरल संडास बाथरुमची व्यवस्था कमी पडते त्या करीता भक्तावास इमारतीचे "BC" विंगचे तळमजल्यावर असणाऱ्या हॉलमध्ये जनरल संडास बाथरुम व्यवस्था करता येईल.

आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी BC विंग मध्ये नव्याने स्वतंत्र पुरूषांकरिता ८ बाथरुम व ७ संडास तसेच ८ वॉश बेशिन, वॉशिंग प्लेस, युरिनल व स्टोअरसह टॉयलेट ब्लॉक तयार करणे तसेच सध्या स्त्री व पुरुषांसाठी असलेल्या जनरल टॉयलेट ब्लॉकचा वापर फक्त स्त्रीयासाठीच ठेवणेचे यादृष्टीने त्यामध्ये वाढीव ४ बाथरुम करणे याकामी रु. ९,२६,१००.०० मात्र खर्चाचे एस्टीमेट सादर केले होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/११/२००६ चे अवये निर्णय क्र. ८९५ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली आहे.

याकामी वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी पुरविलेल्या कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. ०२/०२/२००७ ते दि. ०८/०२/२००७ पर्यंत ठेवण्यात आली आहे. सिलबंद निविदा सादर करण्याची अंतिम मूदत दि. ०९/०२/२००७ पर्यंत मूदत देण्यात आली आहे. त्यानुसार विहीत मूदतीत खालील पाच ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव पत्ता |
|---|---|
| ०१. | मे. आर.आर. कस्ट्रक्शन, नाशिक |
| ०२. | श्री. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव |
| ०३. | मे.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर |
| ०४. | मे. आर.एल.भुतडा, कोपरगांव |
| ०५ | श्री. मंगेश आर.लोढा, शिर्डी |

विहीत मूदतीत मे.आर.आर. कस्ट्रक्शन, नाशिक वगळता खालील चार ठेकेदारांनी निविदा प्राप्त झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव पत्ता |
|---|---|
| ०१. | श्री. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव |
| ०२. | मे.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर |
| ०३. | मे. आर.एल.भुतडा, कोपरगांव |
| ०४. | श्री. मंगेश आर.लोढा, शिर्डी |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता, निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव पत्ता | निविदेत देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | श्री. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव | १५% अधिक |
| ०२. | मे.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर | ६.३% अधिक |
| ०३. | मे. आर.एल.भुतडा, कोपरगांव | ९ % अधिक |
| ०४. | श्री. मंगेश आर.लोढा, शिर्डी | १५% अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५.** **मौजे येसगांव येथे साईभक्तांसाठी संस्थानमार्फत निवासस्थळ उभारणेकामी जागा मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.२००** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७९७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

"यावर सविस्तर चर्चा होऊन येसगांव तसेच देर्डे चांदवड येथे त्याचप्रमाणे गुहा तालुका राहुरी येथे ही साईभक्तांकरीता निवासस्थळ-तथा-विश्रांतीस्थान बांधणेकामी प्लॅन व एस्टिमेट तयार करण्यात यावे, असे ठरले."

मा.सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, येसगांव यांनी दिनांक ०९ डिसेंबर, २००६ रोजी दिनांक २२ नोव्हेंबर, २००६ रोजी झालेल्या ग्रामसभेतील ठराव क्रमांक ०८ ची प्रत इकडील कार्यालयास पाठविली आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे :

"ग्रामपंचायत सर्व्हे नंबर २/११ मध्ये ०० हे १९ आर जागा उपलब्ध असून सदर जागेमध्ये ग्रामपंचायतचे मंगल कार्यालय आहे. मंगल कार्यालयाच्या पुर्वेस १० गुंठे जागा साईभक्तांच्या निवासासाठी निवासस्थळ बांधणेकामी देण्यासाठी ग्रामसभेने मंजुर केले.

सदर जागा ही विनामुल्य देण्याचे ठरले. सदर बांधकाम झाल्यानंतर देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी ग्रामपंचायत येसगांवचे मंगल कार्यालय लक्ष्मीबाई सेवाभावी विश्वस्तव्यवस्था येसगांव यांचेकडे देण्यास ग्रामसभेने मान्य केले."

०१) वर नमुद केलेली, ग्रामपंचायत येसगांव यांची अट मान्य करणे अथवा न करणे याबाबत निर्णय होणेस विनंती.

०२) ग्रामपंचायत येसगांव यांची उपरोक्त अट मान्य केल्यास, शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, येसगाव येथे उभारण्यात येणारे निवासस्थळाची देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी ग्रामपंचायत येसगावचे मंगल कार्यालय लक्ष्मीबाई सेवाभावी विश्वस्तव्यवस्था, येसगाव यांचेकडेस देणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदर निवासस्थानाकरीता १० मोठ्या सतरंज्या,प्रत्येकी १०० ताटे, वाटी व ग्लासही देण्यात यावेत अशी सूचना मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी कली त्यास मान्यता देण्यात आली. तत्पुर्वी याकामी शासनाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६.** **शिर्डी पोलिस स्टेशन यांचे पेव्हींग ब्लॉक मिळणेबाबतचे पत्र**

**निर्णय क्र.२०१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७.** **नगर-मनमाड रस्ता (लांबी १६०५ मी.) व जुना पिंपळवाडी रस्ता (लांबी ४६५ मी.)फूटपाथ व मेडीयनला रंग देणे बाबत.**

**निणर्य क्र.२०२** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण नगर- मनमाड रस्त्याचे रुंदीकरण डांबरीकरण व फुटपाथचे काम संस्थानतर्फे करण्यात आलेले आहे. याबाबत सदर कामामध्ये सदर रस्त्याच्या दुभाजक व फुटपाथचे कर्बीग स्टोनला रंगकाम करण्यात आलेले होते. सदर रंगकाम करुन एक ते दिड वर्षाचा कालावधी झालेला असनू या रस्त्यांवरुन जड वाहनांची मोठ्या प्रमाणात वहातूक होत असते. त्यामुळे वाहनांच्या धुरामुळे सदर ठिकाणचा रंग खराब झालेला आहे.

दिनांक २१/१०/२००६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी नगर-मनमाड रोड डिव्हायडर सुशोभिकरण करणेकामी सूचना दिलेल्या आहेत. याकामी नगर-मनमाड रोड डिव्हायडरला रहदारीचे नियमाप्रमाणे रंगकाम करुन देणेस व त्याकामी येणारे योग्य त्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/११/२००६ निर्णय क्र. ९५४ अवये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरच्या दोन्ही रस्त्यांचे कर्बस्टोन व मेडीया यांना रंगकाम करणेकामी अंदाजे रुपये १,९०,०५०.०० मात्र अपेक्षीत आहे. याकामी आवश्यक असलेले रंग मटेरीअल खरेदी करुन सदरचे काम विभागामार्फत पूर्ण करुन घेता येईल. याकामी खालील रंग मटेरीअलची आवश्यकता आहे.

०१. पिवळा ऑईल पेंट:- ४०० लि.
०२. काळा ऑईल पेंट :- ४०० लि.
०३. टरपेंटाईन :- २०० लि.

वरीलपैकी ऑईल पेंट थेट खरेदीकरणे कामी अेशिया पेंट, नेरोलॅक पेंट, आय.सी.आय. पेंट इ. नामांकित कंपनीकडून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार अेशियन पेंट, नेरोलॅक पेंट, आय.सी.आय.पेंट इ. कंपन्यांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहे. टरपेंटाईन खरेदीसाठी स्थानिक पूरवठादारांकडून कोटेशन्स मागविता येतिल.

उपरोक्त कंपन्यांचे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | ऑईल पेंटचे नांव | मागणी | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | अेशियन पेंट,नाशिक | पिवळा | ४०० लिटर | २,६७७.०० प्रति २० लिटर |
| | | काळा | ४०० लिटर | २,३७६.०० प्रति २० लिटर |
| ०२. | कनसाई नेरोलॅक,पुणे | पिवळा | ४०० लिटर | २,६७७.०० प्रति २० लिटर |
| | | काळा | ४०० लिटर | २,३४५.०० प्रति २० लिटर |
| ०३. | आयसीआय पेंट,मुंबई | पिवळा | ४०० लिटर | २,४९९.०० प्रति २० लिटर |
| | | काळा | ४०० लिटर | २,१९८.०० प्रति २० लिटर |

यावर सविस्तर चर्चा होऊन, आयसीआय पेंट, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना ऑईल पेंट पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८. मौजे निमगाव-को-हाळे गट नं. १९५ मध्ये हेलीपॅडसाठी खडीकरण,डांबरीकरण व प्रतिक्षा कक्षाचे बांधकाम करणे कामासाठी आलेल्या निविदांवर निर्णय होणे बाबत**

**निर्णय क्र.२०३** मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/११/२००६ चे सभेतील निर्णय क्र. ८९२ अन्वये मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गट नं. १८३ मध्ये हेलीपॅडचे बांधकाम करणे करीता मान्यता देण्यात आली आहे.त्यानंतर दि.१७/०१/२००७ रोजी जगसन् एअरलाईन्स यांचेकडील विंग कमांडर श्री शर्मा यांनी श्री अनिल सानेवणे (पॅसो इंजिनियर्स) यांचे समवेत गट नं. १८३ व गट नं.१९५ मधील जागेची पहाणी केली. जगसन् एअरलाईन्स यांचेकडील विंग कमांडर श्री शर्मा यांनी हेलीपॅडची जागा सदर भूखंडावर कोठे असावी याबाबत सुचविले व मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार गट नं. १८३ ऐवजी गट नं. १९५ मध्ये हेलीपॅड तयार करणे बाबत ठरले आहे.

या कामासाठी,यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या फीवर तांत्रिक सल्लागार म्हणून आर्किटेक्ट मे.निकम पा.असो.श्रीरामपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचेकडून प्लॅन व एस्टीमेट, निविदा तयार करुन घेण्यात आले आहेत. सदर काम सुरु करणेसाठी दि. १३/०२/२००७ रोजीचे वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन को-या निविदा फॉर्मची विक्री दि. १३/०२/२००७ ते दि.१६/०२/२००७ पर्यंत ठेवण्यात आली होती. सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि. १७/०२/२००७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत मूदत देण्यात आली होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,कोपरगांव |
| ०२. | कुऱ्हाळे बी.एम., मढी, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कान्ट्रॅक्टर्स, कोपरगांव | १५% अधिक |
| ०२. | कुऱ्हाडे बी.एम., मढी, कोपरगांव | १.५% कमी |

यावर सविस्तर चर्चा होऊन, कुऱ्हाडे बी.एम., मढी, कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी संस्थानतर्फे तांत्रिक सल्लागाराची फी अदा करणेसाठी शिर्डी नगरपंचायत व राहाता नगरपरिषद यांना केलेल्या विनंती बाबत.**

**निर्णय क्र.२०४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० वैद्यकीय आर्थिक अनुदान रकमेबाबत**

**निर्णय क्र.२०५** सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात वैद्यकीय आर्थिक अनुदानाकरीता अंदाजपत्रकीय तरतूद रुपये ८ कोटी करण्यात आलेली आहे. त्यापैकी माहे जानेवारी २००७ अखेर एकूण रुपये ७,७७,,४३,८४१.०० वाटप करण्यात आलेले असून शिल्लक रक्कम रुपये २२,५६,१५९.०० आहे.

माहे मार्च २००७ अखेर करीता सुधारित बजेटमध्ये रुपये १,५०,००,०००.०० (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख मात्र) ची मागणी करण्यात आलेली असून लेखाशाखेकडून रुपये ३०,००,०००.०० मंजूर करण्यात आलेले आहेत.

माहे एप्रिल,२००६ ते जानेवारी २००७ अखेर वाटप केलेली रक्कम विचारात घेता दरमहा सरासरी रुपये ७५,००,०००.०० रक्कम खर्च होत असल्याने माहे फेब्रुवारी व मार्च २००७ या दोन महिन्याकरीता रुपये १,५०,००.०००.०० इतकी रक्कम आवश्यक आहे.

पैकी २००६-२००७ या वर्षातील शिल्लक रक्कम रुपये २२,५६,१५९.०० व सुधारित अंदाजपत्रकिय मंजूर रक्कम रुपये ३०,००,०००.०० अशी एकूण रक्कम रुपये ५२,५६,१५९.०० शिल्लक असून जादा रुपये १,००,००,०००.०० ची आवश्यकता भासणार आहे.

सुधारित अंदाजपत्रकात रुपये ३०,००,०००.०० मात्र ची तरतूद करुन सदरचे सुधारित अंदाजपत्रक राज्यशासन व धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंद घेण्यासाठी पाठविण्यात आलेले आहे.

तरी वैद्यकीय अर्थिक अनुदानासाठी लागणाऱ्या रुपये १,००,००,०००.०० (अक्षरी रुपये एक कोटी मात्र ) वाढीव रकमेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता उपकरणे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२०६** याबाबत वैद्यकीयउपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. कु.सायली विलास लचके यांनी वैद्यकीय उपचारासाठी वैद्यकीय मदत मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.२०७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. ग्रहण कालावधीमध्ये मंदिरामधील दैनंदिन कार्यक्रमात बदल करणे बाबत.**

**निर्णय क्र.२०८** मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५.०० ते रात्री २२.४५ असे असतात. या कालावधीमध्ये सुर्य/चंद्र ग्रहण (स्पर्श ते मोक्ष काल) आल्यास ते पाळण्याची परंपरा आहे व या वेळेत आरती,पुजा-अर्चा,दर्शन समाधी स्पर्श निषिध्द मानले जाते. ग्रहणाचा वेध कालावधी पाळला जात नाही.

**(अ)** दिनांक ४ मार्च २००७ रोजी पहाटे ३.०४ ते ६.४५ असे तीन तास आणि ४२ मिनिटे खग्रास चंद्रग्रहण आहे व ते पाळणे आवश्यक आहे. त्यामूळे मंदिरातील दैनंदिन कार्यक्रमामध्ये खालीलप्रमाणे बदल करावे लागतील.

०१) मंदिर पहाटे पहाटे २.१५ वाजता उघडणे
०२) काकड आरती पहाटे २.३० ते २.५२ वा
०३) मंत्राच्चार पहाटे ३.०४ ते ६.४६ वा
०४) श्रींचे मंगलस्नान पहाटे ६.५५ ते सकाळी ७.०५ वा
०५) शिर्डी माझे पंढरपुर सकाळी ७.१० वा व त्यानंतर दर्शन रांग सुरु होईल

या पूढील कार्यक्रम नित्याप्रमाणे होतील. या अगोदर दिनांक ९.११.२००३ रोजी चंद्रग्रहण आले होते. (स्पर्श ५.०७ वा व मोक्ष ८.३८ वा ) त्यावेळी मंदिर पहाटे ४.०० वा उघडले होते. व सकाळी ८.४५ वाजता शिर्डी माझे पंढरपूर आरती करण्यात आली होती.

(ब) दिनांक १९ मार्च २००७ रोजी खंडग्रास सुर्यग्रहण आहे. स्पर्श वेळ सकाळी ६.४९ वाजता व मोक्ष वेळ सकाळी ७.४० वाजता या दिवशी गुढी पाडवा आहे. दैनंदिन कार्यक्रमामध्ये ५.५० वाजता श्रींचे मंगलस्नान सुरु होते. मंगलस्नान भक्त दर्शन घेऊन बाहेर जातात. सकाळी ६.३० वाजता शिर्डी माझे पंढरपूर आरती होते. व त्यानंतर दर्शन रांग व पूजेची ताटे स्विकारली जाते. दिनांक १९.३.२००७ रोजी ग्रहणस्पर्श सकाळी ६.४९ वाजता सुरु होतो. त्यामुळे दैनंदिन कार्यक्रमामध्ये खालीलप्रमाणे बदल करावा लागेल.

०१) पहाटे ५.०० वाजता मंदिर उघडेल
०२) पहाटे ५.१५ वाजता काकडआरती सुरु होईल
०३) पहाटे ५.४५ वाजता काकड आरती संपल्यानंतर भक्तांचे दर्शन सुरु होईल, मात्र पुजेची ताटे स्विकारली जाणार नाही.
०४) सकाळी ६.४० वाजता दर्शन रांग बंद करुन भक्तांना जागेवर बसविणे.
०५) सकाळी ६.४९ ते ७.४० मंत्रोच्चार सुरु होईल.
०६) सकाळी ७.५० वाजता श्रींचे मंगलस्नान सुरु होईल.
०७) सकाळी ८.०० वाजता शिर्डी माझे पंढरपुर आरती सुरु होईल व त्यांनतर दर्शन रांग सुरु होईल व पुजेची ताटे स्विकारण्यात येतील, पुढील कार्यक्रम नित्यनेमाप्रमाणे होतील.

तरी उपरोक्तप्रमाणे ग्रहण कालावधीत मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ पालखी सेवेकरी मानधनाबाबत**

**निर्णय क्र.२०९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५. अपारंपारिक उर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प उभारणेबाबत मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांच्या आलेल्या इ-मेलवर निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.२१०** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८-०९-२००५ च्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं.०६ निर्णय क्र. ५३८ अन्वये अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प ऊभारणेकामी रु.१३ कोटी + प्रकल्पाच्या किंमतीच्या २.० टक्के (दोन टक्के) इतके महाउर्जाचे सल्लागार शुल्क, इतक्या खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर / बीड मागविणेस मान्यता मिळालेली होती. व त्यानुसार टेंडर विक्रीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बीड मागविण्यात आले होते.

वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर टेंडर / बीड मागविलेनंतर पवनचक्की प्रकल्पाकरीता ०३ टेंडर (बीड) प्राप्त झालेले बीडस दिनांक २५-११-२००६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर उघडण्यात येऊन या सभेत, बीड सादरकर्त्यांचे टेक्नीकल बीड हे मिटकॉन, पुणे यांचेकडे तपासणीसाठी देण्यात यावेत व मिटकॉन, पुणे यांनी त्वरीत संबंधीत टेक्नीकल बीड अभ्यासून त्यावर स्पष्ट अहवाल व अभिप्राय संस्थानकडे पाठविण्याचे करावे, असे ठरले होते. त्याअन्वये विद्युत विभागामार्फत जा.क्र. एसएसएस-विद्युत- -१६६५५-२००६ दिनांक २९-११-२००६ अन्वये मिटकॉन, पुणे यांचेकडे संबंधीत टेक्नीकल बीड देण्यात आलेले होते.

मिटकॉन यांनी दिलेल्या अभिप्रायावर निर्णयासाठी सदर प्रस्ताव दिनांक ०६-०१-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.मिटकॉन, पुणे यांनी संबंधीत टेक्नीकल बीड अभ्यासून त्यावर त्यांचा टेक्नो-कमर्शिअल इव्हाल्युएशन अहवाल व फायनल फायनान्सीअल इव्हाल्युएशन अभिप्राय संस्थानकडे पाठविला होता व मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०६-०१-२००७ च्या झालेल्या सभेपुढे या प्रकल्पाबाबत व रिपोर्टबाबत मिटकॉन, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.झाडे यांनी समक्ष उपस्थित राहून या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती सभेतील मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना दिली. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीचे मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. या प्रकल्पाबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना सविस्तर माहिती देऊन शंका निरसन केले.

मिटकॉन,पुणे यांनी संबंधित अभिप्राय देताना पत्रामध्ये शेवटी वरील महत्त्वपुर्ण बाबींचा विचार करता, मे. सुझलॉन एनर्जी लि.चा प्रस्ताव संस्थानच्या आवश्यकतेनुसार आहे. असे नमूद केलेले आहे. मे.सुझलॉन एनर्जी लि. प्रती मेगावॅट रु. ६,२३,२८,२००.०० नुसार प्रस्तावित २.५ मेगावॅट क्षमतेच्या पवनचक्की प्रकल्पासाठी रु.१५,५८,२०,५००.०० ( रु. पंधरा कोटी अठ्ठावन्न लाख वीस हजार पाचशे मात्र ) सर्व कर मिळून इतका खर्च येईल असे कळविले होते. तसेच मेडा, पुणे यांचेकडे प्रकल्प चालू होण्यापुर्वी भराव्या लागणाऱ्या सिक्युरीटी डिपॉझीटपोटी ( ही सिक्युरीटी डिपॉझीटची रक्कम पवनचक्की प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर परत मिळते.) रु.१५ लाख प्रती मेगावॅट प्रमाणे होणारी रक्कम रु. ३७,५०,०००.०० ( रु. सदतीस लाख पन्नास हजार मात्र ) या रक्कमेचा दरपत्रकात समावेश नसल्याचे व ही रक्कम संस्थानला मेडाकडे भरावी लागेल म्हणून कळविले होते.

दि. ०६-०१-२००७ रोजी झालेल्या सभेत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मे.एन.ई.जी. मायकॉन, चेन्नई व मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले. मे.एन.ई.जी. मायकॉन, चेन्नई यांचे प्रतिनिधी चर्चा / वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते, मे. सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री.दिपक संगल व श्री. आशिष गोयल हे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी त्यांचे देऊ केलेल्या दरात रु.५ लाख एकत्रित सूट देऊ केली. तसेच प्रकल्प उभारणीपासून ०१ वर्षाचे ऐवजी प्रकल्प उभारणीपासून पुढील सलग सहा वर्षे मशिनरीची गॅरंटी देण्याचे मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांनी कबूल केले आहे. या सहा वर्षात मशिनरीची कोणताही पार्ट खराब झाल्यास, ते त्याबदली मशिनरीचे कोणतेही चार्जेस न घेता फ्री बदलून देणार आहेत. तसेच पहिल्या वर्षी मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली हे मशिनरी ऑपरेशन - मेन्टेनन्सकामी लागणारा खर्च स्वत: करणार असून याबदली पहिल्या वर्षी ऑपरेशन - मेन्टेनन्सकामी लागणारा कोणताही चार्ज ते संस्थानकडून घेणार नाहीत.

यावर दिनांक ६.१.२००७ चे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन मे. सुझलॉन एनर्जी लि, दिल्ली यांनी दिलेले प्रती मेगावॅट रु. ०६,२३,२८,२००.०० प्रमाणे २.५ मेगावॅट क्षमतेच्या पवनचक्की प्रकल्पासाठी रु. ०६,२३,२८,२००.०० x२.५ मेगावॅट रु.१५,५८,२०,५००.०० वजा डिस्काऊंट रु ०५,००,०००.०० = रु.१५,५३,२०,५००.०० ( रु. पंधरा कोटी त्रेपन्न लाख वीस हजार पाचशे मात्र ) सर्व कर मिळून हे दर मान्य करण्यात आलेले व त्यांना कार्यादेश द्यावा म्हणून ठरले आहे. यानंतर श्री.दिपक संगल द्वारा मे. सुझलॉन एनर्जी लि, दिल्ली यांनी आता दि. ०६-०२-२००७ रोजी व दि. ०९-०२-२००७ ई-मेल पाठविले आहेत. या इ-मेलमध्ये प्रकल्पाची नमूद किंमत ही या २.५ मेगावॅट

प्रकल्पासाठी पूर्वी कळविलेल्या व निगॉशिएशनमध्ये सूट दिलेल्या किंमतीपेक्षाही कमी दर्शविलेली आहे. म्हणजेच दि.६-१-२००७ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री.दिपक संगल व श्री. आशिष गोयल यांनी निगॉशिएशनमध्ये कबूल केलेल्या रु.१५,५८,२०,५००.०० या दरात रु.५ लाख इतकी सूट देऊन झालेल्या

रु.१५,५८,२०,५००.०० या किंमतीपेक्षा कमी असून आता रु.१५,३९,६४,८००.०० इतकीच किंमत प्रकल्पाची होत आहे. याकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना एकाच नांवाने व एकच ऑर्डर देण्याऐवजी या प्रकल्पाच्या विविध कामासाठी मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांच्या सिस्टर कन्सर्न असलेल्या इतर कंपन्याच्या वेगवेगळ्या नांवाने ऑर्डर द्याव्यात असे कळविले आहे.तसेच विंड मिल जनरेटर पुरविणेकामी, वैध बँक गॅरंटी मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांचेकडून घेऊन त्यापोटी ३५% मोबालायझेशन ॲडव्हॉन्स मिळावा म्हणून विनंती केली आहे.

| | |
|---|---|
| (१) मे. सुझलॉन एनर्जी लि, दिल्ली यांनी टेंडरमध्ये कळविलेली किंमत | रु. १५,५८,२०,५००.०० |
| (२) दि.०६-०१-२००७ च्या मा.व्य. समितीच्या सभेत दिलेली सूट | रु. ००,०५,००,०००.०० |
| येणारी किंमत | रु. १५,५३,२०,५००.०० |
| (३) दि.०९-०२-२००७ च्या इ-मेलद्वारे कळविलेली किंमत | रु. १५,३९,६४,८००.०० |
| आणखी मिळालेली सूट | रु.००,१३,५५,७००.०० |

तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव व गांव | | |
|---|---|---|---|
| ०१) | मे.सुझलॉन एनर्जी लि. दमण | विन्ड मील जनरेटर पुरविणे | रु.०९,०५,१७,०००.०० |
| ०२) | मे.सुझलॉन टॉवरस ॲण्ड स्ट्रक्चर्स लि.पुणे | विन्ड मील जनरेटरसाठी लागणारे टॉवर पुरविणे | रु.०२,००,३३,०००.०० |
| ०३) | मे.सुझलॉन विनफार्म सर्व्हिसेस लि.पुणे | इलेक्ट्रिकल ट्रान्सफॉर्मर व इतर साहित्य पुरविणे | रु.००,८२,२१,०००.०० |
| ०४) | मे.सुझलॉन विनफार्म सर्व्हिसेस लि.मुंबई | इलेक्ट्रिकल लाईन्स टाकणे | रु.००,९८,२५,४९०.०० |
| ०५) | मे.सुझलॉन विनफार्म सर्व्हिसेस लि.मुंबई | विन्ड मील जनरेटरची उभारणी करणे | रु.०१,२०,८०,३९१.०० |
| ०६) | मे.सुझलॉन विनफार्म सर्व्हिसेस लि.मुंबई | विन्ड मील जनरेटर,टॉवर, ट्रान्सफॉर्मर साठी फाऊंडेशन व सिव्हिल काम | रु.०१,०२,८७,९१९.०० |
| ०७) | मे.सर्जन रिॲलिटीज लि., पुणे | विन्ड मील जनरेटरसाठी लागणारी जमिन पुरविणे | रु.००,३०,००,०००.०० |
| | | एकुण रक्कम ( विदाऊट सी-फॉर्म) रु. | रु.१५,३९,६४,८००.०० |

मे. सुझलॉन एनर्जी लि, दिल्ली यांनी दि. ०६-०२-२००७ रोजी व दि. ०९-०२-२००७ रोजी पाठविलेल्या ई-मेलमध्ये २.५ मेगावॅट प्रकल्पासाठी निगॉशिएशनमध्ये कबूल केलेल्या रु.५ लाख इतक्या सूटव्यतिरिक्त आणखी रु.१३,५५,७००.०० एवढ्या रक्कमेची सूट दिलेली आहे. मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांनी कळविलेली वरील किंमत रु.१५,३९,६४,८००.०० ही विदाऊट सी-फॉर्म आहे. तसेच ही सूट मिळण्याकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना एकाच नांवाने व एकच ऑर्डर देण्याऐवजी या प्रकल्पाच्या विविध कामासाठी मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांच्या सिस्टर कन्सर्न असलेल्या वर नमूद केलेल्या सात कंपन्याच्या वेगवेगळ्या नांवाने ऑर्डर देण्यासाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन

(अ) मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांच्या दि. ०९-०२-२००७ रोजी पाठविलेल्या ई-मेलनुसार मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना एकाच नांवाने व एकच ऑर्डर देण्याऐवजी या प्रकल्पाच्या विविध कामासाठी मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांच्या सिस्टर कन्सर्न असलेल्या वर नमूद केलेल्या सात कंपन्याच्या वेगवेगळ्या नांवाने ऑर्डर दिल्याने प्रकल्पाची किंमत रु.१३,५५,७००.०० ने कमी होऊन प्रकल्पासाठी होणारा खर्च कमी होणार असल्याने मे. सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना एकाच नांवाने व एकच ऑर्डर देण्याऐवजी या प्रकल्पाच्या विविध कामासाठी मे.सुझलॉन एनर्जी लि. दिल्ली यांच्या सिस्टर कन्सर्न असलेल्या वर तक्यात नमूद केलेल्या सात कंपन्याच्या वेगवेगळ्या नांवाने ऑर्डर देण्यास व कार्यादेश दिल्याच्या तारखेपासून हा प्रकल्प पाच महिन्याच्या आत उभारणी करून कार्यान्वित करण्याचे मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांना बंधनकारक राहील असे कार्यादेशात व करारनाम्यात नमूद करण्यात यावे.

(ब) मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांच्या दि. ०९-०२-२००७ रोजी पाठविलेल्या ई-मेलनुसार उपरोक्त तक्यात नमूद असलेल्या अ.नं. ०१ च्या मे. सुझलॉन एनर्जी लिमिटेड यांना, विंड मिल जनरेटर पुरविणेकामी, यासंबंधी कार्यादेशाच्या एकुण किंमतीच्या म्हणजे रु. रु.०९,०५,१७,०००.०० च्या ३५% मोबीलायझेशन ॲडव्हॉन्सपोटी होणारी रक्कम रु. ३,१६,८०,९५०.०० इतकी रक्कम मे.सुझलॉन एनर्जी लि.दिल्ली यांचेकडून वैध बँक गॅरंटी घेऊन त्यापोटी देणेस,

(क) प्रकल्प चालू होण्यापुर्वी मेडा,पुणे यांचेकडे भराव्या लागणाऱ्या सिक्युरीटी डिपॉझीटपोटी (ही सिक्युरीटी डिपॉझीटची रक्कम पवनचक्की प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर परत मिळते) रु.१५ लाख प्रती मेगावॅट प्रमाणे २.५ मेग़ावॅटसाठी होणारी रक्कम रु. ३७,५०,०००.०० (रुपये सदतीस लाख पन्नास हजार मात्र) भरणेस,

(ड) या कमी झालेल्या रु. रु.१५,३९,६४,८००.०० या प्रकल्पाच्या किंमतीच्या अनुषंगाने (१) मेडा यांचे प्रकल्पाच्या किंमतीच्या २ % व त्यावर १२.५ सर्व्हिस टॅक्सप्रमाणे होणारे चार्जेस रु. ३४,६४,२०८.०० व (२) तज्ज्ञ सल्लागार मे. मिटकॉन, पुणे यांची २.५ % व त्यावर १२.५ % सर्व्हिस टॅक्सप्रमाणे होणारी सल्लागार फी रु. ४३,३०,२६०.०० आदा करणेस,

(ई) वरील सर्व { (अ) ते (ड) } मिळून पवनचक्की प्रकल्पासाठी एकुण होणाऱ्या रु. १६,५५,०९,२६८.०० (रु.सोळा कोटी पंचावन्न लाख नऊ हजार दोनशे अडुसष्ट मात्र) (मेडा,पुणे यांचेकडे भराव्या लागणाऱ्या सिक्युरीटी डिपॉझीटची रक्कम धरून ) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. एनर्जी सेव्हींगसाठी एनसेव्ह उपकरणे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२११** सध्या सर्वत्र वीजेच्या कमी पुरवठ्यामुळे वीजेचे भारनियमन चालू आहे. हे भारनियमन कमी करण्यासाठी वीजेचा वापर कमी करून वीजेची मागणी व वीजेचे उत्पादन यातील दरी कमी करू शकतो. यासाठी एनर्जी सेव्हिंग्ज महत्त्वाचे आहे.

दिनांक १४-१०-२००६ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर मे. ॲसेंट पॉवर सिस्टिम प्रा.लि., पुणे यांचे प्रतिनिधी श्री जी.एन.चौधरी व श्री . एस.पी.साळुंके हे उपस्थित होते, त्यांनी या उपकरणाबद्दल सविस्तर माहिती सभेस करुन दिली. व संस्थानने धर्मशाळेच्या स्ट्रीट लाईटचा भाग एक महिन्यांकरीता उपलब्ध करून दिला, तर हे उपकरण बसवून त्याठिकाणचे लाईट बीलात बचत झाल्याचे दाखवून देऊ असे सांगितले. यावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, मे. ॲसेंट पॉवर सिस्टिम प्रा.लि., पुणे यांना संस्थानचे मंदिर परिसरातील स्ट्रीटलाईटसाठी उपकरण एक महिन्यांकरीता बसविण्यास परवानगी देण्यात यावी. व एक महिन्यांचे मुदतीनंतर वीजखर्चाचे बाबतीत मे. ॲसेंट पॉवर सिस्टिम प्रा.लि., पुणे यांचेकडून अहवाल मागवून घ्यावा, असे ठरले होते.

यानुसार मे.ॲसेंट पॉवर सिस्टिम प्रा.लि., पुणे यांचे प्रतिनिधी श्री जी.एन.चौधरी यांनी दिनांक १६-१०-२००६ रोजी संस्थानचे धर्मशाळा परिसरातील स्ट्रीटलाईटसाठी एनसेव्ह उपकरण महिन्याच्या कालावधीकरिता बसविले होते. या एनसेव्ह उपकरणाद्वारे एनर्जी सेव्हिंग्ज होत असल्याचे आढळून आले होते. तसा अहवाल मे.ॲसेंट पॉवर सिस्टिम प्रा.लि., पुणे यांनी पाठविला व यानंतर त्यांनी संस्थानच्या सर्व विभागातील उपकरणांची व लोडची पाहणी केली आणि एनर्जी सेव्हींग्जसाठी प्रथम टप्प्यात खालीलप्रमाणे इमारतीकरीता एनसेव्ह उपकरण सुचविले आहे.

| अ.क्र. | इमारतीचे/विभागाचे नांव | क्षमता | नग | दर रुपये | एकूण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई मंदिर | ५० के.व्ही.ए. | ०१ | १,१२,५००.०० | ०१,१२,५००.०० |
| ०२ | शांतिनिवास इमारत | ७५ के.व्ही.ए. | ०१ | ०१,६८,७५०.०० | ०१,६८,७५०.०० |
| ०३ | साईप्रसाद इमारत क्र.०१ | २५ के.व्ही.ए | ०१ | ५६,२५०.०० | ५६,२५०.०० |
| ०४ | साईप्रसाद इमारत क्र.०२ | २५ के.व्ही.ए | ०१ | ५६,२५०.०० | ५६,२५०.०० |
| ०५ | पी.आर.ओ. जवळील रुमस | १५ के.व्ही.ए | ०१ | ३३,७५०.०० | ३३,७५०.०० |
| | | | | एकूण | ४,२७,५००.०० |
| | | | + वॅट १२.५ टक्के | | ५३,४३८.०० |
| | | | | एकूण | ४,८०,९३८ |
| | | | + इरेक्शन + कमिशनिंग चार्जेस ४ टक्के | | १९,२३८.०० |
| | | | | एकूण | ५,००,१७५.०० |
| | | | | पूर्णांकित रुपये | ५,००,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे एनसेव्ह उपकरण कोटेशन मागवुन बसविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,००,०००/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७ श्रीसमाधी मंदीरात नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये भिंतीवरील स्प्लिट टाईप ए.सी.बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२१२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. जनरेटर खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.२१३** श्री रामनवमी उत्सव २००७ हा दिनांक २६.३.२००७ ते दिनांक २८.०३.२००७ अखेर साजरा होणार आहे. सदर उत्सवासाठी मुंबई येथून येणारे पदयात्रींसाठी पडघा जि.ठाणे ते शिर्डी पर्यंत दरवर्षीप्रमाणे

पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावयाची आहे. सदर मार्गावर बरेच ठिकाणी पाण्याचे टँकर भरणेसाठी इलेक्ट्रीक सप्लाय नसल्यामूळे अडचण निर्माण होते. विशेषतः विल्होळी ते घाटनदेवी या दरम्यान ही अडचण भासते. मागील उत्सवात सदरचे ठिकाणी एका विहीर मालकाने मोफत पाणी दिले होते. परंतू लाईट नसल्यामूळे पाणी भरता आले नाही. व पर्यायाने इगतपूरी येथून पाणी भरुन आणावे लागले. यामध्ये वेळेचा अपव्यय होऊन डिझेलचा खर्च वाढला. त्यामूळे सदरचे विहीरीवर जनरेटर ठवेला तर वेळोवेळी पाणी भरता येईल व वेळ तसेच डिझेलचा खर्च वाचेल.

याकरीता कोटेशन्स मागवून जनरेटर खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३०,०००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२००७ करीता पालखी मार्गावर श्री साईभक्तांना पिण्याचे पाण्याची लाईट नसल्यामूळे गैरसोय होऊ नये याकरीता एक जनरेटर कोटेशन्स मागवून मा.कार्यकारी अधिकारी यांनी निम्नतम दराने खरेदी करावे असे ठरले.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **नवीन प्रसादालयाकरीता स्टीम बॉयलर खरेदी बाबत**
**निर्णय क्र.२१४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **नवीन प्रसादालयामध्ये सौरउर्जा यंत्रणा उभारणीसाठी कन्सलटंटची नियुक्ती करणे बाबत.**
**निर्णय क्र.२१५** सध्या चालू असलेल्या प्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेसाठी एल.पी गॅसचा वापर करण्यात येत आहे. गॅसची वाढती किंमत तसेच उपलब्धता याचा विचार करुन इंधनाची बचत व्हावी यादृष्टीने संस्थानने सध्याचे प्रसादालयात ४० सौरउर्जा डिश बसविलेले आहेत. हा प्रकल्प उभारणी करतांना मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. वलसाड यांचेकडून खरेदी व उभारणी करण्यात आलेला आहे.

आता नवीन प्रसादालय इमारतीचे काम प्रगतीपथावर असून या ठिकाणीही १४२ डिशची सौरउर्जा यंत्रणा उभारणी करण्याचा प्रस्ताव आहे. सदरची सौरउर्जा यंत्रणा खरेदी ,उभारणी करण्यासाठी येणा-या खर्चाचे इस्टीमेट मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि., वलसाड यांचेकडून घेण्यात आलेले आहे. सुमारे २० हजार व्यक्तींचे भोजन तयार करावयाचे आहे. हे ग्राहय धरुन उभारणी करावयाच्या सौर उर्जा यंत्रणेसाठी सध्याच्या चालू असलेल्या ४० डिशेस नवीन प्रसादालयाचे ठिकाणी वापरून, तसेच १०२ डिशेस नव्याने खरेदी करता येतील. हे विचारात घेउन एकूण १४२ डिशेसची सौरउर्जा यंत्रणा उभारणीसाठी अंदाजे रुपये १ ,३६,८०,०००/- एवढा खर्च येईल.असे मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि., वलसाड यांनी कळविलेले आहे.

त्यानूसार सौरउर्जा यंत्रणा खरेदी व उभारणीसाठी अंदाजे येणा-या खर्चास व त्यासाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन एजन्सीकडून निवीदा मागणी करण्यास मान्यता मिळणेबाबत दिनांक ०६/०१/२००७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यता मिळालेली आहे.

तथापी , सौरउर्जा यंत्रणा उभारणी करणेचे कामासाठी , कन्सलटंट नियुक्ती करणे आवश्यक आहे. यासंदर्भात संस्थानच्या मा.व्यवस्थापन समिती , सदस्या श्रीमती उर्मिला जाधव यांनी दि.०९/०२/२००७ रोजी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण., पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. तोरणे (मॅनेजर सोलर) यांचशी फोनवरुन चर्चा केली असता प्रोजेक्ट रकमेच्या ३% फी घेउन कन्सलटंट म्हणून काम करण्यास तयार आहेत. असे त्यांनी सांगितले आहे. त्यानूसार त्यांना दि.१०/०२/०७ चे पत्राव्दारे कळविले असता त्यानीं दि.१३.०२.२००७ च्या पत्रामध्ये प्रोजेक्ट किंमतीच्या १०% सल्लागार फी कळविली आहे.

मात्र उपरोक्त १०% रक्कम जास्त वाटत असल्याने मा.डॉ.श्री तोरणे सो. व श्री महेश झगडे, डायरेक्टर जनरल महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेशी चर्चा केल्यानंतर त्यांनी पूर्वीप्रमाणेच ३% रक्कम सल्लागार फी दिली तरी चालेल असे सांगितले.

तरी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, पुणे यांचे प्रतिनिधींशी समक्ष केलेल्या चर्चे प्रमाणे संस्थानचे नवीन प्रसादालयामध्ये सौरउर्जा यंत्रणा उभारणी करण्यासाठी ३% दराने महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, पुणे यांना कन्सलटंट म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होवून नवीन प्रसादालयामध्ये सौरउर्जा यंत्रणा उभारणीसाठी महाराष्ट्र उर्जा विकास अधिकरण, पुणे यांना सल्लागार म्हणून प्रोजेक्ट रक्कमेच्या ३% रक्कम फी म्हणून देणेस मान्यता देण्यात आली. मात्र त्याकामी महाराष्ट्र उर्जा विकास अधिकरण यांना पत्र पाठवून त्यांचेकडून ३% रक्कम मान्य असलेबाबत लेखीपत्र घेणेत यावे असे ठरले.

याचवेळेस नविन प्रसादालयाकरिता किचन इक्विपमेंट व अलाईड सिस्टम यंत्रणा खरेदीकामी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी व्यवस्थापन समितीचे

दिनांक ६.१.२००७ चे सभेतील निर्णय क्र.२४ अन्वये नियुक्त केलेल्या उपसमितीने चर्चा/वाटाघाटीने अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१ सुमोना बागची कृत बंगाली भाषेत रुपांतरीत श्री साई सगुणोपासना आरती पुस्तक छपाई कामाचे कोटेशन उघडून निर्णय घेणे**

**निर्णय क्र.२१६** व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.१०.२००६ चे सभेतील निर्णय क्र.८१३ अन्वये श्रीमती सुमोना बाक्ची नवी दिल्ली यांचेद्वारा बंगाली भाषेत रुपांतरीत केलेले श्रीसाई सगुणोपासना आरती पुस्तक प्रकाशित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

श्रीसाई सगुणोपासना आरती बंगाली पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५ हजार प्रतींची छपाई श्रीमती सुमोना बाक्ची,नवी दिल्ली यांचे मार्गदर्शनाखाली करुन घेणे असल्याने श्रीमती सुमोना बाक्ची,यांनी नवी दिल्ली येथील खालील तीन प्रेसधारकांचे कोटेशन्स सादर केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.डि.आर.व्ही.प्रिन्टर्स,प्रा.लि.,जनकपूर,नवी दिल्ली |
| ०२ | मे.श्रृंखला प्रिन्टोग्राफिक्स प्रा.लि.,नवी दिल्ली |
| ०३ | मे.सोहन आर्ट,प्रा.लि.,नवी दिल्ली |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे.डि.आर.व्ही.प्रिन्टर्स,प्रा.लि.,जनकपूर,नवी दिल्ली | १५.०० |
| ०२ | मे.श्रृंखला प्रिन्टोग्राफिक्स प्रा.लि.,नवी दिल्ली | १२.५० |
| ०३ | मे.सोहन आर्ट,प्रा.लि.,नवी दिल्ली | १७.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्रृंखला प्रिन्टोग्राफिक्स प्रा.लि.,नवी दिल्ली यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना श्रीसाई सगुणोपासना आरती बंगाली पुस्तकाचे छपाईकामी कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २२ नवीन ट्रॅक्टर खरेदी बाबत**

**निर्णय क्र.२१७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २३ किटकनाशक (पेस्ट कंट्रोल) फवारणीबाबत.**

**निर्णय क्र.२१८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २४ श्री साई मंदिराकरीता सिक्युरिटी सिस्टीम बसविणेकरीता कंन्सल्टन नेमणे बाबत**

**निर्णय क्र.२१९** श्रीसाईदर्शनाकरिता येणाऱ्या साईभक्तांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असुन येणाऱ्या साईभक्तांमध्ये महत्वांच्या व अतिमहत्वांच्या व्यक्तींचा समावेश असतो. सध्या अतिरेकी कारवायांमध्ये वाढ झालेली असुन महत्वाचे व गर्दी असलेल्या धार्मीकस्थळांवर अतिरेक्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे. श्री साईमंदिर हे जागतीक किर्तीचे धार्मीकस्थळ असल्याने श्री साईमंदिराला अतिरेक्यांकडुन धोका असल्या बाबत पोलिस गुप्तचर विभागाने वेळोवेळी सुचित केले आहे.

श्रीसाईमंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षिततेकरिता तादिरन सिक्युरिटी सिस्टीम बाबत इस्त्राईल येथील कंपनीचे प्रतिनीधी यांनी सर्व्हे करुन प्रोजेक्ट सादर केला होता. सदर सिक्युरिटी सिस्टीम बाबतची माहिती मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व मा. पोलिस महासंचालक व इतर अधिकारी यांना देण्यात आली आहे. सदर सिक्युरिटी सिस्टीम अत्याधुनिक संगणिकृत असल्याने या बाबतचे सखोल ज्ञान असलेल्या व्यक्तीची कंन्सल्टन म्हणुन नेमणुक करुन सिक्युरिटी सिस्टीम कार्यान्वीत करणे योग्य राहील.

श्री.एम.सी. मंगलनाथन, नवी दिल्ली यांनी दि. ०३ डिसेंबर २००६ रोजी टेम्पल सिक्युरिटी डिझाईनींग करिता कंन्सल्टन म्हणुन नेमणुक करणे बाबत विनंती केली आहे. त्यांचे शिक्षण बी. ई. (इलेक्ट्रॉनीक्स ॲन्ड कम्युनिकेशन) असुन त्यांनी ऐअरपोर्ट ॲथोरीटी ऑफ इंडीयामध्ये वेगवेगळया पदांवर २८ वर्षे काम केले असुन जनरल मॅनेजर, (इलेक्ट्रॉनिक्स) म्हणुन रिटायर झालेले आहेत. त्यांना संरक्षण संदर्भात असलेल्या विवीध इलेक्ट्रॉनिक्स साधने, सिस्टीमची माहिती आहे. त्यांनी मुंबई, दिल्ली, कोलकत्ता, चेन्नई येथील विमानतळचे सिक्युरिटी सिस्टीमचे डिझाईनींग व इन्स्टॉलेशन केलेले आहे.

श्री.एम. सी. मंगलनाथन, नवी दिल्ली यांना श्री साई मंदिर व मंदिर परिसर सुरक्षेकरिता आवश्यक योजना व सिक्युरिटी सिस्टीम बसविणे संदर्भात कन्सल्टंट म्हणुन नेमणुक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर श्री.एम. सी. मंगलनाथन, नवी दिल्ली यांचेशी सविस्तर चर्चा होऊन, त्यांची कन्सलटंट महणून नेमणूक करणेस व त्याकामी त्यांना रुपये ४ लक्ष अधिक सर्व्हीस टॅक्स त्यांची फी म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २५** **गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना साईगंगा मिनरल वॉटरची विक्री करणेकामी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील दिलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत**

**निर्णय क्र.२२०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **शिर्डी नगरपंचायत शिरडी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण करा(पथकरा) बाबत**

**निर्णय क्र.२२१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **जलतरणपटू कु.वैशाली भाष्कर रिटे,अमरावती हिला प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.२२२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८** **श्री.आप्पासाहेब भिमराज ढूस,देवळाली ता.राहूरी यांना स्कायडायव्हींग या खेळाचे जागतिक विक्रमासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२२३** श्री.आप्पासाहेब भिमराज ढुस, देवळाली,ता.राहुरी यांनी दि.०१/०२/२००७ चे पत्रान्वये केलेली विनंती अमान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९** **श्री आण्णासाहेब गो.गागरे,राहूरी यांचे पाल्यांना बुध्दीबळ खेळासाठी आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.२२४** श्री आण्णासाहेब गो.गागरे,राहूरी यांचे पाल्यांना बुध्दीबळ खेळासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत करण्यात आलेली विनंती अमान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३०** **अमेय पालक संघटना,ठाणे व क्षितीज मतिमंद मुलांची शाळा डोंबीवली यांना आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.२२५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३१** **श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट,शिर्डी यांना मंदिराचे अपूर्ण बांधकाम व इतर कामास आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२२६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३२** **विविध संस्थांनी मागणी केलेल्या शिध्याबाबत.**

**निर्णय क्र.२२७** (०१) खाली दर्शविलेल्या समितीने मा.चेअरमनसाहेब,/मा.कार्यकारी अधिकारीसाहेब श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | लक्ष्मणबाबा होडगर, श्री सिध्देश्वर ज्ञानपीठ व संशोधन केंद्र, डिंग्रस (मालुंजा), ता.संगमनेर, जि.अहमदनगर | श्री क्षेत्र डिंग्रस येथे दि. १३/०२/२००७ ते दि. १७/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व महाशिवरात्र महोत्सव कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. | श्री.वाकचौरे, शिधा देण्यात यावा.मा.अध्यक्ष यांचा शेरा. |
| ०२. | सचिव,श्रीसिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट, मु.पो.मंजूर, ता.कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर फोननं. २६५३३१ | श्री क्षेत्र मंजूर येथे दि.१०/२ ते १७/२/०७ अखेर अखंड पंच महायाग सप्ताहाचे आयोजन केले असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. | |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त अ.नं.०१यांना यापुर्वी रु.४९,५८४.१५ पैसे व अ.नं. ०२ यांना रु.२४,६६१/- इतक्या रकमेचा शिधा देण्यात आलेला आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त

कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी अ.नं. १ लक्ष्मणबाबा होडगर, श्री सिध्देश्वर ज्ञानपीठ व संशोधन केंद्र, डिंग्रस (मालुंजा), ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांना श्री क्षेत्र डिंग्रस येथे दि. १३/०२/२००७ ते दि. १७/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व महाशिवरात्र महोत्सव कार्यक्रम व अ.नं. २ मधील सचिव, श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट, मु.पो.मंजूर, ता.कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर यांना श्री क्षेत्र मंजूर येथे दि.१०/२ ते १७/२/०७ अखेर अखंड पंच महायाग सप्ताहाचे आयोजन केले असून होणार असून महाप्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू प्रत्येकास शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(०२) खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प.बबन महाराज गव्हाणे, मु.अंजनापूर, पो. रांजणगांव -देशमुख, ता.कोपरगांव, जि. अहमदनगर | श्री क्षेत्र पुणतांबा येथे दि. २१/०२/२००७ ते दि. २८/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०२. | गोरक्षगिरी गुरु नारायणगिरी, मु.पो.केलवड, ता.राहाता, जि.अहमदनगर मो.नं.९८८१७६६४०४ | दि. २१/०२/२००७ ते दि. २८/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व भागवत कथा पारायण सोहळा कार्यक्रम होणार असून महा- प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त दर्शविलेल्यांनी पहिल्यांदाच शिधा स्वरुपात मागणी केलेली आहे. तसेच अ.नं.२ मधील हि व्यक्तीची मागणी असून एका व्यक्तीने आयोजित केलेल्या सप्ताहास शिधा द्यावा किंवा कसे याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच मागणी ही लेटरहेडवर नसून साध्या कागदावर करण्यात आलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी अ.नं.१- ह.भ.प.बबन महाराज गव्हाणे,मु.अंजनापूर, पो. रांजणगांव -देशमुख, ता.कोपरगांव, जि. अहमदनगर यांना श्री क्षेत्र पुणतांब्यात दि. २१/०२/२००७ ते दि. २८/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रम होणार असून रु.१५,०००/- पर्यंतच्या व अ.नं.२- गोरक्षगिरी गुरु नारायणगिरी, मु.पो.केलवड, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना दि. २१/०२/२००७ ते दि. २८/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व भागवत कथा पारायण सोहळा कार्यक्रम होणार असून रु.११,०००/- पर्यतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(०३) खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.अमोल थेटे, अध्यक्ष, सप्ताह कमेटी, प्रवरानगर, पंचवटी, ता.राहाता. जिल्हा-अहमदनगर फोन नं. २६५३३१ | महाशिवरात्रीनिमित्त दि.१०/२ ते १७/२/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |
| ०२. | अध्यक्ष, स्वयंभु त्रिवेणीश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट, हंडिनिमगांव/सुरेशनगर, | महाशिवरात्रीनिमित्त दि.१३/०२ ते दि.१६/०२/२००७ अखेर महारुद्र स्वाहाःकार यज्ञ व शिवलिलामृत पारायण सोहळा | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ता.नेवासा, जि.अहमदनगर | आयोजित केला असून महाप्रसादासाठी फराळाचे शिधास्वरुपात मदत मिळावी. | |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त कमेटी व ट्रस्ट यांनी पहिल्यांदाच शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी (०१) श्री.अमोल थेटे,अध्यक्ष, सप्ताह कमेटी, प्रवरानगर(पंचवटी),ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर यांना महाशिवरात्रीनिमित्त दि.१०/२ ते १७/२/०७ अखेर होणा-या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे महाप्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या व (०२) अध्यक्ष, स्वयंभु त्रिवेणीश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट, हंडिनिमगांव / सुरेशनगर, ता.नेवासा, जि.अहमदनगर यांना महाशिवरात्रीनिमित्त दि.१३/२ ते १६/२/०७ अखेर होणा-या महारुद्र स्वाहाःकार यज्ञ व शिवलिलामृत पारायण सोहळ्याचे महाप्रसादासाठी रु.२१,०००/- पर्यंतच्या वस्तू प्रत्येकास शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(०४) खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकरीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाक्चौरे, अध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर फोन नं. ०२४२३२५७२८१ | शिर्डी गावात दि. २१/०२/२००७ ते दि. २८/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्रीज्ञानेश्वर पारायण सोहळा कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त यांना यापुर्वी रु.२४,९७४.४० पैसे इतक्या रकमेचा शिधा देण्यात आलेला आहे.
प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाक्चौरे, अध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांना शिर्डी गावात दि. २१/०२/२००७ ते दि. २८/०२/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वर पारायण सोहळा कार्यक्रम होणार असून रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(०५) खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, ओम गुरुदेव सत्संग मंडळ, श्रीरामपूर. जि.अहमदनगर | दि.०१/०४/२००७ रोजी श्री संत जंगलीदासजी महाराज यांचे भव्य सत्संग व पौर्णिमा दर्शन सोहळा कार्यक्रमाचे महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

उपरोक्त मंडळांनी पहिल्यांदाच शिधा स्वरुपात मागणी केलेली आहे. सदरचे मंडळ रजिस्टर्ड नाही.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी अध्यक्ष, ओम गुरुदेव सत्संग मंडळ, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना दि.०१/०४/२००७ रोजी श्री संत जंगलीदासजी महाराज यांचे भव्य सत्संग व पौर्णिमा दर्शन सोहळ्याचा कार्यक्रम होणार असून रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **बडोदे येथे पादूका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलन भरविणेबाबत.**

**निर्णय क्र.२२८** श्री जयसिंह बं निंबाळकर,अध्यक्ष, ओम श्री साईभक्त परिवार ट्रस्ट, बडोदे यांचे दि. १९/०१/२००७ रोजीचे पत्रान्वये बडोदे व गुजरात येथील भक्तांसाठी बडोदे येथे साई भक्तांना दर्शनासाठी पादुका पाठविणेबाबत व साई भक्त संमेलन आयोजित करणेबाबत विनंती केली आहे. यापुर्वीही त्यांनी याबाबत पत्रव्यवहार केला होता. तथापि तारखा उपलब्ध नसलेने कार्यक्रम पुढे करण्याचे ठरले. त्यानुसार त्यांनी दि.१७/३ ते १९/३/०७, दि.३१/०३ ते ०२/०४/२००७ व दि. ०७/०४/२००७ ते दि. ०९/०४/२००७ अश्या तारखा संमेलन भरविणेबाबत कळविल्या आहेत व त्यापैकी एक तारीख निश्चित करणेबाबत विनंती केलेली आहे.

साईभक्त संमेलन कार्यक्रम हा अधिनियम २००४, १७(ड) मध्ये समितीचे कर्तव्य व अधिकार मध्ये नमुद केलेप्रमाणे - श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल. या नुसार घेता येईल. त्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

दि.०६/०१/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १०१ अन्वये संबंधितांना चर्चेसाठी समक्ष बोलावून निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

त्यानुसार श्री जयसिंह बं निंबाळकर, बडोदे यांना फोन करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चेसाठी बोलाविण्यात आले होते.

श्री निंबाळकर यांनी बडोदे येथील पादूका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलनाबाबत सविस्तर माहिती सभेस दिली. तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बडोदे येथील पादूका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलन श्री जयसिंह बं निंबाळकर,अध्यक्ष, ओम श्री साईभक्त परिवार ट्रस्ट, बडोदे यांचेमार्फत आयोजित न करता संस्थानमार्फतचे यथावकाश आयोजित करण्यात यावे असे ठरले याबाबत नियमावली निश्चित करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **श्रीरामनवमी उत्सव-२००७ कार्यक्रम निश्चिती.**

**निर्णय क्र.२२९** श्री रामनवमी उत्सव - २००७ हा सोमवार, दि. २६/०३/२००७ ते बुधवार, दि. २८/०३/२००७ अखेर श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) मार्फत साजरा करावयाचा असून त्यासाठी कलाकारांची निश्चिती करावयाची आहे. मा.अध्यक्ष यांचे सुचनेनुसार मोठमोठ्या कलाकारांचे कार्यक्रम ठेवावयाचे आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | कलाकाराचे नांव व फोन/मो.नंबर | अपेक्षित मानधन | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | साधना सरगम, मुंबई यांचा साधना सरगम नाईट, | रु. २,५०,०००/- | २६/०३/२००७ रोजी साईनगर स्टेजवर |
| ०२. | श्री नविन प्रभाकर, मुंबई व त्यांचे साथीदार,सोबत ३ - गायक कलाकार यांचा हास्य दरबार. | रु. ४,००,०००/- | २७/०३/२००७ रोजी साईनगर स्टेजवर. |
| ०३. | सौ.स्वाती दैठणकर, नृत्य साधना, भरत नाट्यम् अकेडमी, पूणे-४११ ०३८, यांचा नादनुपुर, | रु.४०,०००/- एकूण कलाकार १२ | २८/०३/२००७ रोजी समाधी मंदिर जवळील स्टेजवर. |
| ०४. | श्रीमती गितांजली अरोरा, पूणे (श्री अनिल मोहीले यांचा स्वरदा निर्मीत यादोंकी बारात हा हिंदी/मराठी जुन्या गीत नृत्यांचा कार्यक्रम) | रु. ९०,०००/- एकूण कलाकार ३० | दि. २८/०३/२००७ रोजी साईनगर स्टेजवर. |

तथापि सी.एस.साबळे, अध्यक्ष, कलासंपदा, शिर्डी यांचे दि. ७/२/२००७ रोजीचे पत्रान्वये या वर्षी श्री रामनवमी उत्सवात विधीलिखीत हा नाट्यप्रयोग संस्थानमार्फत सादर करणेस परवानगी मागितलेली आहे. तसेच मानधन म्हणून रु. २५,०००/- इतकी मागणी केलेली आहे.

मागील वर्षी सदर संस्थेचे कलाकार स्थानिक व हौशी असलेने "मालकीण मालकीण दार उघड" हा नाट्यप्रयोग रु. ५,०००/- मानधन देऊन श्री रामनवमी उत्सवात सादर करणेस परवानगी दिली होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२००७ मध्ये मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी निमंत्रित कलाकाराचे कार्यक्रम निश्चित करावे असे ठरले.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५ अपंगांच्या राज्यस्तरीय क्रिडास्पर्धा,२००६-०७ बिसलरी पाणी मदत**

**निर्णय क्र.२३०** श्री विश्वास जयदेव ठाकुर, कोषाध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, नाशिक यांचे दि.१८/०१/२००७ रोजीचे पत्रान्वये तसेच विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचे दि.२२/०१/२००७ रोजीचे पत्रान्वये, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई पुरस्कृत नवमहाराष्ट्र युवा अभियान, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने सन २००६-०७ या वर्षाकरिता अपंग मुला/मुलींच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा दि. १७/०२ व १८/०२/२००७ रोजी राजे संभाजी स्टेडीयम , सिडको, नाशिक येथे आयोजित करण्यात आल्या असून, त्यासाठी त्यांनी शिधा स्वरुपाची मदत मिळणेबाबत विनंती केलेली आहे. मा.आयुक्त साहेब, नासिक, महसुल विभाग यांनी शिधा स्वरुपात मदत देणेबाबत उचीत कार्यवाही करणेबाबत सुचीत केलेले आहे. सदर अपंग मुला/मुलींच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी अंदाजीत एकूण खर्च रु. ३५,३०,०००/- इतका येणार असून पैकी फराळ, नाष्टा व जेवण इ.कामी अंदाजीत रक्कम रु. १०,८०,०००/- (अक्षरी रु. दहा लाख अैशी हजार मात्र) इतका खर्च येणार असल्याचे पत्रात म्हटले आहे.

तथापि बुधवार, दि. १४/०२/२००७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या फोनवरील चर्चेनुसार शिधाऐवजी १/२ लिटरच्या १० हजार व एक लिटरच्या ५ हजार बाटल्या नाशिक येथे राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी पुरविण्यात याव्यात असे मा.आयुक्त नासिक महसुल विभाग यांनी सुचविलेले आहे. त्यानुसार बिसलरी बाटल्या खरेदीकामी अंदाजे रु. ७०,०००/- (अक्षरी रु. सत्तर हजार मात्र ) पर्यंत खर्च येईल. सदरच्या बिसलरीच्या बाटल्या खरेदी विभागामार्फत पुरविता येतील. तरी १/२ लिटरच्या १० हजार व १ लिटरच्या ५ हजार बाटल्या नाशिक येथील राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी नासिक येथून खरेदी करुन पुरविण्यात आलेल्या असून त्याकामी येणा-या रक्कम रु. ७०,०००/- (अक्षरी रु.सत्तर हजार मात्र)चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३६ श्री सुधाकर जोशी,आय.ए.एस.(सेवानिवृत्त) यांचेकडे बांधकाम व भांडार खरेदी नियमावली, कर्मचारी सेवानियम व अधिकारी/कर्मचारी आकृतीबंधाची कामे सोपविणे बाबत**

**निर्णय क्र.२३१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३७. दिनांक ६.१.२००७ रोजीचे मुलाखतीतील वैद्यकीय अधिकारी व इतर पात्र उमेदवारांच्या नेमणूकांबाबत**

**निर्णय क्र.२३२** श्रीसाईबाबा हॉस्पीटलकरीता आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिकारी व इतर उमेदवारांसाठी दि.११/११/२००६ व इतर रोजीचे वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येवून त्यातील विविध पदांसाठी पात्र उमेदवारांचे दि.२०/११/२००६ अखेर पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते.

आलेल्या अर्जातील पात्र उमेदवारांच्या दि.०६/०१/२००७ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आल्या होत्या.सदर मुलाखतीसाठी तज्ञ म्हणून ०१) मा.डॉ.सदानंद,डीन अहमदनगर मेडीकल कॉलेज ०२) मा.डॉ.सुदान डीन प्रवरा मेडीकल कॉलेज,लोणी यांना आमंत्रीत करण्यात आलेले होते तसेच डॉ.ढवळे,वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी हे ही उपस्थित होते.

दि.०६/०१/२००७ रोजी जाहीरातीनुसार पात्र असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या त्यातील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबतचा तपशील खालील प्रमाणे.

| **अ.नं** | **नियुक्तीसाठी निवड झालेल्या पात्र उमेदवारांचा तपशील** | **शैक्षणिक अर्हता** | **आकृतीबंध व हॉस्पिटल प्रचलित पध्दतीनुसार देय वेतन** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ०१ | **नेफ्रोलॉजीस्ट (पुर्णवेळ)**<br>डॉ.गांधी तुषार एन, राजकोट | एम.डी.डी.एन.बी. | प्रतिमहा रु.३०,०००/- | निवड |
| ०२. | **युरोलॉजीस्ट (व्हीजीटींग)एक दिवस**<br>**०१.** डॉ.विलेकर नंदन पी.<br>०२.डॉ.मुंदडाओमप्रकाश, औरंगाबाद | एम.एस.डी.एन.बी.<br>ए.एस.,एम.सी.एच. | | व्हिजीटींग<br>व्हिजीटींग |
| ०३ | **पिडिॲट्रीशिअन (पूर्णवेळ)**<br>डॉ.कुरकुटे दुर्वा, | डी.सी.एच.डी.एन.बी. | प्रतिमहा रु.३०,०००/- | निवड |
| ४. | **ज्यु/सिनि.ॲनेस्थेसियालॉजीस्ट**<br>०१. डॉ.विनोद वि. खर्डे,लोणी<br>०२. डॉ.संतोषकुमार मराठे | एम.बी.बी.एस.डी.ए.<br>एम.बी.बी.एस.डी.ए. | प्रतिमहा रु.२५,०००/-<br>प्रतिमहा रु.२५,०००/- | क्लि.असि. [अनेस्थेसिया]<br>क्लि.असि. [अनेस्थेसिया] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | **ज्यु/सिनी.इंन्टेन्सीव्हीस्ट (पुर्णवेळ)**<br>डॉ.बिडवे विजय आत्माराम | एम.बी.बी.एस.डी.ए. | प्रतिमहा रु.२५,०००/- | ज्यु.इंन्टेन्सीव्हीस्ट |
| ०६. | **एम.आर.आय.टेक्निशियन**<br>०१. श्री आहिरे विजय भाऊराव मुंबई<br>०२. श्री ठोसर राजेंद्र बी.,मनोली<br>०३.श्री मुसमाडे बी.बी. | टी.वाय.बी.ए.एक्स-रे टेक्निशियन<br>बी.एस्सी,डी.एम.आय.टी. एम.आर.आय.टेक्नि.<br>डीप्लोमा इंन रेडीओलॉजी | प्रतिमहा रु.८,०००/-<br>प्रतिमहा रु.८,०००/-<br>प्रतिमहा रु.८,०००/- | निवड<br>निवड<br>प्रतिक्षा |
| ०७ | **परिचारीका (बी.एस्सी)**<br>०१.श्री कदम विजय गणपत<br>०२.कु.साबळे शितल गौतम<br>०३.कुलकर्णी सुचिता चं.<br>०४.कु.नजमा एम.सय्यद | बी.एस्सी.नर्सिंग<br>बी.एस्सी.नर्सिंग<br>बी.एस्सी.नर्सिंग<br>बी.एस्सी.नर्सिंग [ॲपीएर] | प्रतिमहा रु.१५,०००/-<br>प्रतिमहा .१४,०००/-<br>प्रतिमहा .१४,०००/-<br>प्रतिमहा .१४,०००/- | निवड<br>निवड<br>निवड<br>निवड |
| ०८. | **आर.एम.ओ.**<br>०१.डॉ.आंगळे संदेश एन.<br>०२.डॉ.तलवारे राजू एन.<br>०३.डॉ.कोल्हे शोभना टि.<br>०४.डॉ.ढिकले प्रसाद तुकाराम<br>०५.डॉ.उत्कर्ष विश्वासराव देशमुख<br>०६.डॉ.प्रशांत पी.मोरे.<br>०७.डॉ.महेंद्र बनारसी गुप्ता<br>०८.डॉ.फैजी अब्दुल वकील | <br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस. | <br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/-<br>प्रतिमहा रु.१७,०००/- | (श्री साईनाथ रुग्णालय) |

वरिलप्रमाणे मुलाखतीमध्ये डॉ. विनोद वि.खर्डे यांची ज्यु.ॲनॉस्थेसियालॉजीस्ट म्हणून निवड झालेली आहे. तथापि सध्या ते प्रवरा मेडिकल कॉलेज लोणी येथे सेवेत असल्याने डॉ. सुदान व डॉ. सदानद तज्ञ यांनी त्यांचे नेमणूकीची शिफारस केलेली नाही तथापि ते स्वतः येणेस उत्सुक आहेत.

तसेच बी.एस्सी नर्सिंग उमेदवारांपैकी श्री विजय कदम यांना रु.१५०००/- व उर्वरीत ०३ उमेदवारांना प्रतिमहा रु.१४,०००/- एकत्रीत मानधन / वेतन द्यावे असे डॉ.तिवारी सो व ढवळे यांनी सुचविले आहे. या पदासाठी एकाच दिवशी मुलाखती झालेल्या उमेदवारांना नविन नेमणूका देते वेळी वेगवेगळे वेतन दर्शविणे योग्य नाही ते सारखे असावे असे मत आहे.या आगोदर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रतिमहा रु.१०,०००/- एकूण वेतनावर नेमणूकपत्र देण्यात आलेले आहे.सदर पदासाठी शासनाकडे रु.६,५००-२००-१०,५०० अशी वेतनश्रेणी अशी असून त्यानुसार मासिक एकूण वेतन रु.१२,५७८/- (मुळ वेतन + डी.पी.+महागाई) इतके येते.त्यामुळे बी.एस्सी नर्सिंग या पदासाठी मासिक किती वेतन द्यावयाचे याची निश्चिती करावयाची आहे.

उपरोक्त बी.एस्सी.नर्सिंग पदावरील नेमणूकीबाबत अ.नं.०३ वरिल कु.कुलकर्णी सुचिता चंद्रकांत ह्या श्री साईनाथ रुग्णालयात परिचारीका पदावर सेवेत आहेत त्यांचा सध्याचा पगार विचारात घेऊन वेतन ठरवावे लागेल. तसेच अ.नं.०४ वरिल श्रीमती नजमा एम.सय्यद (बी.एस्सी नर्सिंग,पोस्टल कोर्स) यांचा बी.एस्सी नर्सिंगचा निकाल येणे बाकी आहे.सदरबाबत त्यांचा निकाल आल्यानंतर त्यांना नेमणूकपत्र देवून वेतन निश्चिती करता येईल.

उपरोक्त नेमणूकांस आकृतीबंधास शासनाची मान्यता येणेचे अधीन राहून मानधन / नियत वेतनावर नेमणूक पत्र देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे व बी.एसस्सी नर्सिंग परिचारिकांना दर्शविलेल्या वेतनश्रेणीत रुपये १२,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात व एम.आर.आय टेक्नीशियन बाबत मशिनरी आल्यानंतर नेमणूका देण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३८** **कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) नेमणूक मुदतवाढ मिळणे बाबत**
**निणर्य क्र.२३३** श्री.गबाजी सखाराम वराळ यांना प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-०१/४५०४/२००६ दिनांक ०३/०४/२००६ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे बांधकाम विभागात भू-संपादन कक्षात " कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) " म्हणून रुपये-७,०००/- इतक्या मानधन तत्वावर दि.१४/०२/२००६ ते १३/०२/२००७ अखेर एक वर्षे कालावधीसाठी नेमणूक देण्यात आलेली असून त्यांची मुदत दि.१३/०२/२००७ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री गबाजी सखाराम वराळ यांनी दि.०६/०२/२००७ रोजी " कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) " म्हणुन मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज केला असून ,त्यांत त्यांनी असे नमूद केले आहे की, मी सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे बांधकाम विभागात भू-संपादन कक्षात "कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) " म्हणून मानधन तत्वावर काम करीत आहे.

माझी नेमणूक संस्थान आदेश जा.नं.एसएसएस/वशी-०१/४५०४/०६ दि.०३/०४/२००६ अन्वये कंत्राटी पध्दतीने सर्व्हेअर म्हणून एक वर्षासाठी एकत्रित मानधन रक्कम रुपये-७,०००/- (अक्षरी रुपये- सात

हजार ) मात्र इतक्या रक्कमेवर झालेली आहे. मी दिनांक १४/०२/२००६ पासून विषयांकित पदावर बांधकाम विभागाकडे कामावर रुजू झालेलो आहे.

माझ्या नेमणूकीच्या कालावधीत सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील श्री लोढा यांचे जमिनीची प्राथमिक मोजणी, सर्व्हे नंबर ५४ पैकी व ५५ पैकी मधील श्री जगताप , श्री काटकर व इतर २ यांचे जमिनीची प्राथमिक मोजणी , सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील श्री चौधरी व इतर दोन यांचे जमिनीची प्राथमिक मोजणी, सर्व्हे नंबर १०७ व सर्व्हे नंबर १०८ पैकी मधील श्री बच्छानी व श्री कोते यांचे जमिनीची मोजणी करणेकामी शासनाच्या मोजणी खात्यास सहकार्य करणे इत्यादी कामे केलेले आहे. मौजे सिन्नर व पांढुर्ली येथील पालखी थांबा जागेचे मोजणी कामी सहकार्य करणे,तसेच बांधकाम विभागास व भू-संपादन कक्षास वेळोवेळी लागणारे नकाशे, आराखडे तयार करणे, जुन्या मोजणी नकाशांचे ट्रेसिंग तयार करणे इत्यादी कामे करीत आहे.

मी शासनाच्या भूमि अभिलेख खात्यामध्ये निमत्तानदार, परिक्षण भूमापक इत्यादी पदावर काम केलेले असून , साधारणतः ३८ वर्षे भूमि अभिलेख खात्यातील कामाचा व्यापक अनुभव आहे.तरी माझ्या नेमणुकीची मुदत दि.१३/०२/२००७ अखेर संपुष्टात येत असल्याने मला "" कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) " या पदावर सध्याच्याच अटी /शर्तीवर एक वर्षे मुदतवाढ मिळावी, असे नमूद केले आहे.

त्यावर मुख्य अभियंता,बांधकाम विभाग यांनी " शिरडी एकात्मीक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे देण्यात आलेल्या ९ रस्त्यांच्या जागेचे भू-संपादन करतांना सदर जागा मोजणीकामी तसेच मुंबई ते शिरडी मार्गावर साईभक्तांसाठी ६ पालखी थांब्याची जागा ताब्यात घेतांना सदरच्या जागा मोजणीकामी मोजणीदार (सर्व्हेअर )ची आवश्यकता आहे. तरी तूर्त अर्जदार श्री गबाजी सखाराम वराळ यांची दि.१३/०२/२००७ अखेर मुदत संपुष्टात येत असल्याने त्यांना सहा महिने मुदतवाढ द्यावी ", असे अभिप्राय दिले आहे.

संस्थानच्या कामाचा व्याप लक्षात घेता व मुख्य अभियंता,बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता, श्री.गबाजी सखाराम वराळ,(सर्व्हेअर ) यांना दि. १४/०२/२००७ पासून पुढे पुर्वीच्याच अटी / शर्तीनूसार सहा महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडील प्रस्तावित जमिन खरेदीचा विचार करीता श्री गबाजी सखाराम वराळ यांना दि. १४/०२/२००७ पासून पुढे पुर्वीच्याच अटी/शर्तीनूसार एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३९** **बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सेवा सोसायटी मर्यादित बुलढाणा यांना भक्तनिवाससाठी संस्थेस जागा उपलब्ध करुन देणेबाबत**

**निणर्य क्र.२३४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४०** **मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गट नंबर १८३ क्षेत्र ५ हेक्टर ४० आर मध्ये साईभक्तांसाठी निवासस्थान उभारणे बाबत**

**निणर्य क्र.२३५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४१** **डॉ.विजय नरोडे यांचे मासिक पगाराव्यतिरिक्त मासिक फिक्स मोबदला मिळणेसाठीचे अर्जाबाबत**

**निणर्य क्र.२३६** याबाबत वैद्यकीय उपसमितीने अंतिम निर्णय घ्यावा,असें ठरलें.(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४२** **संस्थानचे नविन प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट फर्निचर व लॅण्ड स्केपिंग या कामाचे आर्किटेक्ट, अमृता पवार,नाशिक यांचे फी बाबत.**

**निणर्य क्र.२३७** दि. ०६/०१/२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे बैठकीत निर्णय क्र. २५ अन्वये नवीन प्रसादालय इमारतीचे अंतर्गत सजावट, फर्निचर व लॅण्ड स्केपिंग या कामांसाठी मे.अमृता पवार, नाशिक यांची २% अधिक सर्व्हिस टॅक्स इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेत आली असून सदरहू काम त्यांचेकडून आर्किटेक्ट मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई व बांधकाम विभाग यांचे सल्ल्याने करुन घेण्यात यावे. असे ठरले आहे.

आता आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांनी त्यांचे दि. १५/०२/२००७ चे पत्रान्वये नविन प्रसादालयाचे अंतर्गत सजावट (Interior) या कामासाठी एकूण ७% फी मिळावी अशी विनंती केली आहे. या ७% फी मध्ये डिटेल वर्किंग ड्रॉईंग, एस्टिमेट, टेन्डरींग आवश्यक साईट व्हिजीट या कामांचा समावेश आहे.

तरी आर्किटेक्ट अमृता पवार यांनी वरिल प्रमाणे केलेल्या विनंती नुसार नविन प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट व फर्निचर (Interior) या कामासाठी ७% फी अधिक सर्व्हिस टॅक्स तसेच लॅण्ड स्केपिंगचे कामासाठी यापुर्वी निर्णय क्र.२५ दि.०६/०१/२००७ अन्वये ठरल्याप्रमाणे २% फी अधिक सर्व्हिस टॅक्स देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत आर्किटेक्ट अमृता पवार उपस्थित होत्या. त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सदर कामामध्ये इंटेरिअर डिझाईनचा समावेश असल्याने ३.५% इतक्या फी मिळावी अशी विनंती

केली. तसेच फर्निचर व इंटेरिअरचे नियोजित कामासाठी अंदाजे रुपये १.५० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित असून लॅण्डस्केपिंगसाठी अतिरिक्त खर्च येईल असे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट, फर्निचर व लॅण्ड स्केपिंग या कामासाठी आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांना ३.५%आर्किटेक्ट फी अधिक वेळोवेळी प्रचलित असलेल्या दराने सर्व्हीस टॅक्स देण्यात यावा, असे ठरले. तसेच फर्निचर व इंटेरिअरचे कामासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १.५० कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास व लॅण्डस्केपिंगचे कामासाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४३** **मौज शिर्डी येथील स.नं.५५ पैकी मधील (आरक्षण क्र.२५) क्रिडांगणासाठी आरक्षित असलेली जमीन विकसित करणेबाबत.**

**निणर्य क्र.२३८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४४ शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी रक्कम अदा करणेबाबत.**

**निणर्य क्र.२३९** **:(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी गांवातील व परिसरातील एकुण २५ रस्ते प्राधान्य क्रमाने तीन टप्प्यात विकसित करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरलेले आहे. तसेच इकडील पत्र जा.क्र. बांधकाम/८९१३/२००६, दिनांक ०७ जुलै,२००६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सदरील प्रकल्पास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरील प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

**(ब)** तसेच संदर्भ क्रमांक ०१ ते ०३ चे निर्णयांन्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेशी शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या प्रकल्पासंदर्भात दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ रोजी शिर्डी येथे मरारविम यांचे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे मुख्याधिकारी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी समझोता करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्यातील (Article-II (1)- The **Panchayat** shall acquire all such land and rights in respect of land as shall be required for SIP, before inviting the bids for construction work. The cost of providing such lands and rights shall be borne exclusively by the **Sansthan**.)आणि (Article -III Funds and Payment to the Corporation (1)) यामधील अटी-शर्तीनुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पासाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीची वेळोवेळी मान्यता मिळालेली आहे.

**(क)** उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार व समझोता करारनाम्यास अनुसरुन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील एकूण ०९ रस्त्याचे रुंदीकरणासह विकसित करणेसाठी भूसंपादन कार्यवाही सुरु केलेली आहे.

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचे पत्रान्वये, भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार प्रस्तावित भूसंपादन एकूण ०९ प्रकरणातील संपादनाखालील क्षेत्राच्या अंदाजित मोबदला रक्कमेच्या २/३ रक्कम अधिक ३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम बिनव्याजी ठेव म्हणून जमा करणेबाबत कळविलेले आहे. या रक्कमेचा गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | ०९ रस्त्याचे भूसंपादनाखालील क्षेत्राच्या अंदाजित मोबदला रक्कमेच्या २/३ रक्कम | १७,४५,०७,९६३/- | सोबत, मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे भूसंपादन प्रकरणानुसार रक्कमेचा तपशील दर्शविणारा तक्ता **परिशिष्ट अ** जोडला आहे. (तक्त्यातील मजकूर निर्णयामध्ये नमूद केलेला आहे) |
| ०२ | ०९ रस्त्याचे भूसंपादन कार्यवाहीसाठी ३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम | ००,७८,५२,८५७/- | |
| | **एकुण रुपये -->** | **१८,२३,६०,८२०/-** | |

तसेच, शिर्डी नगरंपचायत, शिर्डी यांनी संदर्भ क्रमांक ०७ चे पत्रान्वये, शिर्डी शहरातील रस्ते विकसित करणेसाठी आवश्यक असणारे भूसंपादन कार्यवाहीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस सत्वर जमा करणेबाबत विनंती केलेली आहे.

**(ड)** तरी उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमुद केल्यानुसार, **परिशिष्ट अ** मधील रकाना क्रमांक ०३ मध्ये दर्शविलेली २/३ रक्कम **रुपये १७,४५,०७,९६३/-** (अक्षरी रुपये सतरा कोटी रुपये पंचेचाळीस लाख सात हजार नऊशे त्रेसष्ट मात्र) व रकाना क्रमांक ०४ मध्ये दर्शविलेली ०३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम **रुपये ७८,५२,८५७/-** (अक्षरी रुपये अठ्ठयाहत्तर लाख बावन्न हजार आठशे सत्तावन्न मात्र) अशी **एकूण रक्कम रुपये १८,२३,६०,८२०/-** (अक्षरी रुपये अठरा कोटी तेवीस लाख साठ हजार आठशे वीस मात्र) शिर्डी

एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील रस्त्यांचे भूसंपादन कार्यवाहीसाठी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला.

या प्रस्तावावर साधकबाधक चर्चा करणेत आली. मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर यांचेकडे प्रथम टप्प्यातील ११ रस्त्यांपैकी ०९ रस्त्यांच्या भूसंपादन कार्यवाहीसाठी अदा करावयाच्या रक्कमेचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २/३ मोबदला | आस्थापना खर्च | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी निमगांव शीव रस्ता (न.म. रोड ते पुर्वेस ०१ किमी) रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | भूसंपादन कार्यवाहीची आवश्यकता नाही. | | |
| ०२ | शिर्डी रुई दक्षिणोत्तर रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शीव रस्ता) खडीकरण व डांबरीकरण करणे. | भूसंपादन कार्यवाहीची आवश्यकता नाही. | | |
| ०३ | नांदुर्खी रस्ता (२०० रुम्स ते नांदुर्खी शीव रस्ता) रुंदीकरण व डांबरीकरण करणे. | १,२८,६३,००८.०० | ५,७८,८३५.०० | १,३४,४१,८४३.०० |
| ०४ | कनकुरी रस्ता (न.म.रस्ता ते पुनमनगरपर्यन्त - १००० मीटर ) रुंदीकरण व डांबरीकरण करणे. | ६१,१३,००५.०० | २,७५,०८५.०० | ६३,८८,०९०.०० |
| ०५ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा (आरक्षण क्रमांक ३१ चा दक्षिण-पश्चिम कोपरा ते नाला क्रमांक ३४ पर्यन्त) यांना जोडणारा १३८० मीटर लांबीचा रस्ता. | ५,३८,१५,३१९.०० | २४,२१,६८९.०० | ५,६२,३७,००८.०० |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा ( नवीन पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रिंग रस्त्यापर्यन्त, आरक्षण क्रमांक ३१ पोहच ) ६०० मीटर लांबीचा रस्ता. | १,८७,३६,१९९.०० | ८,४३,१२९.०० | १,९५,७९,३२८.०० |
| ०७ | विकास योजनेतील २४ मीटर वळणरस्ता ( नगर मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचा रस्ता) यांना जोडणारा ४५० मीटर लांबीचा रस्ता. | १,२७,२९,९८७.०० | ५,७२,८४९.०० | १,३३,०२,८३६.०० |
| ०८ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर (पिंपळवाडी रस्ता - निमगांव शीव रस्ता) ४५० मीटर लांबीचा रस्ता. | २,२६,१२,५२०.०० | १०,१७,५६३.०० | २,३६,३०,०८३.०० |
| ०९ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता ( नगर मनमाड रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता पर्यन्त) ८०० मीटर लांबीचा पुर्व - पश्चिम रस्ता. | ४,५१,९५,१६०.०० | २०,३३,७८२.०० | ४,७२,२८,९४२.०० |
| १० | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील व्दारकामाई ते ताजीमखान बाबा चौकापर्यन्त ०९ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर ७५ मीटर लांबीचा रस्ता. | १४,९१,५९३.०० | ६७,१२२.०० | १५,५८,७१५.०० |
| ११ | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील ०६ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर ( पालखी रस्ता ते नवीन पिंपळवाडी रस्ता ) ३० मीटर लांबीचा रस्ता. | ९,५१,१७२.०० | ४२,८०३.०० | ९,९३,९७५.०० |
| | **एकुण : -** | **१७,४५,०७,९६३.००** | **७८,५२,८५७.००** | **१८,२३,६०,८२०.००** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे माध्यमातून व संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीतून शिर्डी शहरातील रस्ते विकसित करणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे, या प्रस्तावास सत्वर मान्यता मिळणेचे दृष्टीने शासनस्तरावर प्रयत्न करण्यात यावेत. दरम्यान शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या पहिल्या टप्प्यातील वरील एकूण ११ रस्त्यांपैकी ०९ रस्त्यांचे भूसंपादन कार्यवाहीसाठी अंदाजित मोबदला रक्कमेच्या २/३ मोबदला रक्कमेसह आस्थापना खर्चाची रक्कम एकुण रुपये १८,२३,६०,८२०/- मात्र मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४५** **शिर्डी स.नं.१०७,१०८,१०९ पै. मधील नियोजीत साईआश्रम प्रकल्पाचे Project Management Consultancy (PMC) सेवेकरीता आलेल्या प्रस्तावांबाबत**

**निर्णय क्र.२४०** शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई (तामिळनाडू) यांचेमार्फत साईभक्तांचे निवासाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे शिर्डी येथील स.नं. १०७,१०८,१०९ पै. मध्ये "साईआश्रम" प्रकल्प उभारणे प्रस्तावीत आहे. सदर प्रकल्प हा शिर्डी साईट्रस्ट यांचे देणगीतून उभारण्यात येणार आहे. याबाबत संस्थान व शिर्डी साईट्रस्ट यांचेमध्ये करार झालेला आहे. या प्रकल्पाकरीता Project Management Consultancy (PMC) चे सेवेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/१०/२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८७२ अन्वये झालेला आहेत. त्यानुसार PMC सेवा पुरविणाऱ्या कंपण्याकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. खालील कंपन्यांनी सेवा पुरविण्याकरीता प्रस्ताव संस्थानकडे सादर केले होते.

01. TCE Consulting Engineers Ltd., Pune.
02. Kirloskar Consultants Ltd., Pune
03. Tare & Associates, Nashik
04. Dorsch Consult India Pvt., Ltd. Mumbai

दि. २५/११/२००६ रोजीचे सभेत सदर प्रस्ताव उघडण्यात आले व निणर्य क्र. ९५२ नुसार सदर प्राप्त प्रस्तावांचा तुलनांत्मक तक्ता व इतर अनुषंगिक माहिती शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (श्री.के.व्ही.रमणी) यांचेकडे अभिप्रायासाठी पाठवून त्यांचेशी चर्चा तथा विचारविनीमय करुन त्यांचे अभिप्राय तथा मार्गदर्शनानुसार नियोजीत साई आश्रम प्रकल्पासाठी PMC सेवेकरीता नेमणुक करण्यात यावी असे ठरले होते.

त्यानुसार दिनांक ०६/०१/२००७ रोजी शिर्डी येथे PMC नेमणे करीता आयोजीत सभेसाठी श्री के.व्ही.रमणी यांना बोलविण्यात आले होते. सदर मिटींग करीता उपरोक्त PMC प्रस्ताव सादरकर्ते यांनाही बोलविण्यात आले होते. त्यांचेशी चर्चा करुन सदर प्रस्ताव सादरकर्ते यांना फेर प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले.

दिनांक १४/०२/२००७ रोजीचे फॅक्स पत्राव्दारे श्री रमणी यांनी साईआश्राम प्रकल्पाकरीता PMC सेवा पुरविणेकरीता शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेतर्फे नेमणुक करण्यात येईल व त्यांची फी देखील शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांचेतर्फे अदा करण्यात येईल असे कळविले आहे. तसेच सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची राहण्याची व इतर सुविधा श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचेतर्फे पुरविणेबाबत कळविले आहे. श्री रमणी यांनी उपरोक्त चार PMC प्रस्ताव सादरकर्ते कंपन्यांची निविदा रद्द करुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव प्रत्येकी रक्कम रुपये १.०० लक्ष मात्र परत करण्यास विनंती केली आहे.

तरी वरीलप्रमाणे PMC सेवेकरीता आलेल्या निविदा रद्द करुन त्यांची सुरक्षा ठेव प्रत्येकी रक्कम रुपये १.०० लक्ष परत करणेसाठीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

या प्रस्तावावर साधक बाधक चर्चा होऊन, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००७ रोजी कळविल्यानुसार, साई आश्रम प्रकल्पाकरीता PMC सेवा पुरविणेसाठी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे मार्फत PMC संस्थेची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. नियुक्त करणेत येणाऱ्या PMC संस्थेचे सेवाशुल्क शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत अदा करणेत येणार आहे. तथापी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे मार्फत नेमणूक करण्यात येणाऱ्या PMC संस्थेच्या प्रतिनिधींसाठी त्यांचे शिर्डी येथील कार्यकाळात निवास व प्रसादभोजन व्यवस्था संस्थानतर्फे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले. तसेच श्री. रमणी यांनी कळविले प्रमाणे PMC सेवेकरीता ज्या निविदाधारकांनी बयाना रक्कम भरलेली आहे. त्या सर्व निविदाधारकांची बयाणा रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४६** **मंदिर व मंदिर परिसरात वाढीव सोयी सुविधा निर्माण करणे करीता आर्किटेक्ट सोनीया काप्रे यांचेशी चर्चा करुन निर्णय होणेबाबत .**

**निर्णय क्र.२४१** मंदिर परीसरात साईभक्तांसाठी अनेक सोयी सुविधा निर्मान करण्यात आल्या आहेत. श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांची दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे. त्यामुळे सदर सोयी-सुविधामध्ये आणखी सोयी - सुविधा वाढविणे आवश्यक आहे. मंदिर परीसरात वाढीव सोयी- सुविधा निर्माण करणे बाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/०५/२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३२२ अन्वये खालील प्रमाणे वाढीव सुविधा निर्माण करणेकामी आर्किटेक्ट सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांचेकडून प्लॅन एस्टीमेट मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

०१) गुरुस्थान मंदिरासमोरील बेसमेंट वरती साईभक्तांना देणगी टाकता यावी याकरीता हुंडी तयार करणे.

०२) मंदिर परिसरातील व्ही.आय.पी. लाईन बदलणे बाबत.

०३) दिक्षीतवाडा प्रथोमोउपचार केंद्राचे जागेवर देणगी कांऊटर तयार करणे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०६/२००६ चे सभेत ही श्री साईबाबा मंदिर परिसरात एकवटणाऱ्या गर्दीसाठी नियोजन व उपाय योजना करणेविषयी आर्किटेक्ट श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार Landscape Park, Saibaba Musuam, Information Center, प्रसंग प्रदर्शन व त्यास ध्वनीमुद्रीत निवेदनाची जोड तसेच श्री साईबाबांची भव्य प्रतिमा (Haulogaaphice Image ) आधुनिक तंत्रनासह, खुले नाट्यगृह, विविध शिल्पे, मेडीटेशन गार्डन , म्युझींक गार्डन इत्यादीबाबींचा समावेश असा आराखडा व खर्चाचा तपशिल आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, आर्किटेक्ट नवि दिल्ली यांचेकडून तयार करुन घेण्यास व जागा निश्‍चिती करणेस मान्यता देण्यात आली .

त्याचप्रमाणे मंदिर परिसरातील फार आवश्यक नसलेल्या सुविधा व स्टाल इतरत्र हलविण्याचे ठरलेप्रमाणे मंदिरपरिसरातील कॅन्टीन प्रसादालय परिसरात स्थलांतरीत करुन त्याठिकाणी देणगी कांऊन्टर तयार करण्यात आले असून त्याचे इंटेरीअरचे काम चालू करण्यात आले आहे.

गुरुस्थान समोरील बॅसमेंटवरती देणगी कांऊन्टर, व दक्षिणा हुंडी करणे तसेच मंदिर परिसरातील खालील प्रमाणे वाढीव सोयी सुविधा करणेबाबत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांना दिनांक २२/०१/२००७ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविण्यात आले आहे.

०१. समाधी व गुरुस्थान मंदिरातील दर्शन व्यवस्थेसाठी स्वतंत्ररित्या दर्शनरांगेची व्यवस्था असावी. यासाठी कन्व्हेअर बेल्ट (एक्सलेटर्स) सारख्या पर्यायांचा वापर करता येईल किंवा कसे याबाबत तांत्रिक तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

०२. गुरुस्थान मंदिरासमोरील ध्यानमंदिर (बेसमेंट) इमारतीचा अथवा त्या जागेचा योग्य तो वापर करणेबाबत प्रस्ताव तयार करण्यात यावा.

०३. मंदिर व मंदिर परिसरात उत्सवाच्या, सुट्टयांच्या कालावधीमध्ये भक्तांची खूपच गर्दी होते. उन्हाळयात व पावसाळयात साईभक्तांना ऊन, पावसाचा खूपच त्रास सहन करावा लागतो. गर्दीच्या वेळेस दर्शन रांग नगर-मनमाड रस्त्यावर जाते. सध्याचा नगर-मनमाड रस्ता संस्थानमार्फत विकसित करण्यात आला असून,रस्त्याच्या दोन्ही बाजूस पादचारी मार्ग तयार करण्यात आलेला आहे. या पादचारी मार्गापैकी, मंदिराकडील बाजूच्या पादचारी मार्गावर कायमस्वरुपी सुशोभित छत उभारण्यात यावे. तसेच पिंपळवाडी रस्त्यास (मनोजकुमार गोस्वामी मार्ग) दोन्ही बाजूस पादचारी मार्ग तयार करण्यात आलेला आहे. या पादचारी मार्गावर ही सुशोभित छत उभारण्यात यावे.

०४. समाधी मंदिराचे कार्यालयाचे खिडकीतून साईंच्या मुर्तीचे मुखदर्शन होते. दिवसातील चार आरतींच्या वेळेस या खिडकीसमोरील मोकळया जागेत मोठया प्रमाणावर गर्दी होते. अशा गर्दीमध्ये भक्तांचे मोठया प्रमाणे खिसे कापले जातात. यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात यावी.

०५. समाधी मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भक्तांची मंदिर परिसरात मोठया प्रमाणावर गर्दी असते. या गर्दीमध्ये दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांच्या गर्दीची भर पडतच असते. यासाठी मंदिर परिसरातील भक्तांची गर्दी पसरविण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी.

याबाबत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांना दिनांक ०५/०१/२००७ व दि. २९/०१/२००७ चे पत्रान्वये मा. व्यवस्थापन समितीपुढे त्यांचा प्रस्ताव सादर करणेबाबत विनंती केली होती.

आर्किटेक्ट सोनिया काप्रे आजचे सभेपूढे समक्ष उपस्थित होत्या. त्यानी सभेपुढे खालीलप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सादर केला.

शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांसाठी दर्शनाव्यतिरिक्त आणखी आकर्षण केंद्र बनविणे आवश्यक आहे. समाधी मंदिरपरिसरातील गर्दी कमी करणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे. हा नियोजित प्रकल्प विकसित करावयाचा परिसर विस्तीर्ण स्वरुपाचा असेल. व त्यामध्ये खालील विशेष बाबींचा समावेश असेल.

०१) भक्तांचा आकर्षित करणे
०२) साईबाबा संस्थानसाठी मोठ्या स्वरुपाचे कार्यक्रम आयोजित करणेकरीता योग्य अशी जागा निर्माण करणे
०३) श्री साईबाबाच्या काळातील व जिवनावरील माहिती आकर्षक व देवाणघेवाणीच्या स्वरुपात उपलब्ध करणे
०४) जे साईभक्त श्रीसाईबाबांचे उद्देशाबाबत अकलन व जागृती करण्यास उत्सुक असतील त्यांना संधी उपलब्ध करुन देणे

सदर नियोजित प्रकल्प सुमारे १५ ते२० एकर जागेवर उभारण्यात येईल. तेथे जाण्यासाठी मंदिर परिसरापासून शटल बसेसेवा उपलब्ध असेल. श्री साईबाबा गार्डनमध्ये खालील सुविधा असतील

| Facility Type | |
|---|---|
| Landscape Facilities | 'THEME' PARK WITH 3-D IMAGE LANDSCAPING SUCH AS WALKING TRACKS PAVILIONS CHILDREN'S AREA MEDITATION AREA MUSIC GARDEN FOR BHAJANS |
| Facilities for Socio Cultural Activities | OPEN AIR THEATRES<br>INDOOR PERFORMANCE FACILITIES<br>SAI MUSEUM<br>DEVOTEES MUISEUM<br>ART GALLERY<br>EXHIBITION HALLS<br>SOUND & LIGHT SHOW |
| Convenience Facilities | BUS/CAR/AUTO PARKING<br>RAILWAY BOOKING<br>BUS BOOKING<br>CENTRAL PRO OFFICE<br>LOST & FOUND |
| Institutional Facilities | TRUST OFFICES/<br>SAI BABA CO-OPERATIVE<br>CONFERENCE FACILITIES<br>CENTRA; ;ONRARU<br>RESEARCH FACILITIES & NETWORKING |
| Retail /Commercial | EATING STALLS /FOOD COURT<br>RESTAURANTS<br>PRASAD STALLS<br>UDI STALLS<br>BOOK STALLS<br>OTHER STALLS |

उपरोक्त तक्त्यात लॅण्ड स्कॅप सुविधेमध्ये थ्री डी इमेज, वॉकींग ट्रॅक्स, पॅव्हेलियन, लहान मुलांसाठी जागा, ध्यानधारणा करण्यासाठी सुविधा भजनासाठी म्युझिक गार्डन तयार करणे याचा समावेश असेल.

थ्री डी इमेजमध्ये अंतर्गत व बाह्य वॉटर स्कीन करणे. वॉटर फौंटनप्रमाणे पंप सिस्टीम वापरुन यामध्ये इमेज तयार केली जाते. सदर इमेज स्थिर अथवा हलती ठेवता येते. वेगवेगळ्या स्वरुपातील इमेज आपणास यामध्ये तयार करता येतील.

म्युझियमचे अंतर्गत भागामध्ये Peppers Ghost Illusion व Holographic Projection तंत्राचा वापर करुन प्रतिमा तयार करण्याची संकल्पना त्यांनी विशद केली आहे.

आर्किटेक्ट यांनी उपरोक्त बाबींचे खालीलप्रमाणे एस्टिमेट सादर केलेले आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये (लाखात) |
|---|---|---|
| ०१. | कम्पाऊंड | १८०.०० |
| ०२ | लॅण्ड स्केपिंग-यामध्ये सॉफ्ट लॅण्डस्केपिंग,पेव्हींग,वॉटर फ्युचर,बेंचेस पेव्हेलियन,लायटिंग,सिंगींग,रोड,पार्किंग इ.सह | ५६०.०० |
| ०३ | थिम डिस्प्ले-<br>i) साईबाबा थ्रीडी इमेज<br>ii) पेपर गोस्ट स्पेशल इफेक्टस<br>iii) हॉलोग्राफिक डिस्प्ले | <br>१००.००<br>२५.००<br>१००.०० |
| ०४. | इमारती-<br>i) उपहारगृह<br>ii) स्टॉल्स<br>iii) रेल्वे, बस,ट्रेन बुकींग<br>iv) पीआरओ सेंटर<br>v) हरवले सापडले<br>vi) प्रशासकीय इमारत<br>vii) लायब्ररी<br>viii) रिसर्च व नेटवर्कींग<br>ix) प्रकाशने विभाग<br>x) आर्ट गॅलरी<br>xi) हॉल्स<br>xii) साईम्युझियम<br>xiii) लहान मुलांसाठी म्युझियम<br>xiiii) देणगी<br>xv) सार्वजनिक सोयीसुविधा | २६६०.०० |
| ०५ | इमारत अतर्गत सुशोभिकरण व फर्निचर | ९९८.०० |
| | एकूण रुपये | ४६२३.०० |

सदरचा प्रकल्प आर्थिक निधीनुसार तीन टप्प्यात निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९ व २०० येथील जागेत करता येईल.

०१) प्रथम वर्षे-१९ कोटी

०२) दुसरे वर्षे -१५ कोटी

०३) तिसरे वर्ष -१२ कोटी

सदरहू प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे दर्शनाव्यतिरिक्त आकर्षणाचे केंद्र, मनोरंजनातून अध्यात्म व त्यामूळे मंदिर परिसरातील गर्दी कमी होण्यास मदत होईल तसेच साईभक्तांकरीता एक चांगला प्रकल्प निर्माण होईल. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट सोनिया काप्रे यांना २.५% आर्किटेक्ट फी अधिक सर्व्हीस टॅक्स व येण्या-जाण्याचे खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय क्र.४७** **एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांची सिकंदराबाद येथील जागा भाडेपट्टयाने घेणेकामी करण्यात आलेल्या करारनाम्याबाबत नोंद घेणे.**

**निर्णय क्र.२४२** **(अ)** कार्यकारी विश्वस्त, एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांनी त्यांच्या दिनांक १४ एप्रिल, २००६ रोजीच्या पत्रान्वये १९० चौरस फुट जागा विनामुल्य देणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जून, २००६ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ३३५ खालीलप्रमाणे झ ाालेला आहे :

"सिकंदराबाबद येथील देणगी मिळणारे जागेबाबत योग्य ती कायदेशीर पुर्तता करुन जागा ताब्यात घेणेबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरलें."

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ८५० खालीलप्रमाणे झालेला आहे :

"यावर साधकबाधक चर्चा होऊन, एस.राधास्वामी फौंडेशन यांनी देऊ केलेली जागा ही वायएमसीए व दिप्ती बिल्डर्स यांची आहे. या जागेबाबत एस.राधास्वामी फौंडेशन व दिप्ती बिल्डर्स यांचेत भाडेपट्टा करारनामा झालेला आहे. त्यानुसार एस.राधास्वामी फौडेंशन हे उपरोक्त जागा संस्थानला विनामुल्य भाडेपट्टयाने देणार आहेत, ती स्वीकारण्यात यावी व याकामी करावयाचे करारनामा इत्यादीसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त जागा ताब्यात मिळालेनंतर या ठिकाणी माहिती केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक असे फर्निचर व इतर सुविधा निर्माण करणेसाठी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे यथावकाश सादर करावा. "

उपरोक्त निर्णयांनुसार, दिनांक २४ जानेवारी, २००७ रोजी वाय.एम.सी.ए.कॉम्प्लेक्समधील दिप्ती हाऊसच्या तळमजल्यावरील, मागील बाजूस असणारी, युनिट क्रमांक २५ या अंदाजे २०० चौरस फुट जागेबाबत भाडेपट्टा करारनामा मा.दुय्यम निबंधक, मेरडपल्ली, सिकंदराबाद (आंध्रप्रदेश) यांचेसमक्ष रजिष्टर्ड नोंदणी क्रमांक १३९/२००७ ने नोंदविण्यात आलेला आहे. करारनामा नोंदणीचे वेळेस मा.दुय्यम निबंधक, मेरडपल्ली यांनी सांगितले की, हा भाडेपट्टयाचा करारनामा असल्याने विनामुल्य भाडेपट्टा करारनामा करता येणार नाही. त्यासाठी करारनाम्यात जागेचे भाडे नमूद करणे आवश्यक आहे. त्यावेळेस नाममात्र रुपये १००/- मात्र दरमहा भाडे ठरवून करारनामा नोंदविण्यात आलेला आहे.

(ब)कार्यकारी विश्वस्त, एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांनी त्यांच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या पत्रान्वये ३००० चौरस फुट जागा विनामुल्य देणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ८४९ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"यावर साधकबाधक चर्चा होऊन, एस.राधास्वामी फौंडेशन यांनी देऊ केलेली जागा ही वायएमसीए व दिप्ती बिल्डर्स यांची आहे. या जागेबाबत एस.राधास्वामी फौंडेशन व दिप्ती बिल्डर्स यांचेत भाडेपट्टा करारनामा झालेला आहे. त्यानुसार एस.राधास्वामी फौडेंशन हे उपरोक्त जागा संस्थानला विनामुल्य भाडेपट्टयाने देणार आहेत, ती स्वीकारण्यात यावी व याकामी करावयाचे करारनामा इत्यादीसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त जागा ताब्यात मिळालेनंतर या ठिकाणी माहिती केंद्राचे कर्मचाऱ्यांसाठी निवासव्यवस्था व साईभक्तांसाठी प्रासंगिक निवासव्यवस्था करणेसाठी या जागेत आवश्यक असे फर्निचर व इतर निवासी सुविधा निर्माण करणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे यथावकाश सादर करावा."

उपरोक्त निर्णयांनुसार, दिनांक २४ जानेवारी, २००७ रोजी वाय.एम.सी.ए.कॉम्प्लेक्समधील दिप्ती हाऊसच्या दुसऱ्या मजल्यावरील युनिट क्रमांक २०१ ते २०४ या अंदाजे ३००० चौरस फुट जागेबाबत भाडेपट्टा करारनामा मा.दुय्यम निबंधक, मेरडपल्ली, सिकंदराबाद (आंध्रप्रदेश) यांचेसमक्ष रजिष्टर्ड नोंदणी क्रमांक १३८/२००७ ने नोंदविण्यात आलेला आहे. करारनामा नोंदणीचे वेळेस मा.दुय्यम निबंधक, मेरडपल्ली यांनी सांगितले की, हा भाडेपट्टयाचा करारनामा असल्याने विनामुल्य भाडेपट्टा करारनामा करता येणार नाही. त्यासाठी करारनाम्यात जागेचे भाडे नमूद करणे आवश्यक आहे. त्यावेळेस नाममात्र रुपये १५००/- मात्र दरमहा भाडे ठरवून करारनामा नोंदविण्यात आलेला आहे.

(क) उपरोक्त परिच्छेद अ व ब मध्ये विवेचन केल्यानुसार, सिकंदराबाद येथील एस.राधास्वामी फौंडेशन यांचे २०० चौरस फुट व ३००० चौरस फुट जागेसाठी अनुक्रमे भाडेपट्टा करारनामा क्रमांक १३८/२००७ दिनांक २४ जानेवारी, २००७ अन्वये दरमहा भाडे रुपये १००/- मात्र व भाडेपट्टा करारनामा क्रमांक १३९/२००७ दिनांक २४ जानेवारी, २००७ अन्वये दरमहा भाडे रुपये १५००/- मात्र भरणे संस्थानला आवश्यक होते.

तथापि, एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांनी त्यांचे दिनांक २४ जानेवारी, २००७ रोजीच्या पत्राने असे कळविले आहे की, एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांचे कार्यकारीणीच्या बैठकीत सदरचे जागांच्या भाडे भरण्याची जबाबदारी त्यांचा ट्रस्ट स्वीकारणार आहे व संस्थानला या जागांच्या भाडे पोटी कुठल्याही प्रकारची रक्कम भरण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

थोडक्यात, सिकंदराबाद येथे संस्थानने माहिती सुविधा केंद्रासाठी घेतलेल्या उपरोक्त दोन्ही जागांचे भाडे एस.राधास्वामी फौंडेशन, सिकंदराबाद यांचेमार्फत भरण्यात येणार असून, संस्थानला या जागांचे भाडे भरण्याची आवश्यकता नसलेबाबतचा नोंद घेणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीच्या माहितीस्तव सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात आली तसेच सिकंदराबाद येथील उपरोक्त दोन्ही जागी संस्थानचे माहिती-तथा-सुविधा केंद्र तयार करणेबाबत संबंधित विभागांनी उचित कार्यवाही करावी असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४८** **शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी छत्रपती मित्र मंडळ,शिर्डी यांना निधी देणे बाबत.**
**निर्णय क्र.२४३** अध्यक्ष,छत्रपती मित्र मंडळ,शिर्डी रजि.नं.महा/अह/५१२१/१९९७ यांनी दि.१२/०२/२००७ चे पत्रान्वये, " मा.आ.राधाकृष्णजी विखे पा.प्रणीत छत्रपती हेल्थ क्लब शिर्डी आयोजीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे सहकार्याने भव्य जिल्हास्तरीय "आमदार श्री" रुपये ११००१/- स्मृतीचिन्ह व "व छत्रपती श्री" रु.७००१/- व सर्व सहा गटांसाठी रु.३५,०००/- ची रोख बक्षिसे देणार आहोत. दिनांक ८ मार्च २००७ रोजी घेण्यात येणा-या या स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे रु.९५,०००/- अंदाजे खर्च

गृहीत धरुन संस्थानकडुन जास्तीतजास्त निधी मिळावा अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

"आमदार श्री" रुपये ११००१/- स्मृतीचिन्ह जिल्हास्तरीय
"बेस्ट पोजर" रुपये ५००१/- स्मृतीचिन्ह जिल्हास्तरीय
"छत्रपती श्री" रुपये ७००१/- स्मृतीचिन्ह तालुकास्तरीय
"बेस्ट पोजर" रुपये ३००१/- स्मृतीचिन्ह तालुकास्तरीय

तसेच जिल्हास्तरीय सर्व सहा गटांसाठी

१) प्रथम गट पारितोषीक रु.५०१/-, २) द्वितीय पारीतोषिक रु.३०१/-, ३) तृतीय पारातोषिक रु.२५१/- ४) चतुर्थ पारितोषिक रु.१५१/-, ५) पंचम पारितोषिक रु.१५१/-

तसेच तालुकास्तरीय सर्व सहा गटांसाठी

१) प्रथम गट पारितोषीक रु.३०१/-, २) द्वितीय पारीतोषिक रु.२०१/-, ३) तृतीय पारातोषिक रु.१०१/-, ४) चतुर्थ पारितोषिक रु.७५/-, ५) पंचम पारितोषिक रु.७५/-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) " छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे."

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.आ.राधाकृष्णजी विखे पा.प्रणीत छत्रपती हेल्थ क्लब शिर्डी आयोजीत केलेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी रुपये ५०,०००/- अर्थिक मदत देण्यात यावी. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ४९ महिलांच्या हळदी -कुंकू कार्यक्रमाचे नाट्यप्रयोगासाठी मदत मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.२४४** श्री शांताराम मिराणे समन्वयक, रथसप्तमी हळदी कुंकू समारंभ-२००७ यांचे दिनांक १५.०२.२००७ चे पत्रान्वये नाट्य रसिक संच व श्री साई समर्थ सेवा प्रतिष्ठाण शिर्डी यांचे संयुक्त सहकार्याने रथसप्तमी निमित्त स्थानिक महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम दिनांक १९.१.२००७ रोजी आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये महिलांच्या मागणीवरुन दिनांक १९.३.२००७ रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी मातोश्री कमला निर्मित "बिन बायकांचा तमाशा" हा नाट्यप्रयोग हॉटेल साई अमृत शिर्डीचे प्रांगणात आयोजित करण्यात येणार आहे. सदरचा कार्यक्रम हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) नाट्यरसिक संच व श्री साई समर्थ सेवा प्रतिष्ठाण , शिर्डी यांचे संयुक्त सहकार्याने आयोजित करण्यात आलेला आहे. त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत खालीलप्रमाणे मदत मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**०१)** दिनांक १९.३.२००७ रोजी येणाऱ्या ३५ कलाकारांची निवास, भोजन चहा व नाष्ट्याची सोय विनामल्य व्हावी.

०२) कार्यक्रमासाठी ३०x३० फूट चा स्टेज ३०x२० फूटाचा २ ग्रीन रुम (मंडप) व १५०x८० फूट जागेवर कनात

०३) आवश्यकतेनुसार प्रकाश व ध्वनीक्षेपन व्यवस्था

सदरहू पत्रावर मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी उपरोक्त सर्व व्यवस्था संस्थानमार्फत करावी असा शेरा दिला आहे.

तरी श्री शांताराम मिराणे, समन्वयक, रथसप्तमी हळदी कुंकू समारंभ-२००७ यांचे दिनांक १५.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये नाट्य रसिक संच व श्री साई समर्थ सेवा प्रतिष्ठाण शिर्डी यांचे संयुक्त सहकार्याने आयोजित केलेल्या नाट्यप्रयोगास ध्वनीक्षेपन व लाईट इ.ची व्यवस्था संबंधितांनी व निर्मंत्रित कलाकार निवास, भोजन व चहा नाष्टा इत्यादी व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य तसेच संस्थानमार्फत स्टेज ग्रीन रुम व कनात इत्यादीसाठी रुपये २०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५० अक्षय तृतीय मुहर्तावर संपन्न होत असलेल्या ३०१ सामुदायिक विवाह सोहळयाचे नियोजन करणे बाबत**

**निर्णय क्र.२४५** साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट,शिर्डीचे अध्यक्ष श्री कैलास गोविंदराव कोते यांनी त्यांचे दिनांक १७.२.२००७ चे पत्रान्वये श्री साईबाबांच्या पुण्यनगरीमध्ये एप्रिल २००७ महिन्यातील अक्षय तृतीयाच्या शुभ मुहर्तावर साई सिध्द चॅरिटेबल ट्रस्ट व दत्त धार्मिक एंवम परमार्थीक ट्रस्ट, इंदोर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने ३०१ सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मागील वर्षी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी विवाह सोहळ्यात भाग घेऊन अतिशय चांगल्या प्रकारे नियोजन केलेले होते. या विवाह सोहळयात सर्वधर्मिय १२२ जोडप्यांचे विवाह संपन्न झाले आहेत. तसेच श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांचेकडून वधू-वरांसाठी मिष्टान्न जेवण देण्यात आले होते. त्यात सुमारे ३५००० वऱ्हाडी मंडळीनी याचा लाभ घेतला होता. तसेच संसारपयोगी वस्तू,

मंगळसूत्र देण्यात आले होते. त्यामुळे या विवाह सोहळयास भव्य दिव्य स्वरुप प्राप्त झाले होते. त्यामूळे या विवाह सोहळ्याच्या नावलौकीकात भर पडली.

तरी यावर्षीही अक्षय तृतीयाच्या मुहर्तावर होत असलेल्या ३०१सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी यांनी सहभाग घेऊन विवाह नियोजनासाठी योग्य ती कार्यवाही करावी असे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट व दत्त धर्मिक एवंम परमार्थीक ट्रस्ट, इंदोर व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने अक्षय तृतीयाचे मुहर्तावर ३०१ सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात यावे. या विवाह सोहळ्यासाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी वधु-वरांचा पोशाख,मंडप,स्टेज,विद्युत रोषणाई, वाजंत्री इ. खर्च श्री साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट,शिर्डी यांचेमार्फत व मनीमंगळसुत्र, भांडी, प्रसिध्दीसाठी बोर्ड, बॅनर्स, दुरदर्शन/केबल जाहीरात, भोजन व्यवस्था, कलाकर व बॅण्ड पथकासह उर्वरित आवश्यक तो खर्च श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत करण्यात यावा. (कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०३ /वशी-०५/जनसंपर्क अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५१** **आरक्षण क्रमांक ०९ सर्व्हे नं. १/१ मधील जागेस संस्थानचे नांव लावणेबाबतचा अर्ज मागे घेणे बाबत**

**निर्णय क्र.२४६** आरक्षण क्र.०९ व १० सर्व्हे नं. १/१ मधील जागेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नांव लावणेबाबत तहसिलदार, कोपरगांव यांचेकडे दिनांक १०.०९.२००४ रोजी अर्ज करण्यात आलेला आहे.

शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी आरक्षण क्र.०९ मध्ये श्री साईबाबा संस्थान यांना संस्थानचे कंम्पाऊंड लगतची सर्व्हे नं. १/१ मधील १६ आर जागा देण्याचे नगरपंचायतीने सर्वसाधारण सभा दिनांक २१ जून २००६ चे ठराव क्र.२१ अन्वये ठरलेले आहे. तसेच आरक्षण क्र.०९ येथील नियोजित दुकानकेंद्रातील तळमजल्यावरील ५ दुकानगाळे पहिल्या मजल्यावरील १० दुकानगाळे व दुसऱ्या मजल्यावरील ऑडिटोरियम, दर्शन रांग व्यवस्था बांधकाम संस्थानसाठी करुन देण्याचे या ठरावाने मान्य केलेले आहे. तसेच याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ मधील तरतूदीनुसार शासनाची मान्यता घेऊन सदरील मिळकत हस्तातरण करण्यात येईल असे कळविले आहे.

तसेच संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६ सप्टेबर,२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७८१ अन्वये शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे उपरोक्त प्रस्तावास सहमती दर्शविलेली आहे.

उपरोक्त विवेचनानुसार सर्व्हे नं. १/१ मधील जागेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नावं लावणेबाबत तहसिलदार,कोपरगांव यांचेकडे करण्यात आलेला विनंती अर्ज मागे घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५२** **स.नं. १४८ मधील व्दारावती भक्तनिवास इमारतीवर वाढीव ४ था मजला(व्ही.आय.पी. रुम) बांधणे बाबत**

**निर्णय क्र.२४७** श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी दिवसेन दिवस साईभक्तांची गर्दी वाढतच आहे. त्याच बरोबर शिर्डी येथे येणाऱ्या व्ही.आय.पी.ची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढतच आहे. गर्दीचे वेळेस सर्वच व्ही.आय.पी.ची निवास व्यवस्था करण्यात अडचण निर्माण होते. त्यामुळे बऱ्याच वेळेस व्ही.आय.पी नाराज होतात. व्दारावती भक्तनिवास इमारतीवर ४ थ्या मजल्यावर व्ही.आय.पी. अे.सी. रुम करणे बाबत चर्चा झालेली आहे.

स.नं. १४८ मध्ये धर्मशाळेजवळ व्दारावती भक्तनिवासस्थानाचे बांधकाम चालू आहे. सदर इमारतीमध्ये तळमजला पार्कींग व ड्रायव्हर्स रुम करीता आहे. वरील तीन मजल्यावर साईभक्तांसाठी ॲटच टॉयलेट असलेल्या एकूण २४० खोल्या बांधण्यात येत आहेत. सध्या तिसरा मजला स्लॅबचे काम प्रगतीपथावर आहे.

आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून सदर इमारतीवर ४ था मजला वाढविणे बाबत दि.०७/०९/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे. "तळमजला अधिक चार मजले उभारणी करता येईल अशा प्रकारे फौन्डेशन स्ट्रक्चर डिझाईन करण्यात आले आहे. चौथ्या मजल्याचे बांधकामासाठी डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांची मंजुरी घ्यावी लागेल". चौथा मजला वाढीव बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांचे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सध्या व्दारावती तिसऱ्या मजल्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे एका जादा फ्लोअरचे बांधकाम करणे योग्य राहील, सध्याचे नियोजित इमारतीच्या ड्रेनेज लाईन व वॉटर सप्लाय लाईन इ. उपयोगात येतील त्यामुळे कमी खर्चात बांधकाम होईल. दि. १७/०२/२००७ चे पत्रान्वये आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी खालीलप्रमाणे एस्टीमेट सादर केले आहे.

अ) सध्याचे मंजूर निविदा दराने वाढीव मजल्याचे काम करणे कामी रु. ३,५२,१०,२२७.०० मात्र खर्च येईल.

**अथवा**

ब)सध्या रुम ऐवजी व्ही.आय.पी. रुम करावयाचे झाल्यास खालील प्रमाणे नवीन ॲटमचे काम करावे लागेल.

व्हिट्रीफाईड टाईल फ्लोअरींग/ स्कर्टींग

ग्रॅनाईट स्टोन फ्लोअरींग/ स्कर्टींग (टॉयलेट)

ग्लास टाईल डॅडो (पॅसेज)
प्लॅस्टिक पेंट
लिफ्टसाठी वाढीव रक्कम

सदर ॲटम विचारात घेऊन व्ही.आय.पी.रुम तयार करणेकामी अंदाजे रु. ४,३३,४३,०१५/- मात्र खर्च येईल.

तरी व्दारावती इमारतीवर चौथा मजला साध्या रुम अथवा व्ही.आय.पी. साठी करणेकामी येणारे खर्चास तसेच सदरचे काम सध्या काम करीत असलेल्या ठेकेदार यांचेकडून मंजूर निविदा दरात अथवा नव्याने निविदा मागवून करुन घेता येईल. याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन व्दारावती इमारतीचा ४ था (वाढीव) मजला व्ही.आय.पी. रुम म्हणून बांधकाम करणेस व याकामी येणारे रुपये रु. ४,३३,४३,०१५.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकरीता जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.११३ ते २४७ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी